म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२६९

# समग्र कविता संग्रह

— राम गणेश गडकरी

REFBK-0020251
REFBK-0020251

श्रीशं वंदे ।

# वाग्वैजयंती

किंवा

## कै० गोविंदाग्रजकृत

# समग्र कवितासंग्रह

[ श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, यांच्या प्रस्तावनेसह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अ. क्र. २९८०
विभाग आ
क्रमांक ९६
नों. दि. १०/०/९
REFBK-0020251
REFBK-0020251

क

कै० राम गणेश गडकरी

संगीत 'पुण्यप्रभाव', 'एकच प्याला', 'भावबंधन', 'राजसंन्यास', व
'प्रेमसंन्यास' इत्यादि नाटकांचे कर्ते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०२५१

तृतीयावृत्ति—१९२९

किंमत २ रुपये

आवृत्ति पहिली–१९२१—प्रती ३०००
आवृत्ति दुसरी – १९२३— ,, ३०००

पुणें, पेठ शनवार, घर नं. ५७० शनवार येथें अनंत सखाराम गोखले
यांनीं आपल्या 'विजय' छापखान्यांत छापिलें.

लक्ष्मण नारायण गोडबोले बुकसेलर्स व पब्लिशर्स, लक्ष्मीरोड, पुणें;
यांनीं प्रसिद्ध केलें.

या पुस्तकासंबंधीं भाषांतराच्या हक्कासुद्धां सर्व हक्क रा० शंकर गणेश गडकरी,
हायकोर्ट वकील, ८७ कसबा, पुणें यांनीं स्वतःकडे राखून ठेविले आहेत.

वरची विनोदाची रागदारी तिच्यावर वाजवितां येणार नाहीं. तरी पण या एकतारीवर आणि यमक व वृत्त यांचीं बंधनें सोसूनही गडकऱ्यांनीं आपल्या कवितांतून विनोदाचा पिंगा घातला आहे. उदाहरणार्थः–'एक समस्या', 'विहिणींचा कलकलाट', 'विचार', 'काय करावें !' 'आंधळ्यांची माळ' व 'हुकमेहुकूम' या कविता वाचल्या असतां काव्यही विनोदाच्या कार्याला कसें खेचून आणतां येतें हें दिसून येईल. इंग्रजींत हूड कवीची कविता एथून तेथून श्लेषयुक्त किंवा विनोदपर आहे. पण तुलना करावयाची तर गोविंदाग्रज व हूड यांची न करितां गंभीर व विनोदी अशी मिश्र कविता करणाऱ्या पोपचीच तुलना करावयास पाहिजे. पोपच्या डन्सिअडप्रमाणें मराठी वाङ्मयांतील 'शंखांचा बाजार' अशा स्वरूपाचें एक काव्य गडकरी लिहिणार होते असें समजतें. पण कदाचित् पोपइतका विद्वेषी गडकऱ्यांचा स्वभाव नसल्यामुळें म्हणा किंवा 'कवींचा कारखाना' या त्यांच्या विनोदी लेखांत या बाजाराचा थोडासा भाग दाखविला असल्यामुळें म्हणा–त्यांनीं हात आंखडता घेतला असावा.

पण गडकऱ्यांचें खरें कवित्व पहावयाचें तर तें या विनोदी कवितांतून जितकें सांपडेल त्यापेक्षां त्यांच्या इतर कवितांतूनच तें अधिक सांपडेल असें मला वाटतें. त्यांच्या काव्यांतील अस्सल प्रतिभाजन्य कल्पना मग त्या गोड असोत, गंभीर असोत, भीषण असोत; पहावयाच्या तर 'गोड निराशा,' 'विरामचिन्हें', 'गुलाबी कोडें', 'घुबड', 'भुतांचें गाणें,' 'बागेंत बागडणाऱ्या लहानग्या लाडक्यास' व 'कधीं' वगैरे कविता वाचकांनीं वाचून पहाव्या. अशाच इतरही आणखी क ीं कविता आहेत.

रसाच्या दृष्टीनें पाहतां गडकऱ्यांचे काव्यवाणींत प्रेमळपणाही ठिकठिकाणीं न येतो. 'प्रेमसंन्यास' किंवा 'पुण्यप्रभाव' या त्यांच्या नाटकांत प्रेक्षकांस यास लावणारे जे कांहीं प्रवेश आहेत त्यांच्याच तोंडीच्या कांहीं कविता या ासंग्रहांत आढळतील. 'राजहंस माझा निजला' ही कविता तर लहान याही तोंडीं बसली आहे; पण 'घुंगुरवाळा', 'प्रेमाचा प्रळयकाळ', 'मुरली', ी ओरडणाऱ्या कोकिळेस' वगैरे कवितांतून केवळ करुणरसच नव्हे; पण ान्य प्रेमळपणा दिसून येतो.

रा एक विशेष प्रकार गडकऱ्यांच्या कवितेंत आढळतो. त्याला 'शाहीर-श नांव मला द्यावेंसें वाटतें. गडकऱ्यांचा बखरी, पोवाडे, लावण्या, वगैरेंचा

अभ्यास फार कसून झालेला होता. 'सगनभाऊ', 'प्रभाकर', 'तुळशीराम', 'होनाजी बाळ' वगैरेंचा उल्लेख त्यांनीं 'महाराष्ट्रगीतां'त इतर कवींबरोबर केलेला असला तरी या चौघांच्या कवितेइतकें वाचन दुसऱ्या महाराष्ट्रकवींचें त्यांचें झालें नसावें. गडकऱ्यांना जुन्या मराठी भाषेचा अलीकडे विशेष नाद लागलेला असून त्यांनीं त्या भाषासांप्रदायाचें पुनरुज्जीवन करण्याचा जोराचा प्रयत्नही चालविला होता. कांहीं वर्षांपूर्वी गडकऱ्यांनीं आपल्या 'राजसंन्यास' नाटकांतील कांहीं प्रवेश मला वाचून दाखविले; त्यांत या नवीन सांप्रदायाचा त्यांचा अभ्यास इतका दिसून आला कीं, कांहीं कांहीं वाक्यें अर्थ समजण्याकरितां मला त्यांजकडून दोन दोनदां वाचून घ्यावीं लागलीं. रंगभूमीवर हें नाटक चालू असतां प्रेक्षकांस ही भाषेची अडचण भासल्याशिवाय राहणार नाहीं असेंहि मीं त्यांना म्हटलें. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, शाहिरांच्या काव्याचा अभ्यास त्यांनीं फार केला होता व प्रस्तुत कवितासंग्रहांतील 'प्रेम आणि मरण', 'मुरली', 'कुंडल' वगैरे कवितांतून हें दिसून येतें. 'महाराष्ट्रगीत' ही कविता अभिमानावेशानें ओथंबलेली आहे. ही कविता अर्धवट राहिलेली असून कोणा महाराष्ट्रप्रेमी कवीला पूर्वीच्या धोरणानें पुरी करण्याची बुद्धि झाल्यास महाराष्ट्रांत सभांतून वगैरे म्हणण्याला ती उपयोगी पडेल.

गडकरी यांनीं आपल्या कवितांतून कांहीं नवीन शब्दसांप्रदाय निर्माण केलेले आहेत. उदाहरणार्थ, 'अश्रूंची मोहनमाळ', 'फुलती दुनिया', 'गाणें झुळझुळणें', 'गाणें उधळणें', 'जिवाचा रास', 'जिवाची झूल' इत्यादि. भूगर्भांत ज्याप्रमाणें उष्णता व दडपण यांच्या योगानें ओबडधोबड पण सतेज हिऱ्याचे दगड बनतात, तसेच प्रतिभेची उष्णता व छंदोबद्धतेचें दडपण यांच्या योगानें काव शब्दहीरक बनतात. त्यांतूनही गडकरी हे नवीन शब्दरचनेला न भिणारेच; सु पण साधल्यास ती हटकून करण्याचा हव्यास धरणारे असल्यानें त्यांच्या जव न कापलेलें किंवा न घांसलेलें असें जवाहीर सर्वत्र उधळलेलें आढळतें. कवि

प्रस्तुत लेख हा प्रस्तावनारूप आहे, टीकारूप नाहीं; तथापि गडक काव्यरचनेंतील ठळक दोषही जातां जातां सांगण्यास हरकत नाहीं. हे क्वचित् ठिकाणीं व्याकरणदृष्ट्या त्यांची भाषा अशुद्ध तर असतेच; अव्यवस्थित रचना, कांहीं ठराविक शब्दांची व कल्पनांची पुनरुक्ति प्रयोग व उत्प्रेक्षातिरेक हेही त्यांचे हातून घडून येतात. तसें

बऱ्याच क्लिष्ट आहेत व सर्वसामान्यपणें मुख्य दोष सांगावयाचा तर कल्पनांची शब्दांवर जबरी, त्यामुळें येणारी कृत्रिमता व प्रसादाभाव हा होय. या दृष्टीनें रे० टिळक, ठोमरे किंवा स्वतः गडकऱ्यांनीं मानलेले गुरु केशवसुत यांची दिशा व स्वतः गडकऱ्यांची दिशा या अगदीं भिन्न वाटतात. इंग्रजी कवीची उपमा द्यावयाची तर गडकऱ्यांचें काव्य वर्ड्स्वर्थ किंवा टेनिसन यांपेक्षां शेले किंवा ब्राउनिंग यांच्या वळणाकडेच अधिक झुकतें.

तथापि हे दोष असूनही कवि या नात्यानें आधुनिक वाङ्मयांत गडकऱ्यांना फार उच्च प्रतीचें स्थान मिळालें आहे यांत शंका नाहीं व तें योग्यही आहे. कल्पनेचें धाडस व चमत्कृति हा जर काव्याचा एक मुख्य गुण मानला, तर त्याबाबतींत गडकऱ्यांची बरोबरी करणारे कवि किती निघतील असा प्रश्न टाकण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यांच्या नाटकांच्या आधारानें व स्वतंत्रही गोविंदाग्रजांची कविता लोकांच्या जिव्हाग्रीं बसून खेळती झाली आहे आणि ज्यांच्याकडे बोट दाखवून जुन्या नव्या कवितेचें भांडण भांडण्याला आणि आधुनिक मराठी कवितेची तरफदारी करण्याला जोर येतो, अशा कवींत गडकऱ्यांची गणना बरीच प्रामुख्यानें करितां येईल. गडकरी यांचें कविचरित्र एखाद्या धूमकेतूप्रमाणें अकल्पित व तेजस्वी होऊन गेलें; पण धूमकेतूच्या तेजापेक्षां गडकऱ्यांची काव्यकीर्ति त्यांच्या पश्चात् अधिक काळ टिकेल यांत शंका नाहीं. 'नवकवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार' अशा शब्दांनीं गडकऱ्यांनीं बालकवि ठोमरे यांना आपल्या काव्यांत भूषविलें आहे. उदारबुद्धीचें हें देणें इतर कविही कांहीं काल गोविंदाग्रजास देऊं इच्छितील असें मला वाटतें. कारण, सुदैवानें सरस्वतीच्या जरिपटक्याच्या मानांत तरी वतनदारी होऊं शकत नाहीं.

पुणें,
ता. १३ ऑगस्ट, १९२१

न. चिं. केळकर



श्रीयुत नरसिंह चिंतामण

ऊर्फ

तात्यासाहेब केळकर

# कै० राम गणेश गडकरी

"—Ram Ganesh Gadkari with whom we were acquainted personally as well as in his character as an author *remarkable enough by performance but greater still in promise.*"

—Fergusson College Magazine

कवीचें कुल मुख्यतः जरी अप्रसिद्ध असलें तरी त्याच्या काव्यौघाबरोबरच त्याच्या घराण्याच्या कीर्तीचा प्रवाह सुरू होतोच होतो. या दृष्टीनें पाहिलें असतां कै० राम गणेश गडकरी यांच्या नांवाबरोबरच गडकरी घराण्याचें नांव महाराष्ट्रीय जनांच्या श्रवणांत दुमदुमूं लागलें असें म्हटलें असतां त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं. तथापि एकंदर गडकरी घराण्याच्या इतिहासाचा विचार केला असतां वस्तुस्थिति कांहीं तशी नाहीं असें दिसून येतें. उत्तर हिंदुस्तान व दक्षिण, यांच्या जवळजवळ सीमारेषेवर असलेल्या, कीं ज्याच्या तटावरून दक्षिण देश सोडून वर सरकलेल्या वीर मराठ्यांना आपल्या मातृभूमीकडे प्रेमपूर्वक नजर टाकतां येऊन, दिल्लीच्या सम्राटासकट 'हिंदुस्थानांतील' सर्व राजेरजवाड्यांवर डोळे वटारतां येत असत, त्या मांडवगड किल्ल्याच्या जबाबदारीचें ओझें एकेकाळीं आपल्या खांद्यावर घेणाऱ्या गडकऱ्यांच्या घराण्यांत राम गणेश यांचा जन्म झाला. देशाच्या कोनाकोपऱ्यांत यशोध्वनि जाऊन दुमदुमत रहाण्याजोगें मोठें महत्त्वाचें कृत्य, ऐतिहासिक काळांतील या घराण्याच्या पुरुषांकडून, अगर मध्यंतरींच्या काळांतील या घराण्याच्या पुरुषांकडून कदाचित् झालें नसेल; तरी पण राम गणेश यांचें घराणें अगदींच अप्रसिद्ध होतें असें म्हणतां येणार नाहीं. पित्याच्या घराण्याप्रमाणें राम गणेश यांच्या मातेचेंही मूळ घराणें असेंच ऐतिहासिक महत्त्वाचें आहे. मावळांतील वारखाचे देशपांडे यांच्या घराण्यांतील राम गणेश यांच्या मातुःश्री आहेत. आतां इतकें मात्र निखालसपणें कबूल केलेंच पाहिजे, कीं स्वतः राम गणेश यांनीं आपल्या कीर्तीनें या दोन्ही घराण्यांवर—विशेषतः गडकरी घराण्यावर—यशाचा उजाळा दिला आहे.

राम गणेश यांचा जन्म इ. सन १८८५ सालीं गुजराथेंत नवसरी येथें झाला. जन्म गुजराथेंत, घराजवळचे शेजारपाजारही गुजराथी, एकंदर वातावरणही गुजराथी, त्यामुळें या महाराष्ट्राच्या महाकवीनें प्रथमतः आपल्या बालविचारांना शब्दस्वरूप देत असतां गुजराथी भाषेचाच आश्रय केला या एकंदर गोष्टींमुळें राम गणेश यांना गुजराथ व गुजराथी भाषा यांबद्दल फारच मोठा आदर असे. एखादे वेळेस त्यांनीं थोडेंसें प्रेमाचें, थोडेंसें चेष्टेनें " मी तर काय बोलूनचालून परदेशी गुजराथी " असें म्हणावें. सगळ्यांत मजेची गोष्ट अशी कीं, ज्याप्रमाणें प्रथमतः या महाराष्ट्र–काव्य–कोकिलाच्या कंठांतून गुजराथी शब्द बाहेर पडले, त्याचप्रमाणें या महाराष्ट्राच्या लाडक्या नाटककाराच्या लेखणीमधून वयाच्या पांचव्या किंवा सहाव्या वर्षीं एक 'सुरसुंदरी' किंवा अशाच अर्थाचें एक गुजराथी नाटक उतरलें. ज्या घरांत राम गणेश रहात होते त्या घरासमोर एक गुजराथी नाटक मंडळी रहात असे. त्या मंडळीच्या तालमीचा आरडाओरडा ऐकून, आपल्यालाही गुजराथी नाट्यलेखनाची स्फूर्ति झाली असें राम गणेश सांगत. तें नाटक तीन दिवसांत पूर्ण होऊन चौथे दिवशीं त्या गुजराथी नाटक मंडळीच्या मालकाकडे गेलें देखील होतें. अर्थातच तें नाटक बसणें कांहीं शक्य नव्हतें. तरी पण यावरून सिद्ध हेंच होतें कीं, महाराष्ट्र-नाट्य-संगीताचा सूचक ध्वनि, गुजराथी पाळण्यांत दिसणाऱ्या–हालणाऱ्या पायांतील 'घुंगुरवाळ्यां'तून पूर्वीच निघाला होता. संगीत पुण्यप्रभाव नाटक रंगभूमीवर येऊन त्याचा जेव्हां दाही दिशा बोलबाला सुरू झाला तेव्हां मुंबईच्या एका गुजराथी नाटक मंडळीनें त्या-नाटकाचें गुजराथी भाषांतर करून देण्याविषयीं राम गणेश यांना विनंती केली होती. त्या वेळीं झालेला राम गणेश यांचा आनंद अवर्णनीय होता. बाळपणीं दबून गेलेल्या कोवळ्या आशेचा तो तरुण उन्माद होता. त्या उन्मादाच्या भरांत राम गणेश यांनीं पुण्यप्रभावाच्या भाषांतराला सुरवात केली होती. पुण्यप्रभाव नाटकांतील सुप्रसिद्ध 'नाचत ना गगनांत नाथा' या पद्याचें भाषांतर इतकें उत्कृष्ट झालें होतें कीं, मूळ व भाषांतरित अशीं पदें एकत्र आणलीं असतां भाषांतर कोणतें व कोणाचें भाषांतर हें सांगतां येणें कठीण गेलें असतें; इतकें राम गणेश यांचें गुजराथी भाषेवर प्रभुत्व होतें. 'जवळजवळ माझी मातृभाषाच गुजराथी आहे' असें त्यांनीं केव्हां केव्हां म्हणावें.

बाल्य आणि तारुण्य यांच्या दरम्यानच्या आयुष्यांत असतां राम गणेश यांची

जितकी त्यांच्या आप्तेष्टांकडून आबाळ झाली तितकी कांहीं पुढच्या आयुष्यांत अगर बालपणांत झाली नाहीं ! विशेषतः बालपणांतच त्यांना विशेष सुख झालें असें म्हणावें लागतें. तें बालपणाच्या ज्या मनोरंजक गोष्टी सांगत त्यांवरून, ज्या आयुष्य-नाटकाची नांदी इतकी गोड होती त्याचें पर्यवसान निराशेनें निगडित अशा आयुष्यक्रमांत होईल, असें एखाद्या पटाईत ज्योतिष्याला तरी सांगतां आलें असतें कीं नाहीं, याची शंकाच आहे. राम गणेश आपल्या पिताजींचे अत्यंत लाडके असत. मात्र त्यांच्या एकंदर वर्तनांतील तीव्रपणा ध्यानांत घेऊन गणेशपंत गडकऱ्यांनीं आपल्या लाडाला कधींच अमर्याद होऊं दिलें नाहीं. आपल्या तीर्थ-रूपांचा, प्रसंगीं कडक, परंतु इतर वेळीं अत्यंत प्रेमळ, असा नेतेपणा जर आपल्याला बरेच दिवस लाभला असता तर आपल्या आयुष्याला फारच हितावह, असें वळण लागलें असतें असें राम गणेश वारंवार म्हणत असत.

ज्याचीं पुसटतीं पावलें पुढील आयुष्यक्रमांत वरचेवर दिसत असत, तो स्वभावांतील हट्टीपणा राम गणेश यांच्या बाल्यावस्थेंत विशेष प्रकट स्वरूपांत असे. एखादी गोष्ट करावयाची म्हटली, कीं करावयाची; मग कितीही अडचणी येवोत, वडीलधारे कितीही रागावोत; त्याची क्षिति बाळगावयाचीच नाहीं. त्याचप्रमाणें एखादी गोष्ट करावयाची नाहीं असें त्यांच्या मनानें घेतलें, कीं मग इकडची सृष्टि तिकडे झाली तरी कांहीं त्यांचें मन आपल्या जागेचें हलावयाचें नाहीं. लहानपणीं पोहण्याचा त्यांना अतिशय नाद असे; राम गणेश यांच्या वडिलांनीं कांहीं त्यांना परवानगी देऊं नये; वेळप्रसंगीं धाकटदपटशाही दाखवावा; परंतु संधी सांपडली कीं, यांनीं आपली पुन्हा नदीकिनाऱ्याकडे धांव घ्यावीच. राम गणेश असेच एकदां सर्वांचा डोळा चुकवून पोहावयास गेले असतां घरच्या एका म्हाताऱ्या मुसलमान शिपायानें ती बाबद त्यांच्या वडिलांच्या नजरेस आणिली. आपली चहाडी त्या मुसलमानानें केली असें वाटून, राम गणेशांच्या बालमनाला इतका प्रखर राग आला कीं, रात्रीं तो गवत अंथरून निजला असतां त्याच्या आंगा-खालच्या गवताला आग लावून त्याला जिवंत जाळून टाकावयाचें मीं ठरविलें होतें असें ते सांगत असत. त्याच मुसलमान शिपायाचा छोटा मुलगा राम गणेश यांचा बालखेळगडी होता. आपल्या खेळगड्याचा बाप मरणार या विचारानें, तो मुसलमान शिपायाला जिवंत जाळण्याचा विचार मागें सारला. त्यांच्या गुजराथी शेजाऱ्याची 'दुरामन' नांवाची एक मुलगी रोज सकाळीं अगदीं नियमानें त्यांना

शाळेंत न्यावयास येत असे. 'लालाजी चल' या दोन शब्दांनीं आपली कशी त्रेधा उडत असे, तिला चुकविण्याकरितां आपण काय काय अव्कड युक्त्याप्रयुक्त्या योजत असूं, व शेवटीं त्या गुजराथी भगिनीपुढें आपले सर्व प्रयत्न कसे वायफळ ठरत असत, वगैरे हकीगतींचें वर्णन राम गणेश मोठ्या मजेदारपणानें सांगत असत. हा त्यांचा हट्टी स्वभाव अनेक वेळां त्यांच्या इष्टमित्रांच्या निदर्शनास आला होता; आणि त्याचा अतिरेक म्हणजे त्यांच्या अखेरच्या दुखण्यांत झाला. तो इतका कीं, त्यांच्या अकाली मृत्यूला जीं कांहीं प्रमुख कारणें झालीं त्यांपैकीं हा त्यांचा हट्टी स्वभाव एक होता असें बिनधोकपणें म्हणतां येईल.

तीर्थरूपांच्या बरोबर गुजराथेंत असतां, पुढें पितृनिधनानंतर कर्जतच्या शाळेंत दिवस काढीत असतां, अगर चुलत्यांच्या आश्रयाला असल्या वेळीं, राम गणेश यांच्या हूड स्वभावाचा विशेष जोर असे. अगदीं १९०५ पर्यंत त्यांची शरीर-प्रकृति वाखाणण्यासारखी होती. अंगांत जरा जोर असला म्हणजे साहजिकच हूडपणा करावासा वाटतो. पाप्यांचे भावी पितर माशा मारण्याखेरीज काय करणार? शाळेतील अभ्यास नीटनेटका राखून दंगेधोपे, मारामाऱ्या करण्याकडे राम गणेश यांची मनःप्रवृत्ति फार धांव घेत असे. दुसऱ्या खेपेस नवसरीस गेल्या वेळीं राम गणेश तितके मोठे झाले होते. तेव्हां गुजराथी व मराठी शाळा यांच्यामधील विद्यार्थ्यांची मोठी चुरस असे; व दोनही पक्षांच्या मोठमोठ्या मारामाऱ्या होत. त्यांत मराठी पक्षाचे नेते राम गणेश असावयाचे. एकदां त्यांपैकीं कांहीं गुजराथी पोरांना त्यांनीं आपल्या घरांत कोंडून बडविले होतें; व मोबदल्यादाखल दाम-दुपटीनें मार मिळविला होता! कर्जतच्या शाळेत असतां तर त्यांनीं फारच वांड-पणा केला होता; व त्याच्यासाठीं खरपूस बक्षीसही पैदा केलें होतें. गुजराथनिवासा-पेक्षां, वडिलांच्या मृत्यूनंतर शिक्षणासाठीं म्हणून जेव्हां राम गणेश यांना कर्जत येथें ठेविलें होतें तेव्हां ज्या ज्या गोष्टी घडल्या, जे जे प्रसंग अनुभविले, त्यांचें स्मृतिचित्र त्यांच्या अंतःकरणावर स्पष्ट उमटलें गेले होतें. त्या चित्राची पडछाया अथवा त्या पडछायेचे कांहीं भाग, त्यांच्या काव्यपटावर मधून मधून उमटलेले दिसतातच.

कर्जतच्या शाळेंत असतांना त्या 'चिमण्या जगांत' राम गणेश यांच्या हुषारी-विषयीं मोठी ख्याति असे. त्यांच्या बुद्धीचा तीव्रपणा व तीव्र बुद्धीचें भावी कर्तव्य ओळखणारी एक व्यक्ति त्या वेळीं कर्जत येथें होती. त्या व्यक्तीचें नांव

**कृष्णाजी भिकाजी जागळकर.** सदर जोगळेकर हे तेव्हां कर्जतच्या शाळे-चे हेडमास्तर होते. राम गणेश हे कोणीतरी पुढें मागें मोठे होणार हें या मास्तर-साहेबांनीं जाणलें असावें. कारण, त्यांची राम गणेश यांच्या अभ्यासक्रमावरच नव्हे, तर वर्तनक्रमावरसुद्धां मोठी करडी नजर असे. या मास्तरसाहेबांच्या उपकारी वर्तनादाखल पुढें राम गणेश प्रसंगीं अंतःकरणपूर्वक आभार मानीत. इंग्रजीचा ओनामा राम गणेश याच मास्तरसाहेबांपाशीं शिकले. पहिल्या प्रायमर"चें शेवटचें पान राहिलें असतां जोगळेकर मास्तरांनीं राम गणेशांचें इंग्रजी शिक्षण थांबविलें. 'मला येतें आहे त्यापेक्षां एकच पान कमी शिकविलें. कारण तेवढीच विद्या अधिक अशी माझ्यापाशीं असूं दे. मीं तुला हें शेवटचें पान शिकविलें नाहीं तरी तुझें इंग्रजीचें ज्ञान कमी होणार आहे थोडेंच ! कांहीं दिवसांनीं तूं मोठा पंडित होशील व होणारच अशी माझी खात्री आहे' असें म्हणून मास्तरसाहेबां-नीं मोठ्या प्रेमळपणानें राम गणेश यांच्या पाठीवरून हात फिरविला. सदर प्रसंगा-चें वर्णन राम गणेश अगदीं भरल्या अंतःकरणानें करीत असत. आणि म्हणत कीं, जर मला कांहीं यश प्राप्त झालें असेल तर त्यांत जोगळेकर मास्तरांच्या आशीर्वादाचा मोठा वांटा आहे.

कर्जतच्या शाळेंतील आयुष्याचा ज्याप्रमाणें राम गणेश यांच्या अंतःकरणावर ठसा उमटला होता, त्याचप्रमाणें मॅट्रिकच्या वर्गांत असतां न्यू इंग्लिश स्कूलमध्यें व विशेषतः फर्ग्यूसन कॉलेजमधील आयुष्यांतील आठवणींचें प्रतिबिंब त्यांच्या अंतःकरणादर्शावर उमटलें होतें. फर्ग्यूसन कॉलेज या संस्थेसंबंधीं त्यांना अनिवार प्रेम वाटत असे. फर्ग्यूसन कॉलेजचें नांव निघालें कीं, कृतज्ञतेनें त्यांचें अंतःकरण भरून येत असे व त्यांच्या तोंडून तेव्हां जे प्रशंसोद्गार निघत असत ते म्हणजे अंतःकरणांतून उमटून निघालेले काव्योद्गारच निघत असत. 'तोड ही माळ' या नाटकांत फर्ग्यूसन कॉलेज व फर्ग्यूसन कॉलेजचे अध्यापक यांच्यासंबंधींच्या धन्योद्गारांचे एक स्वगत भाषण नायकाच्या तोंडीं येणार होतें; परंतु राम गणेश यांच्या अकालीं मृत्यूनें जशा त्यांच्याबद्दलच्या भावी आशा नष्ट झाल्या त्याबरोबर-च 'तोड ही माळ' हें नाटक व त्याचें अंतरंगही नष्ट झालें ! फर्ग्यूसन कॉलेजशीं अर्थाअर्थीं संबंध नसतां कांहीं कर्तव्यशून्यांकडून जी कुत्सितपणानें टीका करण्यांत येते त्या कर्मनष्टांना, अथवा फर्ग्यूसन कॉलेजच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन

रिकामे झालेल्या शिव्या देणाऱ्या कृतघ्नांना त्या स्वगत भाषणापासून बरेंचसें शिकण्यासारखें झालें असतें खास. पण—पण आतां त्याचें काय !

फर्ग्यूसन कॉलेजमध्यें असतां राम गणेश यांची कीर्ति चांगले विद्यार्थि म्हणून असण्याऐवजीं बुद्धिमान् व खोडकर विद्यार्थी म्हणूनच विशेष असे. मुलगा कॉलेज-मध्यें गेल्यावर त्याच्या विचारांत कसा कसा फरक होतो व जर त्याच्यावर कोणाचा दाब नसेल तर त्याचे विचार दिवसेंदिवस कसे उथळ होत जातात या-विषयीं स्वतःच्या अनुभवाच्या म्हणून स्वतः आपल्या अगर तत्कालीन सोबत्यांच्या अनेक गोष्टी राम गणेश सांगत असत आणि अशा उथळ विचारांच्या व मोकळ्या जिभेच्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांवर त्यांचा विशेष कटाक्ष असे. फर्ग्यूसन कॉलेजमध्यें असतांनाच त्यांनीं आपला 'पानपतचा फटका' लिहिला होता व तो त्या वेळच्या कॉलेजवसतिगृहांतील विद्यार्थ्यांना फारच आवडला होता. राम गणेश यांच्या अंगीं जो जन्मसिद्ध विनोदी स्वभाव व कोटीबाजपणा भरला होता तो फर्ग्युसन कॉलेज-मध्यें येईतों अर्धोन्मीलितावस्थेत असून तेथें आल्यावर तो विशेषपणानें विकास पावूं लागला असावा असें वाटतें. त्यांच्या स्वभावांतील या विशेष धर्मामुळेंच ते आपल्या कॉलेजांतील सवंगड्यांना व पुढील आयुष्यांतील स्नेहीसोबत्यांना प्रिय असत असें नव्हे, तर त्यांचें ज्यांच्याशीं जुळत नसे अशांनासुद्धां आपलें त्यांच्या-शीं जुळतें करून घेऊन त्यांच्या गुदगुल्या करणाऱ्या संभाषणाचे आपण वांटेकरी व्हावें असें वाटत असे.

राम गणेश यांच्या नाटकांच्या लोकप्रियतेचें बरेंचसें रहस्य त्यांच्या सात्त्विक विनोदांत व चकित करणाऱ्या कोटीबाजपणांतच सांठविलें गेले आहे. त्यांच्या नाटकाचा गंभीर भाग तर हृदयाला पटतोच पटतो; परंतु त्यांचा विनोद सरसकट सर्वांच्या हृदयाला हालवून सोडतो. हें झालें सार्वजनिक कार्याचें. खासगी वर्तनांत-ही त्यांच्या विनोदी कोट्यांप्रमाणे त्यांचे गंभीर विषयावरचे गंभीर विचार नीट मनन करण्यासारखे असत. काव्य, नाटक, विनोद, तत्त्वज्ञान, थोडेंसें राजकारण, सामाजिक सुधारणा यांसारख्या विषयांवर त्यांचे विचार खरोखरीच मोठे खोल व उदात्त असत. त्या विचारांत ठराविक ठशाचें थोडेंसुद्धां दर्शन व्हावयाचें नाहीं. त्या विचारांतील प्रत्येकाचा प्रत्येक भाग नावीन्यानें नाहलेला असावयाचा.

ईश्वरदत्त देणग्यांना जर मानवी उद्योगाची जबर जोड दिली नाहीं तर त्या देणग्यांवर गंज चढून कालांतरानें त्या मातीमोलाच्या होतात, ही गोष्ट राम गणेश

यांच्या मनाला चांगलाच पटलेली असावी. ईश्वरानें दिलेल्या बौद्धिक ऐश्वर्याची त्यांना अगदीं पुरेपूर जाणीव होती. त्या ऐश्वर्याचा उपयोग कोणत्या कार्याकडे व्हावयाचा हेंही पण त्यांना लौकरच उमजले होतें. म्हणून आपल्या भावी कार्याला उपयोगी व बुद्धीला पोषक असा हा उद्योग अगदीं विद्यार्थिदशेंत असतांनाच चालू होता. पूर्ण जाणिवेनें असा हा उद्योग कॉलेज कोर्स सोडून किर्लोस्कर मंडळींत राहिल्या वेळींच सुरू झाला असावा. तत्पूर्वींचा वाचनाचा उद्योग नैसर्गिक आवडीमुळें परंतु अजाणपणानेच होत असावा. हातीं लागेल ते पुस्तक वाचून हातावेगळें करावयाचें–मग तें पुस्तक कोणतें कां असेना–असा त्यांचा क्रम असे. फर्ग्यूसन कॉलेजमध्यें रहात असतां, निजण्यापूर्वीं एखाद्या पुस्तकाचीं निदान पन्नास पानें तरी वाचून झालींच पाहिजेत असा त्यांनीं निश्चय केला होता. तात्पर्य काय, किर्लोस्कर मंडळींत दाखल होण्यापूर्वींचा वाचनाचा उद्योग जरी प्रचंड स्वरूपाचा असला तरी तो एकाच धोरणानें, विशिष्ट दिशेनें, विशेष हेतूनें चालविला नव्हता. असें जरी असलें तरी त्या प्रचंड व अखंड वाचनाचा उपयोग झाल्यावांचून राहिला नाहीं खास. हरएक विषयावरचे त्यांचे विचार नेहमीं तयार असत, याचें रहस्य या जरभेसळीच्या अखंड वाचनप्रवाहाच्या तळाशींच सांपडतें. त्याचप्रमाणें एखाद्या विषयाच्या साधकबाधक बाजूंचे सप्रमाण विचार जे त्यांच्या लेखनांत सांपडतात त्यांचें तरी कारण या त्यांच्या वाचनांतील विलक्षण विविधत्वाखेरीज दुसरें काय असणार ? राम गणेश गडकरी म्हणजे चहापान, विडीपान व साळसूद गप्पा यांचें आगर असे मानणारे कांहीं लोक आमच्या आढळांत आले आहेत, त्यांनीं ही त्यांच्या उद्योगाची माहिती अवश्य ध्यानांत ठेवावी.


किर्लोस्कर मंडळींत आल्यावर त्यांचें वाचन नाटकें, नाट्यरचना, नाट्य-टीका, काव्य, काव्य-टीका व विनोद येवढ्यापुरतेंच मर्यादित झालें असावे असें एकंदर माहितीवरून वाटतें. विशेषतः विनोद व नाट्यवाङ्मय यांच्यावरच त्यांच्या वाचनाचा विशेष भर असावा. नाट्यवाङ्मयाच्या वाचनांत त्यांना पुण्याच्या नाटयग्रंथसंग्रहालयाचा विशेष उपयोग झाला असावा. तेथेंच त्यांचा आवडता नाटककार व्हिक्टर ह्यूगो त्यांना भेटला. त्यांच्या जिव्हाळ्याचा दोस्त मार्कट्वेन याची विशेष सलगी याच कालांत झाली आणि विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशी कीं, राम गणेश यांचे लेखन-गुरु श्री० तात्यासाहेब कोल्हटकर यांची प्रत्यक्ष गांठ किर्लोस्कर मंडळींत असतांनाच पडली.

किर्लोस्कर मंडळीबरोबर असतांना एका मुक्कामीं राम गणेश यांना एका सद्-गृहस्थाच्या घरीं मोरोपंताचा समग्र काव्यसंग्रह आहे असें समजलें. आपल्या लोकांचा पुस्तकांच्या बाबतींतील प्रामाणिकपणाचा पक्का अनुभव आल्यामुळें असो, अगर दुसऱ्या कांहीं कारणांमुळें असो, ते गृहस्थ कांहीं आपला **मोरोपंत** राम गणेश यांच्या हवालीं करावयास तयार होईनात. राम गणेश यांनीं अनेक प्रकारें विनविलें. त्या गांवांतील ओळखीच्या एकदोन वजनदार लोकांच्या मध्यस्थीची मात्रा दिली, तेव्हां कोठें त्या गृहस्थाच्या घरीं जाऊन वाचावयास त्या गृहस्थानें परवानगी दिली. रोज सकाळीं अकरा वाजतां जेवण करून जे त्या गृहस्थाच्या घरीं जावयाचें ते सायंकाळीं पांच साडेपांच वाजतां परत यावयाचें. अशा दीर्घोद्योगानें, मंडळीचा मुक्काम संपावयाच्या आंत राम गणेश यांनीं मोरोपंताचा समग्र काव्यसंग्रह वाचून काढला. ज्याला मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवावयाचें आहे त्यानें मोरोपंताचा नीट अभ्यास केला पाहिजे असें राम गणेश यांचें ठाम मत होतें. चिपळुणकरांचीं संस्कृत काव्यांचीं भाषांतरें, वामन पंडितांची कविता, तुकोबारायांचे अभंग व ज्ञानेश्वर महाराजांची जगमान्य ओवी या सर्वांचा अभ्यास त्यांनीं नक्की केव्हां केला हें कांहीं समजत नाहीं. चिपळूणकरांचें मेघदूताचें भाषांतर त्यांचें फार आवडतें होतें. छोट्या चिपळूणकरांची निबंधमाला त्यांनीं अगदीं अलीअलीकडे वाचिली. आगरकरांच्या लेखनाचा अभ्यास त्यांनीं फार करून फर्ग्यूसन कॉलेजमध्यें असतांना केला असावा. त्याचप्रमाणें श्री० कोल्हटकरांच्या नाटकांचाही अभ्यास तेथेंच झाला असावा. ज्यांचे ते आपल्याला सच्चे चेले म्हणवून घेत असत त्या आधुनिक महाराष्ट्र कविकुलगुरु **केशवसुतांच्या** कवितांची व राम गणेश यांची ओळख यापूर्वी किंवा फार तर याच सुमारास झाली असावी. त्यांचा आवडता आंग्लकवि बायरन याची त्यांनीं नीट ओळख केव्हां करून घेतली याचाही मागमूस लागत नाहीं. कालिदासाचा रघुवंश, कुमारसंभव, शाकुंतल, भवभूतीचें उत्तररामचरित, मृच्छकटिक, वेणीसंहार वगैरे ग्रंथ त्यांच्या विशेष आवडीचे होते. यांचा अभ्यास फार-करून त्यांनीं किर्लोस्कर मंडळींत असतांनाच केला होता. महाभारत व रामायण यांचीं तर किती पारायणें झालीं होतीं तें सहज सांगतां येण्यासारखें नाहीं. महाभारत, रामायण, पांडवप्रताप वगैरे-सारखे ग्रंथ हातीं आल्यास, राम गणेश यांनीं अगदीं लहान असल्यापासून रात्रीच्या रात्री जागून काढाव्या व आपल्या लहान

भावांना त्या ग्रंथांचें रहस्य समजून सांगण्याचा प्रयत्न करावा. वाचनाच्या बाबतींत जितकें सांगावें तितकें थोडेंच होणार आहे. कारण राम गणेश यांच्या एकंदर बत्तीस वर्षांपैकीं वीसपंचवीस वर्षें वाचनांत गेलेलीं, तेव्हां त्या वाचनाचें वर्णन एवढ्याशा टीचभर जागेंत कसें करतां येणार ? शेवटीं वाचनाच्या बाबतींतील एकच गोष्ट सांगावयाची म्हणजे ती अशी कीं, राम गणेश यांची दुसऱ्याला वाचून दाखविण्याची शैली कांहीं अद्‌भुत असे. मुंबईच्या एका वाङ्मयविषयक सभेंत श्री० नरसिंह चिंतामण केळकर यांनीं तर स्पष्ट असें सांगितलें होतें कीं, जुन्या शाहीरांचे पोवाडे राम गणेश गडकरी यांच्या तोंडून ऐकल्यावर मला त्यांची कांहीं नवीनच गोडी वाटूं लागली.

संस्कृत कवींत कालिदास हा राम गणेश यांचा अत्यंत आवडीचा कवि होता. शाकुंतल नाटकाचें मोल पृथ्वीच्या किंमतीनेंही करतां येणार नाहीं असें त्यांना वाटत असे. हिंदुस्थानचें शिल्पसौंदर्य पहावयाचें असल्यास ताजमहालाकडे पहा; बौद्धिक सौंदर्य पहावयाचें असल्यास **बाळ गंगाधर टिळक** अथवा **रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे** यांची भेट घे; काव्यसौंदर्याचा अनुभव घ्यावयाचा असल्यास शाकुंतल नाटक वाच; असें मीं एखाद्या फिरत्या फिरंग्याला सांगेन तर तो आश्चर्यानें थक्क झालाच पाहिजे असें राम गणेश नेहमीं म्हणत असत.

नावीन्य हें तर गडकरी यांच्या प्रत्येक कृतीचें शरीर आणि चमत्कृति हें जीवन. शाकुंतल नाटकाचा त्यांचा अभ्यासही कांहीं या नियमाला अपवाद नव्हता. शाकुंतल नाटकावर एक प्रचंड टीका लिहून, अद्यापपावेतों कोणाला न दिसलेले असे त्या नाटकरूप खाणींतील अनेक हिरे बाहेर काढून, त्यांचा एक अमोलिक हार महाराष्ट्ररसिकवरांना नजर करण्याचा त्यांचा विचार होता. अर्थातच सत्यसृष्टींत न उतरलेल्या त्यांच्या दुसऱ्या अनेक विचारांप्रमाणें याही विचाराची वासलात लागली. शाकुंतल नाटकावरील त्या टीकेपैकीं दुर्दैवानें आम्हालाही फक्त एक दोनच गोष्टी आठवत आहेत. पहिली म्हणजे अशी कीं, त्या टीकेंतील ६ व्या अगर ७ व्या भागाचें नांव 'शाकुंतल व सामाजिक सुधारणा' असें ठेवण्यांत येणार होतें. दुसरी म्हणजे त्या नाटकाच्या बांधेसूदपणासंबंधींची आहे. कालिदासानें आपलें नाटक एका समद्विभुज त्रिकोणांत बांधलें जाईल अशा रीतीनें लिहिलें आहे असें राम गणेश म्हणत असत आणि नायक–नायिकेची भेट हाच




एक विषय घेतला तर तो सुद्धां त्या त्रिकोणांत घालतां येतो असें ते दाखवीत असत. पहिला व सातवा अंक एका दर्जाचे आहेत; नायक व नायिका यांची पहिली व दुसरी भेट या दोन अंकांत झाली आहे; दुसरा व सहावा एका दर्जाचे आहेत; त्या दोनही अंकांत नायक नायिकेला भेटण्यास उत्सुक झाला आहे. तीन व पांच या अंकांचा नाटकाच्या संविधानक पोषणाकडे उपयोग करण्यांत आला आहे; व टोंकाचा चवथा अंक परमावधीच्या कौशल्याचा आहे असा एक ठोकळ मानानें सांगतां येण्याजोगा सिद्धांत त्यांनीं बसविला होता. या त्रिकोणाच्या पायथ्याशीं, मध्यंतरीं मारलेल्या समांतर रेघांमुळें झालेल्या कोनावरून सुद्धां त्यांनीं काव्य सौंदर्याशीं ताळमेळ देणारे सिद्धान्त बसविले होते. ते सारे कांहीं आमच्या लक्षांत आतां नाहींत. आहेत त्यांचें विवरण करावयास अनेक अर्थांनीं सांगावयाचें म्हणजे अवकाशही नाहीं. हें एवढें सर्व द्यावयाचें कारण इतकेंच कीं, असामान्य, अदृष्टपूर्व, अद्भुत गोष्टी शोधून काढणाऱ्या राम गणेश यांच्या अलौकिक बुद्धीनें, स्वैर वृत्तीनें वावरणाऱ्या काव्याला गणिती बंधनानें कसें बद्ध करून दाखविलें असतें, किंवा रूक्ष, खडखडीत, रसविहीन गणिताला काव्योद्यानांत आणून सोडून त्याला एक प्रकारचा मनोहारी मोहकपणा कसा प्राप्त करून दिला असता हें थोडक्यांत येथें दाखवावें हें योग्य, असें आम्हांस वाटतें.

ज्या बुद्धीनें, गणित व काव्य हे परस्पर विरुद्ध वाटणारे विषय एकत्र आणण्याचा विचार केला होता त्या विलक्षण बुद्धीविषयीं येथें थोडक्यांत विचार करणें जरूर आहे. राम गणेश गडकरी हे एक विलक्षण बुद्धीचे पुरुष होते, हें कांहीं असंतुष्ट व हट्टी आत्म्यांखेरीज महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व लोकांना आतां मान्य झालें आहे. लोकांना, त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें त्यांच्या अलौकिक बुद्धीचे चमत्कार पहावयास मिळाले नाहींत; परंतु त्यांच्या सहवासांत असणाऱ्या लोकांना त्या बुद्धीचे अनेक व निरनिराळ्या जातीचे चमत्कार पहावयास मिळत असत. राम गणेश यांनीं मॅट्रिक परीक्षेचा अभ्यास रात्रंदिवस जिवापाड मेहनत करून अवघ्या तीन महिन्यांत केला तो इतक्या कसोशीनें केला कीं, त्यांचा नंबर बराच वर लागला व त्यांना युनिव्हर्सिटींत एक संस्कृतची स्कॉलरशिपही मिळाली. त्या

परीक्षेच्या वेळीं त्यांनीं जें संस्कृत तयार केलें होतें त्याच्या जोरावरच त्यांना पुढें आपला संस्कृत ग्रंथांचा अभ्यास पुढें चालवितां आला. तीच गोष्ट गणित-विषयाची. मॅट्रिकपर्यंतचें त्यांचें गणित अगदीं ताजेतवानें होतें. तेथपर्यंतच्या भागापैकीं त्यांना वाटेल तेव्हां शंका विचारावी. एखाद्या गणिती विद्वानाला शोभेल अशा रीतीनें त्यांनीं त्या शंकेचें निवारण करावें. "माझ्या लेखनांत जर कांहीं बांधेसूदपणा आला असेल तर तो माझ्या जॉमेट्रीच्या अभ्यासामुळे आला आहे" असें त्यांनीं म्हणावें.

परंतु वर ज्या सांगितल्या त्या झाल्या शिक्षणक्रमांतील व केवळ लौकिक अशा गोष्टी. त्यांच्या लेखनांत जे बौद्धिक चमत्कार सांपडतात त्यांचें कारण, एकंदर जगाकडे अथवा नैसर्गिक गोष्टींकडे पाहण्याची जी राम गणेश यांची पद्धत होती (आमच्या मतें असूं शकेल) त्या पद्धतींत सांपडूं शकतें. अगदीं लहानपणीं जगाच्या रंगभूमीवर अगदीं एकलकोंडेपणानें प्रवेश करण्याचा प्रसंग, आजूबाजूच्या लोकांनीं दाखविलेले स्वतःविषयींचे अनेक प्रकारचे विकार; किर्लोस्कर मंडळीच्या धर्मशाळेंत निरनिराळ्या मनोवृत्तींच्या प्रवाशांबरोबर झालेला पांचचार वर्षांचा सहवास यांसारख्या गोष्टींमुळें जगाकडे व निसर्गाकडे, दूर बाजूला राहून स्वतंत्र-पणानें पाहण्याची त्यांच्या बुद्धीला संवयच लागून गेली होती असें वाटतें. 'जगा-च्या रंगानें रंगल्याखेरीज जगांत वावर' असें एक गुर्जर कादंबरीकार गोवर्धनराम त्रिपाठी यांच्या 'सरस्वतीचंद्र' नांवाच्या कादंबरींत वाक्य आहे, तें वाक्य राम गणेश आपल्या तरुण मित्रांना, शिष्याच्या शालीनवृत्तीनें त्यांच्या पायांपाशीं रहाणाऱ्या तरुणांना नेहमीं वाचून दाखवीत व त्याप्रमाणें वागण्याचा उपदेश करीत.

जगाकडे पहात असतां राम गणेश यांच्या दोन शक्ति अव्याहतपणें कामीं लागत असत. त्या शक्तींपैकीं एक बुद्धि आणि दुसरें हृदय. मनुष्यमात्राच्या अवलोकनांत नेहमीं एकाच जातीच्या गोष्टी येतात असें नाहीं. वाईट, सुंदर, कुरूप, सामान्य, असामान्य अशांच्या सरमिसळीनेंच आपलें जग झालें आहे. अवलोकनां-त जर एखादी असामान्य गोष्ट आली तर ती कोणत्या रीतीनें असामान्य याचा आधीं राम गणेश विचार करीत असले पाहिजेत. जर ती गोष्ट सौंदर्यानें सजलेली असली तर ती त्यांच्या हृदयाला पटतच असे आणि ती विसौंदर्यानें, विलक्षण-त्वानें, एकाददुसऱ्या कमतरतेनें उणावून निघालेली असली तर ती कांहीं त्यांच्या बुद्धीच्या तीव्र दृष्टींतून सुटत नसे. हृदयाला पटलेल्या सौंदर्याची किंमत, जातगोत,

उपयोग व उपयोगाची जागा वगैरेंचा निर्णय करावयास त्यांची बुद्धि तयार असे. कमीजास्त प्रमाणांत पाणीदार असलेल्या सौंदर्यमौक्तिकांचा हार गुंफावयाचेंच काम त्यांची बुद्धि करीत असे असें म्हटल्यास कांहीं वावगें होणार नाहीं. निसर्गाच्या उदरीं असलेल्या सौंदर्यमौक्तिकांचे दाणे हृदयानें टिपावेत व बुद्धीनें त्यांना निरनिराळ्या रीतीनें काव्यरूप सुवर्णसूत्रांत गुंफून निरनिराळ्या प्रकारचे अलंकार रसिकांना द्यावेत असा हा काव्यप्रबंधाचा इतिहास असावा असें आमच्या अल्पमतीला वाटतें. त्याचप्रमाणें विसौंदर्याचेंही. बुद्धीच्या शोधक व तीक्ष्ण नजरेनें निरनिराळ्या विलक्षणपणाचे, अप्रासंगिकपणाचे नमुने सांठवून ठेवावेत व हृदयानें त्यांच्यामधील त्याज्य भाग कोणता व त्यांतील कोणत्या भागामुळें इतर हृदयांतील धागे हालूं लागतील हें दाखवावें. हृदयानें अशा रीतीनें विसौंदर्याच्या प्रांतांतील खडेकांटे निवडून काढल्यावर बुद्धीनें उरलेल्या जमिनीवर मनाजोगती पेरणी करून प्रसंगाप्रसंगानें अनुक्रमाप्रमाणें अप्रासंगिकपणाचे नमुने एकत्र करावे व लोकांना सात्त्विक विनोदाची कायमची मेजवानी द्यावी असा राम गणेश यांच्या सुप्रसिद्ध, सुरेख, सात्त्विक विनोदाचा इतिहास असावा असें आम्हांस वाटतें. अर्थातच या आमच्या विचाराला वाटणाऱ्या गोष्टी आहेत. आम्हाला एक असें पृथक्करण पटतें म्हणून दुसऱ्यांना तें पटेलच असें नाहीं.

राम गणेश म्हणजे भावनांच्या भोंवऱ्यांत भिरभिरणारे एक अशक्त डोक्याचे कवि समजावेत किंवा बुद्धीच्या निष्ठुर घावानें हृदयाचे तुकडे करणारे एखादे राजकारणी समजावेत, किंवा जगांत राहून लौकिक सुखदुःखांत, नफ्यातोट्याची स्वतःला बाधा न करून घेतांही, जगाच्या अंतिम सौख्याच्या विवंचनेंत गुरफटून गेलेले एखादे तत्त्वज्ञानी समजावे असा एक गुंतागुंतीचा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. परंतु या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, ते कविही होते ते एखाद्या राजकारणी पुरुषाप्रमाणें बुद्धिजीवीही होते आणि अखेरीस स्वतःच्या सुखाची पर्वा न करितां समाजाच्या हितासाठीं तळमळणारे एक संन्यस्त वृत्तीचे तत्त्वज्ञानीही होते. हें कांहीं आम्ही मन मानेल त्याप्रमाणें लिहीत नाहीं, तर आम्हांला जें कांहीं त्यांच्या लेखनांत सांपडलें, किंवा वर्तनांत दिसलें त्यावरूनच लिहीत आहों. वर्तनाचा पडताळा लोकांना पटण्याजोगा नाहीं म्हणून ज्यांना विधानाची प्रचीति पहावयाची असेल त्यांनीं त्यांच्या काव्यसंग्रहाचा, विनोदी लेखांचा, नाटकांचा सूक्ष्म व नीट अभ्यास करावा असें आमचें त्यांना नम्र सांगणें आहे.

आतां एकदोन थोड्याफार महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या म्हणजे झालें.

जिला आपण 'कविता' म्हणतों त्या कवितेचा राम गणेश यांना अगदीं लहानपणींच नाद लागला असें म्हणावयास हरकत नाहीं. शाळेंतील पुस्तकांतील कविताच त्यांना तोंडपाठ असत असें नाहीं, तर मुलीबाळींचीं अगर इतरत्र ऐकिलेलीं अनेक गाणींही त्यांना तोंडपाठ असत. परंतु ज्याला आपण 'काव्य' असें म्हणतों, त्याच्या तेजाच्या पहिल्या कोंवळ्या किरणांचा राम गणेश यांच्या हृदयाला केव्हां स्पर्श झाला हें कोणासच सांगतां येणें शक्य नाहीं. काव्यानें ओथंबलेले कवितांचे, गाण्यांचे, ओव्यांचे तुकडे त्यांनीं नेहमीं आपल्या मनांत अगर सवंगड्यांना म्हणून दाखवावेत; व त्यांत काव्य भरलें आहे' असें म्हणावें. कोणी काव्य म्हणजे काय ! असें विचारल्यास, त्यांच्या हृदयाला पटलेल्या ओळी म्हणून दाखवून हें काव्य, असें त्या पृच्छा करणाराला त्यांनीं सांगावें. हा त्यांचा लहानपणींचा क्रम असे. पुढें तरी, काव्याची व्याख्या रोखठोक शब्दांनीं करतां येणें शक्य नाहीं, असेंच आपलें मत असल्याचें ते सांगत.

एका गृहस्थांनीं एकदां असें सांगितलें, राम गणेश यांच्या कविता इतक्या लोकांना प्रिय व्हावयाचें कारण त्यांनीं आपल्या वाचकांच्या हृदयाची ठेवण यथातथ्यपणें जाणिली आहे, व त्या हृदयाला पटण्याजोग्या शब्दांनीं आपलें हृद्गत अथवा आपली शिकवण ते सांगत. विशेषतः मराठी भाषेंतलि विशेषणांना राम गणेश यांनीं नवीन व विशेष असें विशेषत्व दिलें असल्यानें, त्यांच्या काव्याचा निरोप बरोबर जाऊन पोहोंचतो. राम गणेश यांच्या काव्याचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास करणाऱ्याला सदर गृहस्थांच्या विधानांत सर्वस्वीं नाहीं, तरी बरेंच तथ्य आहे असें आढळून येईल.

आतां माझ्यापेक्षां कोणी मोठा कवि राहिला नाहीं, असें राम गणेश म्हणत असल्याची खोटी अफवा, कांहीं बेजबाबदार लोकांनीं उठविली आहे. त्या अफवेच्या भुसभुशीत पायावर, त्यांहूनही बेजबाबदार व उपटसुंभ टीकाकारांनीं राम गणेश यांना गालिप्रदानाचा आहेर केला आहे. त्या अफवा उठविणारांना व टीकाकारांना आम्ही इतकेंच नम्रपणें सुचवितों कीं, त्यांना राम गणेश यांच्या स्वभावाची इत्थंभूत माहिती नसल्यानें त्यांना त्यांच्या ( राम गणेश यांच्या )हृदयाची परीक्षा झाली नाहीं. कै० गडकरी यांच्या सहवासांत वर्षांनुवर्षें राहिलेल्यांपैकीं एकलाही अशी त्यांनीं दर्पोक्ति काढल्याचा एकही प्रसंग आठवत नाहीं. इतकेंच नव्हे तर

उलटपक्षीं असें सांगतां येईल कीं, राम गणेश यांची शालीनवृत्ति कांहीं प्रसंगीं इतक्या मोठ्या प्रमाणांत दिसून येई कीं, त्यांच्या आसपासच्या लोकांना हें कांहीं तरीच अति होत आहे असें वाटे. 'तुम्ही काय समजलांत, **कोल्हटकरांनीं** गडकरी निर्माण केला आहे; तुम्ही माझ्यासमोर माझी स्तुति व कोल्हटकरांची निंदा करूं लागलांत, म्हणजे तुम्ही तोंडपुजे आहांत यापेक्षां माझी दुसरी कांहींच कल्पना होत नाहीं', 'आधुनिक कवींपैकीं एकही ठोमऱ्यांच्या **निर्झरा**सारखी कविता लिहूं शकणार नाहीं' 'आणि Bee कवीच्या **फुलाच्या ओंजळी**वरून नव्या कवींची कविता कशी असावी हें शिकावें' अशासारखी प्रशंसापूर्ण, सहृदयत्वाची साक्ष पटविणारी, **खऱ्या कवींसंबंधींचीं** अनेक वाक्यें, अनेक वेळां, राम गणेश यांच्या तोंडून बाहेर पडलेलीं बऱ्याच लोकांनीं ऐकिलीं आहेत. त्यांच्या स्वभावांतील जर दोषच काढावयाचा असेल तर असें म्हणावें कीं, राम गणेश यांना नाणें वाजवून घेण्याची संवय होती. खोट्या ढब्बूंना वा झब्बूंना ते थारा देत नसत; आणि आम्हाला तर असें वाटतें कीं, या त्यांच्या स्वभावदोषामुळेंच—जर दोष असेल तर—कांहीं कविताकारांनीं कांहीं दर्पोक्तीचीं उग्र वाक्यें राम गणेश यांच्या तोंडीं कोंबलीं आहेत. तसेंच पाहूं जातां, आम्ही खात्रीपूर्वक आमच्या वाचकांना असें सांगूं शकतों कीं, राम गणेश यांच्याइतके शालीन कवि क्वचितच निपजतात. आम्ही कांहीं तरी सांगतों असें नाहीं, तर पुराव्यादाखल आम्ही पुण्यप्रभाव नाटकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेकडे अथवा या काव्यसंग्रहांतील निरनिराळ्या कविवरांना उद्देशून लिहिलेल्या चारपांच कवितांकडे बोट दाखवूं शकतों. स्वतः राम गणेश यांनीं लिहून ठेविलें आहे त्याच्यावर विश्वास ठेवावयाचा कीं गटारगप्पांवर अधिक विसंबावयाचें हें ज्यानें त्यानें स्वतःसाठीं स्वतःच ठरवावें व आपल्या मनोवृत्तीची किंमत करून घ्यावी.

शेवटीं शेवटीं राम गणेश यांच्या लेखनाला मोठाच खंड पडला होता. 'माझी कविता मला कंटाळून सोडून निघून गेली' असे उद्गार त्यांनीं दोन चार वेळां काढिले होते. त्यांची कविता त्यांना सोडून गेली नसून, एका पायरीवरून दुसऱ्या पायरीवर जाण्याच्या संक्रमणावस्थेंत ते होते असें म्हणावेसें वाटतें. **महाराष्ट्र-गीत, कृष्णाकांठीं कुंडल,** यांसारख्या खंडकाव्यांवरून महाकाव्याकडे त्यांची काव्यशक्ति त्यांना नेणार असावी, असें समजण्यास कांहीं हरकत नाहीं.

कारण रघुवंशासारखें एकोणीस सर्गांचें **'शिववंश'** नांवाचें एक काव्य आपण लिहिणार आहों असें ते एकदोघांजवळ म्हणाले होते.

**कृष्णाकांठीं कुंडल** या काव्यासंबंधीं वाचकांचा बराच घोंटाळा उडणार आहे. सुचतील त्याप्रमाणें ओळी लिहून, नंतर त्या संदर्भाप्रमाणें एकत्र करावयाची राम गणेश यांची मनीषा होती. परंतु त्या ओळी इतस्ततः पसरलेल्या असल्या-मुळें ठिकठिकाणीं वाचकांचा मनोभंग होण्याचा संभव आहे. सदर काव्यांत एका मराठ्या वीराची व एका मराठा कुमारीची प्रेमकहाणी निवेदन करण्यांत येणार असून, तिचा शेवट मनास चांगलाच चटका बसविण्याजोगा दुःखपर्यवसायी होणार होता, हें लक्ष्यांत ठेवून त्या अनुरोधानें वाचकांनीं आपली करमणूक करून घ्यावी. यापरतें आम्ही तरी जास्त काय सांगणार ?

गडकरी अद्वैतवादी होते हें निराळें सांगावयास नकोच; त्यांच्या काव्यांत अनेक प्रसंगीं तें दिसून येईलच. त्यांची ईश्वरभक्ति किती उत्कृष्ट स्वरूपाची होती, हेंही पण त्यांच्या भक्तिप्रधान कवितांवरून दिसून येईलच. भक्तीच्या खालची पायरी म्हणजे जें प्रेम, त्यासंबंधीं आम्ही नवीन असें तें काय सांगणार ? **सात्त्विक प्रेमाचे शाहीर** म्हणूनच महाराष्ट्र त्यांना ओळखीत आहे. आम्हां-ला सांगावयाचें आहे तें इतकेंच कीं, प्रेमाच्या कविताच राम गणेश यांनीं लिहि-ल्या नाहींत, तर त्यांच्या वर्णनांत, वचनांत, हरएक बाबतींत त्यांच्या प्रेमळपणा-चें स्पष्ट प्रतिबिंब उमटलेलें असे. ईश्वरावर कदाचित् नसेल, इतकी त्यांची आपल्या मातुःश्रींच्या चरणीं निष्ठा असे. त्यांच्या लेखनगुरूंच्या ठायीं—म्हणजे श्री० **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** यांच्या ठिकाणीं त्यांची भक्ति किती होती हें त्यांचे वाचक जाणतच आहेत. श्री० **कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर** यांनाही ते फार मानीत असत. राम गणेश यांनीं ज्याला एकदा आपला म्हटला त्याच्या सर्व बाजूंच्या हितार्थ ते अहर्निश झटत असावयाचे. त्यांनीं जवळ केलेल्यांपैकीं जर एखाद्यानें अल्लडपणानें प्रमाद केला तर तो पोटांत घालून त्याला क्षमा करून त्याची ते प्रेमळपणानें समजूत घालीत असत. इतकें मात्र खरें कीं, त्यांचें ज्याच्यावर प्रेम जास्ती त्याच्या वर्तनावरही त्यांची करडी नजर ज्यास्तच. करड्या नजरेबरोबर त्याचा अभिमानही तितकाच जास्त. आपल्या प्रेमांतील मनुष्याला कोणी फट् म्हणतां कामा नये, असें राम गणेश यांना वाटे.

राम गणेश यांच्यासंबंधानें जितकें लिहावें तितकें थोडेंच होणार आहे,

लिहावयास लागावें, तों अनेक गोष्टी आठवतात; परंतु स्थल-काल यांचा विचार करतां, येथेंच थांबणें आम्हांस रास्त वाटतें. आम्हांला शेवटीं इतकेंच सांगावयाचें आहे कीं, सर्वांगांनीं विचार केला असतां कै० **राम गणेश गडकरी यांच्यासारखा अष्टपैलू हिरा** एका शतकांत एकादुसराच सांपडत असतो. त्याची किंमत कमीअधिक करण्याचा कोणीं कितीही प्रयत्न केला तरी 'जनस्वरूप जनार्दन' व सर्वसाक्षी 'काळ' हे सत्यासत्याचा न्यायनिवाडा करावयास समर्थ आहेतच.

पुणें, फर्ग्यूसन कॉलेज,<br>श्रावण शुद्ध ९, शके १८४३

नरहर गणेश कमतनूरकर

# अनुक्रमणिका


| कविता | पृष्ठ |
|---|---|
| ईशस्तवन | १ |
| माझी पहिली कविता | २ |
| नदीस पूर आलेला पाहून | २ |
| देवल | ३ |
| मोगऱ्याचा हार | ४ |
| सत्सुमदाम | ४ |
| घरांत बसलेल्या काजव्यास | ६ |
| काळ | ७ |
| कोणी कोणास तरी | ८ |
| सुखदुःख | ८ |
| तरुणीस बालकाचें चुंबन घेतांना पाहून | ९ |
| काय करावें ? | १० |
| सांग कसे बसलों ? | १० |
| कवीचा वधूवरांस अहेर | ११ |
| 'वेषभूषा'कारास सादरार्पित पद्यभूषा | १२ |
| घुबडास | १३ |
| स्मशानांतलें गाणें | २३ |
| अभिनंदनपर वर्धापन | ३० |
| जुन्या कवितांची आठवण | ३२ |
| अंधाला दृष्टिलाभ | ३३ |
| चिन्तातुर जन्तु | ३४ |
| एका जुन्या श्लोकाची आठवण | ३४ |
| प्रासंगिक किंवा अप्रासंगिकच | ३५ |
| केशवसुत मेले ? | ३५ |
| निद्रागीत | ३८ |
| आंधळ्यांची माळ | ३८ |
| विचार | ३९ |
| कलगीचें गाणें | ४० |
| घांस | ४८ |
| गुलाबी कोडें | ४९ |
| अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस | ५० |
| हुरहूर | ५३ |
| वेडा | ५३ |
| पुनर्जात प्रेमास | ५५ |
| हृदयशारदेस | ५६ |
| मोरपिसावरचा डोळा | ५९ |
| एखाद्याचें नशीब | ५९ |
| जगाचें गाणें | ६० |
| अनामिकाचे अभंग | ६१ |
| रांगोळी घातलेली पाहून | ६४ |
| राजहंस माझा निजला ! | ६५ |
| दसरा | ७० |
| ती कोण ? | ७५ |
| विरामचिन्हें | ७५ |
| कांहीं इंग्रजी कविता वाचून | ७६ |
| पुनर्विकसन | ७७ |
| गीतविरक्ति | ७८ |
| कधीं ? | ७८ |
| ओसाड आडांतील एकच फूल | ७९ |
| चिमुकलीच कविता | ८२ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| मंगलाचरण | ८६ |
| प्रेम आणि मरण | ८७ |
| बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास | ९१ |
| प्रेमाची प्रामाणिकता | ९३ |
| कवि आणि कैदी | ९४ |
| फणसाचें पान | ९६ |
| बंडयाची चित्रकला | ९७ |
| मुरली | ९९ |
| अरुण | १०४ |
| पानपतचा फटका | १०७ |
| प्रेमपाठ | ११७ |
| केशवसुतांची कविता वाचून | १२४ |
| मार्गे पहाणें | १२४ |
| पहिलें चुंबन | १२५ |
| हा क्षण | १२६ |
| बापासाठीं रडणारास | १२७ |
| —स | १२७ |
| मनांतली पाल | १२८ |
| मनांतली दिवसरात्र | १२९ |
| मुरलीचा नाद | १३० |
| हालत्या पिंपळपानास | १३१ |
| फुलें वेचिलीं पण— | १३४ |
| गोड निराशा | १३५ |
| अल्लड प्रेमास | १३९ |
| रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास | १४० |
| जीवितास | १४२ |
| समसमां संभोग कीं जाहला | १४३ |
| इच्छा, उपभोग व विषय | १४४ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| हुकमे हुकूम | १४४ |
| फुटकी तपेली | १४६ |
| विहिणींचा कलकलाट | १४८ |
| निर्वाणीची विनवणी | १४९ |
| एक समस्या | १४९ |
| घुंगुरवाळा | १५१ |
| सगुणस्वरूप | १५२ |
| दैवाची निर्दयता | १५३ |
| त्याच तारकेस याचना | १५४ |
| कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ? | १५५ |
| पांच देवींचा पाळणा | १५६ |
| एक शंका | १५७ |
| "न"साठीं आर्या | १५७ |
| चेंडू | १५८ |
| संगीत मित्रप्रीति नाटकांतील तीन पदें | १५९ |
| भीमकवाळा | १६० |
| स्मृतिगीत | १६१ |
| गुलाबास | १६२ |
| पांखरास | १६३ |
| एकच मागणें | १६५ |
| सुभाषित | १६५ |
| कवितेसाठीं धडपड | १६६ |
| प्रेमाखातर | १६७ |
| अरुण ( दुसरा ) | १६९ |
| गरिबीचें गाणें किंवा एक प्रसंग | १७१ |
| दुर्दर्शन | १७२ |
| लीडोर | १७२ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| प्रेमकाळ | १७३ |
| भयाण एकांत | १७५ |
| लीला | १७८ |
| ये ये ये कविते | १७९ |
| स्मरणसृष्टि | १८२ |
| प्रेमाचा प्रळयकाळ | १८४ |
| निजलेल्या बालकवीस | १८६ |
| एका बालकवीस | १८८ |
| विश्वाची विजयादशमी | १९१ |
| अपराध यांत कोणाचा | १०१ |
| एका शब्दासाठीं विनंति | १९२ |
| पुत्रशोक | १९२ |
| काळाला बजावणें | १९४ |
| गेले गोपाळ कृष्ण--हा ! हाय ! ! | १९५ |
| वीणावती सुंदरीस | १९६ |
| जिवास बोध | १९७ |
| दिव्य प्रेमाची जाति | १२७ |
| श्रीमहाराष्ट्रगीत | २०० |
| कृष्णाकांठीं कुंडल | २०३ |
| नटमित्रास पत्र | २१० |
| लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद ! | २१३ |
| कारंजाचें चढतें पाणी | २१५ |
| हाय हाय ! | २१५ |

| कविता | पृष्ठ |
| --- | --- |
| श्रीमत् राजाधिराज पांचवे जार्ज हिंदुस्थानचे बादशहा यांच्या राज्यरोहणाचेनिमित्त पदें | २१७ |
| प्रेमशोधन | २१८ |
| गाणें चांगलें कसें असावें ? | २१८ |
| काव्याची व्याख्या | २१९ |
| समशेर दुधारी दिसतो | २१९ |
| गुलाबाच्या पाकळ्या | २२० |
| निर्दय बालेस | २२० |
| दिवाळी | २२१ |
| लक्ष्मीपूजन | २२३ |
| गोफ | २२३ |
| हृदयास | २२४ |
| शेवटचें प्रेमगीत | २२५ |
| तीन तरी | २२६ |
| सेवावीं म्यां चरण कमलें | २२७ |
| विपिनचंद्रपाल यांचे सुटके-निमित्त | २२८ |
| कां ? | २२९ |
| देवाघरची दौलत हरपतांना पाहून | २२९ |
| वीरमरणाला शोभण्याजोगें गाणें | २२९ |
| निरोप द्यावा आतां | २३० |
| फूल ना फुलाची पाकळी | २३१ |
| परमाणूंचें कार्यमाहात्म्य | २३१ |
| माझा मृत्युलेख | २३२ |




जन्म मे १८८५ } **कै० राम गणेश गडकरी** } अवसान २३ जा. १९१९

# अर्पण-पत्रिका

सत्-चित्-हृत-महत्
आनंद-पदवी-प्रदान-वदान्या ॥ १
प्रीतीची पवित्रता, चिरंतनाची चरित्रता,
सृष्टीची सचित्रता,
विश्वाची विविधता, अनंताची अगाधता,
ईश्वराचें अस्तित्व
या सर्वांच्या
अचल ऐक्याची
प्रत्यक्ष निदर्शना ॥ २
भूतकालांतली भावजीवना, वर्तमा ांतली वरतराशा,
भवितव्यांतली भाग्यदेवी ॥ ३
हृदयाची स्फूर्ति, इच्छेची पूर्ति,
मांगल्याची कीर्ति ॥ ४

**श्रीहृदयशारदा**

ही सर्वस्वानें अर्पिलेली
" वाग्वैजयंती "
सदैव कंठांत धारण करो !

—गोविंदाग्रज

## वाचकांस विज्ञापन

[ शार्दूलविक्रीडित ]

जें जें ज्या समयीं मनांत भरलें स्वच्छंद नानास्थळीं,
तें तें त्या समयीं जपून धरितां ही होय गंगाजळीं !
मित्रा ! ही कविता—न गद्य—इजला निर्बंध कैसा बरें ?
सारें हें मनिं आणुनी मग धरीं "वाग्वैजयंती" करें ! १

[ वसंततिलका ]

प्रेमें सख्या, धरि हिला हृदयीं सदाही,
दे टाकुनी; तुडवि ही अथवा पदांहीं !
मातें दशा समचि या गमतात दोन्ही
माझी मलाच लखलाभ सदा असो ही ! २

---

## तडजोड *

[ शार्दूलविक्रीडित ]

एका एक कधीं जसें दिसतसे स्वांतीं विकारांतरें,
अन्या तें न दिसे तसेंच; असतें ज्याचें तयातें खरें !
चित्तैक्यास्तव सर्वथा फुकट कां हेका धरावा मग ?
एका शून्य जगीं दिसे तरि दिसे शून्यांत अन्या जग ३

---

* गोविंदाग्रजाशीं ज्यांचा विचारभेद होईल त्यांना या तडजोडीनें समाधान वाटावयाला काय हरकत आहे ?

—राम गणेश गडकरी.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नौपाडा शाखा.
20459

कै० राम गणेश गडकरी
यांची

# वाग्वैजयंती

## ईशस्तवन

[ चाल—जयति जय सुरसरित्० ]

अतुल तव कृति अति भ्रमवि मति ईश्वरा ! ध्रु०॥
वर्षती मेघ जल, शांतविति भूमितल,
सलिल मग त्यजुनि मल, जात सुरमंदिरा.
फिरविसी रविशशी, तेजविसि भूमिसी,
केविं जन सुखविसी, कळत नच पामरा !
करिसि गर्भावना, मग पयोयोजना,
पुढति अर्पिशि जनां, पवन जल शुभकरा !
श्रम जनां दिनभरी, विश्रमा शर्वरी,
रमवि संध्या वरी, रंगवुनि अंबरा.
दिङ्मंडलावरति, नित्य नव विहरती
तारकातति हरति, नयनमन सुखकरा !
पक्षि लक्षावधी, श्रवणसुख निरवधी,
प्रसरिती स्तवनधी, नादरसनिर्झरा.
वाग्वैजयंतींत, शब्दमणि अगणित
स्वीकरुनि कविरणित, हंसुनि खुलवीं जरा
'गोविंद, पूर्वपद अग्रज स्मरुनि पद,
उधळि निज हृत्सुखद, शब्दरत्नाकरा !

## माझी पहिली कविता

[ आमचा एक वृद्ध गुजराती शेजारी, रोज दुपारीं जेवण झाल्यावर आमच्या घरीं येऊन गप्पागोष्टी सांगत बसत असे. त्याचें पुढील आर्येंत वर्णन केलेलें आहे. माझे वडील बंधु ती० रा० विनायक गणेश गडकरी यांनीं या काव्याला थोडी मदत केली होती. मु० गणदेवी, प्रांत नवसारी, संस्थान गायकवाडी. १८९६ जून किंवा जुलै.]

[ आर्या ]

चष्मा लावुनि डोळ्यां, डोकिस पागोटि तांबडी घाली !
काठी टेंकित टेंकित येउनि बैसे पथारिच्या खालीं ॥ १ ॥

---

## नदीस पूर आलेला पाहून

[ मुठा नदीस एकदां फार पूर येऊन श्रीऑंकारेश्वराचे मंदिरांत पाणी शिरलें होतें.]

[ चाल—नृपममता रामावरती.]

विरहोत्सुक सागर झाला ।
प्रियसखीस भेटायाला ॥ मज गमे ॥
निजमित्र मेघ पाठविला ।
गिरिराज श्वशुर-सदनाला ॥ मज गमे ॥
सरिता ही सागरजाया ।
त्यासवें निघाली जाया ॥ मज गमे ॥
आकांत । करित अत्यंत । ठेवितो तात ।
तिजसि उतरोनी ।
भूवरती तटकटिवरुनी ॥ मज गमे ॥ १ ॥
तो प्रसंग जणुं बघवेना ।
म्हणुनि रवी झांकी नयनां ॥ मज गमे ॥
घन गाळिति अश्रूधारा ।
दुःखें नच वाहे वारा ॥ मज गमे ॥

शिवमंदिरिं भगिनी गिरिजा।
भेटे तिस सागरभाजा ॥ मज गमे ॥
यापरी। सिंधुमंदिरीं। जात सुंदरी।
पूर्ण जलसरिता
शिवगिरिजादर्शनमुदिता ॥ मज गमे ॥ २ ॥

---

पुणे-१९.१९.

## देवल
[ आर्या ]

वंदन नाट्य-मिलिंदा गोविंदा, तव पदारविंदांना,
वंदन बळवन्नंदन, तेविं तुझ्या काव्य-सुंदरी-चरणा १
आर्धीं कवित्व नाहीं; त्यांतहि कांहीं सुचूं न दे घाई,
परि उत्सुकता वदवी मजकरवीं बोल बोबडे पाहीं. २
वाही चार फुलें हीं प्रेमें हा बाल त्या तुम्हांलागीं,
ज्या तुम्हां उभयार्थीं बलवद्गुरु सार्थ तेविं वश्या गी. ३
आहे धाष्टर्य बहुत हें कवि-कुल-गुरु-राज मजहि हें ठावें,
परि गुरु-जन-दर्शन-सुख रिक्त-करें म्यां वदा, कसें घ्यावें? ४
ती धन्या तव कविता रवि तापवितां उटी जशी अंगीं,
खिन्न मना दंग करी गुंगवुनी स्वैर आपुल्या रंगीं. ५
हरि ताप 'शाप-संभ्रम' संभ्रम निपजवि कवित्व रसिक-मनीं
येथुनि उचलुनि बसवुनि मनो-विमानीं तयास ने गगनीं. ६
बोलूं काय अधिक मी? जरि असती कवि जगीं अमित साच,
तरि "देवल ते देवल" वदती ते मान्य कां न मजलाच? ७
निर्मूनि 'शारदा' परि कां तुमची शारदा उगी बसली?
कसली भीति धरी ती शक्ति जिची दांडगी असे असली? ८
जिज्ञासा अधिका ही—क्षमा करावी परी महाभाग,
अथवा क्षमा कशाला! महज्जनांतें कधीं न ये राग ९
त्या रसिकांतें कांहीं अजुनी; द्या मग सुखेन आराम!
विनवित सविनय कविवर, नमन करुनियां पुन्हा पदा 'राम' १०

---

## मोगऱ्याचा हार

[ चाल—नृपममता रामावरती० ]

मुलगा:—हा हार शुभ्र किति आई ।
किति कोमल सुंदर पाही ॥ क्षणभरी ॥
किति वास मधुर या येई ।
मम चित्त ओढुनी घेई ॥ बघ तरी ॥
काशिं फुलें डंवरलीं असतीं ।
किति अलंकार त्यांपुढती ॥ बहुपरी ॥
भूवरी । जन्म घे तरी । वास जनशिरीं ।
कसा हा मिळवी ।
जनमनें कशानें वळवी ॥ वद तरी ॥ १ ॥

आई:—मधुवासें प्रिय हा सकलां ।
स्वगुणांनीं तूं हो बाळा ॥ त्यापरी ॥
हा धवलत्वें सुंदरसा ।
चारित्र्यें शोभे तैसा ॥ तूं तरी ॥
हा दिपवि जसा नगभारा ।
तेजें तूं लोपवि धीरां ॥ त्यापरी ॥
यापरी । वागशिल जरी । सकल जन तरी ।
तुजशि मम तनया ।
शिरिं धरतिल हारासम या । कधिं तरी ॥ २ ॥

पुणें, १९०३

---

## सत्सुमदाम

[ आर्या ]

ज्याच्या बोध-सुधेनें पावन झालें मदीय हीन मन
श्रीज्ञानेश्वर-चरणीं प्रेमानें मी करीतसें नमन १

नमिला शिवरायगुरू परळीचा रामदास भक्तमणी
यत्पदकमलाधारें कालभयातें कधीं न विश्व गणी २

श्रीवर-कृपा जयावर श्रीवर ज्याचें न चित्त किमपीही
श्रीवरद-साधुवर्णीं श्रीवरदा प्रणति एकनाथा ही ३

शशि भगणीं, मन करणीं, साधुजनीं तेवि हे तुकाराम
तद्वचनपथक्रमणा त्यजुनि धरिल अन्य हेतु का 'राम' ४

जरि यवन, कवनकरणीं स्मरणीं आणूं नको कबीर कसा
भक्तिवधू धरि करिं ज्या भगवज्जनकंकणांत हीरकसा ५

ज्या हीन हीन म्हणती प्रणति करिति सुमति ज्यास तो चोखा
वंदावा न कसा म्यां? इंद्रिय हो तद्गुणाम्ररस चोखा ६

ज्यास्तव अंत्यजरूपा धरि हरि तो वंदिलाचि दामाजी
कां थोरवी न यावी त्यातें म्यां कृपण देत दामा जी ७

यत्किंकर शंकरसख नमिला जगदेकविप्रवर नरसी
तद्भक्ति दशमरस सुख देई जें दे कविप्रवर न रसीं ८

नमिला भक्तिरसाचें धाम श्रीनामदेव जरि शिंपी
लोकीं काम्य न कां ती मोति जिच्या उदरिं कठिण वरि शिंपी ९

मान्य कसा न मला हो गोरा जरि होय हीन कुंभार
भार जयाचा प्रभुवर वंद्य मला रोहिदास चांभार १०

सत्कुसुमदामीं दासी म्हणुनि न गुंफावि कां जनाबाई
अक्षरमालेंतुनि कशि वांकडि तरि टाकवे जना बा 'ई' ११

दासी श्रीसुखदासी आम्हासी मायसी मिरादेवी
सकरण तनु तच्चरणीं त्यजुनि नृतामान कां न कवि ठेवी १२

वंदन नंद-सुनंदनकुंद-सुकालिकालि तुलसिदासाला
मज्जन्मग्रामस्था साधुवरा नमन टेलदासाला १३

वंदिं विवेकानंदा जरि अर्वाचीन मान्य साधु सदा
कुमतप्रस्तर दुरवुनि वाहविलें जगतिं आर्यधर्मनदा १४

हीं षोडश कुसुमें निजवासें निशिदिनिं करोत शुद्ध मला
वंदुनि अर्पीं "सत्कुसुमदाम" विनत "राम" ईशपदकमला १५

## घरांत बसलेल्या काजव्यास

[चाल—भक्ति ग वेणी०]

उडुनि जा स्वैर। काजव्या, चमक बाहेर. ॥ ध्रु० ॥
वासरमणि अस्तासी गेला,
कृष्ण करी तम सर्व जगाला,
अजुनि चंद्रमा वरति न आला
असे ही वेळ। जा, जा, जा, तोंवरि खेळ! ॥ १ ॥
दिवस तुझे हे फार मजेचे,
तेज तुला हें नित्य कशाचें ?
आठवलें तुज बसणें कैचें!
अगदिंच गैर। काजव्या, चमक बाहेर ॥ २ ॥
दाट तरूंची ती बघ राई,
चमकत चमकत तिकडे जाई
प्रेम जसें नव-रमणी-हृदयीं
वीज मेघांत। जा, तैसा चमके तींत. ॥ ३ ॥
वदसि काय " चिरसौख्यं न माझें,
तेज खरें नच तें अस्थिर जें,
मिरवाया मी म्हणुनी लाजें, "
वेडा, बारे। हें वेड तुझ्या मनिं सारें. ॥ ४ ॥
वेद, पुराणें नच पढलासी,
न्याय, तर्कही नच शिकलासी,
म्हणुनिच ऐसा मूर्ख रहासी,
मानवी कावा। वेड्या, तुज नाहीं ठावा! ॥ ५ ॥
असेल त्याचा गर्व धरावा,
अल्प-अधिक हा भेद नसावा,
स्थिरास्थिराचा विचार जावा,
सोडुनी जाता। धन, पुन्हां धरावी लघुता. ॥ ६ ॥

" ज्ञानवंत जगिं मनुजप्राणी,
क्षुद्र इतर " हें कोण न जाणी ?
म्हणुनी अमुच्या नियमा मानीं.
जगाची रीती । जा, ठेविं आपुल्या चित्तीं ॥ ७ ॥

---

## काळ

[ वसंततिलका ]

कोठें असे सकलपंडितमुख्य भोज
कोठें शिकंदर जगद्विजयी सुराज
कोठें स्वधर्मपरिपालक श्रीशिवाजी
कोठें तदीय यशवर्धक वीर बाजी १
ते राजकारणपटूत्तम धीट नाना
कोठें न कां दिसति ओढित कोण त्यांना
लोकैकवीर रणधीर सुरारबाजी
कोठें लपोनि बसले कळतें न आजा २
कोठें असे मयसभा स्पृहणीय शोभा
निस्तेज कां मज कथीं पृथुची यशोभा
धारा कुठें सकळ लोकललामभूता
तें हस्तिनापुर कुठें हरि ज्यास त्राता ३
गेले कुठें सुकवि जे प्रिय शारदेसी
नेलें कुणीं अखिल भारतसंपदेसी
गेलें कुठें बहुल वैभव पेशव्यांचें
व्यापारकौशल कुठें लपलें चिनाचें ? ४
कां मृण्मया बनलि रोमकराजधानी
कां ग्रीकराष्ट्रमहतीहि न येत कानीं
केलें कुणीं परमदीन दमास्कतातें
नेलें कुणीं मिसरच्या सुयशोधनातें ५

वाजी-गजादि नवरत्नसुजातकोष
प्राचीन वैभव नितांत तसें अशेष
स्तंभादि वीरजयसूचक वस्तुजात
केलें कुणीं सकल हें स्मृतिमात्र ज्ञात ६
स्थित्यंतरा करित कोण असा विदेही
कीं नामरूपगुणवर्णन त्यास नाहीं
छे; सर्व हें वितथ; नाम तयास आहे
तो काळ जो करितसे स्थितिभेद बा हे! ७

पुणें, १९०३

---

## कोणी कोणासतरी

[आपल्या रूपाचाच अभिमान करणाऱ्या एका आचरटास उद्देशून.]

[चाल—श्रीहरिच्या वेणुनादें०]

तुज बघुनी वाटतें कीं भ्रम पावे विधिमति ॥
पुरुषातें अर्पि कैसा मधुरा ही स्वाकृति ॥
कोमलता, वर्णशोभा तनु तनुला ही अति ॥
जरि असतीं स्त्रीप्रती हीं सार्थकता पावतीं ॥ १ ॥

पुणें, १९०५

---

## सुखदुःख

"सुखदुःखाच्या द्वैतामधुनी दुःख सदा वगळावें,
सुख सेवावें," हीच वासना सामान्यांची धांवे १
एक पायरी चढतां वरती मानवता मग बोले,
"सुखदुःखाची समता आहे, एकानें नच जग चाले." २
सदा भरारी गगनीं ज्यांची ऐसे कविवरही वदती,
"संसाराच्या गाड्याचीं हीं दोन्ही चाकें जणुं असती!" ३

परि सुखदुःखां पुढें टाकुनी, वदती " घे जें रुचे तुला,"
अचुक सुखाला उचली मानव दुःखा त्याची न ये तुला. ४
यापरि जगतीं सुखदुःखांचें खरें मर्म ना कळे कुणा,
रुचे मला तर दुःख सुखाहुनि; वेडा वाटे तरी म्हणा ! ५
सुख निजभोगीं नरा गुंगवी विसर पाडितें इतरांचा,
दुःख बिलगतें थेट जिवाला, ध्वज फडकवितें समतेचा ६
सुख उद्दाम करी आत्म्याला ओळख ज्याची त्या नसते,
कोण कुणाला पुसतें जगिं या दुःख जरि मुळीं ना वसतें ! ७
गर्भवासगत अंधपणानें दिशाभूल होवोनी,
परक्या ठायीं आत्मा आला स्वस्थानातें त्यजुनी. ८
परमात्म्यापर्यंत तयाला पुन्हा असे जें जाणें,
नांव तयाला दिलें गोडसें कीं, " जीवाचें जगणें." ९
परि " जगणें " ही मुदत ठरविली मूळपदा जायाची,
सदा चालता आत्मा तरिही मजल न संपायाची. १०
इष्ट पदा ने दुःखभोग हा प्रवास आहे आत्म्याचा
विश्रांतीचा मुक्काम अगतिक काळ जात जो सौख्याचा ११
दुःख असे कर्तव्य तयाची जाणिव पटते जीवाला,
इंद्रियांस वरच्यावर शिवुनी सौख्य जातसे विलयाला. १२
मजल मारणें इष्ट जयाला ठरलेल्या मुदतीमाजी,
प्रवास दुःखांचा भोगाया त्यानें व्हावें राजी. १३

---

## एका तरुणीस आपल्या बालकाचें चुंबन घेतांना पाहून

[ उपजाति ]

धवाननालोकन-चुंबनातें ।
लज्जा न आज्ञा जनिं देत तीतें, ॥
ही बालरूपा प्रतिमा तयाची ।
करोनि इच्छा पुरवी मनाची ॥ १ ॥

---

## काय करावें ?

[ आचरटपणापलीकडे या ओव्यांची फारशी किंमत नाहीं.]

उन्हाळ्यासाठीं पाणी न ठेवून। नदी वेगें जातां पळून।
भक्कम दगडांचें धरण बांधून। तिला अडवितां येतसे ॥ १ ॥

अगदीं आपला नेम धरून। तोफ सुटतां धडधडून।
हळुच बाजूला सरून। मारा चुकवितां येतसे ॥ २ ॥

अंतराळीं कडकडून। वीज घरांवरि पडतां तुटून।
उंच खांबांत बांधून। पाताळीं सोडितां येतसे ॥ ३ ॥

सावकारांनीं वैर धरून। जप्ती आणितां दावा करून।
मागील बाकी देऊन। तिला उठवितां येतसे ॥ ४ ॥

अगदीं नीट रोख धरून। म्हैस मार्गी येतां धांवून।
एकदम छत्री उघडून। तिला पळवितां येतसे ॥ ५ ॥

जुन्यानव्याची चोरी करून। भिकार कवि येतां कविता घेऊन।
कशी तरी एकदां वाचून। त्रास चुकवितां येतसे ॥ ६ ॥

सर्वांस उपाय येत दिसून। परि एका गोष्टीस आहे न्यून।
तोंडाळ बायको कडकडून—। येतां, काय करावें ? ॥ ७ ॥

---

## सांग, कसे बसलों ?*

[ आचरटपणाचाच आणखी एक मासला.]

[ अंजनीगीत ]

भेट जाहली पहिल्या दिवशीं,
परिचित नव्हतों कुणी कुणाशीं,
लाजुनि तेव्हां परस्परांशीं,
दूर—दूर—बसलों. ॥ १ ॥

* ही कविता भाषांतर आहे.

दिवस यापरी जातां चार,
लज्जा उरली नाहीं फार,
त्रास न होतां मग अनिवार–
जवळ जरा—आलों ॥ २ ॥

यापरि गेले महिने कांहीं,
परिचयास मग पार न राही,
लज्जा नुरतां तिळभर पाहीं—
सांग कसे बसलों? ॥ ३ ॥

---

## कवीचा वधूवरांस अहिर

[ शार्दूलविक्रीडित ]

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नौपाडा

श्रीमन्मंगल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा,
मोदें तेविं सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्वदा,
पद्माही करि सद्म ज्यास अपुलें त्या मंडपीं मंगळें–
जोडी मंगलकार्य मंगलतरा चिन्मंगला मंगळें!
गंगौघा यमुना, सुकीर्ति विजया, चंद्रास तारा वरा,
अर्थातें प्रतिभा, कवीस कविता, स्वर्गा धरा सुंदरा,
आत्मारामपदासि मुक्ति मिळतां जो हर्ष वाटे जना,
देवो तेविं अपूर्व योग तुमचा तो सर्वथा सन्मना! २
श्रद्धा साधुजनीं, नया गुरुजनीं, नम्रत्व विद्वज्जनीं,
सेवा सेव्यजनीं, दया निजजनीं, स्नेहार्द्रता सज्जनीं,
माया दीनजनीं, क्षमा परजनीं, सुप्रेम साऱ्या जनीं,
ऐशा निर्मळ सद्गुणांप्रति सदा आधार या स्वा मनीं. ३
मातातात जगांत वागति, न तें होई तुम्हांतें पुरें,
तन्मार्गे क्रमिला यथाविधि, तरी कर्तव्य थोडें उरे.
त्यांनीं वाढविलें तुम्हांस; ऋण हें तुम्हांवरी राहि, जें–
बाळें वाढवुनी तुम्हांसम गुणी, तें फेडिलें पाहिजे. ४

आलें चालत जें क्रमागत कुळीं त्या सयशोवैभवा
रक्षा दक्षपणें; सुलक्षणगणें लक्षैकधा वाढवा.
ठेवा सुस्थिर वैभवा; परि करा त्या सयशा चंचल
यावच्चन्द्रदिवाकरौ पसरुनी आसेतुहैमाचल ! ५

जैशा मस्तकिं या सुरक्तधवला मंत्राक्षता अक्षता
तैशी सत्कृतिसंघवृष्टिकरणीं ठेवा सदा दक्षता
जैसा गर्जत वाद्यनाद सुयशा तैसें जगा गाजवा
प्रेमें सुस्थिरशा चिरंतनयशा ऐशा ध्रुवा लाजवा ! ६

माळादान न हें; परस्पर परी सर्वस्व संतर्पण !
केलें गुंफुनि सद्गुणांहिं सुमनें हें नित्य आत्मार्पण !
गंगायामुन ओघ भिन्न असतां एकत्र होती यथा
झालां त्यापरि एकरूप इथुनी; आतां न व्हा अन्यथा ! ७
जें जें सुंदर जें सुखप्रद तसें जें जें महन्मंगल
जें जें वांच्छित जें अभंग जगिं तें देवो तुम्हां मंगल !
आशीर्वाद सहर्ष वर्षित असा ज्या मान्य आहे रसा
"गोविंदाग्रज" शब्दहार करि हा सामान्य आहेरसा ! ८

---

## "वेषभूषा"कारास सादरार्पित पद्यभूषा

रचिसी काव्यभूषा। अथवा कुसुमचापपाशा ? ॥ ध्रु०॥
मंजुल शब्दें गूढार्थातें कविराया ! जें झांकी,
चित्रकाव्य तव पाहुनि ऐसें प्रश्न मला पडला कीं—
रचिसि "वेषभूषा"। अथवा कुसुमचापपाशा ! ॥ १ ॥

मंजुळ गुंजारवें रंजवी कुंज कुंजगत भृंग,
घालिसि कुंजमुखावरि रुंजी मृदुपदिं होउनि दंग,
रचिसि नादभूषा। अथवा कुसुमचापपाशा ? ॥ २ ॥

शब्द तुझे व्यक्तार्थाखालीं दडविति मूकार्थातें,
गूढभाव लक्षितां लक्ष्य मम भलत्या वेडा वरितें.
रचिसि शब्दभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ३ ॥
सुवेषभूषा लेख्यमिषानें योषिदंतरंगा—
शब्दचित्रिं अव्यक्त रेखुनी हलविसि चित्ततरंगा!
रचिसि चित्रभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ४ ॥
व्यक्त कल्पनांसह मम चित्ता प्रतिभा तव नेई,
अव्यक्ताच्या पटाआड त्या टाकुनि मागें येई.
रचिसि काव्यभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ५ ॥
पद्यावलिंतिल पदपुष्पांच्या अर्थामोदानें
प्रीतिदेवता हृदयिं जागविसि उद्दीपनमोदानें
रचिसि अर्थभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ६ ॥
अर्थ खरा हा कीं प्रतिबिंबा बिंब दावि तुजशीं,
निजार्थांच मन माझें तैसें पाहत काव्यादर्शी
रचिसि गूढभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ७ ॥
सुंदर रमणी-वर्णनपर हें पद्य न मज भासे,
मजसम वेडा भ्रमीं पडाया मद्याचि वाहे खासें!
रचिसि पद्यभूषा। अथवा कुसुमचापपाशा? ॥ ८ ॥

---

## घुबडास—

[“ या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥ ”

या प्रवचनाची आठवण घुबडाचा शब्द ऐकून होऊं नये असें त्या बिचाऱ्यानें कोणतें पाप केलें आहे बरें? आमच्या दृष्टीचा रंग त्यावर कां लावायचा?]

घुबडा, बोल रे घू घू। नकोत चिमण्याराघू! ॥ ध्रु०॥
मातिंत मिसळुनि झाली माती
धडपड असल्या फोलासाठीं
चिंवचिंव नुसत्या पोटासाठीं
ओंवाळुनि टाकिलें जगीं तें मी तूं कधिंहि न मागूं ॥ १ ॥

आज आपला बोलति नाद
उद्यांच भलत्याचा पडसाद!
पोपटपंची पोकळवाद!
जळत्या खाईसाठिं म्हणाया मी तूं कधिंहि न लागूं ॥ २ ॥
शंख कुणाचा पोटापाठीं!
गात कुणी तर तिसऱ्यासाठीं!
छाया जीवाची उफराटी.
"जो तो ज्यात्यासाठीं!" चल, हें मी तूं यांना सांगूं ॥ ३ ॥
पोपट गातो मंगल नाम,
जळुं दे; कुठला तयांत राम?
उष्ट्या गुळणीचा तो "राम"!
आपण अपुला राम रमवितां मी तूं कधिंहि न भागूं! ॥ ४ ॥
सताड उघड्या रविकिरणाच्या
प्रकाशांतला जो तो नाच्या,
नाचत तालावर इतरांच्या,
ताज्या घोड्यावर गोमाशा खुशाल दे या रुंगूं! ॥ ५ ॥
पोपट चिमण्या या जाऊं दे,
खुशाल रडगाणें गाऊं दे,
गोष्पदिं मुंगीला न्हाऊं दे,
मार्ग आमुचा सडेतोड हा; जगास दे रे रांगूं! ॥ ६ ॥
धनी जगाचा कुठला आला—
तुम्हां अम्हांला शिकवायाला?
निघेल तोची सूर आपुला!
माझें मजला, तुझेंहि तुजला, "मी–तूंपण" ना त्यागूं ॥ ७ ॥
मनांत माझ्या जी हुरहूर
जनांत काढिन तीचा सूर,
साथ मला कर; जरि तूं दूर—
बेसूरानें भेसूरानें, झोंप जगाची भंगूं! ॥ ८ ॥

तुमची अमुची न्यारी रीत,
एकान्ताचे भालाईत,
काळोखावर लिहिलें गीत,
उचल जागत्या अशा जगाला चल, वाचाया सांगूं! ॥ ९ ॥

ऐकुनि असल्या पिशाचगाना
कित्येक मोडुनि पडतिल माना,
कितेक हलतिल ऐकुनि ताना,
तुला मला परि काय होय तें? रंगाखातर रंगूं ॥ १० ॥

गगनाच्या उदरांत भरारा
काळोखावर घुमतो वारा
घों घों घों घों ओघचि सारा,
दक्षिण-उत्तर कापुनि अंतर नभास लागे लंगूं ॥ ११ ॥

वेताळाची येतां स्वारी,
भूत वाजवी काय तुतारी;
भालदार कीं त्या ललकारी;
मरत्या रात्रीचा हा श्वासचि लागे काय तरंगूं? ॥ १२ ॥

वरतीं नभ हें, अरतीं भूतळ,
सटवीच्या जात्याचे हे तळ,
पीठ तयाचें गळतें भळभळ,
त्या जात्याची घरघर वारा; त्यावर गाया लागूं ॥ १३ ॥

अफाट वारा सुटला असला
काय कुणाला भिववायाला?
तसा घोगरा घसा आपला,
नच रिझवाया, नच खिजवाया; रंगाखातर रंगूं ॥ १४ ॥

मेघ मारुनी वरुनी गारा
काय कुणावर करिती मारा!
त्यांतुनीच परि निघती धारा,
"गोडकडू"चें गाणें असलें चल ये जगता सांगूं ॥ १५ ॥

गुरफटलें जग सारें मोहुनि,
कालतरंगावर परि वाहुनि
बघ मी आलों त्यांतुनि पोहुनि,
फिरता फकीर तूं; तव चरणीं जरा मला दे लागूं ॥ १६ ॥
संन्यासी तूं जन्माचा रे,
इतरांची तर कथाच विसरे!
होतीं का परि मातापितरें ?
पूर्वाश्रमिंच्या संसाराचा थांग न देसी लागूं! ॥ १७ ॥
प्रीति असे का ठाउक तुजला ?
जीव कधीं का दुःखें सुजला ?
प्रकाश नयनां कधिं का दिसला ?
तुझ्यावांचुनी तुझ्या जगांत न देसी कोणा वागूं ॥ १८ ॥
व्याप कधीं जन्मामरणाचे
भोगिलेस का स्मरतें साचें ?
कीं संस्कारहि हे पूर्वींचे ?
येतांजातां किंवा प्राणा देह लागतो बिलगूं ? ॥ १९ ॥
एकान्ताला कां पतकरशी ?
समाधींत या कधिंचा रमशी ?
कुठें असा संन्यासहि शिकशी ?
"घू घू" वांचुनि दुसरें कांहीं तुझें न देशी उमगूं ? ॥ २० ॥
शिष्य तुझा मी झालों म्हणुनी,
निःसंगाची संगत धरुनी,
काळोखाची राख फांसुनी,
सांग तुझा गुरुमंत्र मला तो करीं एकदां घू घू ॥ २१ ॥
ऐकुनि वाटे तव हें गाणें
निजल्या निश्वाचेंच घोरणें,
वाऱ्याचें बेछूट बरळणें,
किंवा काळोखाचें रडणें लागत काय तरंगूं ? ॥ २२ ॥

काळे डोंगर जिकडे तिकडे,
कडेकपारी त्यांचे जबडे,
काळोखामधिं असतां उघडे–
तुझा शब्द जणुं निघतो त्यांतुनि 'आ' करितांना घू घू. ॥ २३ ॥
नादब्रह्माचें हें प्रेत,
कीं जीवांचा नाच हवेंत,
मृत ओंकाराचा ध्वनि येत,
तांडवकालीं कीं शंभूचा डमरू करि हा घू घू ? ॥ २४ ॥
भटक्या जीवा आला थकवा,
पाहुनि भुलावणीचा चकवा,
काळोखांतुनि घाली पकवा,
उलूनि काळिज ब्रह्मांडाचें लागे काय दुभगूं ? ॥ २५ ॥
विश्वात्म्यानें शंख स्फुरिला,
विश्वहृदयिं तो घुमूं लागला,
हृदयामाजी या दुमदुमला,
फोडुनि हृदया गगनपथावर काय लागला वेंघूं ? ॥ २६ ॥
कीं वाऱ्याचे घुटके घेत,
रात्र करी प्रळयाचा बेत,
काळ तिला हुंकारा देत,
भीषण रव तो तव शब्दांवर लागत काय तरंगूं ? ॥ २७ ॥
बहिरासाहिरा होतो जीव,
घुमघुमण्याची नच जाणीव,
कल्पावांचुनचें ऐकींव,
थरथरतो अंगांत जगाच्या एकांतांतिल घू घू ! ॥ २८ ॥
चोर मनाचे मनीं चरकती,
हलल्याविण मार्गेहि सरकती,
खुळीं दिलें भ्रमभरें थरकतीं,
घुमू घुमू घुमू घुमू एकसारखा घुमतो आतां घू घू. ॥ २९ ॥

असें असे जरि गाणें भेसुर,
ऐकाया तरि आत्मा आतुर,
कां न कळे तें लावी हुरहुर,
त्यांत कांहिं तरि असे थेट जें जिवास लागे बिलगूं. ॥ ३० ॥
असल्या गाना तूं गातांना,
काळोखावर ठरतिल ताना,
रेषारूपें दिसतिल नयनां,
तुझी तीव्रता ऐकुनि माझ्या हृदया दे या जागूं. ॥ ३१ ॥
मीही मिळविन माझा सूर,
लाडेंलाडें जें कमसूर,
करुनी टाकूं त्याचा चूर,
गळाचेच "गणपती" जणीं जे त्या वेशीवर टांगूं.॥ ३२ ॥
खरें न कोणा कधींच दिसतें,
म्हणुनिच दिसतें तें तें पटतें,
चुकल्या चित्ता खरें वाटतें,
वस्तुवस्तुवर परि तेजाचा छाप लागतो रंगूं. ॥ ३३ ॥
मूळरूप परि अंधारांत,
न फिरे त्यावर भलता हात,
तें तूं बससी सदा पहात,
तमोभेदिनी दृष्टि तुझी ती दे मम नयनिं तरंगूं. ॥ ३४ ॥
दृष्टिस इतर न दिसतो कांहीं,
सैरावैरा हिंडत नाहीं,
जो तो ज्याचा त्याला पाही,
आत्मनिरीक्षण काळोखांतिल काम दृष्टीला सांगूं. ॥ ३५ ॥
अहंपणाच्या गाऊं गाना,
मुक्या मनाच्या उघड्या ताना,
स्वानुभवानें हलवूं माना,
ठराविकाळा लाथ मारुनी नभासही उल्लंघूं. ॥ ३६ ॥

तुझी आपुली संगत छान,
एकान्ताचें गाऊं गान,
बाणा ज्याचा त्या अभिमान,
वेळ आपुली भरास आली चल ये गाया लागूं. ॥ ३७ ॥
रात्र रंगली काळोखानें,
मेलीं संगीताचीं गानें,
विलया गेलीं उसनीं भानें,
कोणि निजलें, कोणी मेलें, आतां मी तूं जागूं. ॥ ३८ ॥
वरतीं नभ हें खाया पाहीं,
खालीं काळ्याकभिन्न राई,
काळोखाच्या भकास खाई,
सळसळुनी काळोख उकळतो; पवनहि लागे झिंगूं. ॥ ३९ ॥
तेजाची गंगाच आटली,
काळोखाची प्रभा दाटली,
भयानकाची सभा थाटली,
चिरंतनाचें प्रेतचि नाचे; लागे विश्व दुभंगूं. ॥ ४० ॥
दिवे चमकती आकाशांतिल,
नसत्या चिरंतना ते गातिल,
अपुल्या काळोखाला खातिल,
जळत्या आशेच्या या ज्योती काळोखानें डागूं. ॥ ४१ ॥
मरुं दे त्यांचें फसवें तेज,
खोट्या मोत्यावरचें वेज,
कृष्णनभाची अखेर शेज—
करुनि घोंगडी देउनि त्यांच्या अखंड वाती भंगूं. ॥ ४२ ॥
पिळुनी पाणी काळोखांतिल,
दिवे मालवूं आकाशांतिल,
आले जेथुनि तेथें जातिल,
काळोखाची धूळ गिळुनि मग काळे काळे रंगूं ॥ ४३ ॥

शरीर काळें, जीवहि काळे,
वटवटीतसे काळे डोळे,
तारांच्या काजळिचे गोळे,
काळभैरवचि मी; तूं माझा गोजिरवाणा राघू. ॥ ४४ ॥
घोर शब्द तूं करिं या काळीं,
–एकांताची जणुं किंकाळी,
शांतिब्रह्माची कीं उकळी,
स्वानुभवाचा तुझेपणाचा, दे रव भंवतीं पांगूं. ॥ ४५ ॥
मध्यरात्रिच्या या अवकाळीं,
गात बसूं चल गाणीं काळीं,
काळीं किरणें नेत्र उगाळी;
सजीवतेच्या काळ्या काळ्या प्रेताला आलिंगूं. ॥ ४६ ॥
ठराविकानें जग जें भरलें,
ठराविकचि तें आतां निजलें,
ठराविकचि रीतीनें मेलें,
स्मशानांतला जलसा अपुला; चला गावया लागूं. ॥ ४७ ॥
त्याच्या प्रेताच्या तोंडावर,
काळोखाची टाकूं चादर,
"राम" तयानें म्हटला ये तर–
रामप्रहरच्या अशा भुपाळ्या आपण गाउनि रंगूं ॥ ४८ ॥
भूपाळ्यांचा बिभासराग,
भयानकाला लाविल आग,
ढवळुनि तमास जागोजाग,
काळोखाच्या लाटांवरतीं लाविल तेज तरंगूं. ॥ ४९ ॥
आकाराविण जीव डोलती,
बोलावांचुनि भाव बोलती,
गाणीं त्यांचीं दूर खोल तीं,
अर्थ खोल ते करूं बोलते; चल ये, त्यांतच गुंगूं. ॥ ५० ॥

काळोखाचे पीळ मोकळे,
गतकाळाचें गाणें सगळें,
घुमुनि सारखें त्यांत गोंधळे,
अर्थ तयाचा चल ये, आपण सर्वांआधीं उमगूं. ॥ ५१ ॥
फुलें कालचीं काळवंडलीं,
नक्षत्रेंही नभीं झिरपलीं,
निःश्रेयाचीं बिजें करपलीं,
जित्या सुराचा जरा जिव्हाळा दे रे त्यांना लागूं. ॥ ५२ ॥
ऐकुनि तव हें शांतरसाचें,
काळें गाणें करुणरसाचें,
उफळतील कण काळोखाचे,
प्रकाशबीजें गूढ लागतिल फुलुनी स्वैर तरंगूं. ॥ ५३ ॥
स्वैर नाचती प्रकाशांतलीं
विश्वें सारीं बघ हीं सुकलीं,
उदास छाया त्यावर भरली,
सूर खडा धर; वेळ तुझी ही गूढ आपुलें सांगूं.॥ ५४ ॥
फुंक आपुलें भयाण शिंग,
काळोखाचें फोडुनि भिंग,
अज्ञेयाचें उकली बिंग,
पृथ्वीचें नारिंग फुंकरावर उडवाया लागूं.॥ ५५ ॥
नारिंगाच्या अशा शिदोऱ्या,
काळोखाच्या वळुं या दोऱ्या,
भुरकयागहिऱ्या गोऱ्यामोऱ्या,
करितिल त्यांच्या आधारावर नाच उद्यांचे राघू ! ॥ ५६ ॥
जरी आपुलें गाणें काळें,
निघेल त्यांतुनि विश्व उजाळें,
चिरंमृतांना उठविल काळें,
मरत्या ब्रह्मालाहि आजच्या होइल मात्रा लागूं.॥ ५७ ॥

झाडांच्या पानांची सळसळ,
मृतप्राय आत्म्यांची तळमळ,
विश्वाच्या हृदयांतिल खळबळ,
दूर कराया–दूर हराया चल ये, गाया लागूं. ॥ ५८ ॥
काळोखांतुनि जग जें दिसतें,
परब्रह्म जें त्यावर बसतें,
काळें गाणें ऐकुनि हंसतें,
निजत्यासाठीं साक्ष तयाची घुत्कुरावर मागूं. ॥ ५९ ॥
शांतरसाचा, एकान्ताचा,
स्वानुभवाचा, वैराग्याचा,
काळोखांतिल अज्ञेयाचा,
गीतझरा सोडुनी तयावर देऊं जगा तरंगूं. ॥ ६० ॥
शांत शांत मग जिकडे तिकडे,
ब्रह्मजलाचे सडे चहुंकडे,
जें तें होइल तेव्हां उघडें,
परात्पराचें गीत रोकडें गातिल चिमण्या राघू. ॥ ६१ ॥
घुबडा, आतां वेळ न उरला,
जीव कधींचा गाया झुरला,
भाव तयाचा मनींच मुरला,
तोंड तया परि फोडिलेंस तूं आतां दे त्या रंगूं. ॥ ६२ ॥
काळोखाचें भिनतां वारें,
शरीर सारें पहा थरारे,
पंचप्राणहि थिजले सारे,
सुन्न मस्तकीं घुमतो आतां एकसारखा घू घू. ॥ ६३ ॥
काळीं गाणीं अशीं गाढ तीं,
रसरसलीं हृदयांत वाढतीं,
पिळुनी हृदया सूर काढतीं,
"गोविंदाग्रज" घुमवितात मग घू घू घू घू घू घू. ॥ ६४ ॥

# स्मशानांतलें गाणें

[ बोलूनचालून भुतांचेंच गाणें, त्यांत अर्थ तरी काय असावयाचा व राग तरी काय धरावयाचा ! ]

वाटे स्मशान शांतिस्थान ! ॥ ध्रु० ॥
सजीवतेचा चाले चाळा,
कवीस त्याचा ये कंटाळा,
त्रास जगाचा चुकवायाला,
शांतपणाचें, रूप जगाचें, अशा स्मशानीं जात ! ॥ १ ॥
विश्रांतीस्तव निसर्गदेवी,
निजसदनींचा दीप मालवी,
( ज्यातें वदती अल्पधी रवी ! )
किंवा केल्या, तारा टिकल्या, फोडुनि झुंबर छान ! ॥ २ ॥
प्रकाश रविचा यापरि मेला,
संध्यारक्षारूप पावला !
परी तिचाही शेवट झाला,
आकाशीं जी, "गंगामाजी" पडे तिच्या तीर्थांत ! ॥ ३ ॥
अनंत-तारा-तारक-नयनीं
जरी यावया खुणवी रजनी
चंद्र न वरती परि ये भिउनी,
स्थिति जी रविची, तीच तयाची, होइल हें भय त्यास ! ॥ ४ ॥
दुष्कृत्यांचा बहर चालला,
जोड तयांच्या कृष्णत्वाला
याया, अंधारही पसरला,
दुष्टत्वाशीं, अंतरनाशीं, मिसळुनि जाई त्यांत. ॥ ५ ॥
भयाण जागीं, भयाण काळीं,
भयाण वृत्ती होत निराळी;
भयाण झाली तों आरोळी !
जरा दचकला, कवि तो उठला, ऐके देउनि कान. ॥ ६ ॥

"शांतीची ही स्मशानकारा,
सजीवतेला इथें न थारा,
म्हणती मरुनी पडतो वारा!
प्रेत जगाचें, जर हें साचें; कसला मग हा नाद? ॥ ७ ॥

पवन गातसे कीं बेसूर?–
हंसें भुतांचें कीं भेसूर,–
प्रेतांचा चौपदरी सूर,–
कीं प्रेतांतुनि, सुटला म्हणुनी, आत्मा करि थैमान?" ॥ ८ ॥

तों सरणांतुनि अस्थिच उठती,
त्यांचीं तुटकीं प्रेतें होतीं,
स्कंधीं त्यांच्या भुतें बैसतीं!
करिती बडबड, शब्दही न धड, कवि बसवी अनुमान.॥ ९ ॥

अणुरेणूंच्या अवकाशांत
प्रेतांचे कण हे शिरतात,
स्वैर घर्षणें ध्वनि करितात,
स्मशानांतलें, गाणें चाले; त्याचा हा पडसाद. ॥ १० ॥

रातकिड्यांचा किर्र शब्द या
निघे सारखा सूर धराया,
श्वान रडे हें साथ कराया.
तुझिया हृदयीं, धडधड जी ही, धरी तबल्याचा ताल! ॥ ११ ॥

कवि ऐकुनि हें स्तब्ध जाहला,
प्रकार सारा कळे तयाला,
मृत जिव्हेला फांटा फुटला!
ऐकायासी, त्या गानासी; करि आत्म्याचा कान. ॥ १२ ॥

"धन्य धन्य" ती स्मशानभूमी!
धन्य येथलीं भुतेंहि आम्ही!
सदाहि देवा या सुखधामीं—
घडवी वसती; सजीव जगतीं, नको नको आम्हांस! ॥ १३ ॥

धन्य तशी ती मानवजाती!
श्रेष्ठपणा जी मिरवी जगतीं,
सजीवतेचा आव घालिती,
भुतें परातें, वदतां भूतें, तिरस्कार ये फार! ॥ १४ ॥
बाह्यरूप नच भुतांस म्हणुनी
तुच्छ मानिती त्यां अवगणुनी,
द्विविधरूप जरि धरिती प्राणी—
तरि बाह्यांतर, रूपीं अंतर, जहनमूसे अस्मान्! ॥ १५ ॥
देवनाम भूतांप्रति पळवी,
देवाची त्यां फळे थोरवी,
मानव नवसें परि त्यां फसवी!
कोणी म्हणती, "ईश्वर नास्ति," हाच तयाचा मान! ॥ १६ ॥
अनेक माता एकाचि वनिता,
न्यायमार्ग हा ऐसा असतां;
अनेक वनिता, एकाचि माता!
व्यर्थ पसारा, मांडिति सारा, नीतीच्या जगतांत! ॥ १७ ॥
भुतें भुतांसच कधीं न खातीं,
बंधु बंधुच्या रंगत रक्तीं!
बाप मुलाची करितो माती!
हा जगताच्या मनुष्यतेच्या, प्रेमाचा बाजार! ॥ १८ ॥
नीतीसाठीं वपन मांडिती,
प्रेताहातीं नवरी देती,
अनाथ विधवा पदीं चिरडती!
सैतानावरि, ताण असा करि, सृष्टीचा सुलतान! ॥ १९ ॥
शास्त्रांचे तोंडांत फवारे,
रूढीचे परि गुलाम सारे!
स्वतंत्रतेचें उसनें वारें;
पक्षी सदनीं, बसले कोंडुनि, गाति यशाचें गान! ॥ २० ॥

समानतेच्या मारी बाता,
वरच्या लत्ता झोलित माथां,
सर्वेच खालीं झाडी लाथा!
न ती निवारी, न ही आवरी, बेशरमी हैवान! ॥ २१ ॥
अन्नावांचुनि सपिंड मरती;
मरतां त्यांतें पिंड अर्पिती!
सजीव तोंवरि लता देती,
मरतां घेती, खांद्यावरतीं, उरफाटा सन्मान! ॥ २२ ॥
पुण्यविक्रया करि धनदानीं,
मांग बसे तो उच्चस्थानीं!
भाविकतेला शिवे न कोणी.
कपटी मांजर, दिलें तया घर, दारिं इमानी श्वान. ॥ २३ ॥
दोन पतींनीं विधवा न सती,
पतिव्रतेला परि पांच पती!
धर्म भाळला आईवरती;
परी आपुलें, तेंच चांगलें, विवेक झाला ठार! ॥ २४ ॥
देवद्वारीं बसला नंदी,
राजद्वारीं स्वारशिबंदी,
रक्ष्य जनाला होई बंदी;
रक्ष्य वस्तुला, धक्का अपुला, रक्षक राखी प्राण. ॥ २५ ॥
गर्भि भार धरि तिजला भजती,
धेनु दुग्धदा, माता वदती,
भर वाहुनि आजन्म पोषिती!
मरतां उदरीं, मातृभूमि धरि, परी तिशीं बेमान! ॥ २६ ॥
विधवा मार्गी मार्गे फिरवी,
मांजर अडवें कार्य बिघडवी,
कर्तृत्वाची हीच थोरवी!
मेतो हसतां, कार्यक्षमता, न धरी परी गुमान. ॥ २७ ॥

भुतें बिचारीं रात्रीं फिरतीं
म्हणुनी त्यांतें तिरस्कारिती;
रात्रीची तर गोष्ट दूर ती—
परि दिवसांही दुष्कर्मांहीं पाडिति जन अंधार! ॥ २८ ॥
केंसांनीं जे गळे कापिती,
स्त्रीच्या केंसांनीं ते तरती!
प्रायश्चित्तें शुद्धहि होती.
शास्त्रें रडतीं, कराच सत्कृति, तरिही हलते मान. ॥ २९ ॥
धर्मस्त्रीचा गळा कापुनी,
समाधान मग करी हिंडवुनि,
तुळशीभंवतीं, देवायतनीं,
विचित्र लीला, दावुनि तिजला, दे दुःखावरि डाग! ॥ ३० ॥
गोपी सोळा सहस्र असती,
तरिही वृंदेसाठीं श्रीपति
निघे स्मशानीं; धीर न पोटीं!
तुळशीभंवतीं, विधवा करिती, काय न हाच विचार? ॥ ३१ ॥
वैराग्याच्या सोप्या गोष्टी
राम रडे परि सीतेसाठीं!
ब्रह्मा लागे मुलिच्या पाठीं!
भोळा शंकर, स्त्री अंकावर, गणेश राखी दार! ॥ ३२ ॥
घरच्या देवा स्त्रिया न भजती,
पुराण-कीर्तन धुंडित फिरती,
देवहि त्यांचे वेश्याभंवतीं.
विवाहकालीं, शपथ वाहिली, दोघे पाळिति छान! ॥ ३३ ॥
सुधारणेचे भक्त निपजती,
'स्वतंत्रता या स्त्रियांस' म्हणती,
पारतंत्र्य परि आपण वरिती,
परानुकरणीं दंग; सोडुनी स्वत्वाचा अभिमान! ॥ ३४ ॥

कोणि काढितां नवी कल्पना,
करिती सारे वृथा जल्पना,
मिळतां यश त्या, देउनि माना—
पायां पडतां, लाज न चिन्ता, म्हणती तो अवतार! ॥ ३५ ॥
सफेत येतो रंग शिराला,
रंग आंतला तसाच काळा!
वृद्धपणा नच दुष्टत्वाला,
भय काळाचें,–नच देवाचें–तेंहि परी देहास! ॥ ३६ ॥
चुना पांढरा, कातहि काळा,
रंग तयांतुनि निघे निराळा!
सहकार्यातें, असल्या ताळा!!
दोघे मिळुनी, एक ठिकाणीं, करिति परस्परनाश! ॥ ३७ ॥
मित्रपणानें पडे गळ्यांत,
गळफांसहि तो घालित हात!
कुणीं कुणाचा करणें घात—
नेम न याचा; उपकाराचा, मोबदला अपकार! ॥ ३८ ॥
सुखदुःखांचा भावहि नसतां,
सुखदुःखांची दावी समता.
सुखी व्हावया भगवद्गीता
वेद मंथुनी, श्रीकृष्णांनीं, हेंच काढिलें सार! ॥ ३९ ॥
बळी पोंचतां भुतें न छळितीं,
अल्पतुष्टता हास्यास्पद ती,
मानवतेची परी न रीती,
पिंड जयाचा, खाती त्याचा, करिती जगीं बोभाट! ॥ ४० ॥
म्हणती आम्हां भुतें बाधतीं!
भूतांची परि नाहीं छाती—
जायाची या असल्या जगतीं!
भुतेंच भीती, या भूतांप्रति, भुतें भुतां हीं खास! ॥ ४१ ॥

'मरतां मानव भुतें निपजतीं' !
बोलायाची परि ही रीती,
भांगेंतुनि का तुळशी निघती ?
कोठें आम्ही, कोठें तुम्ही, कशास कांहीं ठाव ? ॥ ४२ ॥
ब्रह्मपदाहुनि आत्मा ढळतो,
मरुनि जगाच्या स्मशानिं येतो,
मग मानव-छे: ! भूतचि होतो,
चितेंत जळुनी, दिव्य भोगुनी, सुटतो आत्माराम ! ॥ ४३ ॥
भुतें विदेही, मानव सुंदर,
दिव्य भूमिका स्मशान-मंदिर,
प्रवेश येथें फारचि दुष्कर !
प्रेत आणितां, बोले जनता, "राम कहो श्रीराम !" ॥ ४४ ॥
इतुकें गाउनि भूतें हंसलीं,
अखेरची जणुं तान घेतली,
तया वाहवा घुबडमंडळी—
'घू घू' शब्दें, देत मग वदे, घ्या आतां आराम ! ॥ ४५ ॥
श्वानहि साथ करोनी दमलें,
विधवेनें मृत बालक त्यजिलें,
दूध तयाच्या मुखिं सांपडलें,
पिउनि तेवढें, बघुनि कविकडे, हांसत पडलें श्वान. ॥ ४६ ॥
कवि हें पाहुनि विस्मित झाला,
म्हणे "पात्र मी न या स्थळाला !"
पळुनी पापी जगांत आला,
स्मशानांतलें, गाणें असलें, कवीस नुरवी भान ! ॥ ४७ ॥
म्हणे, "वरुनि जग दिसतें सुंदर—
'राम' जाणतो 'क्या है अंदर,'"
स्मशानांतलें गाणें सत्वर—
अमोल म्हणुनी, टाकि उधळुनी, चहूंकडे जगतांत ! ॥ ४८ ॥

———

# अभिनंदनपर वर्धापन

[ श्रीयुत चिन्तामणि द्वारकानाथ देशमुख I. C. S. हे मुंबई विश्वविद्यालयाच्या १९१२ च्या प्रवेशपरीक्षेंत पहिले आले. त्या प्रसंगावर खालील 'शब्दपुष्पहार' कै० "गोविंदाग्रज" यांनीं गुंफिला होता.]

धन्य ! धन्य ! बा, तव सुयशाची होतां जाणीव,
सहर्ष वर्षत आशीर्वच कवि "वत्स चिरंजीव."
परिचय नसतां करित अतिक्रम कविमानस माझें,
राग नसावा त्याचा बाळा ! क्षमा इथें साजे.
आनंदाचे भरांत नाचे मन्मानस बाळ !
कशास त्याला उगीच सांगूं "शिष्ट-नियम पाळ ?"
हर्षदर्शना नियम न कांहीं हृदयहि अनिवार;
गुण आकर्षणकारण; परिचय केवळ उपचार !
अथवा कविला बंध न कोठें मनिं आणुनि हेंची—
क्षमा करावी बाळ ! माझिया पुरोभागितेची.
विद्येच्या दरबारीं मिळतां तुज पहिला मान,
तुझ्या कुळाला, जातीलाही त्याचा अभिमान.
पारितोषकें त्रिविध गौरवी श्रीविद्या तुजला,
स्वानंदानें उधळूं आम्ही सहजचि अश्रुजला !
स्वज्ञातीचें नांव उजळिलें आज महाभागा !
भरुनी जाइल दुथडी म्हणुनी तुझी जातगंगा !
समाधानमय निःश्वासाच्या वातें तुजवरतीं
उत्कटाश्रुजललहरी उडवुनि सुखविल शतधा ती !
गरीब माझी रसवंती; परि होतां अतिहृष्ट
शब्दमौक्तिकें ओवाळुनि तुजवरुनि, काढि दृष्ट.
ममत्वमय दोषाचें लावुनि तुला गालबोट,
सदा सदिच्छासदनीं तुजला जपूं कडेकोट.
धरिलें आम्हीं शिरिं तुज पाहुनि तुझा गुणासार,
परी तुझ्याही शिरीं भार नव तसाच देणार.

वंश, जाति तव, समाज, त्यापरि महाराष्ट्रभाषा,
आजपासुनी सर्वांनाही तुझी फार आशा.
दिव्य अलौकिक जें जें दिधलें ईशें मनुजाला,
ईश्वरांश तें सदा लावणें ईश्वरकार्याला.
ईश्वररूपा जगीं रमे श्रीमानवतादेवी,
निजदिव्यांशा जीवेंभावें तिच्या पदीं ठेवीं!
गुढी पाडवा आज तुझ्या हा यशोजीवनाचा,
वर्षोवर्षी असाच उगवो चढत्या मानाचा.
दंभ, गर्व, अभिमान दडपुनी पायांनीं अरतीं,
निजपुण्यबळें असा सारखा जा वरती वरती.
प्रतिक्षणीं वर जातां दृष्टी व्यापकतर होई,
क्षितिजवर्तुलासह वाढूं दे स्वार्थ-वर्तुळाही!
" मी, माझें कुळ, माझी जाती समाज माझा हा,
श्रीमानवतादेवी माझी ईश्वर मीच अहा!"
अशा भावना मनिं ठेवुनियां जा वरती वरती,
हृदयसागरा सदा येउं दे अमर्याद भरती!
उंच भराऱ्या गगनीं तुजला पाहुनि घेतांना,
परस्परांना दावूं इथुनी डोलवून माना.
धन्य धन्य तूं त्रिवार धन्यचि; धन्य पिता-माता!
हर्षाश्रूंनीं न्हाणित असतिल ते तुजला आतां!
फुला उमलल्या! वास यशाचा नित्य नवा पसरी
दरवळुनी मोहुनी गुंगवीं ही दुनिया सारी!
" विजयी भव, महदायुष्मान् भव, चढविं, यशोनाद!"
खेळतील तुजभंवतिं आमुचे हे आशीर्वाद!
पाप, अमंगल, अनिष्ट किंवा अभद्र जें कांहीं,
स्पर्श तयाचा कधीं न होवो तव छायेलाही!
जें जें मंगल, दिव्य तसें जें, पुण्यहि जें जगतीं,
वृष्टि तयाची होवो बाळा, सदैव तुजवरतीं!

नभीं चकाके सकल कलांची तारामय सृष्टी,
करो तुझ्यावर निजतेजोयुत दिव्यपुष्पवृष्टी !
श्रीपरमात्मन् ! मागतसों हें तुजपाशीं एक,
करिं बाळावर कृपादृष्टिचा अखंड अभिषेक.
असो; असों दे ओळख; बाळा, लोभहि राहूं दे.
नित्य नवा उत्कर्ष तुझा या नयनीं पाहूं दे.
बालमित्र तव जमले असातिल सर्व तुझ्याभंवतीं,
अथवा चिमणीं भावंडेंही असतिल आवडतीं.
किंवा कौतुक करीत असातिल तात गोड वचनीं,
असेल जननी तुज कुरवाळित सजल अशा नयनीं.
अशा सुखाच्या काळीं आलों घटकाभर आड,
क्षमा तयाची करिं; कविता ही अशीच रे द्वाड !
हृदयदर्शना कसावसा हा शब्दपुष्पहार—
" गोविंदाग्रज " धाडी प्रेमें, बाळा स्वीकार.

१९-१२-१२

---

## जुन्या कवितांची आठवण

[ शार्दूलविक्रीडित. ]

साऱ्या त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यापरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ॥
** ! वाहतसे भरूनि दुथडी उल्हास ?‡ तेव्हां जशी ।
गेला वाहुनि काळ तो सकळ तीं सौख्येंहि त्यांचीं तशीं ॥१॥
आनंदें भरलें असें जग तसें आताहि ** ! पहा ।
** ही असतील त्यापरि किती लोकांत रम्या अहा ॥

---

‡ ही नदी बोरघाटांत खंडाळ्याच्या तळ्यांत उगम पावून कर्जत नेरळवरून वहात जाऊन कल्याणच्या खाडीस मिळते.

प्रेमाचीं नवजीवनेंहि दिसतीं स्वच्छंद चोहींकडे ।
ज्याचें त्यास नसे तरी जगभरी शून्यत्व ये रोकडें ॥ २ ॥
बाले, दृष्टि मनोहरा मजवरी तूं टाकिली ज्या क्षणीं ।
गेला तो क्षण सांग सांप्रत कुठें ? हें शल्य राही मनीं ॥
काळाच्या उदरांत खोल दडला जाऊनि कोठें तरी ।
* * ! शोकच शेष आज उरला प्रेमांतुनी अंतरीं ॥ ३ ॥
विद्यादानिं नसे विशेष गति त्या बाल्यांत आम्हां तशी ।
प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषशा मानसीं ॥
* * ! तीं वचनें मरून पडलीं; पर्यात त्यां पाठवी ।
" गोविंदाग्रज " आज विव्हल मनें * * ! तुला आठवी ! ॥४ ॥

बोरिवली, १६।२।१८

---

## अंधाला दृष्टिलाभ

[ आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन; कधीं कधीं हा उपकार असेल; नेहमींच मात्र नाहीं.]

अंधपणें मी पहात होतों माझ्या प्रेमाची मूर्ति ।
जीवनदेवी, जी हृदयातें देई दिव्याची स्फूर्ति ।
मम अंधत्वा वाटत होती ती सौंदर्य अप्रतिमा ।
अमर्याद आशेच्या राज्याचीही उल्लंघी सीमा ॥
न कळे निर्दय दया कुणाला मजविषयीं ही कां आली ॥
प्राणघातपर उपकाराची इच्छा कोणाला झाली ॥
अमोघगुण दिव्यांजन दुर्लभ हाय ! तेंहि परि सांपडलें ॥
विनायत्न या उभयहि नयनीं नेमकेंच कां हो पडलें ॥
स्पष्ट दृष्टि मज अंधाप्रति ही कशी लाभली अवकाळीं ॥
सतेज निजकिरणांनीं जी मृदु जीवाच्या जगता जाळी ॥
कृष्णवर्ण हा-प्रमाण कांहीं अवयवांस या मुळिं नाहीं ॥
कुरूप, दर्शनतापद, असली बाला ही पुढती राही ॥

मराठी ग्रंथ संग्रहा...
...
अ. क्र.
विभाग
क्रमांक,
नों. दि.

दृष्टि लाभतां मूर्तिमंत हा मनोभंगही जन्माचा ॥
शतविध हानीहुनिही असला लाभचि दुःखप्रद साचा ॥
दृष्टि लाभतां पहावयाचें असें तेंच उरलें न परी ॥
"गोविंदाग्रज" अंधत्वास्तव विलाप आतां सदा करी ॥

पुणें, २५।९।१६

---

## चिन्तातुर जंतु !

निजलें जग; कां आतां इतक्या तारा खिळल्या गगनाला।
काय म्हणावें त्या देवाला-" "वर जाउनि म्हण जा त्याला" ॥ १ ॥
"तेज रवीचें फुकट सांडतें उजाड माळावर उघड्या।
उधळणूक ती बघवत नाहीं" "डोळे फोडुनि घेच गड्या" ॥ २ ॥
"हिरवीं पानें उगाच केलीं झाडांवर इतकीं कां हीं।
मातिंत त्यांचें काय होतसे ?" "मातिस मिळुनी जा पाहीं !" ॥ ३ ॥
"पुराबरोबर फुकटावारी पाणी हें वाहुनि जात।
काय करावें जीव तळमळे" "उडी टाक त्या पूरांत" ॥ ४ ॥
"ही जीवांची इतकी गरदी जगांत आहे का रास्त।
भरती मूर्खांचीच होत ना ?" "एक तूंच होसी ज्यास्त" ॥ ५ ॥
देवा, तो विश्वसंसार राहूं द्या राहिला तरी।
या चिन्तातुर जन्तूंना एकदां मुक्ति द्या परी ! ॥ ६ ॥

पुणें, ९।११।१७

---

## एका जुन्या श्लोकाची आठवण !

[ शार्दूलविक्रीडित ]

"डोळ्यांनीं बघतों, ध्वनी परिसतों कानीं, पदीं चालतों।
जिव्हेनें रस चाखतों, मधुरही वाचे अम्ही बोलतों ॥
हातांनीं बहुसाळ काम करितों विश्रांति ही घ्यावया।
घेतों झोंप सुखें—फिरून उठतों ही ईश्वराची दया" ॥ १ ॥

पूर्वी पूर्ववयें प्रसन्नमयता जेव्हां मिळे सृष्टिला ।
शाळेच्या चिमण्या जगांत असतां हा श्लोक मीं वाचिला ॥
साध्या बाळमनास अर्थ पटला–आनंदही वाटला ।
आतां का करुणारस स्मृतिबळें त्याच्या असा दाटला? ॥ २ ॥
डोळ्यांनीं बघणें, ध्वनी परिसणें, इत्यादि सर्वा क्रिया ।
आतांही घडती; उपाधि चुकल्या नाहींत जीवासि या ॥
जेव्हां जीव थकून पाहत परी विश्रांति ही घ्यावया ।
नाहीं झोंप सुखें–अहो हरपली ती ईश्वराची दया ॥ ३ ॥
सौंदर्यें भरल्या जगास बघुनी हा प्रश्न चित्तीं उठे ।
जीवानें जगिं काय कार्य करणें श्लोकांत नाहीं कुठें ॥ ४ ॥

मुंबई, १२।२।१६

---

## प्रासंगिक–किंवा अप्रासंगिकच—

[ एका सार्वजनिक समारंभांत, एका थोर गृहस्थाबरोबर आलेल्या त्याच्या उपवर कन्येच्या गळ्यांतही इतरांप्रमाणें–सहजगत्या व्यवस्थापकांनीं पुष्पहार घातला; त्यावेळच्या त्या मुग्धेच्या वृत्तीस पाहून.]

[ श्लोक ]

सन्मानार्थ सभेंत हार कुणिंसा कंठीं तुझ्या घातला ।
तों झालें तुज कां कसेंच? इतका संकोच कां वाटला? ॥
लोकांदेखत लाजसी नवल हें कांहीं न बाले! परी ।
बाला पुष्पवती सलज्ज असते एकांतिंही यापरी ॥ १ ॥

पुणें.

---

## केशवसुत मेले?

जगतास जागवायाला केशवसुत गाउनि गेले! ॥ ध्रु० ॥
इंग्लंद भूमि शेलेची माहेर जडाचें बनलें,
सन्देश गूढ जे त्याचे तैसेच मानसीं जिरले,
तपोवना मानवतेच्या या बघतां मानस हंसलें!

देवांचे हेतु न पुरले,
अर्धेंच कार्य जें उरलें,
तें येथें करुनी गेले,
अवतरुनी फिरुनी शेले ! केशवसुत गाउनि गेले !
एकेका शब्दें भरले काव्याचे अद्‌भुत पेले !
ज्यांसाठीं मानव झटले, ते सुधाकुंभ भरलेले—
वाग्देवी वरुनी टाकी केशवसुत हृदयीं झेले !

अनुभवुनि निजानंदानें
मग त्यांचें केलें गाणें,
श्वासाच्या कारंजानें
चहुंकडे उधळुनी दिधलें ! केशवसुत गाउनि गेले !
हे तुषार पडतां अंगीं बिंदूंचे सिंधू झाले !
निजलेल्या जागृति आली, हो ताजें जें थकलेलें !
मरणासचि आलें मरणें, मग केलें त्यानें काळें !

तों शब्द मुक्याला सुचले !
गूढास रूप सांपडलें !
स्वच्छंद अचेतन हाले !
नश्वर तें ईश्वर केलें ! केशवसुत गाउनि गेले !
भेदभाव विलया गेला, सूक्ष्मांत स्थूल मिळालें !
गगनाचे फाडुनि पडदे, दिसलें जें त्यापलिकडलें !
मरणाचें मूळच तुटलें, जन्माचें नातें सुटलें !

वस्तूंत वस्तुपण भरलें,
जीवंत जीवही झाले,
आत्म्यास आत्मपद आलें,
ब्रह्महि ब्रह्मसें ठरलें ! केशवसुत गाउनि गेले !
कळलें कीं, 'आम्ही कोण' 'हरपलें श्रेय' सांपडलें;
आत्मा हो 'वेडापीर', सृष्टींत 'भृंग'सा रंगे;
मारुनियां 'गोफण' काळा निज 'निशाण' नभिं फडकविलें !

ऐकतांच विजयि 'तुतारी*'
हो चिरंजीव 'म्हातारी';
मग वाजवितांच 'सतारी'
सर्वत्र 'झपूर्झा' झालें! केशवसुत गाउनि गेले!
या स्थितींत त्या ब्रह्माची ब्रह्माशीं मिळणी घडली.
जें चिरंतनाच्यासाठीं सांगता तयाची झाली,
परि जनता वेडी कुठली, 'केशवसुत मेले' वदली!
परि जन्ममरण हें वारें
कल्पनाच नाचवि सारें!
मूर्खांनो! रडतां कां रे,
कीं 'केशवसुत ते मेले'! केशवसुत गाउनि गेले!
जे एकाठायीं होते, ते सर्वांठायीं भरले;
सर्वांच्या हृदयीं भरले सर्वांच्या जीवीं भिनले;
विश्व स्थिर ज्यांनीं केलें, कां वदतां–तेच निमाले;
लीलेनें त्यांनीं गातां
ही सजीव केली जडता;
अणुरेणूमधुनी आतां
निघतील तयांचे चेले! केशवसुत गाउनि गेले!
सर्व ठायिं सर्वेहि काळीं सर्वांनीं ज्यास पहावें,
पाहतां पाहतां वाटे डोळ्यांनीं ज्यास गिळावें,
तो विषय होइ मरणाचा जन बोले; काय करावें?
जे चकव्यावांचुनि चकले,
जरि ते कुणि कांहीं भकले,
तरि गोविंदाग्रज बोले
केशवसुत कसले मेले? केशवसुत गातचि बसले!

—

* हीं केशवसुतांच्या कवितांचीं नांवें आहेत. अरेरे! हेंहि सांगावें लागतें!

# निद्रागीत

[ पद ]

नीज गुणी बाळ झणीं शान्त, यावरी–
गाउं किती? कुंठित मति, नीज झडकरी!
विश्वाच्या स्नेहरसीं मग्न जाहलें,
प्रेमाच्या अश्रुजलें बाळ नाहलें,
मायेची तीट गालिं, चित्र जणुं हले,
सुयशाचें दुग्धपान गोड त्यावरी! १
हृदयाचा केला हा पाळणा नवा,
बांधाया ममतेचा पाश मग हवा,
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदु रवा, २
ब्रह्म सगुण बाळरूप रमत अंतरीं!
माता करि मंगलमय गायना अहा!
प्रेमभरें विश्व त्यांत रंगलें पहा;
सोड गड्या! हट्ट तुला शोभतो न हा,
अजुनि तुजसि नीज न ये–सांग कां तरी? ३

---

# आंधळ्यांची माळ

[ चाल–भक्ति ग वेणी ॥ माझी गुंफा गे साजणी ]

रानोमाळ । *आंधळ्यांची चाले माळ ॥ ध्रु० ॥
दृष्टि न यांतिल एकालाही । एकामागें दुसरा जाई ।
अर्धा डोळस रस्ता दावी । करी सांभाळ । आंधळ्यांची० ॥ १ ॥
तुकड्यासाठीं करिती ओरड । पैशासाठीं सारी धडपड ।
तोंडीं हरिनामाची बडबड । हातीं टाळ । आंधळ्यांची० ॥ २ ॥
यांना साजे नांव भिकारी । थोड्यासाठीं लोंचट भारी ।
धरुनी धरणें बसती दारीं । उठवि कपाळ । आंधळ्यांची० ॥ ३ ॥
यांना दिसतें केवळ 'आज' । नाहीं कांहिं 'उद्यांची' लाज ।
मिळेल कैशी अगदीं वाझ–। सायंकाळ । आंधळ्यांची० ॥ ४ ॥

---

* मात्रादोष येथें अगदीं अपरिहार्य आहे.

येईल 'उद्यां' जरि एखादी । ठेवूं दृष्टि मिळवुनी आधीं !
न तरी येइल ही कर्मामधिं । पुन्हा जंजाळ । आंधळ्यांची० ॥ ५ ॥
अशा विचारें देवापाशीं । मागति कधिंही दृष्टि न खाशी ।
काय म्हणावें या मूर्खांशीं । प्रभो संभाळ । तूंच ही आंधळी माळ ॥६

---

## विचार

[ विचार ज्याच्या त्याच्या पाठीस लागलाच आहे; त्याची ओळख कशाला करून घ्यावयास पाहिजे ! ]

विचार करितां तुजविषयीं । गुंग विचारा ! मन होई ॥ ध्रु० ॥

दिवसभरी करुनी धंदा
गुलाम पोटाचा बंदा
पडे न तो थकण्यासाठीं-
तोंच लागसी त्यापाठीं !
ताळतंत्र न तुला कांहीं
आदि अंत तुजला नाहीं !
   दया न अंतरिं,
   करिसी स्वारी,
   सदा तयांवरि—
खपती जे पोटावारी
या जगताच्या बाजारीं.

[ २ ]

तूं असती बहु नवलपरी,
विश्रांतीचा कामकरी;
निद्रा तव करितां नाश,
स्वप्नांतहि देसी त्रास !
झोंप जागती तयांप्रती
ज्यांसी तूं धरिसी हातीं.
   नसत्या आधि
   स्वैर शतावधि
   निर्मुनि आधीं,
क्षणोक्षणीं मग वाढविसी
विश्वामित्र दुजा गमसी !

[ ३ ]

विपत्तिकाळीं आम्हांसी,
न कदाही टाकुनि जासी !
मित्र म्हणावें तुला जरी,
देह जाळिसी सदा तरी !
शत्रु म्हणावें जरि तुजशीं
यत्न हितास्तव तरि करिशी !
   "कसें करूं मी"
   "काय करूं मी"
   ध्रुवपद नामी
हें तुझिया रडगाण्याचें,
नांव न संकट जाण्याचें !

[ ४ ]

करिसी एकांतीं गर्दी,
एकांतहि जनसंमर्दीं.
जागा असतां कुणि त्यासी,
पुढचीं स्वप्नें दाखविसी!
निजतां कोणी त्याकरवीं,
कराविसि तूं कामें बरवीं.
देइन म्हणशी,
सुंदर खाशी,
"उद्यां" नराशीं
"आज" हातिंची परि हरिसी,
मृगजाळिं मनुजा खेळविशी!

[ ५ ]

पुत्र भविष्यत्कालाचा,
जन्मसि त्या आधीं साचा.
चिंता जननी तुझी जरी,
घात इच्छिसी तिचा तरी.
वाढायाची गति अतुला,
काळाहुनि बहु वेग तुला.
दीन जनांवर,
लोभ अनावर,
करिसि निरंतर
विचित्र लीला जशी तुझी
तशी नाढळे जगीं दुजी!

---

## कलगीचें गाणें

[तमाशांत कलगीच्या सवालाला तुऱ्याचा जवाब मिळतो; जगाच्या तमाशांत तरी तसें कां नसावें ?]

बोल बोलतों सलगीचे,
गाणें माझें कलगीचें!
एक वेळ जी आवडती
सारंगी माझी होती,
नानापरिचे सूर तिचे
निघती कितितरि गमतीचे;
काळ पुढें तो परि गेला
आनंदहि कांहीं मेला;
नवी नवाई—कायम नाहीं—थोडी राही
पुढें सुरानें नच रमवी,
स्मृतिनें परि त्यांच्या भ्रमवी!

असाच बसलों कुठेंतरी
सारंगी घेऊन करीं;
खेद मना जरि बहु झाला
आशा होती फार मला—
धिन्ना धिन्ना धिन्नकना
प्रसन्न करितिल खिन्न मना;
ही सारंगी–रंगुनि रंगीं–चित्ततरंगीं
हलविल मनिंच्या तारांना
काढिल नानापरि ताना !
ढोल नगारे मजभंवतीं
नाना नादें परि रडती;
त्यांची पोकळ ओरड ती
एकपणाची करि माती;
गरीब माझी सारंगी
मुळीं खुलेना हमरंगीं;
सूर जमेना–चित्त रमेना–मज करमेना
विरमेना रव भंवतींचा,
खेदहि माझ्या चित्तींचा !
दाटी केली तों गगनीं
कृष्ण भयंकर मेघांनीं;
स्वैरपणें हृदयीं शिरले,
मस्तकांतंही ते भरले;
कडकडाट त्यांचा भारी,
धुकें पसरलें बाहेरी;
मन घाबरलें--बहु बावरलें–भटकत फिरलें
कांहिं सुचेना, उमजेना,
कांहिं रुचेना, समजेना !
मेघांच्या छायेसरसें
काळोखाचें राज्य दिसे;

दाट तमाच्या तेजांत
नाहिंपणाचा गिरि दिसत;
काळोखाच्या किरणांचे
कांटे खुपती मग साचे;
वाटे क्षणिं परि–गिरिशिखरावरि–बाळ एक धरि

मंजुळ गाण्याचे घेर
ऐकीवाच्या बाहेर !
मेघांच्या थैमानानें
क्षणांत विसरे परि गाणें;
कल्लोळाच्या मग नादीं
यत्न करीं मी संवादीं;
पडुनी भलत्या अशा भरीं
सारंगी मी न धरिं करीं;
परि तें गाणें–मधुनि ऐकणें–पुन्हा विसरणें

रचणें काळोखावरतीं
मग वाद्याच्या इमारती !
मेघांच्या गर्जनेसवें
मीहि ओरडें दीर्घ रवें,
ढोल नगारे बेसूर;
त्यांतच मी मिळवीं सूर;
आशा ऐशी मन भावी
सससुरां मिळणी व्हावी;
अखेर फसलों–उगाच बसलों–भयाण हंसलों

सूर भिन्न एकेकाचा
एकभाव तेथें कसचा !
यत्न करीं मग अखेरचा
सूर धरीं सारंगीचा;

भेसुराचें संगीत
ऐकाया आत्मा भीत!
संतापानें भूमिवरी
सारंगीचा चुरा करीं!
मान गळालें-ऐक्य पळालें-सूर जळाले,
झालें गोडीचें काळें
तारांचें झालें जाळें!
हृदयीं मेघांची गरदी
दंग असे भीषण नादीं;
नाहिंपणाचा डोंगर तो
अंधपणें पाहत होतों;
मधुनिमधुनि त्या बाळाचें
गाणें चाले भासाचें;
वृत्ति बावरी-रडे बिचारी-ऐकाया तरि
नसत्याच्या पडद्याआड
गमे बाळ दडलें द्वाड!
स्थितींत या त्या मेघांचा
कडकडाट हो शेवटचा;
तोंच कडकडे वीज भरें
अवसानाचें ये वारें;
धुकें पळालें फार जवें
मेघ जळाले जळासवें;
वृत्ति रंगली-फारच रमली-हर्षे रडली
उफराटी सारी सृष्टि
मेघाविण झाली वृष्टि!
खरेपणाचा पाऊस
स्वच्छ धूत काळोखास;

दाट तमाचें तेज बने,
गेलीं तीं काळीं किरणें;
सारंगी तों करीं हंसे
नवल, जशीच्या तशी असे!
समोर डोंगर—परि शिखरावर—बाळ मनोहर
स्वच्छंदें गाणें गाई,
सूर सूर ऐकूं येई!
वृत्ति ऐकुनी थरारली
सारंगी वाजवुं सजली;
सात सुरांस्तव ती वेडी
सुदें तिच्या तारा छेडी!
सूर एकच ।निघे परी
पहिल्याहुनि किति गोड तरी!
सुराबरोबर—विरला डोंगर—शिखरतळावर
नाहींचें नाहीं झालें
बाळ गात पुढती बसलें!
ढोल नगारे ते पहिले
पहिल्यापरि चालू झाले;
गाण्याचे परि या सूर
पोकळपण करिती चूर!
वृद्धवधूचें हो खासें
बालवराशीं लग्न असें!
त्या जोडीचें—अपत्य साचें—गाणें असुचें
उपजे बाळ परी नादीं
पितराच्या जन्माआधीं!
ढोल नगारे एकसरी
त्या लग्नाचीं वाजंत्रीं,

सुमुहूर्ताचा क्षण फुटुनी
युगें निघालीं त्यामधुनी !
बाळचि तें गाई गाणें,
नवरा मुलगा मंत्र म्हणे,
नव्या जुन्याचें--उण्यापुऱ्याचें-असेनसेचें
लग्न चाललें चौफेर
सारंगी मम अहेर !
साथ कराया गाण्याशीं,
सारंगी घे हाताशीं
"गा तूं करील साथ मुला !
माझी सारंगी तुजला."
परी बाळ तें स्वच्छंद
गाणें करि अपुलें बंद !
बाळक रुसलें-पळत चाललें-अंधुक झालें,
माझी सारंगी म्हणतां
मुकेपणा वरि ते नसता !
वेड लागलें गाण्याचें
आर्जव केले बहु त्याचें,
"बाळा गा रे ! गाच पुन्हां,
गाण्यावांचुनि प्राण सुना !
माफ करीं कसलाहि गुन्हा,
गाच, गाच, परि गाच पुन्हां !"
पायां पडलों-"चुकलों !" वदलों-अखेर रडलों-
राग तयाचा जाईना !
कांहीं केल्या गाईना !
"जपलों जीतें जिवापरी
सारंगी ही तंच धरीं !"

ऐकुनि आनंदें हंसलें
बाळ पुन्हां गाऊं सजलें;
एकपणा भिन्नत्वाचा
जीव तोच त्या गाण्याचा !
चिरकालींचे-मखमालींचे-मऊ गालिचे
केले माझ्या हृदयाचे
गाणें मग त्यावर नाचे.
बाळ सारखें गात पुढें
गाण्यामाजीं जीव बुडे;
सर्वांगीं तें विष भिनलें,
सुख मरणाचें सांपडलें;
ऐकत असतां मी मेलों,
प्रेतावरि माझ्या बसलों !
भान न साचें-आजउद्यांचें-मग-आतांचें
दिवस वाटले जायाचे
प्रेताच्या आयुष्याचे !
चहूंकडे गाणें भरलें,
सारंगी गाणें झालें;
मूर्त भाव ये गाण्याला
धरीनसें गमलें मजला;
धरावया जों हात हले
हाताचें गाणें झालें !
कानांचेंही-दृष्टीचेंही-गाणें होई !
मजला मी पाहूं गेलों,
तों मीही गाणें झालों !
गाणें झालें सर्वांचें,
गाणें झालें काळाचें;

गयाचें गाणें सगळें,
गाण्याचें गाणें झालें;
गाण्यानें मग त्या गाणें
गाण्यानें ऐकत बसणें
नादब्रह्मीं–जिरलों " तुम्ही "–जिरलों " आम्ही "
ऐकतांच एके त्याचें
झालें जें ऐकायाचें.
स्वार्थ नसे ना परमार्थ,
गाण्याला कुठला अर्थ ?
वृत्ति जाहली चवचाल,
गाण्याला तुरली चाल !
ध्रुवपदिं गाणें जें सारें
ध्रुवपद मग कसलें बारे !
गाण्यांतचि जिरतां काळ
गाणें सहजचि बेताल !
क्षणिं शब्द सरे–क्षणिं राग हरे–मग नाद मरे,
फुकट नव्हे बा, तें गाणें,
करिशिल मग " गाणें गाणें ! "
बोल बोललों सलगीचे,
गाणें माझें कलगीचें !
तोच तयावरि करिल तुरा !
वेडा जो मनिं खराखुरा !
खराखुरा परि पुरापुरा
असला वेडा करिल तुरा !
गा जगतांना–गा मरतांना–मर गातांना,
मरुनि सदाही गाच परी
गाणें मरणें एक करीं !

स्वप्रेतावरि जो बसतो;
तुझ्याठायिं मजला बघतो;
गाण्यामाजी दोघांना
पाहुनि घेइल तो ताना!
त्याला हें देतों गाणें
अर्थ जयाला मनिं बाणे;
आदिहि गाणें–मध्यहि गाणें–अंतहि गाणें,
असलें गाणें मिळे नवें
काय याहुनी तुला हवें!
होतें गाणें जरि माझें,
आतां झालें तेंच तुझें!
तुझें तरी परि तें कसचें?
गाणें झालें सर्वांचें!
जाणे तें गाणें साचें
गाणें असलें कोणाचें!
सवाल घ्यारे–पुढें सरारे–तुरा करारे!
बोल संपले सलगीचे,
गाणें माझें कलगीचें!

---

## घांस

[ चाल—विडा घ्या हो नारायणा० ]

घांस घे रे तान्ह्या बाळा। गोविंदा गोपाळा।
भरवी यशोदामाई। सांवळा नंदबाळ घेई ॥ ध्रु० ॥
घेई कोंडा कणी। त्रैलोक्याचा धणी।
विदुराघरींचा। पहिलावहिला घांस ॥ १ ॥
पोहे मूठभरी। क्षीराब्धीचा हरी।
मैत्र सुदामजीचा। आला दुसरा घांस ॥ २ ॥

थाळी एक्या देंठीं। ध्यावी जगजेठी।
द्रौपदीमाईचा। आला तिसरा घांस ॥ ३ ॥
उरल्या उष्टावळी। फळांच्या वनमाळी।
शबरीभिल्लिणीचा। घ्या हो चवथा घांस ॥ ४ ॥
टाकूं ओंवाळून। मुखचंद्रावरून।
"गोविंदाग्रजा"चा। उरलासुरला घांस ॥ ५ ॥

---

## गुलाबी कोडें

[ संध्याकाळीं सूर्य पश्चिम दिशेस असतांना पश्चिम तर तांबडी होतेच; पण पूर्व दिशेवरही त्याच रंगाची छटा दिसते, हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल.]

रंग गुलाबी संध्या पसरी पश्चिमदिग्भागीं
समोर पूर्वा स्वमुख रंगवी त्याच रम्य रंगीं.
परी पश्चिमाहृदयिं तांबडें सूर्यबिंब विलसे,
कशी रंगली पूर्वा याचें कारण कांहिं नसे.
विनोदचतुरा मुग्धा बाला विचारि निज नाथा।
"शास्त्रज्ञा, पंडिता, उलगडा हें कोडें आतां !
अपरा वदनीं रमते लाली रविसहवासानें,
रवि नसतां परि कां रंगावें प्राचीच्या वदनें ?
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणें कधीं कशी केली ?"
विनोदपंडित पति कौतुकला, हंसे तसा थोडें.
ओंठ गुलाबी, गाल गुलाबी, गुलाबीच कोडें !
वदे तिला "हें रहस्य असलें कथीन कानांत !"
करि कंठीं कर एक, दुज्यानें धरि दुसरा हात !
ओढुनि जवळी, ऐकिवला तिस मुकाच कानांत,
—गालांवरचें गीत कसें तें वठवूं गानांत !
दूर सरकतां लज्जित बाला, प्राणनाथ बोले
"बघ हृदयाच्या आरशांत जें चित्र तुझें डोले !

रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गालीं !
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भंवतालीं.
चुंबनचित्र न परी उमटतां या दुसऱ्या गालीं,
सांग वल्लभे ! नाचतसे कां त्यावरि ही लाली ?
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणिं कधीं कशी केली ?
" कांट्यानें काढावा कांटा," शास्त्रज्ञा ठावें,
गुलाब टाकुनि गुलाबास मग कां नच उडवावें ?
हीं हृदयाचीं कोडीं सोडवि हृदयांचा मेळ,
शास्त्रांना हा कसा कळावा हृदयाचा खेळ !
ओठ गोष्ट मग कशीं बोलली तीं मिटलीं तोंडें,
" गोविंदाग्रज " रसिकां टाकी गुलाबीच कोंडें !

---

## अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस

[ मध्यरात्रीच्या सुमाराला कोकिळेचा शब्द विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाहीं.]

अवेळ तरिही बोल–कोकिळे–अवेळ तरिही बोल !
रात्र पसरली जगतावरती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भंवतीं,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत;
उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे जरि वरुनी हंसरी–
खिन्नताच तरि अंतरिं सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो संसाराचा गोल !
आनंदाच्या प्रातःकाळीं,
दिवसाच्या गजबजल्या वेळीं,
किंवा संध्या जेव्हां नटली,
आनंदाचीं गाणीं गाया गवई लाखकरोड !

असतां आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !
परंतु जेथें उदासीनता
व्याकुल करिती विषण्ण चित्ता
तेथें त्याला याया समता-
गाणें गावें हेंच अलौकिक ईश्वरतेचें काम.
बाह्य सृष्टि जरि निद्राभोगी,
अंतःसृष्टि तरी हतभागी.
उडते तशीच राहुनि जागी,
निजवाया तिजलागीं असलें गाणें गाई गोड !
अवेळ येथें कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हांही !
अनुकंपेला नियम न कांहीं !
रित्या मनीं या ओत सूर; त्यां जाऊं दे अति खोल.
वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षांतुनि अनिवार,
येतां जातां सूर काढितो भलभलते भेसूर !
खिन्न चांदणें ढगांआडचें
भग्न मनोरथ झाले ज्याचे—
हंसें जणूं तें अशा मनाचें,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !
या अवकाळीं-या एकांतीं
निद्रेची मिळवाया शांति
थकुनी भागुनि पडलों अंतीं,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाहीं ज्यास.

20249

हातीं संसाराची माती,
मनिंच्या आशा मनाच खाती,
भूतकाळचीं भूतें रडतीं !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढतीं शून्याचें मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भंवतीं,
विषण्ण येती विचार चित्तीं,
बाह्यांतर विश्वांत खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणें वायां,
मशाल दिवसां लावुनि होतो लाभ कुणाला काय

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई गीता,
झोंप येउं दे माझ्या चित्ता,
लक्ष्य लागतें सुरांकडे तव, वाटति ते बिनमोल !
पाहुन ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता—
रुक्ष जगावर स्त्रीहृदयांतिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूच्या शीतलतेनें
भोंवतालची आग जाळणें,
निद्रा घेतां शांत मनानें
" गोविंदाग्रज " ऐकत राहिल गुंगींतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

## हुरहूर

[ शार्दूलविक्रीडित ]

काळोखामधुनी पल्याड न दिसे या रात्रिचा शेवट,
आणी मोहकता तिला तरि कसा दुष्प्राप्य तारागण ?
अज्ञेयांतुनि आरपार न दिसे दिक्काल यांचा तट,
चित्ताच्या नयनीं दुरून खुपती कां दिव्य आशाकण ?
मी श्वासास धनी, अखंड फिरतों वारा भरारा जरी,
आधीं बारिक वाड़गें तरि तया हीं कुंपणें घातलीं !
या वाऱ्यावर बांधणार कधिं मी उंची मनोरे परी ?
केव्हां नांगरणार ताल उघडी ही माळरानांतली ?
जें दृष्टीस दिसे न, तेंच पटुनी वाटेल चित्ता कधीं ?
बुद्धीला जिरवीन भावजलिं का, आशा न माते दुजी ?
तेजाला हुडकीन का लपलिया या अंधकारामधीं ?
केव्हां मस्तक लोपुनी हृदयिं या होईल उंची खुजी ?
माझें होइल सर्व हें कधिं, मला जें आजला पारखें,
माझें चित्रच नाचवीन नयनीं माझ्या कधीं सारखें ?

---

## वेडा

[ कुणाला कशाचें वेड लागेल आणि त्याचा शेवट कशांत होईल हें कोणीं सांगावें ? ]

[ शार्दूलविक्रीडित ]

वेडा कोणि जगास सोडुनि पळे बाहेर गांवाचिया,
मैदानांत भयाण जाउनि उभा राही; न कांहीं बघे
संध्यारंग नभःपटांत रमती गांवीं न तें त्याचिया
वेडाचे नवरंग चित्तफलका रंगाविती; तेच घे.
त्याचें वेड कशांतुनी उपजलें कोणास हें नाकळे
त्याचें त्यासहि नाकळे मज गमे देवाहि ना ठाउकें !

त्याची ती विमनस्कता नच वदे कांहीं जरी आगळें ?
वेड्याच्या हृदयास आपण तरी कैसें म्हणावें मुकें ?
व्हावें काय तयास हें समजण्या रस्ता न कांहीं उरे,
शून्या दृष्टि गमे तिच्यांत दिसलें कोणाविशीं प्रेम न !
तोंडाचा पडदा विकार विसरे; बेरंग सारा स्फुरे;
होतें का मग भावशून्य नुसतें ओसाड त्याचें मन ?
छेः ! मैदान उजाड तें; तरि तिथें हा वायु आहेचना ?
वारें कांहिंतरी तसें घुमवितें ओसाड वेड्या मना !

[ २ ]

तारा एक तशांत पश्चिमदिशा फोडून बाहेरली
संध्या कुंकुमिं दिग्वधूच टिकली लावी रुपेरी जणूं !
वेड्यानें तिजला भकास नयनीं येतांक्षणीं हेरली;
हांसे भेसूर तो; सवेंच अपुलें हृद्गान लागे म्हणूं !
वाटे कीं पटली तिला बघुनियां त्या खूण कांहींतरी,
तोंडाच्या पडद्यावरी उमटले चित्तांतले खेळ ते !
कांहीं वेळ तसाच पाहि तिजला; एकाग्रता ती खरी
आशा, प्रीति तसेंच वेड असलें, यांनाच ती साधते !
तारा आड ढगां-जरा क्षणभरी झांकून राहे जर
वेड्याच्याहि तरी विषण्ण वदनीं काळीच छाया दिसे !
केला कांहिं विचार-निश्चय; वठे तच्चित्र तोंडावर,
भासे दीपसम स्मशानतिमिरीं तें निश्चयाचें पिसें !
नैराश्यादि विकार तीव्र करिती हा खेळ ऐसा पहा—
आश्चर्यें बघती तयास थिजले डोळे दिशांचे दहा !

[ ३ ]

किंचित् मस्तक हालवी; पुटपुटे तोंडांतची कांहिंसें
तारास्थानपथें सवेग मग तो चालावया लागला;
हातीं तीस धरीन-निश्चय दिसे धांवे पुढें तें पिसें !
टाकी सारखिं पावलें झपझपां; नाहीं मुळीं भागला !

काळी घोर निशा; उदास हृदयीं तैशी निराशा जडे-
तारा तारक त्या तमीं; मनिं तसा तो एक आशाकण,
पायांखालुनि जाति डोंगर नद्या-पाही न मागें पुढें;
वर्षें कैक असाच चालत तरी लाभे न तारांगण!
वेडा यापरि जात जात पुढतीं झाला कुठें नाहिंसा!
तारा ती दिसते अजून! परि हो पत्ता तयाचा कसा?
काळाच्या उदरीं कधीं भटकतां कोणा कुठेंही कसा
वेडा सांपडतां, कथा मज-पुढें झालें तयाचें कसें?
त्याचें वेड तरी कुणास मिळतां द्या तें मला आणुनी;
माझ्या जी मनिं चांदणी चमकते, जाईन तीमागुनी।

---

## पुनर्जात प्रेमास।

प्रेमा! ऊठ—चल उघड, झांकली मूठ!
तुंबळ सागर तव खळबळला,
हृदयीं तटवूं त्यास कशाला?
जगभर लाटा उधळायाला
दिली तुज सूट—चल उघड, झांकली मूठ!
कोंडुनि असला सागर धरिला,
माझा मूर्खपणा मज कळला,
मिळतां स्थल तुज नाचायाला
करीं रे लूट—चल उघड, झांकली मूठ!
क्षणभर वाटत होतें मजला,
कीं तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट—चल उघड झांकली मूठ!
उगवे सूर्य काल मावळतां,
फिरुनी फुलतें फूलहि मिटतां
प्राणजीवना, तुजही शिवतां,
मरण हें झूट—चल उघड, झांकली मूठ!

मराठी ग्रंथ संग्रहाल
ग्र. क्र.
विभाग
क्रमांक
नों. दि.

द्वेषावरतीं, दुःखावरतीं,
फिरवीं तुझ्या यशाची महती,
जा, जा, नाच सर्वही जगतीं,
धांव बेछूट—चल, उघड, झांकली मूठ !
विसरुनि जाऊं अनुभवजाला,
तुडवूं पायीं चल खेदाला !
टाकूं जाळुनि नैराश्याला !
दुःख सब झूट !—चल उघड, झांकली मूठ !
तुझिया श्वासाच्या उद्गारें,
टाकूं भरुनी जग हें सारें,
एकच नादें करुं आर्ता रे,
सुखाची लूट—चल उघड, झांकली मूठ !
मी तूं दूर न राहूं आतां,
दाखवुं शक्ती अपुली जगता,
आणूं परमेश्वरही हाता,
ऊठ रे ऊठ—चल उघड, झांकली मूठ !

---

## हृदयशारदेस

[ कोणी कवीनें आपल्या कवितेस 'शब्दशारदा' व प्रणयिनीस 'हृदय-शारदा' अशीं नांवें देऊन हें गाणें म्हटलें आहे.]

हृदयशारदे ! या कवनाचे बोल ऐक माझे !
सरस्वती शब्दाची माझी तुजला जरि लाजे.
तुझ्या मनाचा, तुझ्या जिवाचा एक एक बोल,
मम कवितेच्या जादूलागीं ठरवीलच फोल !
नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी,
नाचत डोलत करि शिणलेलीं मनें पुन्हां ताजीं.
तिच्या गुणांवर कुणा कुणाचे जीव गुंग कांहीं,
तरि जादूनें जादूगारच काय फसुनि जाई ?

जरी शिरावर कुणीं बांधिला अमोल शिरपेंच,
दिसतो का तो ज्याचा त्याला? स्तुतिचेंही हेंच?
शब्दांचा बाजार बदलतां; जीवाची वेठ
नको नको हें; उघड आपुल्या प्रेमाची पेठ!
प्रेमाचा जिवलगे! जिव्हाळा करितां रसभरती
भिन्नरंगिं हृत्तरंग रंगति उचंबळुनि निघती!
शब्दचित्र परि काढूं जातां त्यांचें उल्हास,
रंग तयांचे उडुनी जाती निश्वासासरसे,
जनिं जें दिसतें, मनिं जें वसतें, हृदयीं जें सलतें,
तें बोलावें तंव हें वठतें भलत्याचें भलतें!
रस तारांचा नभीं पाझरे, भूवर नच येई;
शुष्क होउनी खालीं येतां शीतलता राही.
मूर्तरसाच्या कैक अप्सरा गगनगीत गाती;
नाद विरे परि नभींच; उतरे वारा भूवरती.
हा मोत्याचा सडा घातला वरतीं आकाशीं,
चमक तेवढी येते त्याची या भूमीपाशीं!
आशीर्वचनीं शब्द तेवढे धांवुनि येतात;
स्फूर्तिदायिनी इच्छा उरते तशीच हृदयांत.
तीच दशा मम होते तुजला जावें जों गाया,
हृदयभावना मूर्तिमती तूं! कविता तव छाया!
सुकला चुकला जीव आजवर तुजवांचुनि फिरतां,
हृदयशारदे! शब्द-शारदा नको मला आतां!
धरी सांवरुनि कविता पडत्या हृदयाचा तोल!
मरत्या जीवा परी वांचवी तुझा प्रणयगोल!
प्रीतीचीं पाउलें उमटलीं जीं या हृदयांत,
जीवस्वामिनि! किती दिवस वद बसूं तींच गात?
प्रणयतटिनि! तूं दूर न राहीं-करपलाच जीव;
हृदयसाक्षिणि! प्राणरक्षिणी! न कां येत कींव?

तव वसतीच्या दिशेवरी जी तारा लखलखते,
नेत्रयुग्म हें तीवर खिळतें, नच कधिंही हलतें !
तव हास्याचा नाद नाचला ज्या वाऱ्यावरती,
जीव कोंडला वांचविण्याचें बळ त्याच्या हातीं,
अनंत तारा, अखंड वारा, नच माझ्या कामीं !
माझी तारा, माझा वारा, तुझ्या प्रेमधामीं !
वस्तुवस्तुवर नेत्र वठविती तव मूर्तिंच एक !
जग ताराया जणुं प्रीतीचा त्वन्मय अभिषेक !
नामाचा जप तुझा सारखा; अश्रूंची स्मरणी–
प्रतिक्षणीं प्रतिनामें वाढे तिच्यांत एक मणी !
ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहानें,
कधिं येशिल कधिं घेशिल मजला हृदयीं प्रेमानें !
प्रीतीनें रंगलीं पावलें हृत्पटिं नाचीव;
प्रेमामृत पाजुनी देवते ! भक्ता वांचीव !
प्रेमदृष्टिनें प्रिये ! मिळविती डोळ्याला डोळा,
पंचप्राणहि होतिल माझे नयनीं क्षणिं गोळा !
हृदयीं जडवीं, चरणीं तुडवीं, मग त्या ओढुनियां;
सोक्षमोक्ष करिं, तार मार वा प्रेमाची दुनिया !
हृदयशारदे ! दर्शन परि दे, हृदयीं दे स्थान,
वक्षःस्थलिं तव पडतां पडतां येऊं दे मरण !
या प्रेमाचीं, तुझ्या यशाचीं, गाणीं या नादीं
गाइन जाइन गात गात तीं तुजसह ईशपदीं.
प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला !
त्या प्रीतीला कविनें पुसतां "गाऊं काय गडे ?"
प्रीति म्हणे "जा तिलाच गाईं जी तव हृदयिं जडे !"
हृदया, नयनां, ध्याना, गाना, जिनें जिंकलेंस,
'गोविंदाग्रज' गाइल त्या तुज हृदयशारदेस !

---

## मोरपिसावरचा डोळा

डोळा साचा ॥ हा मोरपिसाऱ्यावरचा ॥ ध्रु० ॥

बुट्टे काळया शालूवरतीं । तारे निळ्या नभीं लकलकती ।
कृष्णजलावरि कमलें रमतीं । तसा डोळा हा ॥ मोरपिसावरती पाहा ॥

दिसती रंग उघड नयनांतें । आहे विद्युत्शक्तिहि यातें ।
ओढी वस्तुमात्र जग म्हणतें । खरें असावें ॥ कां नाहीं उगिच म्हणावें ॥

मोहकता तर आहे खास ॥ ओढी ती त्याजवळि जगास ।
वाटे सौंदर्याचा वास । असावा त्यांत । ग्रह पहिला बघतां होत ॥

दिसतें काय कुणा परि यानें । रुदना खुलवी का हंसण्यानें ।
फुलतें कुठल्या कीं प्रेमानें । क्षणमात्रांत ॥ हे विचार येति मनांत ॥

सजीवतेचें निर्जिव फूल । नुसती सौंदर्याची भूल ॥
ईश्वरतेची पोकळ हूल । भिन्न रंगाची ॥ ही बैठक भिन्नपणाची ॥

क्षणमात्राची मोहकता ही । चंचलतेनें चमकत राही ।
प्रेमाचें मुळिं पाणी नाहीं । कसला डोळा ॥ हे रंग जाहले गोळा ॥

शोभा प्रेमावांचुनि फोल । जिणेंहि याचें कवडीमोल ।
अर्थाविण मेलेले बोल । टाकुनि याना ॥ खेळणें मुलाबाळांना ॥

कितीक असले फसवे डोळे । रंगीबेरंगी जणुं गोळे ।
जगांत पाहुनि फसती भोळे । दे ही जोड ॥ देवा ते डोळे फोड ॥

---

## एखाद्याचें नशीब

[ शार्दूलविक्रीडित ]

कांहीं गोड फुलें सदा विहरतीं स्वर्गांगनांच्या शिरीं,
कांहीं ठेवितसे कुणी रसिकही स्वच्छंद हृन्मंदिरीं;
कांहीं जाउनि बैसतीं प्रभुपदीं पापापदा वारि तें,
एखादें फुटकें नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारितें !

कोणी पर्वत आपुल्या शिरिं धरी हैमप्रभा शीतला,
कोणाच्या उदरामधून निघती मोठ्या नद्या निर्मला;
कोणाला वनदेवता वरितसे मोदांत जी नाहते,
एकायामधुनी परंतु जळती ज्वालानदी वाहते!
झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटलें मेघाप्रती याचतीं,
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानांवरी नाचती;
सारीं पालवतीं, फुलें विहरतीं, शोभा वरी लोळते,
एखाद्यावरमात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते!
चाले खेळ असा जगांत; बहुधा सौख्यांत सारे जरी,
एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवीं यापरी;
पाही कोण अशा हताश हृदया? जो तो असे आपला,
देवा! तूं तरि टाकिं अश्रु वरुनी, त्यासाठिं तो तापला!

---

## जगाचें गाणें

[ केव्हांहि पहा, जग उगवत्या सूर्याला अर्घ्य देत असतें.]

नमोऽस्तु ते! धन्य एक सकल जगीं तूंच! उगवत्या रवे!
भावगुणीं जी अतुला । भक्तीनें अर्घ्य तुला,
स्वीकारीं या ऋतुला, । पुण्य ज्यांत सांठवे.
गगनिं सदा जरि असशी । तरि अमुच्या नयनांसी
काल न तूं दिसलासी! । आज तुझे कर नवे!
थोर हृदय परि तव हें । अपराधा नच पाहे,
गतवृत्त न मनिं राहे । फिरुनि कधिं न आठवे!
मावळले काल रवि । वार्ताही ती न हवी!
तेज तुझें त्यां लपवी । स्वकर पसरि नवनवे!
जो प्रकाश काल रमे । आतां तो तिमिर गमे!
हा प्रकाश कधिं न शमे । तव करिं जो संभवे.
थोर तूंच! धन्य तूंच! । तेजोनिधि दिव्य तूंच!
नयनिं मनीं एक तूंच! । इतर कांहिं नाठवे!

झालें मनिं हेंच ठाम। कीं रवि तुजलाच नाम।
तेजाचें तूंच धाम। सांगावया का हवें ?
स्तुति आतां इतरांची। कधिं नाहीं व्हायाची !
वंदन हें तुजलाची। सतत उगवत्या रवे !

---

## अनामिकाचे अभंग

[ ज्या प्रदेशांत पाऊल टाकावयाचें आहे तेथील रहिवासी साधुसंतांना तुमचा आमचा स्पर्श अनामिकापेक्षांही अमंगळ आहे. शिवाय, मराठीचिये नागरीं या पंढरीच्या पाहुण्यांची श्रीचंद्रभागातटीं जी प्रेमळ पंगत झाली तिच्या उष्ट्याखरकट्यासाठींच हात पसरण्याचा जिथें संकल्प केला आहे तिथें नांवाचा अभिमान अनाठायीं आहे. मराठी रसवंतीच्या पवित्र अभंगस्वरूपाला, माझ्या अनामिकवृत्तीच्या पामरवाणीनें स्पर्शदूषित करण्याच्या या अतिप्रसंगाची जनस्वरूप जनार्दनाकडून मला क्षमा होईल अशी आशा आहे.]

मंगलाचरण

नमो पांडुरंगा नमस्ते श्रीरंगा। रुक्मिणीच्या रंगा नमोनमः ॥
सर्वां मंगळाचा एकरूप निधि। तूंच देवा विधि–हरिहर ॥
ऐकिल्या देवांच्या तेहतीस कोटी। तीं रूपें गोमटीं देवा तुझीं ॥
निर्गुणाचें ब्रह्म सगुणाची मूर्त। दोहीठायीं कीर्त एका तुझी ॥
म्हणे "××" अगा पंढरीच्या देवा। अनामिका सेवा घ्यावी आतां ॥

१

कवित्वाचा येथें वाहिला मीपणा। लक्ष्मीनारायणा तुझे पायीं ॥
गणांमात्रांचा तो नको ताळेबंद। नको वृत्त छंद नाम गाया ॥
विना कानामात्रा आणिक वेलांटी। लेखनकामाठी मांडिली हे ॥
साहित्याची कळा झाली तिऱ्हाईत। शुद्धाशुद्धातीत नाम तुझें ॥
म्हणे "××" जें जें मनीं मुखीं आलें। तें तें येथ झालें ब्रह्मार्पण ॥

२

क्षणमात्र थांबा असंगाच्या संगा। अहो पांडुरंगा कृपावंता ॥
मनाचा मुहूर्त साधूनि हा आज। सोडुनिया लाज बोलतों मी ॥

माझ्यावरी मीच मांडीन फियोद । तुझ्यापायीं दाद मागावया ॥
नका देवराया धरूं भिडभाड । कराल तो निवाड मान्य आहे ॥
म्हणे "××" देवा रखमाईच्या कांता । परी दूर आतां नका राहूं ॥

३

जीवेंभावें देवा आम्ही अमंगळ । जातीचे चांडाळ, थोर नांवें ॥
पांडुरंगा आम्ही युगांचे दुर्जन । क्षणाचे सज्जन पश्चात्तापें ॥
व्रत एकादशी मात्र हें देहाशीं । नित्य मनापाशीं दिवाळीच ॥
नांवाचेच साव आम्ही थोर थोर । मनाचे हे चोर सर्वकाळ ॥
तुझे पायीं आतां चोरी नसे कांहीं । म्हणे "××" नाहीं भयभीती ॥

४

मागायाची आहे मेख । तुजपाशीं हीच एक ॥
सुखदुःखें हीं केवळ । जन्मा आलियाचें फळ ॥
इंद्राचंद्रा कर्मरेखा । तेथें माझी कोण लेखा ॥
हेंचि एक यावें दान । घडो कांहीं तुझें गान ॥
म्हणे "××" हीनदीन । मृगजळींचा हा मीन ॥

५

नाहीं भक्तिभाव नीट । तरी हांक मोकलीतों धीट ॥
नाहीं मुक्तीचा हव्यास । नसे नामाचाही ध्यास ॥
नेमधर्म कोणा ठावा । एकरूप उजवाडावा ॥
तुम्हीं यावें आम्हांसाठीं । कवित्वही न ऐसें गांठीं ॥
म्हणे "××" हांके साच । अधिकार पाप हाच ॥

६

आलां गोपगोपींसाठीं । देवा तुम्ही यमुनाकांठीं ॥
पुंडलीका याया भेटी । देव आले वाळवंटीं ॥
नामयाच्या कारणीं । राउळाचीही फिरवणी ।
दामाजीच्या संकष्टीं । विठू धेड होई कष्टी ॥
म्हणे "××" मायबापा । भीशी काय माझ्या पापा ॥

७

धन्य धन्य माझें पाप । तुज आणिल आपेंआप ॥
माझ्या पातकांची रास । देवा पाडील इरेस ॥
"आजवरी थोर थोर । पायीं नेले पतित घोर- ॥
परि याचें पाप फार । पाहूं होतो का उद्धार" ॥
म्हणे "××" ऐशा भरीं । देवा याल माझ्या घरीं ॥

८

नेघे देवा तुझ्या नांवा । तुझा माझा उभा दावा ॥
नामें उद्धरिले सारे । मीच एक राहिन बा रे ॥
तुझ्या नांवा गालबोट । सुखें खावे दांतओठ ॥
पाहूं बोलाविल्यावीण । हरी का तें माझा शीण ॥
देवा तुझी ध्याया लाज ॥ "××" ठाकलासे आज ॥

९

काय महिमा नामांकित । आज दावा प्रचीत ॥
पूर्वीं नांव झालें फार । नको त्याचा बडिवार ॥
दावीं मज प्रत्यय कांहीं । नको संतांची ग्वाही ॥
देणेंघेणें हातोहात ॥ उधारीची नाहीं बात ॥
धन्य "××" भाग्यवंत । देवा तुझा पाही अंत ॥

१०

काळयवनाच्या भेणें । दडी पाण्यापोटीं देणें ॥
धाकें आणि दैत्याच्याच । मोहिनीचा केला नाच ॥
काच बळीचा अगोचर । देवा झाला मूठभर ॥
परि येतां पापें माझीं । कुठें दडाल देवाजी ॥
म्हणे "××" धीटपाठ । येथें अस्सलाशीं गांठ ॥

---

# रांगोळी घातलेली पाहून§

[ शार्दूलविक्रीडित ]

" साध्याही विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे;
नित्याच्या अवलोकनें परि किती होती जगीं आंधळे!
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे,"
रांगोळी बघुनीच केशवसुता हें आठवे बोलणें.
रांगोळींत तुझ्या विशेष गुण जो! आर्या मला वाटतो,
स्पष्टत्वें इतुक्या अशक्य कथणें वाटे तुला काय तो?
जो तूतें वदवे न अर्थ मनिंचा तोंडांत आला तरी,
तो मी बोलुनि दाखवीन अगदीं साध्याच शब्दीं परी.
चैत्रीं अंगण गोमयें सकलही संमार्जिलें सुंदर,
रांगोळीहि कुणीं जिथें निजकरीं ती घातिली त्यावर,
ज्यां आमंत्रण त्या घरां मुळिं नसे ऐशा स्त्रियांलागुनी
त्या चिन्हांतुनि हा विशेष निघतो आहे गमे मन्मनीं:—
या या! आज असे सुरेख हळदीकुंकू पहा या स्थलीं
बत्तासे बहु खोबरें हरबरे खैरात ही चालली!
ठावें कोण न जात येत दिधलें कोणास आमंत्रण;
नाहीं दाद घरांत ही मुळिं कुणा; दे धीर हें लक्षण.
संधी टाकुनि छान फौज तुमची कोठें पुढें चालली?
बायांनों! अगदीं खुबी विसरतां तैलंगवृत्तींतली!
नातें, स्नेह, निदान ओळख तुम्हां येथें न आणी तरी,
या, आमंत्रण राहुं द्या; परि शिरा साऱ्याजणी या घरीं!
लाभे हें फुकटांतलेंच हळदीकुंकूं तुम्हांला जरी,
होई काय नफा अचानक तयामाजीं न किंचीतरी?
ही आगंतुकवृत्ति आपण जरी धिक्कारिली यापरी,
प्राप्ती चार घरें उगीच फिरुनी होईल का हो तरी?

---

§केशवसुतांची 'रांगोळी घालतांना पाहून' ही उदात्त कविता ज्यांनीं वाचली आहे, त्यांनाच या कवितेचा अर्थ कळेल.

या डोळा चुकवून नीट; डरतां आतां कशाला बरें ?
चाले काय असें उगीच भिउनी, तुम्हीच सांगा खरें ?
कोणाच्या नजरेंत येइल तरी होणें असे कांहिं का ?
केला का खटला कुणावर कुणीं ऐसा अजूनी फुका ?
बायांनो ! तर या, नकाच दवडूं संधी अशी हातची,
जा जें कांहिं मिळेल तेंच भरल्या रस्त्यांतुनी खातची !
कामें हीं असलीं हितावह कधीं होतील का लाजुनी ?
या-या-या तर धावुनी त्यजुं नका रीती पुराणी जुनी !
कोणाच्या घरचें असेल हळदीकुंकूं कधीं नेमकें
ज्या बायांस नसेल हें चुकुनियां केव्हां जरी ठाउकें,
रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तयीं शाहणे;
कोठें चालत काय काय अगदीं हें नेहमीं पाहणें !

---

## राजहंस माझा निजला !

[ पतिनिधनानंतर अल्पावधींतच बापडीवर एकुलत्याएका मुलाचें निधन पाहण्याचा प्रसंग आल्यावर असा भ्रम कां होणार नाहीं ? ]

[ चाल—उद्धवा शांतवन० ]

हें कोण बोललें बोला ?
'राजहंस माझा निजला !'

दुर्दैवनगाच्या शिखरीं । नवविधवा दुःखी आई
तें हृदय कसें आईचें । मी उगाच सांगत नाहीं !
जें आनंदेंही रडतें । दुःखांत कसें तें होई —
हें कुणीं कुणा सांगावें ?
आईच्या बाळा ठावें !
प्रेमाच्या गांवा जावें—
मग ऐकावें या बोला । 'राजहंस माझा निजला !'

मांडीवर मेलें मूल । तो हृदया धक्का बसला
होउनी कळस शोकाचा । भ्रम तिच्या मानसीं बसला
मग हृदय बधिरची झालें । अति दुःख थिजवि चित्ताला
तें तिच्या जिवाचें फूल !
मांडीवर होत मलूल !
तरि शोकें पडुनी भूल—
वाटतची होतें तिजला । 'राजहंस माझा निजला !'
जन चार भोंवतीं जमले । मृत बाळा उचलायाला
तों काळ नाथनिधनाचा । हतभागि मना आठवला
तो प्रसंग पहिला तसला । हा दुसरा आतां असला !
तें चित्र दिसे चित्ताला !
हें चित्र दिसें डोळ्यांला !
निज चित्र चित्तनयनांला,
मग रडुनि वदे ती सकलां । 'राजहंस माझा निजला !'
करुं नका गलबला अगदीं । लागली झोंप मम बाळा
आधींच झोंप त्या नाहीं । खेळाचा एकच चाळा
जागतांच वाऱ्यासरसा । खेळाचा येइल आळा
वाजवूं नका पाऊल
लागेल तया चाहूल
झोंपेचा हलका फूल
मग झोंपायाचा कुठला । 'राजहंस माझा निजला !'
हें दूध जरासा प्याला । आतांसा कोठें निजला !
डोळ्याला लागे डोळा । कां तोंच भोंवतीं जमलां ?
जा ! नका उठवूं वेल्हाळा । मी ओळखतें हो सकलां
तो हिराच तेव्हां नेला
हिरकणीस आतां टपलां
परि जिवापलिकडे याला—
लपवीन ! एकची मजला । 'राजहंस माझा निजला !'

कां असलें भलतेंसलतें। बोलतां अमंगळ त्याला?
छबकड्यावरुनि माझ्या या। ओंवाळुनि टाकिन सकलां!
येतें मी पदराखालीं। पाहूंच नका लडिवाळा!
मी गरीब कितिही असलें
जरि कपाळ माझें फुटलें
बोलणें तरी हें असलें—
खपणार नाहिं हो मजला। 'राजहंस माझा निजला!'
हें असेंच सांगुनि मागें। नेलांत जिवाचा राजा
दाविलाहि फिरुनी नाहीं। नाहिंत का तुम्हां लाजा?
न्यावयास आतां आलां। राजहंस राजस माझा!
हा असा कसा दुष्टावा?
कोणत्या जन्मिचा दावा?
कां उगिच गळा कापावा—
पाहुनी गरिब कोणाला। 'राजहंस माझा निजला!'
हे काळे कुरळे केश। खेळतात डोक्यावरती
ही दृष्टि पहा मम वदनीं। नेहमीं अशी ही असती!
हें तेज अशा रत्नाचें। झालें का आहे कमती?
कानांत नाचती डूल,
तोंडावर हंसरें फूल,
जीवाची घालुनि झूल—
मी असाच झांकिन याला। 'राजहंस माझा निजला!'
या अर्ध्या उघड्या नयनीं। बाळ काय पाहत नाहीं?
या अर्ध्या मिटल्या तोंडीं। बाळ काय बोलत नाहीं?
अर्थ या अशा हंसण्याचा। मज माझा कळतो बाई!
हें हंसें मुखावर नाचे
जणुं बोल दुग्धपानाचे
कीं मुक्या समाधानाचे
इतुकेंहि कळे न कुणाला–। 'राजहंस माझा निजला!'

या माझ्या मानससरसीं । सारखें प्रेमजळ वाही
त्या तरंगलहरींवरती । राजहंस पोहत राही
सारखा पोहुनी दमला । मग मला भुकेला बाही
नयनांच्या शिंपांमधुनी,
अश्रूंचे मौक्तिकसुमणी,
मीं दिले तया काढोनी,
मोत्यांचा चारा असला । राजहंस खाउनि निजला !
ते वैकुंठेश्वर गेले । पदिं त्यांच्या अर्पायाला
ही अखंड या अश्रूंची । वैजयंति मोहनमाळा
मी करित असे केव्हांची । धरुनिया उराशीं बाळा
कौस्तुभ हा माळेमधला
हृदयाचें कोंदण याला !
तो चोराया कां आलां ?
दैत्याहुनि दैत्यचि झालां । 'राजहंस माझा निजला !'
हें असें जाहलें म्हणतां । तरि देवचि निजला का हो ?
जरि निर्दय होउनि निजला । आळवीन फोडुनि टाहो
कीं असा पोटचा गोळा । पोटांतचि देवा राहो !
ही कुऱ्हाड आकाशाची,
मजवरती पाडायाची,
नाहींच कल्पना त्याची,
हा तुमचा कावा सगळा । 'राजहंस माझा निजला !'
जरि दूत यमाचे आले । लाडक्यास या न्यायाला
ते निष्ठुर असले तरिही । भुलतील पाहुनी याला !
हृदयाचें होउनि पाणी । लागतील चुंबायाला
मी मुका असा घेतांना—
हा पहा-पुन्हा हंसला ना ?
कां अशा फिरवितां माना ?
सुख खुपे काय डोळ्याला ? 'राजहंस माझा निजला !

हें सर्वस्वाचें फूल । त्याभवतीं झाली गोळा
मी बघतें-कधिंचा आहे । त्यावरती तुमचा डोळा
एकदां करावा त्याचा । वादानें चोळामोळा
सर्वांच्यां मनिंचा लाहो,
हाच ना? स्पष्ट बोला हो,
मी इतकी वेडी का हो—
कीं हेंहि कळेना मजला । 'राजहंस माझा निजला!'
जरि होउं नये तें झालें । तरि सोडणार या नाहीं!
पाळणाहि रुततो ज्याला । प्रेमें जरि निजवी आई!
तो देह खांच दगडांत-। छेः नको नकोग बाई!
हृदयाची खणुनी खांच
झांकिन मी बाळ असाच,
दुःखांचे फत्तर साच!
जा! जाउनि सांगा काळा । 'राजहंस माझा निजला!'
जरि काळाचाही काळ । बाळाला न्याया आला!
तरि नाहीं मी द्यायाची । या जीवाच्या जीवाला!
सारखीं गाउंनी गाणीं । निजवीन कल्पवर याला!
जा! करा आपुलें काळें!
माझेही दमले डोळे!
प्राणांचें पसरुनि जाळें—
मी निजतें घेउनि याला । 'राजहंस माझा निजला'

* * *

सांगुनी असें सकलांशीं । मृत बाळ उराशीं धरुनी
तन्मुखीं स्वमुख ठेवोनी । चुंबिलें एकदां फिरुनी
पाहिलें नीट निरखोनी । आणिं तीही गेली निजुनी!
मग पुन्हा कधीं ती उठली,
जाणिव कुणा ही कुठली!
परि मति या प्रश्नें हटली—
"बोलेल कोण या बोला । 'राजहंस माझा निजला'!"

मग मातापुत्रांवरि त्या। तरु गाळिति कोमल पानें।
ढाळिती लता निजसुमनें। पशुपक्षिहि रडती गानें
दशदिशा दगडही कढती। मग दुर्भगुनी शोकानें।
दुमदुमतें स्थळ तें अजुनी,
त्या एकच करुणागानीं,
जा जाउनि ऐका कानीं!
ऐकाल याच बोलाला:—
"राजहंस माझा निजला!"

---

## दसरा

[ रूढीचें सीमोल्लंघन हाच समाजाचा दसरा.]

चला आज हा आला दसरा!
पाउल पुढतें टाकायाला,
सीमोल्लंघन करावयाला,
आनंदानें नाचायाला,
सणांमधें सण हाच खरा!
चौमासाला आतां विसरा!
मुसळधार तो पाउस वरला,
तुडवित पायांखालीं चिखला
शेत पेरिलें येत पिकाला,
येतां आनंदाचा दसरा!
पहिल्या दुभत्या गाई विसरा!
उन्हाळ्यांत त्या उडाल्याच ना?
त्या गाईंच्या खिल्लारांना
नव्या दमानें सोडा राना,
चला खाउं या पहांटचारा.

करा जरासा मुखडा हंसरा !
आतां कां हीं तोंडें रडवीं ?
कडवीं बीजें करी गोडवीं,
फुटलें तुटलें पुन्हांहि जडवी,
आला ना तो तुमचा दसरा !
चला रूढिवर आतां वसरा !
टाकुनि सीमा मृत धर्माच्या,
दंभाच्या या अंधपणाच्या,
जुनेपणाच्या, अहंपणाच्या;
सीमोल्लंघनकालाचि दसरा !
जुन्या मतांचा जाळा कचरा !
नव्या मतांचे जे राऊत,
खरेखुरे मायेचे पूत,
येऊंद्या धैर्याला ऊत,
नका हातचा दवडूं दसरा !
नका हातचा दवडूं दसरा !
जुन्या ऋषींना सलाम ठोकुनि
करा तयारी छाती ठोकुनि
आजकालच्या ऋषींमागुनी
जा तिकडे नेइल हा दसरा !
श्रुतिस्मृतींना आतां विसरा !
अंधभक्तिचा पांगुळगाडा
मोडुनि तोडुनि उपडा पाडा !
पाताळीं तो नेउनि गाडा !
करा साजरा यापरि दसरा !
नेट धरा धीराचा जबरा !
खुल्या मनाचा अबलख घोडा
जीन नको उण्हाणी सोडा !

जेरबंद वा लगाम तोडा !
सीमोल्लंघनकाळच दसरा
जुन्यापुराण्या चिंध्या विसरा
जरिपटका घ्या सुधारणेचा !
भगवा झेंडा नव्या मताचा !
नव्या दमानें फडकविण्याचा
मानवधर्माचा हा दसरा !
नव आशेच्या तृणांकुरांचा
तुरा शिरावर; चढवा साज,
मढवा न्यायाचें शिरताज,
समचित्ताचे बरकंदाज
चला जमूं या जमाव तुमचा.
काळाचें मैदान अफाट,
दिसतां कोठें खंदक खांचा
द्या घोड्याला अमीन टांचा
वाऱ्यावरच्या करवा नाचा
कापा रस्ता आटोकाट !
चला निघूं या असली स्वारी;
जुनाट पोकळ नगारखाना
उंटावरला कुणी शहाणा
वाजवितां त्या आधीं हाणा
घ्या कृष्णाची करीं 'तुतारी'
रूढीच्या किल्ल्यावर स्वारी,
'अगरकरां'ची झडवा नौबत !
'भागवतां'ची धराच हिंमत !
'केशवचंद्रा'चें घ्या चिलखत !
फुंका '*कृष्णाची'च 'तुतारी'

*या गाण्यांत 'केशवसुतां'च्या 'तुतारी' या सुधारणाप्रेरक जोरदार गीताचा उल्लेख 'कृष्णाची तुतारी' या नांवानें केलेला आहे.

रूढीचा गड खाली उतरा,
पाकोळ्या घुबडांना उडवा,
जिवंत सोनें अखंड लुटवा,
कृपण मनाचा रस्ता खुटवा,
असा साजरा कराच दसरा !

कसले पूर्वज घेउनि बसलां ?
होते मोठे सोन्या भरले
त्यांचें आतां काय राहिलें !
त्यांचें त्यांच्या मागुनि गेलें.
शिक्का कायमचा तो कसला !

उगाच खाउनि बसतां हाय !
पूर्वज आले चार पावलें,
एकसारखे पुढें सरकले,
म्हणुनिच ना ते इतके आले ?
त्यांना पूर्वज नव्हते काय ?

कुंभारासारखेच लोटे !
खोटें ठरतें तत्त्व आज तें,
पूर्वज संतत पुढें चालते
घायघूत ही नसती धरिते
बडे बापके तुम्ही बेटे !

रडत बैसले महारमांग
दीनपणाला गर्वं छळतें,
अज्ञानाला भिउनी पळतें,
या वर घ्याया नच जें वळतें
उच्चत्वा त्या लावा आग !

थांबा, ऐका देउनि कान
सुकल्या हातीं बाळा कोमल,

तशाच विधवा करिती तळमळ
फत्तर फुटतिल येउनि कळवळ
कुठला पोकळ गताभिमान?
चला उठा रे बांधा कंबर!
तुमच्यापुरती ही धीशक्कर
टाकुनि, रूढीशीं द्या टक्कर!
युद्ध माजवा रे घनचक्कर!
फोडा कुजकें हें अवडंबर!
गेल्या हें धर्माचें भूत
पाहुनि बसलां कां रे भीत?
नव्या मतांचे भालाईत
घोडे अपुले या उडवीत
नातरि रडते व्हा राऊत!
अनंतकाळाचें मैदान
हिम्मतवाले चाबुकस्वार,
उत्साहाची करिं तलवार,
चित्साक्षीची ढाल तयार,
घोडा फिरवा रानोरान!
सरतां काळाचें मैदान
घोडा उडवा मग आकाशीं,
भिडवा नेउनि स्वर्गापाशीं
पूर्णपणाशीं ईशपदाशीं,
तरीच होइल दसरा छान!
कुणी मनाचा असेल कच्चा
करील त्यालाही मनशूर
या गाण्याचे गाउनि सूर
'केशवपुत्रा'चा महशूर
'गोविंदाग्रज' चेला सच्चा

## ती कोण ?

[ शार्दूलविक्रीडित ]

दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे !
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धांवतो दिवसही, कीं भेट व्हावी कुठें ?
जीवाचें जगणें असेंच असतें सापेक्ष प्रेमावरी !
डोळेभेट दुरून; भाव अथवा आशाहि त्याला पुरे।
मी हें पाहुनि जीवबंधन असें शोकार्त होतों परी,
कांकीं या मम लक्ष्यशून्य हृदयीं कांहीं न आशा स्फुरे !
ओठांशीं भिडतें रहस्य मनिंचें-सांगूं कुणाला परी ?
अश्रू हे नयनींहि-माळ करुनी घालूं कुणाच्या गळां ?
आलें हें भरुनी रितें हृदयही देऊं कुणाच्या करीं ?
आला दाटुनि कंठ-हाय ! रडुनी कोठें करूं मोकळा ?
जी माझ्यास्तव, मी जिचें सकलही, आधार जी जीवनीं
देवा ! भेटविं-दाखवीं तरि मला ती कोण देवी जनीं ?

---

## विरामचिन्हें

[ शार्दूलविक्रीडित ]

जेव्हां जीवनलेखनास जगतीं प्रारंभ मीं मांडिला,
जो जो दृष्टित ये पदार्थ सहजीं वाटे हवासा मला !
बाल्याची पहिली अशी बदलली दृष्टी सदा वागडे,
तेव्हां 'स्वल्पविराम' मात्र दिसती स्वच्छंद चोहींकडे !
आहे काय जगांत ? काय तिकडे ? हें कोण ? कोठें असे ?
सांगा ईश्वर कोण ? त्यापलिकडे तें काय ? केव्हां ? कसें ?

जें तें पाहुनि यापरी भकतसे; दृक् संशयें टाकित,
सारा जीवनलेख मी करितसें तैं 'प्रश्नचिन्हां'कित !
अर्धांगी पुढती करी वश मना, शृंगारदेवी नटे,
अर्धें जीवन सार्थ होइल इथें साक्षी मनाची पटे !
प्रेमानें मग एकजीव बनतां भूमीवरी स्वर्ग ये !
केला 'अर्धविराम' तेथ; गमलें येथून हालूं नये !
झाली व्यापक दृष्टि; चित्त फिरलें साश्चर्य विश्वांतरीं,
दिक्कालादि अनंतरूप बघतां मी होत वेड्यापरी !
सूक्ष्मस्थूलहि सारखीं भ्रमवितीं; लागे मुळीं अंत न,
त्याकाळीं मग जाहलें सहजची 'उद्गार'वाची मन !
आशा, प्रेम, नवीन वैभव, तशी कीर्तिप्रभा, सद्यश,
हीं एकेक समर्थ आज नसतीं चित्ता कराया वश !
सर्वांचा परमोच्च संगम चिरं जेथें असे जाहला,
देवा ! 'पूर्णविराम' त्या तव पदीं दे शीघ्र आतां मला !

---

## कांहीं इंग्रजी कविता वाचून—

[ स्वयंपूर्णतेची जाणीवसुद्धां साधुवृत्तीला बाधक म्हणून म्हटली आहे; मग तिच्या अभावीं केवळ तुसत्या अभिमानाकडे पाहून आपलेपणाला काय वाटत असेल बरें ? ]

पिठांत पाणी घालुनि केलें दूध भलें निष्ठुर काळें,
पितात गरिबाचीं बाळें.
अम्हां मराठी शाहीरांच्या कवनाचा वाहे पूर,
समाधान त्यांतच चूर !
पोत घालुनी गळ्यांत फिरती भिल्लांच्या काळ्या पोरी;
कवीश्वरें चढलीं भारीं !
गरिबीला बोलणें नसे हें, दोष दरिद्री गर्वाला—
हात घालि जो स्वर्गाला !

बाष्कळ बडबड ऐकुनि चित्तीं हास्याचे ध्वनि उठतात,
—आणि आंतडीं तुटतात!
खेद वाटला तोंच आठवे*बालकवीची रसवंती;
धीर जरा वाटे चित्तीं.
नव्याजुन्यांचा प्रेमळ पाइक 'गोविंदाग्रज' नमन करी,—
भल्याबुऱ्यांना एकसरीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा शाखा

## पुनर्विकसन

[ पद ]

दयाघना! विनति करित मन तुज हें चिरविरहें तापतां!
धन्य विश्वरचना ही। यथासांग सर्व कांहिं
न्यून तींत मुळिं नाहीं! मत्सरेंहि पाहतां!
वस्तुवस्तुमात्राला। नाशकाल जरि दिधला,
तरि फिरुनी उदयाला। काल असे तत्त्वतां!
अस्तंगत सूर्याला। सुप्रभात उदयाला,
शुक्लपक्षिं चंद्राला। फिरुनि वरी पूर्णता!
वर्षाऋतु समयाला। प्रतिवर्षीं ये चपला,
प्रतिवसंत वृक्षाला। जन्म नवा आणितां!
भरतीचा नियत काल। जलधीचे हरित हाल
रात्रीं नक्षत्रजाल। वरि नवी अपूर्वता!
याहुनि हें नवविकसन। सुप्रसन्न होई मन,
परि विचारि दीनवदन। बालक हा नेणता!
या मदीय चिरनिराश। जीवन्मृत मानसास
पुनरपि उमलावयास। काल दिला कोणता?

---

* श्रीयुत त्र्यंबक बापूजी ठोमरे.

## गीत–विरक्ति

दैवी दर्शनदुर्लभ झाली,
आशालेशहि नच कांहीं;
संसाराची होउनि भाषा
जीवनकवनांतुनि वाही!
प्रतिवस्तूचा शब्दचि उरला
भावमया जगतीं राही;
त्या शब्दांचा अर्थ कुणातें
वस्तुज्ञानाविण नाहीं!
गूढार्थेचि तो अलिखित भागीं
मत्कवनीं भरुनी जाई;
नसतां परि संकेत जिवाचा
उमगेना तें कवणाही!
गीत कळावें जीस नसे ती
दिशा शोधिल्या जरि दाही;
'गोविंदाग्रज' सहजचि कवनें
जाळि निराशा खर दाहीं!

---

## कधीं?

चित्रपटावरि रम्याकृतिच्या सीमारेषा परोपरी;
रंग कधीं वठतील परी?
कानाला आनंद देति हे झुळझुळ गाउनि गोड झरे;
अर्थ कधीं कळणार बरें?
अंधुक अंधुक गोड भावना डोकावति कविमनाकडे;
शब्द कधीं होतील खडे?
सतेज वचनें देई तारा, परी लकाके नभामधीं;
खालीं येइल परी कधीं?

झांपड पडते डोळ्यांवरतीं-चिंता छळितीं हृदंतरीं;
झोंप कधीं येईल परी ?
प्रतिरात्रीं हीं स्वप्नें दाविति इच्छाचित्रें जीवाचीं;
सृष्टि कधीं होइल त्यांची ?
अंधनयनिं ही बघते आशा विश्वचि हें रम्याकार;
जगीं कधीं तें दिसणार ?
—आणि वल्लभे ! दिलीस वचनें; गोड, अहा तीं किती तरी !
खरीं कधीं होणार परी !
'गोविंदाग्रज' जें जें आळवि कवनीं,-आणिक मनामधीं,
पटेल तें तें सांग कधीं ?

## ओसाड आडांतील एकच फूल

[शार्दूलविक्रीडित ]

[ १ ]

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेंसा, कधिंचा, विशेष नव्हता कोणास तो माहित;
होतें काय तयांत हें नच कधीं कोणी पहाया बसे,
नाहीं जात कधीं तिथें कुणि जिथें नाहीं स्वतांचें हित !
होता आड खरोखरीच अगदीं तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;
घेतो कोण उगाच कष्ट इतके लोकीं खऱ्याखातर !
'आहे भूत तयांत खास' ! वदती ऐसेंहि कोणी तर !
बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वदंता जरी,
लोटे सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गीवर,
टाकीना नुसती जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेंहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी !
देवाला करणें-विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही,
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतही !

[ २ ]

पानांची गरदी लता करिति त्या आडाचिया भोंवतीं
वाटे अंथरलें जणूं दफन तें जीवंत तोंडावरी;
काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधें खोल ती,
आडांतील जलांतही मिसळुनी त्यालाहि काळें करी!
आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;
केव्हांही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी;
काळोखांतिल तेवढेंच जग तें होतें तयाभोंवतीं.
पुष्पाचें वळलें असे मुख सदा पाण्याकडे खालतीं,
श्वासानें जणुं त्याचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती,
केव्हां तन्मकरंदबिंदु पडतां जीं वर्तुळें चालतीं,
घालाया रमणीकरांत वचतां तेव्हांच मागाल तीं!
येई एक कसावसा तरि सदा तेथें रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब तो जलिं करी त्यालागिं दृग्गोचर.

[ ३ ]

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादृशा पाहणें—
हा नित्यक्रम भाबड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असे;
त्याला सर्वहि वाहणें, विरुनिया त्याच्यामधें राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसे.
त्याचा वास असे मनोहर सदा, शंका नसे याविशीं,
या भावें परि गंध जो दरवळे त्यांतीच त्याची मजा!
केव्हांही हलतांच फूल पवनें खेदास देतें रजा,
प्रेमानें डुलतां परी करितसे वृत्तीस वेडीपिशी!
हांसे फूल जलांतल्या बघुनिया त्या स्वीय चित्राकडे.
हांसे तेंहि तसेंच तों अधिक हें हांसे तसें बापडें,
नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामधें बागडे,
'माझा भाव तयाप्रती कळतसे' मानीत हें बापडें.

जोडीचा महिमा असा चहुंकडे; धिक् सर्व जोडीविणें!
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेंही जिणें ?

[ ४ ]

खालीं तोंड करून चंचल जलीं पाहून वेड्यापरी;
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी;
घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणीं,
हांसूं मात्र नका म्हणून कधिंही माझ्या फुलाला कुणी!
त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा—
वाऱ्यानें करपून जातिल अशीं व्हावीं फुलांचीं मनें;
चित्रें चंचल जीं अदृश्य उघड्या डोळ्यांस भावाविणें
पाहायास तयांस नीट तुमचे डोळे फुलांचे करा!
भावाचे अपुल्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेड्याबगड्या फुलांतच असे का तेवढ्या दोष हा ?
मोठे पंडित काय लाविति दिवे, ते एकदांचे पहा,
कोणीं काय कधीं कुठें बघितलें जें ये विकारांत ना ?
जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा!

[ ५ ]

कांहीं काळ असाच फूल गमवी; आशा पुढें वाढली,
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी;
वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों तैसेंच आशेवरी!
त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां
नाहीं तें हंसलें पुन्हा विकसलें नाहीं पुन्हा तें कदा!
आशेनें दुसऱ्या दिनीं फिरुनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर.
पाण्यामाजि पुढें गळून पडलें तें फूल वेडें पिसें,
पाताळींत कुठें असेल दडलें वा प्रेमनिर्माल्य तें ?

छेः छेः ! प्रेममय स्वरूप धरुनी भूतापरी हिंडतें,
कोठें आड उजाड जें, अजुनही तेथें कधीं तें दिसे !
तें मेलें म्हणुनी उणें न ठरतें; मच्चित्त त्याला भुले !
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें !

---

## चिमुकलीच कविता

नाजुक सुंदर गोंडस चिमणी बाला दशवर्षा
कोण कुणाची कुठें चालली उधळित ही हर्षा !
हात चिमुकले पाय चिमुकले, चिमुकलाच बांधा,
भूदेवी–स्वर्देवी यांतिल हाच काय सांधा !
धवलवर्ण हा देहावरती फुलत्या पुष्पाचा,
लाल छटा वर, जणूं पसरला रसचि गुलाबाचा !
त्याच फुलांच्या वळुनि पाकळ्या पोकळशीच घडी,
झालि तीच वाऱ्यावर हलत्या ओंठांची जोडी !
सडा पसरला आंत कोंवळ्या बारिक मोत्यांचा,
ओंठाआडचि अर्धा पडला खेळ पहा त्यांचा !
इवलीशी हनुवटी गोजिरी, खळी तिच्यावरि ही,
निजहृदयिंच उतराया वर्तुळसुख जणुं लांबवि ही !
सरळ नासिका चाफेकळिचा जणुं अंतर्भाग,
दळांआड दडलेला परागमय अवकाशांग.
कपाळपट्टी विशालतेचें बालरूप पहिलें,
कुणा भाग्यवंताचें भावी भाग्य त्यांत लिहिलें ?
किंचित् खुलत्या भिंवया–चिमणीं धनुष्येंच साचीं
चित्रपटांतिल काय चिमुकल्या रामलक्ष्मणांचीं !
नखाएवढ्या दोन हिरकण्या हंसती–त्याखालीं,
तेजोरूपा श्रीकमला जणुं निजकमलीं रमली !

फुलें बसविलीं वेलीवरतीं, गगनीं तारांना
त्याच मुहूर्ती त्याच करें का विधि करि या नयनां!
किरणां किरणां टाकुनि भंवतीं या नेत्रांमधुनी
पापस्पृष्टा वसुंधरेला बाला का न्हाणी!
अभ्यासास्तव सोडित उघडुनि नयनांची खाण
बालमदन निर्दोष किरणमय हे बोथट बाण!
केंस कोंवळे सरळाचि काळे, कुरळेही कांहीं,
तुळतुळीत मोकळे; मनासम नच बंधन त्यांही!
गालिं लोळती कांहीं, कांहीं कानांवर पळती,
पवनीं खेळति कांहीं किंवा मानेवर ढळती;
पाशरूप पुष्कळसे परि ते पाठीवर रुळती,
चकचकीत जणुं लहरि जलाच्या पवनें झुळझुळती!
बालसर्प जणुं, अथवा उपमा कुणीं अशी द्यावी!
तच्छिरिं बसवुनि साप निजशिरीं पाप कोण बसवी?
तळपति जललहरी रविकिरणीं जणूं जागजागीं,
उंच सखलशा सुटल्या वेणीच्या बंधनभागीं.
झुळझुळ मंजुळ वाहे चिमणा ओघ जसा कांहीं,
गमते रमते उगमस्थानीं ही कृष्णाबाई!
गाल कोंवळ्या गुलाबकळिचीं रूपें विधिमनिंचीं,
पदार्थसंसर्गाविण नुसत्या चिंतनमय खनिचीं!
लज्जा निर्मायाची स्फूर्तिच विधिनयनीं चमके,
त्या नयनांनीं बघतां गालीं लाली ही फडके!
चुंबन घेतां येतिल गालाचि हे श्वासासरसे
वाऱ्यावर वाहुनीच चुंबक ओंठांसह खासे
सहज मुखावर हंसें खेळतां गालीं गोड खळ्या,
फुटती मुग्धचि आनंदाच्या तयांतुनी उकळ्या!
ओंठ कशाचे-देंठाचे फुलत्या पारिजातकांचे;
हास्यरसाचे करी मोगरा सांचे कलिकांचे!

कां हंसते सारखी अशी ही? नेत्रहि हंसती कां?
फुलें झेलि चालतीं बोलतीं ललितदला लतिका!
कीं भावी प्रणयाचें अत्तर हृदयपुष्प पिळुनी—
बालमदन करि; उडे हास्यमय सुवास दरवळुनी.
किंवा कांहीं कियाच इजला येत नसे दुसरी?
निष्कारण म्हणुनीच सदाची मुद्रा ही हंसरी!
नखें पदतलीं कीं, वर्खांच्या टिकल्या चकचकत्या,
कापुनि कच्चीं पोंवळींच मृदु केल्या का चकत्या!
करांगुलीमधिं बालमुद्रिका विराजते भद्रा,
पवित्रतेच्या सम्राटाची हीच राजमुद्रा!
तिलक गोजिरे गोंदवणाचे हिरव्या रंगाचे,
शुभ्र मुखावर तुषार कुठल्या दिव्य तरंगांचे!
निळ्या नभीं वर शुभ्र तारका जमवितात मेळ,
शुभ्रमुखनभीं इथें निळ्याशा तारांचा खेळ!
इचा उद्यांचा धनी कोण, हें ठरवावें म्हणुनी,
पुण्याईचें गणित करित विधि दशांशाचिन्हांनीं!
लाल छटा वदनिंची नभींच्या शुभ्र मौक्तिकांत,
कोर बालचंद्राची विलसे संध्याहृदयांत!
रक्त कपाळीं दिला रक्ततर कुंकुमातिलक बरा,
अरुणपटावर मांगल्याचा नव मंगलतारा!
चिमण्या देहा शोभाविणारी चिमणीशी साडी
नीटनेटकी नेसवुनी हिस कोण कुठें धाडी?
घालित बाला चित्रिंचेच का चित्र अलंकार,
स्वप्नांतिल संसार कुणाच्या घे कीं अवतार!
केला विधिनें स्त्रीत्वाचा हा टीचभराचि नमुना;
नवतीर्थास्तव हिंडति संगततनु गंगायमुना!
गर्भजन्म या उपाधि भोगी कीं ही तदतीता
कीं भूमींतुनि अशीच वर ये ही दुसरी सीता!

उषा-चंद्रिका जणूं भेटल्या; त्या संगमकालीं
तांबुस धवलहि रस पाझरतां काय त्यांत न्हाली !
किंवा स्वर्गांतुनि ही सुटुनी आली आतांच,
नंदनवनिंचा मंद वात तरि करि भंवतीं नाच !
महाकवींच्या कल्पनेंतली भावमूर्ति का ही ?
बलवत् भावें स्फुटतर होउनि वस्तुरूप वाही !
पहा थांबली विभ्रमललिता सलीलगति बाला,
बालभाव मनिं विमल, जोडि करयुग परमेशाला
अहा ! कोणता भाव असे हा पापमना न कळे !
द्रवुनि भक्तिनें आत्मा सारा देहीं कीं खेळे ?
देवमनीं निजभक्ताविषयीं वसे भावना जी,
भावरूप ती काय खेळते या हृदयामाजीं ?
शुद्ध भाव हा तिच्याच मनिंचा पुण्याचा वारा,
हाच भाव भगवंता ! आतां जगत्त्रयीं पसरा !
हात जोडुनी विमले बाले ? मागितलें काय ?
स्फूर्तिनेंच कीं पावित्र्याच्या नत झाला काय ?
जें पावन, जें विशुद्ध, त्याची तूं मंगलमूर्ति,
देव कोणती करील आतां तव आशापूर्ति ?
तुझ्या मूर्तिचा विमल भाव हा कळतां तया क्षणीं !
दगडाचा देवही वांकविल देह तुझ्या चरणीं !
स्वर्गहि तुजवर धरिल सारखा दिव्याची गळती !
त्वद्दर्शनपुण्याला मुकले गतमुनि हळहळती !
तीर्थें, पुण्यें, देवदेवता, ज्यां पाहुनि पळती,
तसलीं पापें नेत्रकिरण तव पडतां क्षणिं जळतीं !
टाक नजर एकदां तरी ती या पाप्यावरतीं—
स्वर्गीं सहज तरि जाण्याइतकी पुण्याची भरती.
शुद्धभाव-परिपूर्ण मनीं क्षण मजला जाऊं दे,
कवित्व पावन करून घ्याया जराच राहूं दे

ओघ एकदां त्या कवितेचा जगांत वाहूं दे,
नांव तरी पापाचें उरतें का मग पाहूं दे.
मम हृदयाच्या हिंदोळ्यावर चल ये घे झोले,
त्यांतुनि निघत्या कवनश्वासें विश्व सहज डोले!
कवनस्फूर्ती, मंगलमूर्ती, जराच धांव गडे!
दिव्य सुधारस वर्षूं जगतीं ये जिकडेतिकडे!
अहा! चालली बाला टाकुनि मज संशयवादीं
रंगत गुंगत दंग सदा ती आपल्याच नादीं!
नवल न तिजसह नेत्र जरी मम हे भिरभिर फिरती,
भुलतें, खुलतें, डुलत, झुलतें विश्वचि तिजभंवतीं!
पावित्र्याची उषा काय, कीं कळी पूर्णतेची
आशी कीं ही जगास पुढच्या प्रभुतन्मयतेची!
किंवा कांहीं तरल कल्पना कुणास आठवली,
नटवावी कशि कवनीं ती या विचारिं मति रमली;
तोंच चुकवुनी डोळा धांवे कल्पनाच बाल
स्वच्छंदानें पांघरल्याविण शब्दाची शाल!
पवन पिउनि मग तिची होत का अशी बालमूर्ति
बाळा कसली खास तीचही नवकवनस्फूर्ति!
भरभर फिरते मग वाऱ्यावर ताराया जगता
कुण्या कवीची चुकलीमुकली चिमुकलीच कविता!
मूर्तिमती कविताच यापरी हृदया हालविता
'गोविंदाग्रज' ही गाई मग चिमुकलीच कविता!

---

## मंगलाचरण

[ शार्दूलविक्रीडित ]

स्वानंदें नटला अनंतगुण जो या वस्तुमात्रांतरीं
कल्पान्तीं स्थल ज्या परन्तु पुरतें एकाच पत्रावरी

ज्यालागीं स्तवितां यथार्थ वदती वेद श्रमानें "अलम्"
तो श्रीमान् जगदीश मंगलदृशा कुर्यात् सदा मंगलम्
योगाभ्यासपरा, समाधिनिरता वा शास्त्ररत्नाकरा
जो तूं लभ्य नव्हेस त्या तुज कसें आम्ही धरूं ईश्वरा
लीलाजीवन हेंच पूजन तुझें आम्हां कळे बालकां
केलें अर्पण तें तुझ्या पदिं मुदें देवा जगच्चालका
शालामंदिरिं मांडितीं चिमुकलीं बाळें नवा खेळ हा
दृष्टया कौतुकपूर्ण विश्वजनका तूं सर्वदा त्या पहा
आशीर्वादबलें त्वदीय सदया ने दूर तापत्रयी
स्वाध्यायासह वाढवीं शिशुजनीं क्रीडा सदा वाङ्मयी
रक्षी मोहर जी तरूवरि पुढें होतीं फळें तोंवरी
सांभाळी कलिका लतांवरि; फुलें कालें तयांचीं करी
भूगर्भी नवबीजरक्षण करी आवृष्टि जी सर्वदा
देवा त्या शुभदृष्टिनें शिशुगणा या पाहणें सर्वदा

---

## प्रेम आणि मरण

" जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी ।
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ।। "

—श्रीहोनाजी बाळ.

कुठल्याशा जागीं देख ।
मैदान मोकळें एक ।। पसरलें ।।
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुऱ्या जोमांत ।। सारखा ।।
चहुंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें ।। तेथलें ।।
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली ।। माजती ।।

रोज तीं । कैंक उपजतीं । आणखी मरतीं ।
नाहिं त्यां गणती । दादही अशांची नव्हती ॥ त्याप्रती ॥
त्यासाठीं मैदानांत ।
किति वेली तळमळतात ॥ सारख्या ॥
परि कर्माचें विंदान ।
कांहिं तरि असतें आन ॥ चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरती ।
मेघांत वीज लखलखती ॥ नाचली ॥
त्याक्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी ॥ नकळतां ॥
तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला ॥ प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला । त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला ॥ त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं ॥ एक तो ॥
मुसळधार पाउस पडला ।
तरि कधीं टवटवी त्याला ॥ येइना ॥
जरि वारा करि थैमान ।
तरि हले न याचें पान ॥ एकही ॥
कैकदां कळ्याही आल्या ।
नच फुलल्या कांहिं केल्या ॥ परि कधीं ॥
तो योग । खरा हटयोग; । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लागतें जगावें त्याला ॥ हें असें ॥
ही त्याची स्थिति पाहुनियां ।
ती दीडवितीची दुनिया ॥ बडबडे ॥

कुणि हंसे कुणी करि कींव ।
तडफडे कुणाचा जीव ॥ त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती ।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती ॥ त्याप्रती ॥
निंदिती ॥ कुणी त्याप्रती । नजर चुकविती ।
भीतिही कोणी । जड जगास अवजड गोणी ॥ होइ तो ॥
इष्काचा जहरी प्याला ।
नशिबाला ज्याच्या आला ॥ हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें ।
तें त्याचें होतें जगणें ॥ सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें ।
जीवाला नकळत जगणें ॥ वरिवरी ॥
पटत ना । जगीं जगपणा । त्याचिया मना ।
भाव ज्या टाकी । देवांतुनि दगडाचि बाकी ॥ राहतो ॥
यापरी तपश्चर्या ती ।
किति झाली न तिला गणती ॥ राहिली ॥
इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला ॥ भीतिनें ॥
आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे ॥ पाहुनी ॥
तों स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । “ वरं ब्रूहि ” झाली वदती ॥ त्याप्रती
“ तप फळास आलें पाहीं ।
माग जें मनोगत कांहीं ॥ यावरी ॥
हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होईं ॥ नंदनीं ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें ॥ तरुवरा ॥ ”

तो वदे। "देवि सर्वदे, । हेंच एक दे- ।
भेटवीं मजला । जीविंच्या जिवाची बाला ॥ एकदां ॥"
सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी ॥ मग तया ॥
"ही भलती आशा बा रे!
सोडिं तूं वेड हें सारें ॥ घातकी ॥
स्पर्शासह मरणहि आणी ।
ती तुझ्या जिवाची राणी ॥ त्या क्षणीं ॥
ही अशी । शुद्ध राक्षसी ॥ काय मागसी ॥
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं ॥ जें कधीं ॥"
तो हंसे जरा उपहासें ।
मग सवेंच वदला त्रासें ॥ त्यांप्रती ॥
"निष्प्रेम चिरंजीवन तें ॥
जगिं दगडालाही मिळतें ॥ धिक् तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढें ॥"
निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आंवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी ॥ वृक्ष तो ॥
तो निग्रह पाहुनि त्याचा ।
निरुपाय सर्व देवांचा ॥ जाहला ॥
मग त्याला भेटायाला ।
गगनांतिल चंचल बाला ॥ धाडिली ॥
धांवली उतावीळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत त्याकडे ॥
कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला । त्या क्षणीं ॥
दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला ॥ एकदां ॥

हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारीं ॥ हांसलीं ॥
त्या कळ्या सर्वही फुलल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या ॥ अजुनिही ॥
तो योग । खरा हटयोग; प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतें मरणही त्याला ॥ हें असें ॥

अनुष्टुभ्‌वृत्त.

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी ।
मराठी रसिकांसाठीं 'गोविंदाग्रज' पाठवी ॥

---

## बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास

थांब जरासा बाळ ! ॥ ध्रु० ॥

सुंदर खाशा प्रभातकाळीं,
चहूंकडे हीं फुलें उमललीं,
बाग हांसते वाटे सगळी !
शीतल वारा, या जलधारा कारंजाच्या छान !
थांब जरासा बाळ !

रम्य तडागीं निर्मळ पाणी,
गाति पांखरें गोजिरवाणीं,
आनंदाचीं बसलीं ठाणीं,
खरें असे रे ! तरी नको रे मारूं लाडक्या धांव !
थांब जरासा बाळ !

पाहुनि सौख्याचा हा ठेवा,
सृष्टि करीलचि माझा हेवा !
माझ्यापासुनि फसवुनि न्यावा,
यत्न परोपरि, करितिल सारीं ! भुलशिल तूं लडिवाळ !
थांब जरासा बाळ !

तऱ्हेतऱ्हेचीं फुलें विकसलीं,
रंगी बेरंगी हीं सगळीं,
तूंही शिरतां त्यांच्या मेळीं,
माझें मग तें, फूल कोणतें कसें ओळखूं सांग ?

थांब जरासा बाळ !

बघ सुटला हा मोठा वारा,
वायुवृत्ति तव देहहि सारा !
उडवुनि नेइल तुला भरारा !
दिगंतराला, जातां बाळा ! पुन्हा कसा मिळणार !

थांब जरासा बाळ !

स्वच्छ तडागीं प्रतिबिंबातें,
पाहुनि वेड्या धरावयातें,
चुकुनी जाशिल पाताळातें !
तयासारखा, क्षणीं पारखा होशिल बा आम्हांस !

थांब जरासा बाळ !

किती बुडबुडे पाण्यावरतीं,
इकडुन तिकडे तरंगताती,
चंचल लहरी, तूं त्या साथी,
क्षणांत बारे, लपाल सारे, काळाच्या उदरांत !

थांब जरासा बाळ !

फूलपांखरें हीं स्वच्छंदी,
तूंही त्यांच्यासम आनंदी
क्षणांत पडाशिल त्यांच्या फंदीं !
त्यांच्या संगें, त्यांच्या रंगें, जाशिल उडुनी दूर !

थांब जरासा बाळ !

अशा तुला मग बागडतांना,
भरभर वाऱ्यावर फिरतांना,
फुलांत दडतां कीं उडतांना,
कवण उपायीं, आणूं ठायीं, पुन्हा लाडक्या सांग ?

थांब जरासा बाळ !

शब्दांवाचुनि मंजुळ गाणें,
(अर्थ तयाचा देवचि जाणे!)
गाइल माझें गोजिरवाणें,
सप्तसुरांपरि, या वाऱ्यावरि विरुनी जाशिल पार!
थांब जरासा बाळ!

बालरवीचे किरण कोवळे,
कारंजावर पडति मोकळे,
रंग खेळती हिरवे पिवळे,
धरावयासी, त्या रंगांसी, जाशिल बाळा खास!
थांब जरासा बाळ!

जडावेगळी अमूर्त मूर्ति,
कल्पकतेची कीं तूं स्फूर्ति,
पुण्याची मम आशापूर्ति,
रविकिरणांवरि, जलधारांतरिं, तन्मय होशिल पार!
थांब जरासा बाळ!

---

## प्रेमाची प्रामाणिकता.

[ महाकवि बायरन् एके ठिकाणीं प्रणयिजनाला असा उपदेश करीत आहे कीं, "प्रेमविषयापासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवा म्हणजे तुमच्या इच्छेची पूर्तता होईल." प्रस्तुत लेखकाच्या एका बुद्धिमान् मित्रानेंही त्याजवळ अशा अर्थाचें विधान केलें होतें. या दोन्ही प्रसंगीं या लेखकाला चमत्कारिक वाटलें होतें.]

सख्या! सांगसी बोध हिताचा चातुर्याचा तसाच हा
व्यवहाराच्या परी संगतीं प्रीति होइना सुखावहा
दळादळाची पुरी खुलावट फूल उमलतें जरी करीं
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेंसें तदंतरीं
मेघांआडुनि रविकिरणें जरि स्पष्ट दर्शनें नच देतीं
फुलें खालतीं काय उमलतीं? किंवा रसरंगा येतीं?

मूठ झांकली लाखाची ती भरिते जरि चालू तूट
दैव उद्यांचें पहावया परि उघडावी लागे मूठ
गंगास्नानें पावन व्हाया इच्छा झाली जरी मना
देहावरचें वस्त्र वस्त्र तरि दूर करावें लागेना?
प्रीतीची रसगंगा बघतां जीव विकारी असे जरी
शिष्ट कल्पना त्यजुनि तयाच्या होतो आत्मा अविकारी
हृदयार्पण जरि करणें आहे स्पष्ट दान तरि करावया
अश्रुजलासह अर्पावें हा पुण्यमार्ग एकच सखया
स्वप्रेमातें लपवायाचा बोध तुझा लाभो तुजला
"गोविंदाग्रज" वाहिल प्रेमा हृदयासह निजअश्रुजला

जळगांव—१५।११।१२.

---

## कवि आणि कैदी

[ संसृतीच्या पाशांत सांपडलेला आत्मा एकादे वेळीं तरी आपल्या परिस्थितीच्या वर जाण्याचा विचार करितोच; पण मायावश आत्ममूढता त्याला खालीं ओढिते. अविकारी आत्म्याच्याच "कवि" व "कैदी" अशा दोन बाजू आहेत.]

मार भरारी। चल तोड बंधनें सारीं! ॥ ध्रु० ॥
पायीं गंजत बेडी पडली,
नकळे कोणीं केव्हां घडली;
पुढची चाल परी तव अडली,
व्याद भिकारी। चल तोड बंधनें सारीं! ॥ १ ॥
अवजड बेडीसह जड पाय,
अनाथ जीवांवरती हाय!
टाकुनि चिराडिसि कोमल काय,
निर्दय भारी। चल तोड बंधनें सारीं! ॥ २ ॥
नसतां मुळींच तूं अपराधी,
कोण तुझ्या ही पायीं बांधी?
करुनी निधडा निश्चय आधीं,

फटका मारीं । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ३ ॥
तुटतां असली भिकार बेडी,
हंसतिल तुजला भणंग वेडीं,
कोणी तुजशीं धरितिल तेढीं,
तयां धिक्कारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ४ ॥
मारी गरुड भरारी गगनीं,
सुख तें शेणकिडा का जाणी ?
जाई शेणामधेंच कुजुनी !
सुखाचा वैरी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ५ ॥
असल्या शेणकिड्यांच्या जाती,
जिकडे तिकडे बुजबुज करिती,
केवळ मरण्यासाठीं जगती,
येत ओकारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ६ ॥
प्रकाश बघतां घुबडें दडतीं,
एकांताची आवड धरिती,
रातींबेरातीं परि फिरतीं,
घाण ही भारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ७ ॥
भिडतो गरुड सदा गगनाशीं,
वातावरणीं वसतिहि खाशी !
लावुनियां टक तेजोराशि
बघती घारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ८ ॥
जाऊं त्यांमागुनि धीरानें,
काढूं शोधुनि लपलीं भुवनें,
गगनामागुनि निघतिल गगनें,
करीं तयारी । चल तोड बंधनें सारीं ! ॥ ९ ॥
रविकिरणांचे दोर मोकळे,
बांधूं नवमेघांचे दोले,
वारा देइल त्यांतें झोले,

धन्य संसारीं ! । चल तोड बंधनें सारीं ! ॥ १० ॥
वसुनी तेथें तीन्ही काळीं,
पाहुनि मूर्खपणाच्या चाली,
जगता हंसूं गालेंच्या गालीं,
ब्रह्मानंदीं । रंगुनी स्वैर स्वच्छंदीं ! ॥ ११ ॥

---

## फणसाचें पान

[ साकी ]

सहजचि दिसलें पायाखालीं मज फणसाचें पान
सवेंच कवनाचें हृदयींच्या चढत चाललें मान
फणसाच्या त्या पानावरतीं दिसल्या ज्या मज रेषा
कधींकाळच्या उघडुनि दाविति मनिंच्या आंतरवेषा
लिहुनि ठेविली पूर्ववयामधिं कथा गोड जी पानीं
पुन्हा वाचिली; आणि जाहला सखेद हर्षेहि रमणि !
दोनच नयनीं नीट दिसेना, अंधुक जग हें अवघें
प्रीतीच्या उपनेत्रावांचुनि–पुढें बोलणें नलगे
डोळे झांकुनि भरभर फिरुनी कथा वाचिली मग ती
हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगती
गांव कुणाचें–नांव कुणाचें–आणि कुणाचें पान
सरोवराला परका मधुकर करित रसाचें पान
वाऱ्यासरशीं अंगावरती येउनि पडतीं पानें
नेमधर्म त्या कसला अथवा नेम देव तो जाणे
सुंदर चित्रा मदपूर्णा ती कथा तुझी आठवते
बाले ! रमणि ! प्रणयभरानें हृदय किती खळबळतें
सळसळतीं हीं आजहि सखये, भंवतीं हिरवीं रानें
" गोविंदाग्रज " परी शोधितो तीं फणशीचीं पानें.

बोरिवली, १०।२।१८.

---

# बंड्याची चित्रकला

[ पांच वर्षांच्या बंड्याला माझें चित्र काढावयास सांगितलें; तेव्हां हां हां म्हणतां बंड्यानें एका कागदावर आडव्यातिडव्या चार रेघा ओढिल्या. चित्र काढितांना मात्र तो फार विचारपूर्ण दृष्टीनें माझ्याकडे पाहत होता.]

चित्र काढितां येतें तुजला काय बालका! एखादें?
येत असेल तरी तयाचा नमुना मजला पाहूं दे.

आज्ञा ही मम ऐकुनि बंड्या सरसावे उत्सुकतेनें
कागद लेखनि ठेवुनि पुढती बाळपणाच्या ऐटीनें.

विचारपूर्णा दृष्टि; भूलता चढत्या; आंठ्या भाळीं;
स्वतांच झाला चित्र क्षणभर गुंतुनि विचारजाळीं.
सर्वेच काढी पटावरी त्या कांहिंतरि रेघोट्या;
" चित्र पहा हें तुमचें!" वदला आनंदानें मोठ्या.

विचित्र माझें चित्र असें हें पाहुनि मीही हंसलों;
हसतां हंसतां क्षणार्धांत परि विचारनादीं रमलों—
" स्वैर काढिल्या रेषा का या? छेः छेः स्वैर न रेषा!
विचार तर तूं आधीं केला; जिज्ञासा तव पेशा.
विचार करितां कांहेंतरी तुज खचित कल्पना आली.
व्यक्त तिला केलीस बालका, असल्या रेषाजाळीं,

क्षणभर मजला, क्षण चित्राला बघसी न्याहाळोनी,
साम्य आमुचें पटतें तुजला (हा?) ठसा उमटला वदनीं.
तुझे मित्रही तुझ्या वयाचे जाणीवपणें बघती,
मान तुकाविति, अर्थ तयाचा निःसंशय आकळिती!
बाळपणाचीं गूढ रहस्यें बाळांनीं सोडाविणें;
ज्ञानमदानें आम्ही हंसणें; परी फुकट तें हंसणें!
काय कल्पना लिहुनि ठेविल्या या रेषांच्या खालीं—
सांग सांग मज, उगीच नको रे टाकूं संशयजालीं.

'मानवतेचें गूढ काय हें' मज बघुनी जो आला
संशय तुज तो रेषांनीं करि विकृत तुझ्या वदनाला.
त्या रेषांचें चित्र उतरलें काय कागदावरती ?
चित्रविषय टाकुनी पटावरि चित्रकार करि वसती.
अथवा टाकुनि बाह्यरूप मम जड अवजड म्हणुनी
आंतररूपा चित्रिं रेखिलें; विशेष भावच गणुनी ?
मृतप्रेम मम जातां उरल्या हृदयीं तरंगरेषा,
त्याच काढिल्या काय मनाच्या काढुनि आंतररेषा ?
रेषांमधुनी गांठी दिसती ठायिं ठायिं ज्या बाळा,
खूणगांठि का त्या प्रेमाच्या दृत्त असे जें काळा !
परि चुकलों वाटतें काढितां स्वैर कल्पना नसत्या,
शुद्धपणाच्या जरि या रेषा, तरि काळ्या कां असत्या ?
मूर्खपणाच्या ज्ञानें चित्तीं तरंग उठती नाना,—
मनुजांच्या जे; चित्रिं रेखिलें काय बाळका, त्यांना !
'विश्व खरें का?' 'देव खरा का ?' संशय अनेक असले
अडव्यातिडव्या रेषा बनुनी चित्रिं काय ते बसले ?
अथवा—भाळीं विधिनें लिहिल्या रेषा वेड्यावगड्या
चित्रपटावरि रेखुनि त्यांना करिसि काय बा उघड्या ?
अथवा आम्हां बाळपणींच्या लीला या काळीं—
स्मृतिपटलावर अंधुक दिसती रेषरूपें जवळी
त्यापरि तुज पुण्याईनें ईशाच्या सांनिधतेच्या
जन्मांतरिंचें चित्र दिसे मम; रेषा का या त्याच्या ?
बोल, बोल; बा थके कल्पना; प्रतिभा चालत नाहीं;
सांग अर्थ या रेषांचा मज, प्रकाश पडुं दे कांहीं !

---

# मुरली

[ प्रीति, भक्ति आणि मुक्ति या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचें पहिलें पाऊल उमटून, भक्तीच्या मोकळ्या भरारींत भगवंताचें पूर्णैक्य होत असतें हें दाखविण्यासाठीं स्त्री-हृदयाचें प्रेमळ रहस्य ओळखून भागवतकवीनें 'राधागौळण' कृष्णपरमात्म्या-समोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळांत भोळ्याभाबड्या भक्ति-प्रीतीच्या संयोगाचें इतकें ठळक चित्र याव्यतिरिक्त इतरत्र सांपडणार नाहीं. म्हणून या गीतांत भक्तजीवात्मा राधारूपानें दाखवून भक्तिप्रीती-च्या बदलत्या सीमारेषेवर त्याची स्थापना केली आहे. मनुष्याच्या आयुष्यांत असा एक काळ एकदांतरी येतोच कीं, ज्या वेळीं ईश्वराचें अस्तित्व भावपूर्ण हृदयाला पटतें आणि तेव्हां मात्र बुद्धिप्रधान मस्तकाचें समाधान करण्यासाठीं तळमळणारा जीवात्मा ईश्वरी साक्षात्काराची–प्रत्युत्तराची याचना करीत असतो. हें दैवी प्रत्युत्तर त्या योग्य वेळीं मिळालें नाहीं म्हणजे मात्र मनुष्य पुन्हा भोंवऱ्यांत गुरफटतो. या गाण्यांत अशा ईश्वरी उत्तराला 'मुरलीध्वनि' कल्पून त्यासाठीं झुरणाऱ्या राधे-च्या पांच चढत्या स्थिति ( कडवीं १४।१८।२१।३२।३७ ) दाखविण्या-चा प्रयत्न केला आहे. 'गोविंदाग्रज.]

हीं एक आस मनिं उरलि ॥
कन्हय्या ! बजाव बजाव मुरली ! ॥ ध्रु० ॥

जरि फुटले दोन्ही कान ॥ नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान ॥
वच वृत्ति वृत्तिमधिं मुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १ ॥

कां गाणें मजला व्हावें ॥ चित्तासहि नाहीं ठावें ॥
दृष्टीला कॆंवि दिसावें ॥
मम आस नसे परि पुरलि ॥ कन्हय्या ॥ बजाव० ॥ २ ॥

मी अगदीं भोळी राधा ॥ तूं माधवजी नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनि झुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ३ ॥

चांदणें चहुंकडे खुललें ॥ फत्तरही सारे फुलले ॥
आनंदें विश्वहि झुललें ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रह

तीनेंच शब्द मम निघती ॥ जग फिरुनि फिरुनि मनिं रिघती ।
मज आतां दुसरी न गति ॥
जगतीच सारि जणुं जिरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ५ ॥

अणुरेणुहि देहीं स्वैर ॥ भिन्नता विसरली वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥
प्रेमाची दुनिया उरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ६ ॥

बुद्धीचा तुटला धीर ॥ आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥
बघ बघतां दृष्टिहि विरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ७ ॥

कशुं काय काय मज वाटे ॥ आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥
शून्यांत परार्ध भरलिं कन्हय्या ! बजाव० ॥ ८ ॥

जन्माचें झालें चीज ॥ कायमची मेली नीज ॥
विश्वाचें गवसे बीज ॥
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ९ ॥

मायेची मेली विजली ॥ परि खन्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥
सुकलेलीं विश्वें भिजलिं कन्हय्या ! बजाव० ॥ १० ॥

कोसळति सरीवर सरी ॥ लहरीवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥
अवकाशें तुडुंब सगळिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ ११ ॥

पुष्पाविण येई वास ॥ वाऱ्याविण चाले श्वास ॥
हर्षाविण आतां हास ॥
मरणाविण सुटका झालि ॥ कन्हय्या० बजाव० ॥ १२ ॥

ब्रह्मगोल तन्मय झाला ॥ चहुंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥
मी मला शून्य या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १३ ॥

सांवळ्या यशोदाबाळा ! ॥ बंधाला पडला आळा ॥
स्वैराचा वाढे चाळा ॥
बावरी राधिका बनलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १४ ॥

किति करूं कन्हय्या ! धांवा ॥ गा, नाच, वाजवी पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥
यावांचुनि इच्छा नुरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १५ ॥

एकेक ऐकुनी सूर ॥ दुःखांचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥
न कळे ही लागे कसलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १६ ॥

तूं मनांतला चंडोल ॥ मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल ॥
तरि खोल हृदय या कालिं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १७ ॥

बोल, बोल तव बिनमोल ॥ जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥
नातरी राधिका सुकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १८ ॥

फिर विश्वाचा हा गोल ॥ सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा करुनी सोल ॥
बघ मागुनि राधा आलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ १९ ॥

मुरलीची प्यालें भांग ॥ घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥
आनंदवृत्ति पाझरलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २० ॥

उलगडति पीळ हृदयाचे ॥ जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २१ ॥

ही लहर अशा देहाची ॥ हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥
तुज भेटाया जणुं आलि ॥ कन्हय्या ! बजाव० ॥ २२ ॥

20591

तिजमुळें होउनी दंग ॥ वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यांमाजि नादवी मुरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २३ ॥
हृदयाचे ठोके पडती ॥ अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलिरवाची भरती ॥
मग एकच धडकी सगाळि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २४ ॥
मुरलीचा मंजुळ नाद ॥ हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हांका मारित सुटलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २५ ॥
सारखा मुरलि वाजीव ॥ अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलिं ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २६ ॥
जीवाच्या कमळा भुलवी ॥ निजगुंजारविं त्या झुलवीं ॥
पाकळी पाकळी खुलवीं ॥
झुलवीं त्या पाडुनि भुरळि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २७ ॥
कृष्णजी! त्यांत तूं भृंग ॥ त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करि उत्तुंग ॥
ही मोहरात्र ओसरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २८ ॥
चांदणें खुलें दिलरंगी ॥ ही एक नादरसरंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ २९ ॥
या रसीं देहकण न्हाले ॥ जो तो निजनादीं डोले ॥
क्षणभरांत सारे फुलले ॥
बघ फुलें तयांचीं झालिं ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३० ॥
करुनि त्या फुलांचा झेला ॥ जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥
झेला मज, आलें जवळि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३१ ॥

शृंगाररसानें नटली ॥ तुज राधा रमवूं झटली ॥
जन्मांची ओळख पटली ॥
कृष्णांत राधिका रमलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३२ ॥

वांकड्या अधरिं हा पांवा ॥ वांकडाच डोळा डावा ॥
किति वेळ असाच पहावा ॥
अब खेल करो बनमालि! ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३३ ॥

श्वासें मज हृदयीं भरवीं ॥ नादें कीं ओढुनि नेई ॥
चुंबनेंच कीं मज बनवीं ॥
तव ओंठावरली लालि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३४ ॥

दृढ आलिंगन दे अथवा ॥ अवकाश न त्यांत असावा ॥
एकरूप जीवाभावां ॥
तव देहिं देह मम जिरविं ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३५ ॥

बघ आतां घटका भरली ॥ बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥
ठायींच वृत्तिही हरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ॥ ३६ ॥

जीवाचा पंचीप्यारा ॥ मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुंकडेच राधा झुकलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३७ ॥

उरलें न शीत वा उष्ण ॥ कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥
जयनाद गात ही मुरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३८ ॥

चहुंकडेच आतां शांत ॥ विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥
मुरलींत शांतता भरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ३९ ॥

भोगुनी तापमय उष्णा ॥ मुरलिची लागतां तृष्णा ॥
जग गाइल राधाकृष्णां ॥
ही साक्ष मनोमय मुरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ४० ॥

हीं अखंड मुरली वाजे ॥ सर्वांच्या हृदयीं गाजे
मग कोण वदया लाजे ॥
कीं धन्य धन्य ही मुरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ४१ ॥
त्या नादरसाचे प्याले ॥ मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥
मग गानिं वाजविति मुरलि ॥ कन्हय्या! बजाव० ॥ ४२ ॥

---

## अरुण

अहा! उगवला पहा अरुण हा उधळित तेजाला.
जगा जागवी, तसा जागवी कविच्या चित्ताला
जसा उडवि हा अरुण चहुंकडे गगनीं रंगाला,
तसा पहा कवि उडवी अपुल्या चित्ततरंगाला!
विश्वसूत्रधर सारुनिया करिं पडदा रजनीचा
जगद्रंगभूवरि का उडवित गुलाल गगनींचा!
करी मंगलाचरणा मंजुल द्विज गुंजारव हा,
येत्या संसाराची नांदी चाले काय अहा!
पूर्वदिशेवर लाल रंग हा कोण कुठुनि उधळी!
किंवा फुटली तिच्याच हृदयीं प्रेमाची उकळी!
रविसदनाच्या गवाक्षास हीं काय लाल कांच?
पल्याड लपलें तोंड तयाचें, दिसेल आतांच!
प्रातःकाळीं गगन-पुष्प कीं सूर्याचें फुललें!
सुगंधमकरंदांचे रस हे चहूंकडे झुकले!
सदा सर्वदा जगदुद्धारा धरिती ज्या घेर
त्या मंगल सरितांचें आहे का हें माहेर!
कुणी महात्मा विश्वोद्धारास्तव तप आचरितां
उचंबळुनि का वाहत त्याच्या हृदयाची सरिता!
गत पुण्याच्या पुष्करिणींतुनि तेज काढण्याला
उडी रवीनें घालितांच का फेंस उचंबळला!

अखंड सौभाग्याची सरिता माझी भूमाता
काय लाविते कपाळभर ती हा मळवट आतां !
कीं सोडुनि जी अम्हां चालली कष्टें निस्तूळ
महाराष्ट्र-लक्ष्मीची त्या ही दिसे पायधूळ !
भरतें स्वर्गीं ये पितरांच्या करुणारसरंगा,
अम्हां आळशांवर मग ये कीं पूर्वपुण्यगंगा !
कल्पलतांवर फुलें बहरतां सडा परागाचा
काय तरंगे स्वर्गंगाजालें तांबुस रंगाचा !
दिनरजनींच्या फटींतून या फार दूर ओंड
दिसतें कीं हें कालगर्भिंच्या स्वर्गाचें तोंड !
हा रजनीच्या उदरीं दिसतो गर्भचि दिवसाचा,
कीं, काळाचा बाळ नवा हा नव्याच नवसाचा !
दिनरजनींचा, शुभाशुभांचा, पापापुण्यांचा,
मंगल संगम रंगपटचि हा दावित गगनाचा !
काय निघाला मानसपुत्रचि विराट पुरुषाचा
विश्वैक्यास्तव मिरवित हा ध्वज विश्वसमत्वाचा !
विश्वहितास्तव रोज सोडि जो रविला गगनांत;
पुराणपुरुषाचा कीं उघडा पळता तळहात !
विश्वहितपरा ही खिस्ताची रक्तमया माया,
महंमदाच्या पैगामाची किंवा ही काया !
शांतरसा या अभंगवाणी प्रसवे तुकयाची,
दया परतली कीं बुद्धाच्या उदार हृदयाची !
दिव्यभावना भक्तमनीं ज्या त्यांची ही मूर्ति,
भावि कवींच्या रसवंतीची कीं अस्फुट स्फूर्ति !
आज निपजत्या प्रीतीचा हा मंगल अभिषेक,
जगदीशाच्या कृपादृष्टिची कीं पहिली फेंक !
पतिव्रता गतसती जयांचें अग्निशयनिं निजणें
अखंड सौभाग्याचें त्यांचें किंवा हें लेणें !

यज्ञकाळची ही रामाची सोन्याची सीता,
येत्या अवताराची छाया, कीं रक्तस्फीता!
कीं भवितव्या देवीच्या या विमल दुग्धधारा
धांवत सुटल्या, परितोषाया विश्व शुद्ध सारा!
उद्धाराया पुन्हा धावली किंवा भवभीतां
श्रीकृष्णाच्या मनिं उरलेली श्रीभगवद्गीता!
भाविकाळचें हें स्वर्गाचें स्वप्न असे काय?
ब्रह्मस्वाचा भावि सगुण कीं तेजोमय काय?
विश्व रची जी आधीं, करि मग वृद्धि पुढें त्याची,—
'आज रचाया आली का ती इच्छा ईशाची!
ब्रह्मपदाच्या किल्ल्यावर कीं फडके जरिपटका
चिरंतनाची सनद मानवां, तिचा ताम्रपट का
अंत न पाही भगवंताला आली काय दया
चिन्मंगल मग उभें नभीं हें भूवरि उतराया!
अहा! तयाच्या स्पर्शे होई शुद्ध हृत्तरंग,
दिव्य दृष्टिला पुरता कळला अरुणाचा रंग
मना! कल्पना पुरे! प्रभूची हीच असे जाण
सौंदर्याची, मांगल्याची, प्रेमाची खाण!
प्रीतिरमाच्या, सौंदर्याच्या देवींच्या मूर्ति
नित्य निर्मि ही परमेशाची अरुणमया स्फूर्ति!
आज उद्यांच्या महाकवींनो! हृदयीं नीट ठेवा
प्रेमरसाचा, मांगल्याचा हा अद्भुत ठेवा!
अरुण-रसानें याच रंगवा मनिंचीं परि चित्रें,
रंगवीत जा तशीं उद्यांच्या देवींचीं चित्रें!
या रंगानें रंगवितों मी माझ्या हृदयाला,
पडद्यापडद्यावरी काढिलें चित्राचित्राला!
एका पडद्यावरि परि रंगे प्रेमचित्र एक!
हृदयाच्या हृदयांतिल माझ्या तोच शिलालेख!

त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर !
त्या चित्रांतिल देवीचा मी विकला शाहीर !
मरतां मी तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा !
त्या देवीचा झालों अगणित जन्मांचा बंदा।
तिच्या गालिंचा अरुण सारखा लज्जे ! वाहूं दे !
'गोविंदाग्रज' कविच्या 'अरुणा' त्यांतच राहूं दे !

---

## पानपतचा फटका

[ चाल—भल्या माणसा दसलाखाची० ]

कौरव-पांडव-संगर-तांडव द्वापर-कालीं होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ध्रु०॥
जासुद आला कथी पुण्याला शिंदा दत्ताजी पडला
कुतुबशहानें शिर चरणानें उडवुनि तो अपमानियला
भारतवीरां वृत्त ऐकतां कोप अनावर येत महा
रागें भाऊ बोले जाऊं " हिंदुस्थाना नीट पहा
'काळा'शीं घनयुद्ध करूं मग अबदल्लीची काय कथा —
दत्ताजीचा सूड न घेतां जन्म आमुचा खरा वृथा."
बोले नाना " युक्ती नाना करुनी यवना ठार करा
शिंद्यांचा अपमान नसे हा असे मराठ्यां बोल खरा "
ऊदगीरचा वीर निघाला; घाला हिंदुस्थानाला
जमाव झाला; तुंबळ भरला सेनासागर त्या काळा
तीन लक्ष दळ भक्ष कराया यवनाधीशा चालतसे
वृद्ध बाल ते केवळ उरले तरुण निघाले वीररसें
होळकराचे भाले साचे, जनकोजीचे वीर गडी
गायकवाडी वीर अघाडी एकावरती एक फडी
समशेराची समशेर न ती म्यानामध्यें धीर धरी
महादजीची बिजली साची बिजलीवरती ताण करी

निघे भोंसले पवार चाले बुंदेल्यांची त्वरा खरी
धीर गारदी न करी गरदी नीटनेटकी चाल करी
मेहेंदळे अति जळे अंतरीं विंचुरकरही त्याच परी
नारोशंकर सखारामहरि, सूड घ्यावया असी धरी
अन्य वीर ते किती निघाले गणना त्यांची कशी करा
जितका हिंदू तितका जाई धीर उरेना जरा नरां
भाऊ सेनापती चालती विश्वासातें घेति सवें
सूड ! सूड ! मनिं सूड दिसे त्या सूडासाठीं जाति जवें
वीररसाची दीप्ती साची वीरमुखांवर तदा दिसे
या राष्ट्राचे स्वातंत्र्याचे दृढस्तंभ ते निघति असे
वानर राक्षस पूर्वी लढले जसे सुवेलाद्रीवरती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० १

[ २ ]

जमले यापरि पानपतावरि–राष्ट्रसभा जणुं दुसरि दिसे
वीर वीरमदयुक्त सभासद सेनानायक प्रतिनिधिसे
अध्यक्ष नेमिले दक्ष भाउ अरि भक्ष्य कराया तक्षकसे
प्रतिपक्षखंडना स्वमतमंडना; तंबू ठोकिति मंडपसे
शस्त्रशब्द हीं सुरस भाषणें सभेंत करिती आवेशें
रणभूमीचा कागद पसरुनि ठराव लिहिती रक्तरसें
एका कार्यां जमति सभा या कृति दोघींची भिन्न किती
बघतां नयनीं वाहतीलची पूर अश्रुचे स्वैर गति
पूर्ववीरबल करीत राहे आहे सांप्रत सुखामधीं
हाय ! तयांचे वंशज साचे असुनी झालों असे कुधी
जमले यापरि पानपतावरि भारतसुंदरिपुत्र गुणी
युद्ध कराया रिपु शिक्षाया संरक्षाया यशा रणीं ॥ कौ० २

[ ३ ]

अडदांड यवन रणमंडपिं जमले; युद्धकांड येथोनि सुरू
करिती निश्चय उभयवीर रणधीर "मारुं वा रणीं मरूं"

पुढें पडे दुष्काळ चमूमधिं; अन्न न खाया वीरांना
म्हणती "अन्नावांचुनि मरण्यापेक्षां जाऊं चला रणा"
मग सेनेनें एक दिलानें निश्चय केला लढण्याचा
स्वस्थ होळकर मात्र नीचतर पगडभाइ तो यवनांचा
परधान्यहरणामिष करुनि रणांगणिं पडले आधीं बुंदेले
श्रीशिवराया युद्ध पहाया हांक द्यावया कीं गेले
धन्य मराठे! धन्य यवन ते रणांगणामधिं लढणारे
आम्ही त्यांचे वंशज केवळ हक्कांसाठीं रडणारे
आवेश प्रवेशे दोन्ही सैन्यांमधें कराया युद्धखळी
परी स्वार्थ अनिवार मार दे आर्यजनांमधिं करि दुफळी
आर्यजनांचें दैवहि नाचे अभिमानाचें रूप परी
करी वसति मनिं सदाशिवाच्या; होय आमुच्या उरा सुरी
सुरासुरीं जणुं डाव मांडिला बुद्धिबळाचा भूमिवरी
परि दुर्दैवें वेळ साधिली प्यादी आली अम्हांवरी
कलह माजला झालि यादवी नवीन संकट ओढवलें
कारस्थानीं हिंदुस्थाना व्यापुनि पूर्णचि नागविलें
कुणि यवनाचा बाप जाहला ताप तयाचा हरावया
नया सोडुनी जया दवडुनी कुणीं लाविला डाग वया
कुणि दिल्लीची वाहि काळजी कोणी तख्तासाठिं झुरे
कुणा लागला ध्यास प्रीतिचा विचार सारासारिं नुरे
"लालन लालन" करि कुणि, साधी मर्जीनेची कुणि मरजी
असे घसरले साफ विसरले युद्धरीति अति खडतर जी
गारदीच मज फार रुचे जरि यवन न सोडी विश्वासा
निजबंधूंची करणी ऐकुनि सोडि वाचका! निश्वासा
कलहा करिती कार्य विसरती क्षुद्रवस्तुच्या अभिमानें
जसे हल्लींचे लोक तोकसम कलहा करिती नेमानें
नेमानेमाच्या या गोष्टी कथीं होतें मन श्रवणीं
असो; बुडाली एकी, बेकी राज्य चालवी वीरगणीं

सरदारांच्या बुद्धिमंदिरा आग लागली कलहाची
शिपाइभाई परि नच चळले रीति सोडिलि न मर्दाची
नाहीं लढले लढणारहि नच कुणी पुनरपी या जगतीं
तसे मराठे गिलचे मोठे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ३

[ ४ ]

एके दिवशीं रवि अस्ताशीं जातां झाला विचार हा
" प्रातःकालीं स्मरुनी कालीं युद्ध करूं घनदाट महा
निरोप गेला बादशहाला, युद्ध कराया उद्यां चला
समरांत मरा वा कीर्ति वरा जय मिळवुनि आम्हांवरि अचला। "
सकल यामिनी आर्यवाहिनी करी तयारी लढण्याची
वीरश्रीचा कळस जाहला परवा न कुणा मरणाची
परस्परांतें धीर मराठे गोष्टि सांगती युद्धाच्या
वीरश्रीच्या शस्त्रकलेच्या जयाजयाच्या अश्वांच्या
" बोले कोणी " माझा न गणी वंशाचि मृत्युभयासि कधीं
आजा पणजा बापहि माझा पडला मेला रणामधीं
बापसवाई बेटा होई खोटा होइल नेम कसा
पोटासाठीं लढाइ नच परि मान मिळविण्या हवा तसा "
कुणी धरी तलवार करीं तिस पाहुनि आनंदें डोले
फिरवी गरगर करिं खालीं वर वीर मराठा मग बोले
" अफाट वाढीची ही बेटी मोठी झाली लग्नाला
प्राणधनाचें व्याज घेउनी उद्यांच देइन यवनाला "
अशी चालली गडबड सगळी निद्रा कोणा नच आली
कोठें गेली कशी पळाली रात्र न कोणा नच कळली
प्रभातरूपें ईर्षा आली; भीति पळाली निशामिषें
भय मरणाचें कैचें त्यांना; काय करावें हरा विषें
शिंग वाजलें संगरसूचक कूच कराया मिळे मुभा
धांवति नरवर समरभूमिवर राहे धनगर दूर उभा

हटवायातें देशदरिद्रा मुखा हरिद्रा लावुनिया
कीर्तिवधूतें जाति वराया समरमंडपीं धांवुनिया
शहावलीचा हलीसारखा अताइ नामा पुत्र बली
यवनदलीं मुख्यत्व घेत कीं पापावलिमधिं जसा कली
प्रणव जसा वेदांस सदाशिव तसा आर्यबलसेनानी
विश्वासातें पाहुनि वदनीं अंगुलि घातलि यवनांनीं
आले यापरि रणभूमिवरी; जसें गात कवि या पुढतीं
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ४ ॥

[ ५ ]

वाढे जैसा दिवस वाढलें युद्ध तसें अतिनिकरानें
हातघाइला लढाइ आली; अंबर भरलें नादानें
उभय वीरनर गर्जति "हरहर" "अल्ला अकबर" उल्हासें
भासे आला प्रळय; यमाला दिली मोकळिक जगदीशें
अश्ववीरगज भक्तमंडळी गोंधळ भारतदेवीचा
तलवारींच्या दिवट्या केल्या; सडा घातला रक्ताचा
धूळ उडाली गुलाल झाली "उदे" गर्जती भक्तवळी
परस्परांचे बळी अर्पिती भूमि तर्पिती शिरकमळीं
रणवाद्य भयंकर भराड वाजे शुद्ध न कोणा देहाची
रणमदमादिरामत्त जाहले, हले फणाही शेषाची,
मनुजेंद्रबला जणुं अंत न उरला देवेंद्रा नसेचि परवा
म्हणुनि धूलिकण नभीं धाडुनी मेघसंघ कीं रचिति नवा
रक्तपाट अतिदाट वाहती घाट बांधिले अस्थींचे
मृतगजतुरंग मकर खेळती; कृत्य अगाधचि वीरांचें
घोर कर्म हें बघुनी वाटे रविहि धरी निजसदनपथा
कांपे थरथर स्थीर न क्षणभर; इतरांची मग काय कथा
यापरि चाले लढाइ; भ्याले दाढीवाले मग हटले
पळती, धांवति सैरावैरा; आर्यवीर त्यांवरि उठले

ग्रंथ संग्रहालय,
शाखा.

आर्यजनां आवेश नावरे; भरें कांपरें यवनांला
म्हणाति " मिळाला जय हिंदूंला लढाइ आली अंताला "
तोंच अताई दूरदृष्टिचा धीर देत निजसैन्याला
स्वयें धांवला पुढें जाहला स्फूर्ति पुन्हा ये यवनांला
त्वरित पूर्ववत समर चाललें हले भरंवसा विजयाचा
दाढी शेंडी एक जाहली खेळ शहाच्या दैवाचा
करी अताई जबर लढाई नाहीं उपमा शौर्याला
त्यावरि ये विश्वास भासलें कीं खानाचा यम आला
विश्वासानें अतिअवसानें खान पाडिला भूमिवरी
करिवरचरणीं मरण तया ये, शरण एक मग यमनगरी
धीर सोडिती वीर शहाचे पळती आवरती न कुणा
शहावलीची कमाल झाली यत्न तयाचा पडे उणा
पहात होता शहा खेळ हा दुरुनी; तोंही घाबरला
म्हणे, " करावें काय न ठावें " दैव हात दे परि त्याला
दक्ष वीर लक्षैकधीर तनुरक्षक सेनेसह धांवे
म्हणे चमूला, " पळति यवन जे कंठ तयांचे छेदावे "
पुन्हां उलटले यवन लढाया हुकुम ऐकतां हा त्याचा
शहा तयांतें सहाय होतां मारा करिती जोराचा
जसे लढावे वीर संगरीं कविजन इच्छा मनिं करिती
तसे मराठे गिळचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ५ ॥

[ ६ ]

नभोमध्यगत सूर्य होत मग युद्धहि आलें मध्याला
हाय ! हाय ! या आर्य-भूमिचा भाग्यसूर्य तो शेवटला
सदा अम्हांला विजय मिळावा प्रताप गावा जगतानें
परि त्या काळीं फुटक्या भाळीं तसें न लिहिलें दैवानें
सदाशिवाचा उजवा बाहू राहु रिपुश्रीमुखविधुचा
बाऊ केवळ म्लेंच्छजनांचा; भाऊ माधवरायाचा

बेटा ब्राह्मण-द्वादशहाचा; पेटा साचा वाघाचा
वीरकुलांतील गुलाबगोटा; वाली मोठा धर्माचा
ताण जयाची द्रौणीवर उड्डाण आणिता आर्यांला
विजयाचा विश्वास; असा विश्वास; लागला शर त्याला
मर्मे हाणि तो वर्मी लागे कर्म आमुचें ओढवलें
धर्म–सभेला आत्मा गेला धर्मवधूकरिं शव पडलें
अश्रू नयनीं आणी लक्ष्मी प्रिय भार्या त्या आर्याची
उतरे चर्या अधा न मर्या; परि स्मृति तिस कार्याची
करी विचारा वीराचारा दारा वीराची स्वमनीं
"नाथघात सैन्यांत समजतां धीर उरेल न आर्यजनीं"
छातीचा करि कोट लोटिला, दु:खलोट अनिवार जरी
नीट बैसवी प्रेता देवी धनुष्य त्याच्या दिलें करीं
धन्य सती ती! धन्य तिचा पति! धन्यचि जननीजनकाला
धन्य कवीचें भाग्य असे या म्हणुनि मिळे हें गायाला
परि जें घडलें लपेल कुठलें? वेग फार दुर्वार्तेला
अल्पचि काळें भाउस कळलें "गिळिलें काळानें बाळा"
"हाय लाडक्या! काय कृत्य हें घाय काय हा भग्न करी
गोंडस बाळा तोंड पुण्याला दावुं कसें कधिं तोड तरी"
असा करी तो शोक ऐकुनी दु:ख जाहलें सकळांला
अश्वावरती स्वार जहाला भाऊराया मरण्याला
व्यंग समजतां भंग कराया आर्यांच्या चतुरंग बळा
सिद्ध जाहला शहा; तयाला देवानें आधार दिला
फिरति मराठे आला वाटे अंत शिवाजीराज्याला
भाऊराया योजि उपाया—तोही वाया परि गेला
मान सोडिला साम जोडिला, दूत धाडिला होळकरा
प्रसंग येतां मत्त किंकरा धनी जोडिती असे करां
दूत निघाला सत्वर आला होळकराला नमन करी
म्हणे, "भाउचा निरोप ऐका, साह्य करा या समयिं तरी

उणें बोललों प्रमत्त झालों बहु अपराधी मी काका
माफ करा, मन साफ करा या आफतींत मज नच टाका
मत्प्राणाची नाहीं परवा, बरवा समरीं मृत्यु हवा
परी लागतो डाग यशाला शिवरायाच्या तो दुरवा
देशकार्य हें व्यक्तीचें नच; सक्ति नको; भक्तीच हवी
आसक्ती सर्वांची असतां मिळवूं आतां कीर्ति नवी
राग नका धरुं; आग लागते यशा; भाग हा सर्वांचा
शब्द मुलाचा धरितां कैचा? हाच मान का काकाचा
साह्य कराया यवन वधाया धीर द्यावया या काका"
असें विनविलें हात जोडिले दया न आली परि काका
बट्टा लावी वयास; केली थट्टा ऐशा विनतीची
रट्टा दे भूमातेला; धरि कट्टा वैरी मान तिची
दुःखावरतीं डाग द्यावया करी होळकर हुकुम दळा
"पळा मिळाला जय यवनाला" काय म्हणावें अशा खळा?
फिरले भाले-भाले कैचे? दैवचि फिरलें आर्यांचें
पाहे भाऊ; वाहे नयनीं नीर करपलें मन त्याचें
निरोप धाडी पुन्हां तयाला "पळा वांचवा प्राण तरी
पळतांना परि कुटुंबकबिला न्यावा अमुचा सवें घरीं
घेत होळकर वीरवधूनें मग दक्षिणची वाट धरीं
देशहिताची करुनी होळी नाम होळकर सार्थ करी
करी दुजा विश्वासघात हा; निजबंधूंच्या दे साची
परवशतेची माथीं मोळी, हातीं झोळी भिक्षेची
काय कथावी युद्ध-कथा मग वृथा भाउचा श्रम झाला
धीर सोडुनी पळति मराठे, पूर्ण पराभव त्यां आला
कोणी वेणीमाधव धांवे; वार तयाचा शिरीं पडे
भारतरमणीकंठतन्मणी धरणीवरती झणीं पडे
भूदेवीची तुटे गळसरी; फुटे दैव कीं आर्यांचें
आकाशाची कुऱ्हाड पडली; कडे लोटले दुःखाचे

सैरावैरा आर्य धांवती हरहर! कोणी नच त्राता
यवन करिति मग प्रळय भयंकर वदा कशाला तो आतां
वर्णन करितां ज्या रीतीचें कुंठित होइल सुकविमती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौ० ॥ ६ ॥

[ ७ ]

सन सतराशें एकसष्ट अतिनष्ट वर्ष या देशाला
हर्ष मरे उत्कर्ष उरेना; सकळां आली प्रेतकळा
फुटे दांगडी दीडलाख ती; राख जहाली तरुणांची
आग पाखडी दैव अम्हांवर; मूर्ति अवतरे करुणाची
घरोघरीं आकांत परोपरि; खरोखरींचा प्रळय दिसे
भरोभरीं रक्ताच्या अश्रू अबला गाळिति शोकरसें
"दोन हरवलीं मोतिं; मोहरा गेल्या सत्तावीस तशा
रुपये खुर्दा नये मोजितां" वचना वदती वृद्ध अशा
घोर वृत्त हें दूतमुखानें कानीं पडलें नानाच्या
"भाऊ भाऊ" करितां जाइ भेटिस भाऊरायाच्या
उघडा पडला देश तयातें हें नव संकट कां यावें
दुःख एकटें कधिं न येत परि दुःखामागुनि दुःख नवें
धक्का बसला आर्ययशाला; तेथुनि जाई राज्य लया
रघुनाथाचें धैर्य हरपलें, जोड उरेना हिमालया
"नाथ! चाललां सोडुनि अबला, पाहुं कुणाच्या मुखाकडे"
"बाळा! कैसा जासी लोटुनि दुःखाचे मजवरति कडे"
जिकडे तिकडे हंबरडे यापरी परिसती जन फिरतां
कोणिकडेही तरुण दिसेना; सेनासागर होय रिता
उडे दरारा, पडे पसारा राज्याचा बळ घेत रजा
उघडें पडलें मढें हत्तिचें कोल्हे त्यावरि करिति मजा
भलतेसलते पुढें सरकले, खरे बुडाले नीचकरीं
मालक पडतां नीट बैसले पाटावरतीं चाकरी
नडे आमुची करणी आम्हां; खडे चारिले यवनांनीं
तडे पडोनी यशपात्राला रडे सदोदित भूरमणी

गंजीफांचा डाव संपला दिली अखेरी यवनातें
स्वातंत्र्यासह सर्वस्वातें दूर लोटिलें निज हातें
रुमशामाला धूम ठोकितां पुणें हातिचें घालविलें
दुग्धासाठीं जातां मार्गीं पात्र ठेवुनी घरिं आले
करि माधव नव उपाय पुढतीं परि ते पडती सर्व फशीं
परिटघडी उघडिल्या एकदां बसेल कैशी पुन्हां तशी
जसा नदाचा ओघ फिरावा पात्रीं पडतां गिरिशिखरें
पानपताच्या पर्वतपातें इतिहासाचा ओघ फिरे
इतिहासाचें पान येथचें काळें झालें दैवबळें
या देशावर अपमानाची स्वारी दुःखासहित वळे
सर्वस्वाचा नाश जयानें वर्णुं तयातें अतां किती
व्यास वर्णितां थकेल यातें मग मी कोठें अल्पमति
जसें झगडतां त्वरित फिरावी सकल जगाची सरल गति
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ कौं० ☛॥

[ ८ ]

जें झालें तें होउन गेलें फळ नच रडुनी लेशभरी
मिळे ठेंच पुढल्यास मागले होउं शहाणे अजुनि तरी
पुरे पुरे हें राष्ट्रविघातक परस्परांतिल वैर अहो
पानपताची कथा ऐकुनी बोध एवढा तरि घ्या हो
भारतबांधव! पहा केवढा नाश दुहीनें हा झाला
परस्परांशीं कलहा करितां मरण मराठी राज्याला
हा हिंदू, हा यवन–पारशी, हा यहुदी, हा भेद असा
नको नको हो; एकी राहो; सांगुं आपणां किती कसा
एक आईचीं बाळें साचीं आपण सारे हें स्मरुनी
एकदिलानें एकमतानें यत्न करूं तद्धितकरणीं
कथी रडकथा निजदेशाची वाचुनि ऐसा हा फटका
लटका जाउनि कलह परस्पर लागो एकीचा चटका
कौरवपांडवसंगरतांडव द्वापरकालीं होय अती
तसे मराठे गिलचे साचे कलींत लढले पानपतीं ॥ ८ ॥

## प्रेमपाठ

चित्तकोकिला! प्रेमा गाया जगद्गायनाला,
पंचप्राणांचा पंचम तव लावीं याच काला.
हृदयवसंतहि खुलला भुलला जीव तुझ्या गानें,
वृत्तिलतां वहरल्या, फुलांनीं विसरविलीं भानें.
प्रेमाश्रूंच्या मधुबिंदूंच्या करूं सेचनातें,
संतोषाच्या श्वासाच्या या मंदमंद वातें.
प्रेमरसाच्या या वर्षावें भूदवीहृदयीं,
तृणांकुरांच्या रोमांचांची पेरणीहि व्हावी.
चला मनाच्या मनांत पेरूं प्रीतीचीं बीजें
चित्तगीत-पुष्पें मग उधळूं कोण उगिच लाजे?
आज जगाची लाज सोडुनी होऊं या वेडे!
प्रीतिपटाच्या खालीं दडवूं जें जें मनिं तेडें.
पहा नदीच्या जलांत संध्यारंग उडी घाली!
हृदयनदाच्या जलीं पडूं द्या प्रीतीची लाली.
दीप तटींचे जलीं करविती किरणांचा नाच,
नयन-दीपकिरणांस नाचवा हृदयजलीं साच.
काळ्या काळ्या ढगांढगांवरि संध्येची लाली,
काळीं हृदयें तशीं रंगतिल प्रेमें जरि धुतलीं.
उषा-संगमीं तप्त-करांचा रवि होई गार,
तद्विरहें तापतां जगावरि गाजवि अधिकार!
त्या मंगल संगमीं रंगले सृष्टीचे गवई,
मंजुल गुंजारवें प्रीतिच्या गुणगुणती कांहीं!
आकाशाच्या लग्नमंडपीं लता करवल्या या,
वृक्षबालकां लाजुनि पल्लव सांवरितां दमल्या!
कळ्या कोंवळ्या, हलती कानीं डूल मजेदार;
उषा-वधूवरि सुमाक्षतांहीं करिती भडिमार,

नवरदेव नाचरा निघाला, ती पाठोपाठ—
लाजुनि झाली उषा दूर, कुणि या पदरा गांठ !
नवतेजाची साखर वांटित कोठें ती लपली ?
स्त्रीपुरुषांची जोडी किंवा एकरूप झाली ?
श्रीमंतांच्या घरीं चालती खेळ असे फार,
परी गरीबां प्रीतिदेवते ! तुझाच आधार !
क्षयी कलंकी चंद्रासाठीं प्रेमा ! ऊठ तरी,
वसुंधरेशीं लग्न तयाचें लावीं शीघ्र करीं.
दिशेदिशेच्या दिक्पालांनों ! सावधान सगळे !
संध्यापट-पीतांबर काढा; ताराबल जमलें !
प्रेममंगलाष्टकें सारखीं जगीं गाजवा हो !
मेघांचा चौघडा गगनिंचा जगीं वाजवा हो !
नक्षत्रांच्या करा अक्षता शुभ मंगल बोला !
सप्तपदीची चाल चालवा सप्तभुवनिं सकलां
दुग्धचंद्रिका जिकडे तिकडे नवरदेव ओती
पुष्परेणु—शर्कराकणांची पृथ्वी करि भरती !
त्रिभुवनिं साऱ्या दुग्धशर्करा वांटा ही असली,
म्हणेल जग मग दुधांत कीं या साखर ही पडली !
हृदयदीपिके ! प्रीतिदेवते ! मार्ग असा दावीं,
जिकडे तिकडे शुभलग्नें हीं सारखींच लावीं !
चराचरांनों ! केवळ खेळा प्रेमाचे खेळ !
दुसरें तिसरें नकोच कांहीं करा हृदय-मेळ !
दिनरजनींची जोडी एकच, चांदणें न तिसरें—
त्या दोघांचें संमीलन हें जमलें एकसरें !
एकएकट्या फिरतां कां गे तारांनों ! गगनीं
जमवा जोड्या प्रेमाच्या मग गा फिरतां गाणीं !
निळ्या नभाला या ग उजळा शुभ्र चांदण्याचा,
प्रेमासाठीं प्रेमसागरीं खुशाल मग नाचा !

महासागरा! उगाच लाटा उथळतोस कां रे ?
विझवीं वडवानलासि पिउनी प्रेमाचें वारें!
नदीमुखाचें चुंबन घेतां ज्या लाटा उडती,
त्याच तेवढ्या नाचूं दे; त्या प्रेमपाठ गाती!
हृदय सळसळे, फेंस उसळ ऽा, टाकुं नको खालीं,
त्या फेंसाचे गेंद रुपेरी नदीपदीं घालीं!
नदीनदीच्या पदीं बांधुनी प्रेमाचे चाळ,
नाचूं दे तुजभवतीं त्यांना बा रानोमाळ!
वनांत लपलेल्या वेलींनों! या ग बाहेर!
वृक्षांचे कर धरुनी घ्या मग प्रेमाचे वेर!
गवताचा गालिचा कोंवळा, हळूहळू चाला,
पायघड्या पसरल्या फुलांचा सडा वरति घाला
वाऱ्यावरतीं वरात काढा जीवाभावांनीं,
वनदेवींच्या मुलिंनों! या ग, या लौकर नटुनी!
कुणी गुलाबी पातळ नेसा, शालु कुणी हिरवा,
कुणि मोत्यांची जाळी लेउनि हव्या तशा मिरवा!
चला चला ग फुलाफुलाला देऊं या नांव!
जसा जयाचा येइल दिसुनी प्रेमाचा भाव!
शोभापुष्पें कमलें; नुसती शोभा त्या ठायीं!
काव्यपुष्प पदवी ही दे त्यां सरस्वतीदेवी!
सूर्यकमल दिनपुष्प साजिरें दिवसभरीच फुले,
निशापुष्प तव बालक कुमुदिनि चंद्रा बघुनि खुले!
उषा-पुष्प जास्वंदीवरतीं तसा रंग त्याचा,
प्रथम पुष्प दिवसाचें भावहि अस्फुट वासाचा!
फुलें गुल्बशींवरति विहरतीं तांबुस अंगाचीं
संध्यापुष्पें संध्यासमयीं संध्यारंगाचीं
तीन रंग दिवसांतुनि दावित फूल तेरड्याचें,
बालपुष्प तें बालवृत्तिचें भडक रंग त्याचे!

यौवनपुष्पाचा निशिगंधा दिधला अधिकार,
हृदय खळबळे, वास दरवळे जो अपरंपार!
सुरकुतलें कोरांटीवरि जें कांटयांतिल फूल,
जरठपुष्प तें रजःकणांची वृथा उडवि धूळ!
एकलकोंडा नीरस भावहि या धत्तूरांचा;
स्मशानस्थ शिव सदा हावरा स्मशानपुष्पांचा!
धड न पांढरें, लालहि नाहीं वासहि उग्र तसा,
गर्वपुष्प हें कण्हेर दावी गर्वाचाच ठसा!
व्यर्थ पसारा वासावांचुनि या मखमालीचा.
दंभपुष्प–परि नको; पथ न हा प्रेमळ चालीचा!
उगाच नांवें अशीं कशाला कुणास ठेवावीं!
मंगलकालीं मंगलवदनीं मंगलताच हवी.
लीलापुष्पें खुल्या दिलाचीं या शेवंतीचीं
मुग्धा पुष्पें हीं जाईचीं कोमळ वृत्तीचीं,
शुभ्र मोगरा दंतनिदर्शक हंसऱ्या तोंडाचा,
हास्य-पुष्प तें शुभ्र रंग हा दावित हास्याचा.
लालि गुलाबी जी लज्जेची रमणीच्या वदनीं,
गुलाब दावी लज्जापुष्पापरि ती निज सुमनीं.
मदपुष्पें हीं आम्रावरचीं मत्तमना करितीं,
पुण्य-पुष्प तुलसीदलिं साधी पुण्यमंजरी ती.
श्वासानें जें सुमन करपतें पारिजातकाचें,
हृदयपुष्प अतिकोमल तें अतिकोमल वासाचें
सुकलें तरिही सुवास राखी; दृढतेचा भाव,
प्रेमपुष्प बकुलाचें वसवी प्रेमाचा गांव!
त्या गांवाचा, त्या नांवाचा कायमदायमचा
रहिवासी हा जीव गातसे प्रेमपाठ तुमचा!
वनदेवींनों! तुम्हांसाठिं हा थाट बारशाचा!
फुलाफुलाचें नांव दाखवी भाव आरशाचा!

फुलें तुम्ही द्या, फुलें मला या, प्रेमाची ठेव,
कृष्ण द्या कुणी, कृष्ण या कुणी, हीच देवघेव !
चला लतांनो ! मुलें बसवुनी कटिखांद्यावरतीं,
लग्न निसर्गासह लावी कविहृदयस्था प्रीति !
सृष्टिदेवता माता तुमची कार्यें तिच्या घरचें,
लग्न निघे माहेरघरीं मग आळस काय रुचे !
हृदयपटावरि निजलज्जेचा लाल रंग उधळा,
प्रेमपल्लवीं लिहुनी कुंकुमपत्रें द्या सकलां,
प्रीतिदेविचें आज निघालें लग्न निसर्गाशीं;
वऱ्हाड जमलें, मुहूर्त भरला, धीर न कोणाशीं
वनदेवींच्या मुलिंनो ! या ग, या लौकर म्हणुनी,
पराग उधळित, सुवास पसरित, कोमल हातांनीं !
हिमवंतीच्या जळीं मिसळुनी मरंदमय तेला,
स्नान सुमंगल घाला कोणी प्रीतिदेवतेला !
शशिकिरणांचे तंतु भिजवुनी संध्यारंगांनीं,
अष्टपुत्रि या नव नवरीला कुणीतरी विणुनी.
हिमगिरिशिखरीं स्फटिकशिलांतरिं रविकिरणें शिरतीं,
प्रतिकिरणें पाझरतीं भरभर अति कोमल असती.
मुग्ध अधरिंच्या गुलाबि रंगीं रंगवुनी त्यांना
त्या सूत्रांची काचोळी कुणि नवरीला द्याना !
पराग कोळुनि करुनि हरिद्रा उटी तिला लावा,
इंद्रधनुष्यें वळवुनि हातीं वज्रचुडा भरवा.
शुभ्र फुलांचें तेज आटवुनि घडवा कुणि त्याचीं
वेढिविरोदीं सौभाग्याचीं लेणीं पायांचीं,
रात्रीचें तम, उषा-रक्तिमा, कांहिं नका टाकूं,
प्रीतिदेविच्या सौभाग्याचें हें काजळकुंकू !
मणिमंगळसूत्रांत चांदण्या चंद्र चमकदार,
तिला तिच्या भाग्याचा भगवान् निसर्ग देणार !

संध्याकाळीं संध्यापटिं जो असे सूर्य गगनीं,
भरा प्रीतिची ओटी असल्या खणांनारळांनीं.
मयासुराची माया शिकुनी कविकल्पकतेनें,
मंगलभूषणरचना मग ही करा शीघ्रतेनें.
मुक्या मनाची म्हणा मंगलाष्टकें, जीं न सरतीं,
हृदयाश्रूंच्या दिव्य अक्षता वधूवरांवरतीं !
खुल्या दिलांचा मिलाफ घडवा; मुहूर्त हा सरतां,
अंतरंगिंचा अंत:पटही दूर करा आतां !
शुभमंगल वच तूंच बोल श्रीमहन्मंगलारे !
हृदयाचा चौघडा वाजवुनि विश्व भरा सारें !
पाउल त्यांचें एक एक मग जन्माजन्माचें,
सात पावलें सात जन्मभर सप्तपदी नाचे !
पतिव्रतांनों ! मंगल विश्वचि तुमचें माहेर,
वधूवरांना मांगल्याचा कराच आहेर !
सकलवेलिंनों ! वरात त्यांची चला चला पाहूं,
ही सोन्याची संधी ! मागें नका कुणी राहूं !
लाजाळू लाजते कुणाला ? नका तिला रुसवूं !
चला चिमुकल्या करवलीस त्या जाउनियां हंसवूं.
वंशतरुवरा ! असाच गा रे प्रेमाचे सूर !
हृदयस्था हृदयाशिं धरा कुणि; नका राहुं दूर !
जनिं कीं रानीं, जळीं स्थळीं, वा गगनीं पाताळीं,
जिवाजिवाला बांधा पसरुनि प्रेमाचीं जाळीं !
जलदेवींनों ! स्थलदेवींनों ! गगनदेवतांनों !
सकलां शिकवा प्रेमपाठ; गा हाच अप्सरांनों !
हृदयशारदे ! हृदयिं राहुनी करिं मज प्रेमकवी !
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी !
पशूस करशिल मानव ! मानव नेशिल देवपदा !
देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूंच सदा !

प्रेमतरंगें चित्त तरंगे, आत्माही रंगे !
जगत् रंगलें, विश्व रंगलें एक प्रेमरंगें !
चराचरांनों ! स्थिरास्थिरांनों ! नश्वर ईश्वर वा,
प्रेमें जिंका ईशा; साक्षात् कीं परमेश्वर व्हा !
हृदयसंपुटीं स्नेहिं पाजळुनि जीवाच्या ज्योती,
प्रीतीच्या गंगेंत सोडुनी गा मंगल आरती !
हृदयाचीं राउळें उघडुनी हृदयदेवतेला,
पंचेन्द्रियकृत प्रभावळीमधिं वरच्यावर झेला !
इतर वृत्तिंचा देवीभंवतीं चालूं द्या नाच;
जीवेंभावें तिच्यापुढें गा प्रेमपाठ हाच ! —
चित्ताच्या ताटामधिं अर्पा निजपंचप्राणां;
त्या नैवेद्यें हृदयदेवता तृप्त होत जाणा !
प्रेम नसे तर जीव नको हा ! प्रेमें जग चाले !
प्रेमावांचुनि धिग् जीवन हें असे आज झालें !
प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेमपाठ बोले,
मनांतलें हें गाणें माझें जनांतलें झालें !
प्रियमित्रांनों ! प्रेमरंगणीं प्रेमानें नाचा !
मुक्या मनाला फुटली आतां प्रेमाची वाचा !
प्रेमपाठ हा सदैव गारे प्रेमानें ताज्या,
आण घालितों अशी तुम्हांला गळ्याचीच माझ्या !
चला गड्यांनों ! या प्रेमाचीं ऋण आधिं फेडा,
हेंच मागतों हात जोडुनी प्रेमाचा वेडा !
प्रेमपाठ हा सरता झाला, मन हो बेताल !
प्रेमरसें गुंगलें यावरी फुकट शब्दजाल !
त्या गुंगीच्या भरांत गातां पडुनि मना भूल !
क्षमा करा हो गातांना जरि होइ चूकभूल.
प्रेमपाठ हा रुचे कुणाला, न रुचे कवणाला,
एक नसे जगीं आवडनावड; ती ज्याची त्याला !

तशांत हें तर बोलुनिचालुनि मन वेडें झालें !
बंधन कसलें मग त्या ? गाई जें सुचलें रुचलें !
परवा न तया; हंसा, रुसा, वा निंदा, कीं वंदा,
मी प्रेमाचा बंदा ! माझा हाच असे धंदा !
स्तुतिनिंदेचा भेदचि अवघा प्रेमजलीं जिरला;
भेदाभेदचि, न परि जीवही प्रेमांतचि विरला !
हृदयशारदा हृदयमंदिरीं चित्तरंग तारा,
छेडित बसली त्या गीताचा वाहे प्रेमझरा !
देहभरीं त्या निर्झरलहरी थरथरुनी भिनल्या,
वृत्तिवृत्ति त्या गायननादें प्रेममयी बनल्या !
भाव बहिरला, जीव बहिरला, बहिरलाच आत्मा!
प्रेमरूपची, प्रेमलभ्यची, रमला परमात्मा !
त्या दोघांच्या या ऐक्याचा गाया जयवाद,
घुमत सारखा बधिरवृत्तिंतुनि प्रेमगीतनाद !
कायावाचामनसा होउनि प्रेमाचा भाट,
'गोविंदाग्रज' आळवीत मग सदा 'प्रेमपाठ' !

---

## केशवसुतांची कविता वाचून–

शिवरायाच्या मागें आम्ही लालमहालीं फिरणें
तसेंच तुमच्यामागें आम्ही नवीन कविता करणें
असेंच कांहीं कांहीं करुनी जीवित त्याला गणणें
'गोविंदाग्रज' म्हणे असे हें आम्हां लाजिरवाणें !

---

## मागें पहाणें

[ चाल—नोहे हा पवन जवन० ]

चालतसे सारखीच ही मुशाफरी ॥
जहांगीर या फकीर हा पिशापरी ॥ ध्रु० ॥

जिकडे मज मार्ग फुटे। न कळत मी फिरत सुटे।
नच कसलीही माया। पायबंध बांधाया।
मागुनि मज शोकवशा। पाहीना कुणि आशा।
मग मागें वळुनी कां। पाहणें तरी ॥ १ ॥

पुणें, ता. ३०।७।१५.

---

## पहिलें चुंबन

[ पहिलें फूल, पहिलें मूल सर्व कांहीं पहिलें म्हणजे पहिलेंच ! तसेंच पहिलें चुंबन ! पहिल्याची अजब जादू दुसऱ्यांत नाहीं ! ]

[ **चाल**—श्रावणांत पेरणी केली० ]

जें मनास शिवलें नाहीं। ठावें न कल्पनेलाही। सुख असें।
जें दिसे न कवण्या जागीं। जें अवर्ण्य वाणीलागीं। सुख असें।
कविताही प्रतिभाशाली। कल्पितां जयातें थकली। सुख असें।
एकदां—। कष्टतां सदा। पुढतिं नच कदा—।
अनुभवा येई। तें पहिलें चुंबन देई। सुख असें ॥ १ ॥
चित्रासम रमणी बसली। नवयौवनशोभा ठसली। तन्मुखीं।
करिं ठेवुनि कोमल गाला। करि विचार नकळे कसला। सारखी।
बोले ना अथवा हाले। मग कुठलें बोले चाले। चित्र तें।
रंजना। मुग्धयौवना। करित कल्पना।
भावि कालाची। ( तुज ठावें ) त्या दिवसाची। दिवस तो ॥ २ ॥
चित्र हें पाहुनी असलें। नेत्रांचें सार्थक झालें। वाटलें।
परि तरंग अद्भुत उठले। अनुभवा न पूर्वी आले। जे कधीं।
जाउनी चोरट्या चालीं। झांकिले नयन करजालीं। न कळतां।
संभ्रमें। दचकली गमे। त्वरित विभ्रमें।
श्रमवि कर दोन्ही। काढाया नयनांवरुनी। मम करां ॥ ३ ॥
तों बघुनी उघड्या गाला। उन्माद मानसीं भरला। स्वैरसा।
संमोह पडे नयनांला। मज विसर जगाचा पडला। क्षणभरी।

ठेवुनि मुख सखिच्या गालीं। आणिली गुलाबी लाली। त्यावरी।
हांसली। फार लाजली। दूर जाहली।
एक निमिषांत। झिडकारुनि माझा हात। हंसतची ॥ ४ ॥
हा खेळ एक निमिषाचा। एकदांच अनुभव त्याचा। नच पुन्हां।
तें वारें आलें गेलें। जन्माचें सार्थक झालें। परि गमे।
तें निमिष, स्थिति ती, सुख तें। चित्ताच्या दृष्टिस दिसतें ॥ सारखें।
स्वानंद—। कमलमकरंद। सुधानिस्यंद।
भूवरी आणी। जें वर्णावें तें कोणी। सुख तसें ॥ ५ ॥
एकदांच अनुभव त्याचा। आरंभ अंत सौख्याचा। एकदां।
आयुष्य न त्याला क्षणही। जन्मही पुन्हां त्या नाहीं। एकदां।
मनीं चटका लावायासी। पाठवी दैव जणुं त्यासी। एकदां।
निशिदिनीं। वाटतें मनीं। नित्य जन्मुनी।
मरण सोसावें। परि पहिलें चुंबन घ्यावें। फिरुनिही ! ॥ ६ ॥

---

## हा क्षण

रमणि ! स्मरणीं आमरणचि या हृदयपटावर ठसा
सदाचा ठेविल हा क्षण असा !
भूतभविष्यामधें तरलतर वर्तमान ज्यापरी—
चंचल सीमारेषा धरी;
गतदुःखाच्या भाविसुखाच्या मधें तसा सुंदरी !
क्षण हा संशयरेषेपरी !
गतकालाच्या दुःखाचें हें पळतें पाऊल !
सुखाची येत्या चाहूल !
जरि संशय माझ्या क्षणास या दूषवी;
तरि आयुष्यातें अवघ्या क्षण भूषवी;
करि दुभंग जीवननदास दे गति नवी;
अनंत सौख्याचा हा होइल आदिकालची तरी;
नातर अंत तरी सुंदरी !

## बापासाठीं रडणारास !

मृत जनकाचें प्रेत पाहुनी शोकसागरीं कां पडसी ?
गेलेले गुण आठवुनी कां एकसारखा बा रडसी ?

होता बलवान्, होता गुणवान्-आणिहि पुष्कळसा होता
—परंतु चढला पतंग; त्याला कसा चुकावा हा गोता !

जिवा अवश्यंभावि मरण हें; लोभ न धरणें प्रेताचा,
दृष्टिआड करिं जाळुनियां तें-क्रूरपणा हा काळाचा.

करीं उत्तरक्रिया झडकरी ऋण फेडाया कायमचें,
दीनवदन हा पुत्र तुझा-चल, समाधान तरि करिं त्याचें.

ना तरि गिरवुनि धडा तुझा हा शिकेल तोही रडावया
आजकालच्यासाठीं रडुनी उद्यांहि दवडिसि कां वांया ?

पुत्र असिसि तूं तसा जनकही; उभयहि धर्मां सांभाळीं,
'गोविंदाग्रज' सांगे बा रे रडणें आवरिं या काळीं.

---

## —स

[ शार्दूलविक्रीडित ]

प्रेमें जीं कुसुमें दिलींस मजला
तूं प्रेमले ! धाडुनी,
कोमेजून उद्यांच जातिल-सुखें
जावोत कोमेजुनी !
नाहीं वाटत खेदलेश, उलटा
आनंद वाटे मना,
प्रेमाची स्मृति त्या जिवास जडुनी
आजन्म राहील ना.

---

# मनांतली पाल

[ कांहीं विचार मनांत आला आणि तितक्यांत पाल चुकचुकली म्हणजे मनाला धक्का बसतो; तसेंच कांहींही अलौकिक करावयाला जा; आधींच कसेंसें वाटतें ! ]

[ **चाल**—कसें मी मारूं ? माझें नवलाचें पांखरूं० ]

करितां कार्या । चुकचुके पाल ही वांया ॥ ध्रु० ॥
क्षणैक भरतें भलतें वारें । संभ्रमिं बुडतें जग हें सारें ।
काराग़ृहिंचीं उघडतिं दारें । समयिं अशा या ।
चुकचुके पाल ही वांया ॥ १ ॥
सजीवतेची उकळी फुटते । बेडी पायांमधली तुटते ।
नसती लाज जनाची सुटते । तोंच भिवयाया ।
चुकचुके पाल ही वांया ॥ २ ॥
ओळख निजरूपाची पटते । क्षणभर भेकड वृत्तिहि हटते ।
शक्तिहि सर्वस्वानें नटते । जीव तों ध्याया ।
चुकचुके पाल ही वांया ॥ ३ ॥
दृष्टिहि अनंत ठायीं शिरते । बघतां बघतां उलटी फिरते ।
चहूंकडे वा ठायिंच जिरते । विरते माया ।
चुकचुके पाल तों वांया ॥ ४ ॥
मर्यादेच्या सीमा सरती । अणूंत सर्वस्वाची वसती ।
“मी तूं” शून्यामाजीं रमती । वायुमय काया ।
चुकचुके पाल ही वांया ॥ ५ ॥
जडता पारदर्शि जों होई । स्फूर्तिस पद अवकाशहि देई ।
कल्पकता जडरूपा येई । ब्रह्ममय माया ।
चुकचुके पाल तों वांया ॥ ६ ॥
अंधुक जें जें तें लखलखतें । ‘असतें’ सहजचि हातीं बसतें ।
नसतें तेंहि परी मग दिसतें । ठाव ना शून्या ।
चुकचुके पाल ही वांया ॥७ ॥

होतों सुखी सदा ज्या गांवीं । पुन्हां आठवण त्याची व्हावी ।
नसती ब्याद टाकुनी द्यावी । निघावें जाया ।
चुकचुके पाल ही वांया ॥ ८ ॥

न दिसे कोठें अंतःकरणीं । नाहीं तैशी वातावरणीं ।
नाहीं कधीं पाहिली कोणीं । ज्या त्या ठायीं ।
चुकचुके पाल परि वांया ॥ ९ ॥

न कळे चांडाळिण ही कुठली । निशि-दिनिं अडवायातें उठली ।
कर्तव्याची चालच खुटली । मार रे मार ! ।
पाल ही प्रभो ! अनिवार ! ॥ १० ॥

---

## मनांतली दिवसरात्र

[ पृथ्वी ]

अनंत नभ हें वरी पसरलें न मर्या तया !
अनंत मनही तसें जरि लघू शरीरांत या;
सदैव नभिं खेळती दिननिशा लपंडाव हा;
मनांतहि तशाच या दिवसरात्र दोन्ही पहा !

उषा विरुनि जात तों प्रकटतो नभीं भास्कर;
नवा दिवस नाचतो नवनव्या जगाच्या वर !
मनांत उगवे तसा क्षणिं नवीन आशारवि;
प्रफुल्ल-तर कल्पनेप्रति नवीन ये पालवी !

फिरे दिनभरी रवि; प्रकट होइ संध्या पुढें;
गमे उदयकाळशी, रविच तों बिचारा बुडे !
तशीच मनिं सारखी वरिवरीच आशा चढे;
गमे क्षणच जाहली सफल, तोंच खालीं पडे !

तमास पसरी निशा मग जगांत जातां रवि;
दिसे सकल शून्यसें, तम नव्या तमा मात्र वी !

विषण्ण हृदयीं तशी भयकरा निराशा जडे;
तमोमय रसा गिळी मन मनीं विचारें रडे!
तशांत गगनामधें दिसत दूर तारा परी—
मनांतहि सहस्रधा फिरत कल्पना बावरी!
पुन्हां उगवतो रवि प्रभवतो प्रकाशा नव;
निराश मनिंही पुन्हां करि तशीच आशा रव!
असें सतत चालतें जनिं तसें मनीं सारखें;
असे हृदयिं आज जें गमत तें उद्यां पारखें!
नको दिवसरात्र ही न सरती कधीं जी पहा,
सरेल कधिं तो सरो हृदयिंचा लपंडाव हा!

---

## मुरलीचा नाद

[ चाल—परदेसी सैयां ]

परतीरीं कान्हा चिमणी काठी।
मुरलीपरि। अधरीं धरी॥ ध्रु०॥
पैलथडी कपटी काळा।
ऐलथडी राजस बाळा।
पाणी चढलें अवकाळा।
ऊठ न तरी। घात; न परी।
आंवरी। मन बावरी॥ पर०॥ १॥
क्षणोक्षणीं वाढे पाणी।
गौळण परि वेड्यावाणी।
ऐके तीं नसतीं गाणीं।
तनु हरपली। जरी सलिलीं।
ती तरी। नच सांवरी॥ पर० २॥
त्या प्रभातिं गोपाळांशीं।
पुष्पांच्या नवख्या राशि।

दिसती यमुनातीराशीं ।
रडत हातें । धरि तयांतें ।
श्रीहरि । हृदयावरी ॥ पर० ॥ ३ ॥

---

## हालत्या पिंपळपानास

[ राहत्या घराच्या खिडकीसमोर पिंपळाचें पान वाऱ्यानें सारखें फडफडत होतें. परमेश्वराच्या इच्छेवांचून पानसुद्धां हलत नाहीं या लौकिक श्रुतीवरून पुढील विचार सहजच मनांत वावरूं लागले.]

कोंवळ्या हालत्या चिमण्या पिंपळपाना !
कल्पना हले तुज बघुनि असें हलतांना !
निज शाखेच्या या शेवटच्या टोंकाशीं
कां इकडुनि तिकडे सांग सारखें फिरशी ?
हा हिरवा, तांबुस रंग काळसर कांहीं,
तूं भिरभिर फिरतां स्पष्ट भेद नच राही.
या झुळझुळत्या वाऱ्यानें नाचसी,
कोंवळ्या सूर्यतापानें तळपसी,
आपल्या मिश्ररंगानें झळकसी,
तुजकडेच माझें लक्ष्य सारखें लागे,
बांधिलें तयाला गूढ कांहिं अनुरागें !
जीं गूढ अप्सरोगीतें नभिं पाझरतीं,
तीं वहात येतीं खालीं वाऱ्यावरती !
ऐकुनी तयांचे सूर मुके नवलाचे,
या हृदयकंपनें जीव काय तव नाचे ?
कीं जगीं ताप जो सारा उसळला,
रवितेजामाजि भरारा मिसळला,
लागतां तयाचा वारा कोमला,
थरकांप होत हा तव कोमल देहाचा !
वद नाच भीतिचा कीं हा आनंदाचा ?

हें तुझ्याच दुःखें हृदय असें तडफडतें ?
विश्वैक्यवृत्तिची ध्वजा काय फडफडते ?
तूं स्वयें हालसी, कीं तुज कोणी हलवी ?
सुखदुःखीं झुलसी स्वतां इतर कीं झुलवी ?
कळतसे तुझें तुज का हें हालणें ?
कीं दुसऱ्यासाठीं आहे चालणें ?
कीं भावावांचुनि पाहे डोलणें ?
तव अस्तित्वाचें ज्ञान असे का तुजला ?
तुज इच्छा तृप्ति क्रियाभेद का कळला ?
तुजभंवतीं जी ही सृष्टि असे पानांची,
कल्पना असे का तिळा तुझ्या नाचाची ?
रस एकच तरुचा तुम्हांमधूनी वाही–
सुखदुःखभाव ही जोडि तुम्हां कीं नाहीं ?
विश्वेंच्या विश्वें सारीं यापरी
स्थळिं भिन्न, भिन्न आकारीं, भूवरी
नांदतीं गड्या कांतारीं कितितरी !
जाणीव तुम्हांला परस्परांची का रे
जीवैक्य असे कीं भिन्न भिन्न जग सारें ?
क्रम हाच काय वद तुझ्या जीवनाचा रे ?
परिणाम करित का सृष्टीवर हें सारें ?
कुणि चित्रगुप्त हें लिहून ठेवित आहे ?
कीं स्वैरनदाच्या ओघावर हें वाहे ?
हें अवश्य जग चालाया का असे ?
कीं नसत्याहुनिही वांया हें पिसें ?
स्फूर्तिची कुणाच्या काया हलतसे ?
मम नयनिं चित्रसम जाउनि बैसायाचें,
इतुकेंच कार्य का सांग तुझ्या नाचाचें ?

मम करीं कपाळीं दुर्दैवाच्या रेषा
मजसाठिं लिहिति चिरदुःखभोग हा पेशा!
परि असति तुझ्या तर रेषा साऱ्या अंगीं,
दुःखही असे का तितुकें त्यांच्या संगीं?
कीं वाऱ्यावरच्या ताना यापरी
उमटल्या अशा फिरतांना, तुजवरी?
त्या फिरुनि फिरुनि घेतांना अंतरीं–
निजनादब्रह्मीं गुंग होउनी डुलसी!
तें गीत आंतल्या आंत ऐकुनी खुलसी?
कीं दुर्दैवाच्या किंकाळ्या, या ताना,
तव कोमल हृदयीं ठेविति वण जातांना?
खालतीं पडुनि मग मातिंत मिसळुनि जाया,
तूं तडफड करिशी अशी भूमिवर याया?
परि थांब जरा गा गाना तोषदा,
ऐकवीं माझिया कानां एकदां;
स्थिर राहिं न पिंपळपाना! तूं कदा
मज गाऊं दे, मज नाचूं दे, तुजसंगें,
सुखदुःख सारखें सेवूं मानसरंगें!
संबंध असो वा नसो आपणांमाजी,
मी एक कारणासाठीं तुजवर राजी.
नवबालाहृदयीं प्रीति नवी हलतांना
तच्छिरीं हलसि तूं तसाच पिंपळपाना!
जीं हृदयकंपनें सारीं मानसीं,
तीं आम्हांतें बाहेरी दाविशी,
निर्दोष मनानें भारी हालसी,
कुणि बाला जरि मज देइल असला मान,
तरि सुखेंच होइन मीही पिंपळपान!

---

मराठी ग्रंथ संग्रहालय,
क्र.
विभाग
क्रमांक
नों. दि.

# फुलें वेंचिलीं पण—

[ प्रेमस्थान नाहीं अशा मनुष्याला चांगल्यानेंसुद्धां खेदच होतो. ]

पन्हाळगडचा पठार सगळा घालुनि पायांखालीं
फुलें जमविलीं तऱ्हेतऱ्हेचीं जीं जीं हातीं आलीं
शेवंतीचा गेंद हांसरा, शुभ्र मोगरा फुलला
मदनबाण हा पाहुनि असला पुष्पबाणही भुलला
नाजुक जाईचीं हीं बाळें; गुलाब ताजा छान
हीं इवलालीं रानफुलेंही रंगें हरितीं भान
ही तुळशीची मंजुळ, तैसा सबजा महंमदाचा
भूकमळें हीं, अनंत फुलतां औरच वास तयांचा
किती आणखी सांगूं नांवें—आणि कशाला नुसतीं ?
हेंच पुरे कीं सगळीं होतीं जीं वासें घुसघुसतीं
फुलवंतीनें ओंजळ माझी भरुनी लागे शीग
सुगंधिसौंदर्याचा नाचे हातावरतीं ढीग
काव्यभरानें तरुण नयन हे नवतेजानें न्हाले
प्रणयरसानें हृदयहि माझें उचंबळुनि वर आलें
" फुलें वेंचिलीं; पण–आतां हीं द्यावीं कोणालागीं ?"
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणांत झाली जागी
" हतभागी हा जीव एकला; प्रीतिदेवता नाहीं
मोडुनि पडलें हृन्मयमंदिर शतधा आघातांहीं
निष्प्रेमाचें जीवन माझें रूक्ष चिंतनीं जावें
संकल्पचि हा वरला ठरला; कां तें देवा ठावें !
कांटयावरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर
कुठें फुलांची धनीण माझी दिली दवडुनी दूर ?
कृतकर्मांचीं फळें भोगणें अवश्य जीवा जगीं या
गुदस्त तें गुल्दस्त; नको तें पुनः पुनः मनीं याया "

अभंग निश्चय अशा प्रकारें कितीकदां जरि केला
या पुष्पांसम मृदुहि कारणें दुभंगतीं परि त्याला
वृत्ति बावरी झालि, आंतल्या आंत विचारी रडलीं
जीवांचीं नयनांतुनि पुष्पें त्या पुष्पांवर पडलीं
जीव जाहला जड; तीं हातीं पुष्पेंही जड झालीं
"फुलें वेंचिलीं पण–पण आतां देतों टाकुनि खालीं
चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास?
जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास
डोळे असुनी अंध असा कुणि तुडविल यांना पायीं
रसिक कुणी प्रेमांध उचलुनी अर्पिल रमणीहृदयीं
ज्या देवानें असे मांडिला असला निठुर खेळ
असेल त्याला बसवायाचा तसाच कांहीं मेळ
त्याचीं त्याला फेंकुनि देतों; हें ब्रह्मार्पणमस्तु
कुठेंहि पडतां पावतील त्या, विश्वचि त्याचें वास्तु
नाजुक असलीं फुलें अशा या माझ्या हृदयासाठीं
देवाजवळीं दाद मागतिल लागुनि त्याच्यापाठीं
देत उधळुनी फुलें अर्पितां देवा चहूंकडेही
"गोविंदाग्रज" तशीं फुलें हीं रसिका तुम्हां देई!

मुक्काम अथणी, १९१४

---

## गोड निराशा! 6

जादूची माझी बाग
तींत फुलें जागोजाग;
रम्य जरी बागाईत,
तरी तिची न्यारी रीत;
कळी कोंवळी चाफ्याची
मिटलेली ती कायमची;

जरि न कधीं उमलायाची
करिल वृष्टि तरि वासाची;
तशाच कोणी,
सुत्रावाचुनि
दिधल्या रचुनी
कुंदाच्या वेण्या दोन
मोल जिवाचा त्यां होन !

नाहीं पाणी जरि भवतीं
तरी दोन कमळें हंसतीं;
जन्म जलामधिं कमळांचा
न्याय असे हा जगताचा;
परि या कमळांच्या रंगा
खेळे प्रेमाची गंगा !
तुमच्या जगतीं,
किरणें पडतीं,
कमळें फुलतीं,
परि माझीं कमळेंच बघा
निजकिरणीं खुलविती जगा !

गुलाब होते दोन तसे,
आनंदाचे गोड ठसे;
कळ्यांवाचुनी फुललेले
कांट्यांच्या त्रासा चुकले;
जणूं फडकतीं मोजेचीं
नवीं निशाणें लाजेचीं !
गुलाब असले
हांसत बसले,
मनांत ठसले,

हृदयीं धरिलें या भावा
एकतरी काढुनि न्यावा!
परी फुलें तीं जादूचीं
लपंडाव खेळतिं साचीं;
रक्षण त्यांचें करणार
मनांतला जादूगार!
दिसतां हातीं लागत ना,
वेड लागलें तेंच मना;
क्षणांत फुलतीं,
क्षणांत लपतीं,
दिसती हंसतीं,
घेर घेतला गिर्कीचा
थेर थरकत्या फिर्कीचा!
निश्चय केला जिंकाया
जादूची असली माया;
तोंडानें उडवायाचा
मंत्र हाकिला प्रेमाचा
श्वासानें हृदयीं भरिला
मनिं वाटे आतां धरिला;
परि तो कुठला
गवसायाला!
तसाच उरला,
अधिक पसरला चहूंकडे;
तोडितांच उलटा वाढे!
यत्न मांडिला तोच पुन्हां
जीव गुलाबावीण सुना;
स्वस्थानांतुनि हलत नसे
काढावा तो वाटतसे;

गुलाब तर न मिळे मजला  
परि कांटे मम देहाला !  
त्या कुसुमाचे  
संसर्गाचे  
कांटे साचे  
मांडिति अंगीं थैमान !  
कांट्यांचें माजे रान  
कोण असा जादूगार  
खेळ करी हा अनिवार ?  
उघड्यावरती टाकुनियां  
राखी ती फुलती दुनिया;  
चोरितांच वाटे ऐशी  
चोरीची थट्टा खाशी !  
चित्त शरमलें  
जरी विरमलें  
तरिही रमलें;  
चोरी असली लाजेची  
वाटे त्याला मौजेची !  
अशी निराशा भरे मनीं  
शरीर भरलें कांट्यांनीं;  
गुलाब मज हांसत बसला  
हातीशीं नाहीं आला;  
नवल तरी कैसें होई  
दुःख निराशा नच देई !  
न कळे कांहीं,  
हुरहुर कां ही ?  
वेडें मनही  
कां विनवितसे देवासी ?—  
निराशाच दे गोड अशी !

---

## अल्लड प्रेमास

क्षणभर वेड्या प्रेमा थांब !
अधिर मनासह जासी कोठें ?
चुकशील संकटिं पडशील वाटे,
जग हें सारें बारे खोटें !
हृदय सोडुनी; गड्या म्हणोनी, जाइ न कोठें लांब !

क्षणीं पांढरा क्षणींच काळा,
रंग आवडे असा जगाला,
ठाव तयाचा कुणा न कळला !
खुळ्या तुळाची, अशा जगाची, कळेल का कृति सांग ?

जग सगळें हें देखाव्याचें !
गुलाम केवळ रे स्वार्थाचें
स्मशान कीं हें शुद्धत्वाचें !
शुद्ध भाबडें, सरळ रोकडें, अशांत करिशिल काय ?

प्रेमा येथें शपथ लागते !
प्रासावांचुनि कविता अडते
कार्यावांचुनि कार्यहि घडतें !
दैव विचारा, तया न थारा, तुझी कथा मग काय ?

तुझ्यासारखा तुला सोबती—
मिळेल का या अफाट जगतीं ?—
—संकुचितहि हें अफाट जरि अति—
आणी न मना, अशी कल्पना, अगदीं भोळा सांब !

कोणी तुजला मानिल खोटें,
तिरस्कारही दिसेल कोठें,

अपमानाचेंही भय मोठें,
बाग जगाची, ही न फुलांची, कांटे जागोजाग !
टाकिल कुणि तुज धिक्कारानें,
रडविल किंवा उपहासानें,
फसविल नकली कीं मालानें,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग !
म्हणुनि लाडक्या ! कुठें न जाईं,
या हृदयांतचि लपूनि राहीं,
योग्य मित्र नच सुख तरि नाहीं !
कुसंगतीहुनि, वेड्या ! मानीं, फार बरा एकांत !

---

## रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास

[ वसंततिलका ]

जेव्हां धरी निजनिभा रवि आवरोनी
तिग्मांधकार करि कृष्ण जगा भरोनी
जेव्हां अशेष जग निद्रित नीडभागीं
जेव्हां सजीव जगता चलताहि त्यागी १
जेव्हां नये श्रुतिपथावरि शब्द कांहीं
भावि स्थिती जग धरी जनुपूर्व वा ही
होई अशांत रव कर्कश तावक्रीन
जो त्रास दे, खग मना करि भीतिदीन २
आधींच भीषण निशा, तम त्यांत घोर
चोहींकडे वन भयंकर; भीति थोर
येतां अशांत तव तापद शब्द कानीं
घोर स्थितीसि जणुं पूर्णदशेस आणी ३
तो शांति भंग करि कष्टवि लोकचित्ता
होतां पुरी भयद ग्रंथिकरोगग्रस्ता

जैसा करी जनमनाप्रति भीतियुक्त
“श्रीराम” शब्द शववाहकसंघ-उक्त ४

प्रौढा रवासि तव ऐकुनि भीतचित्तें
ऊरःस्थलीं दृढ धरी निजबालकातें
मुग्धा समीप शयितस्वधवांगभागीं
वेष्टीत चंदनतरुप्रति जेविं नागी ५

चिंती धवा कुशल ती विरहार्त बाला
तोडी तशी उपवरा स्वविचारमाला
ऐसें खगा! तव रवा जन अज्ञ भीती
भीती तसें तुज अमंगल मानिताती ६

आहेत अन्य खग जे तुजहूनि थोर
कांहीं तुझ्याहुनि रवा करिती कठोर
तूंतेंच कां मग कथीं जन सर्व भीती?
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती ७

केलेंस पातक असें वद काय वा रे
किंवा गमे तव मना “जन मूर्ख सारे!”
छे! लोक मूर्ख न; पडे तुजलागीं भ्रांति
घूका! तुला जन सकारण निंदिताती ८

तूं घोर शब्द करिसी भलत्याच काळीं
लोकांसवें नससि, रीति तुझी निराळी
रात्रीस तूंच फिरसी खगजात्यमित्रा!
सूर्यप्रकाश दिपवीत तुझ्याच नेत्रां ९

यानेंच लोक उलुका! तुजलागिं भीती
शब्दा तुझ्या अशुभसूचक मानिताती
वा ठेव या सुनियमास सदैव चित्तीं
“लोकानुसारि नसतां जन निंदिताती” १०

---

# जीवितास

[ईश्वरकल्प सौंदर्याचा परिचय या लोकीं नेत्रप्रत्यक्षापुरताच आहे असें नेहमीं प्रत्ययास येतें. या प्रतीतीनें ज्यांना खेद होत नाहीं ते एका अर्थी धन्यच!]

—आणि जीविता, लाभ हाच का तुझ्या संगतीं राहुनिया?
असेंच जाणें असे सदा का कालौघावर वाहुनिया?

सौंदर्याच्या दर्शनमात्रें जागृत होत्या जीवांत
विकल चेतना नाचे नुसती स्वस्थानीं व्हाया शांत

जनसंमर्दीं अलभ्य शोभा पाहुनि, ठसवुनि मनिं घेणें
एकांतीं तच्चिंतन करणें, दुःखावेगीं विस्मरणें

दिव्य दर्शनें हृदयपटावर नवरंगांनीं रेखावीं
आणि आंतल्या अश्रूंनीं तीं सर्वेच धुवुनी काढावीं

अवश्य जीवश्वसनें निर्दय निश्वासांनीं योजावीं
हृदयजलानें भरतां नयनें गेली घटिका मोजावी

आद्यंतींचे क्षण सोडुनिया अशेष जीवनिं या देख
परिस्थितीचा रंग काढितां क्षणयुग्मचि उरतें एक

पहिला क्षण तो कीं ज्यावरतीं स्वप्रकाश आशा धाडी
दुज्या क्षणावरि तीव्र निराशा छाया प्रेतमया पाडी

आयुष्याच्या क्षणाक्षणाचा हिशेब केवळ हा आहे
परंपरेला त्यांच्या दिधलें नाम मनोहर जीवन हें

रंग बदलुनी खेळत राही अशा क्षणांची ही जोडी
स्थलकालांच्या भिन्नत्वानें नित्य नवीं दिसतीं कोडीं

क्षणाक्षणाला जनन मरण हें प्राणिमात्र भोगित राही
चौऱ्याशींचा फेरा याविण आणिक दुसरा तो नाहीं

फसव्या पाण्यावरी पोहुनी, दम कोंडुनि मरतां मरतां
"गोविंदाग्रज" म्हणे जीविता! लाभ तुझा नच यापरता

———

# " समसमां संयोग कीं जाहला ! "

—कृष्णशास्त्री चिपळुणकर.

[ अशीं फुलें नेहमीं सांपडत नाहींत म्हणूनच जगांतले ग्रामोफोन कवि-हृदयाच्या नालायकीचीं गाणीं गात असतात. ]

[ शार्दूलविक्रीडित ]

संध्याकाळ सदा उदास करितो माझ्या अभागी मना
त्यानें हर्षति जीवमात्र, परि तो मातेंच दे यातना
नित्याचा क्रम एक हा ठरविला कीं काळ जायाप्रती
कोठेंही तरि शून्यवृत्ति फिरुनी, येणें घरा मागुतीं १
येतां एक दिनीं असेंच, दिसली वेली कुठेंशी मला
होतीं कांहिं फुलें तिच्यावर-मना आनंद तें वाटला
घ्यावीं काढुनि दोन तीन म्हणुनी जों जीव माझा भुले
वारा वाहुनियां जरा-भरभरां सारीं उडालीं फुलें २
वेलीचीं नव्हतीं फुलें—तिजवरी होतीं कुणीं टाकिलीं
( प्रेमाचे शुकपाठ बोलत नटी, तें आठवे त्या स्थलीं )
कांहीं त्यांतुनि घेतलीं उचलुनी, चालावया लागलों
" यांचें काय करूं " विचार करितां हा मी परी भागलों ३
कोणी मित्र मला पुढें भटकतां वाटेमधें भेटला
प्रेमें ओढुनियां स्वकीय सदनीं तो शीघ्र नेई मला
माझें स्वागत तो करी बहुपरी खेदास न्याया लया
ग्रामोफोनहि लाविला; रिझवि तें गाणें मना माझिया ४
त्या गाण्यांतिल शब्दसंघ पडला होता मनासारखा
गाणाराहि गळा किती मधुर तो लोकींच या पारखा
अर्थानें तर वेड लागत मना; उत्कर्ष झाला रसा
नाहीं एकच तेवढें हृदय तें; हा खेळ दैवा ! कसा ५
ग्रामोफोनवरी तेव्हां संतोषें जीव हर्षतां
फुलें तीं टाकुनी होई " गोविंदाग्रज " चालता ६

## इच्छा, उपभोग व विषय

[ या तिघांचा अन्योन्यपोषक त्रिवेणीसंगम स्वर्गांत तरी असेल काय ? ]

अखंड गायन ऐकायातें पंजरांत धरिला पक्षी
उडती लकेर झरतां जीवा ! नादचित्र केवळ लक्षी १
तेजोदेवी चपला चमके गगनीं लोभवि मनोहरा
हृदय फाडुनी वृत्ति मारुनी जडदेहानें स्पर्श करा २
निर्झरमार्गे अजिलवन्ती झुळझुळ गाणें गात झुके
धरण बांधितां धावतसे जल परंतु गाणें होत मुकें ३
दृढालिंगनीं सौंदर्याच्या, दर्शनलाभ स्पष्ट नसे
चुंबनिं बघतां कपोल हा ! हा ! नेत्रचि मिटती मोहवशें ४
" असें-असावें " यांच्या सीमा अपूर्णता ही दावितसे
" गोविंदाग्रज " सनिश्वास मग नभाकडे क्षण पाहतसे ५

जळगांव, ता. २२।११।१६

---

## हुकमे हुकूम

[ साकी ]

करमत नव्हतें म्हणुनि एकदां असाच गेलों रानीं
वसंत का परि ऋतु दुसरा कधिं कुणीं पाहिला कवनीं !
समोर होता झाडावरतीं एक चिमुकला पक्षी
बोलुनि चालुनि कवि पडलों मी—सहजचि त्याला लक्षी
वसंत ऋतु तो; रम्य वनहि तें; पक्षि आणि कविराय
तुम्हीच सांगा रसिका आतां हवें आणखी काय ?
सत्वर कविच्या रसिकपणानें सांगितलें त्या गाया
नवल वाटतें सांगाया परि—कीं तें गेलें वांया
" वृक्षावरच्या माझ्या मित्रा, कांहीं गाणें गाच
गमतीखातर आणि जरासा इकडे तिकडे नाच

बंधु तुझा मी—माझ्यासाठीं गड्या लाग तूं गाया
हे बघ देतों कण धान्याचे कांहीं तुजला खाया.
स्तुति गाण्याची तुझ्या बहुपरी करिन चारचौघांत
चित्रहि आणिन तुझें कशाच्या तरी खास अंकांत.
गाण्याची या तुझ्या शिफारस करूं अशी भरपूर
कीं, शाळाखातेंही वेड्या करील तें मंजूर."
अशा प्रकारें फार विनविलें जीव तोडुनी साच
भिकारडें तें कांहीं केल्या परंतु ऐकेनाच.
गा म्हटल्या जो गात नसे त्या सृष्टीचा कवि म्हणती
मस्तक फिरलें हातपायही रागानें थरथरती.
"एक मारितों दगड असा कीं पडेल वांसुनि चोंच"
म्हणुनि वांकलों तसाच खालीं आवेशानें तोंच—
लगबग दिसले स्नेही माझे-संपादक त्या ह्याचे
म्हणूं लागले "भले! तुम्हांला कुठें कुठें पाह्याचें!
या अंकाचा चालू तुक्का (फर्मा) होत नाहिं भरपूर
कामाचा खोळंबा झाला, या कांहीं "मजकूर"
वसंत-अंकीं वसंतवर्णनपर कविता चालेल
परंतु झटदिशिं करा; नातरी काम उगिच लांबेल.
सरासरी या खरडुनि ओळी अठरा पासुनि वीस"
ऐकिलें न हें तों कवनाची झाली स्फूर्ति कवीस.
झाडावरचा पिसाट कवि तो तसाच टाकुनि रानीं
चला रसिकहो लांबी रुंदी नीट ठेवुनी ध्यानीं.
वसंतकाळीं त्या वर्णाया वनांतुनी माघारी
"गोविंदाग्रज" कवीश्वराची घरीं परतली स्वारी.

पुणें, १२।१०।१२.

---

## फुटकी तपेली

[ आत्मज्ञान मायेंतून गळूं लागलें, म्हणजे आत्मा अगतिक होतोच.]

नको तपेली फुटकी असली !

जीव बोलतो पाणी पाणी.
चिरकालाची तहान लागुनि;
अशी तपेली मजला देउनि। थट्टा करितां तेथें कसली !

प्रवास करणें फार दूरवर;

आद्याच्या पर्यंतापासुनि
अंताच्या आरंभामधुनी—
एक अनंतें माप घेउनी। कैक अनंतें जाणें भरभर !

विश्व कशाचें घेउनि बसलां ?

विश्व मला जें दिसतें त्यांतिल,
विश्वें तुमचीं अणुसम होतिल,
निजेक्षणीं तें तुमच्या जिरविल। काळांचा बाजारच सगळा !

प्रवास माझा असा भयंकर !

या विश्वाच्या मागुनि जाणें,
मागुनि सुटुनी पुढें धांवणें,
अथवा सर्वांठायीं पसरणें। आद्यंतांचें कापुनि अंतर !

कडक कायदा धांवायाचा !

पाउल एकादें जरि चुकणें,
पहिल्यापासुनि पुनः धांवणें !
आपुल्यांच वा भंवतीं फिरणें। मार्ग कुठुनि मग सरावयाचा ?

आधीं असते पुष्कळ सोबत,

कितीक 'मी, मी' मजला दिसती,
पुढें चालतां भरभर मरती;
मरुनी माझ्याठायीं जगती। माझीच मला उरते संगत !

माझें मीपण फारच मोठें

दुज्या रहाया जागा नाहीं,
एकलकोंडा म्हणुनी राही,
खोटें 'मी' ही अंगिंच पाहीं । राहिल सोबत मग ती कोठें ?

मज जाणाया मीच विचक्षण !

नसते परके आधिं जाणतों,
असल्या मलाच न परी बघतों;
मज ओळखतां इतर विसरतों । माझें सर्वच फार विलक्षण !

तऱ्हाच माझी विचित्र असली !

असला मी, तो प्रवास तसला.
कडक कायदा त्याचा असला,
तशा प्रवासीं असल्या मजला । अशी तपेली देतां कसली ?

अनंततेची तहान माझी,

मिळतां पाणी वाढे उलटी,
अधिकचि पाणी अधिकचि मोठी,
जलब्रह्म या परि तिजसाठीं । तरीच होइल मग ती राजी !

भांडीं असलीं कां मज देतां ?

भरतांना जीं होतिं रिकामीं,
भरुनि ठेविलीं तरि कुचकामी,
पडतिल कोणाच्या तीं कामीं ?। कधीं परत बोला हो घेतां !

वागविण्याचें उगाच ओझें !

करी प्रवासामाजी खोटी,
फुटकि तपेली तुमची खोटी,
मृगजळ नसतें दावी खोटी। कधीं तिच्यांतुन नच गळलें जें !

मायेची ही खरी तपेली,

मृगजळ प्याया आंत उतरतों,
अफाट तरि मी त्यांतच बुडतों,
नसल्यामाजीं असतां विरतों । नको मला ही असली मेली !

ब्रह्मांडाची करा तपेली !

माझी ओळख पाणि तिच्यांतिल,
कैक अनंतें तयांत जिरतिल,
माझ्यावांचुनि सारे विरतिल। शिरे तपेली ही अशा जलीं !

ब्रह्मांडाची खरी तपेली;

करा रिकामी तरिही भरली,
भरुनी भरणें भरवुनि उरली,
जिरतिल विश्वें कितीक असलीं। कांठवरी जरि आधीं भरली

माझी ओळख विचित्र पाणी;

जुनि ओळख मग नवीस आणी
पाण्या वी अव्याहत पाणी,
पाण्यांतहि मग खेळे पाणी। हाय ! कसें हें कोणि न जाणी !

ब्रह्मांडाची करा तपेली;

तृषा नाहिंशी तिनें करीन,
तपेलीसही जलिं भरवीन,
प्रवासासही जलिं जिरवीन। नको मला ही असली मेली !

प्रकार हा घ्या मनिं एकंदर;

सर्वस्वाची करा तपेली,
माझ्या पाण्यानें भरलेली,
पाहुनि तिजला तीन्ही काळीं। खुबी ओळखा क्या है अंदर

## विहिणींचा कलकलाट

[ ओवी ]

वीरांच्या गर्जना थोर। घुबडांचा आवाज घोर।
घायाळांचें रडणें अघोर। हेंही त्यांत घातलें ॥ १ ॥
रणवाद्यांचा दणदणाट। हत्यारांचा खणखणाट।
विजयघंटांचा घणघणाट। एका जागीं मिळाविले ॥ २ ॥

दारुकामाचा फडफडाट। घोड्यांचा खडखडाट।
तोफांचा धडधडाट। यांची त्यांत भर केली ॥ ३ ॥
प्रळयमेघांचा गडगडाट। आणि विजांचा कडकडाट।
भूमिभंगाचा तडतडाट। भरतीस हे घातले ॥ ४ ॥
सागराचें खवळणें। दारू पिणाराचें बरळणें।
आणि मुलांचें ओरडणें। शाळा सुटतां वेळचें ॥ ५ ॥
नाना वाजंत्रीं हीं सारीं। एक केलीं यत्नें तरी।
त्या कलकलाटाची नये सरी। लग्नांत विहिणी करितात जो ॥ ६ ॥

## निर्वाणीची विनवणी

[ चाल—धाडुनि दिधलें० ]

पाहसि आतां अंत असा कां? पीडिसि कां या दीना
सुंदरि, पदरीं मदीय हृदया घेसि न कां पदलीना
क्षणैक हंससी क्षणभर रुससी निष्ठुर चंचलताही
संदिग्धा ही वृत्ति व्याकुल करित मनाप्रति पाहीं
लाजुनि अजुनी स्वजना हा जन जवळी कां नच केला
किंवा हृदया द्वेषाचें दूषवि मजविषयींचा पहिला
सुंदर वदनीं तव निर्दयता हृदय विदारित माझें
पडुंदे श्रवणीं ती शुभवाणी मौन न हें तुज साजे
प्रत्युत्तर दे प्रश्ना कांहीं; अंत वृथा न पहावा
विनोदवचनीं थांबवि नच त्या, प्रश्नें परतवि नच वा
संशयविष हें जाळित जीवा अधरसुधा दे रमणि
करी विनवणी निर्वाणीची गोविंदाग्रजवाणी

मुंबई, २।३।१६.

## एक समस्या

असे एकदां दोघे चौघे कामाला प्रातःकाळीं
घरांतुनी बाहेर निघालों; घाई जाण्याची सगळी!

तोंच धडकली समोर येउनि वृद्धा विधवा दारांत
अपशकून हा पाहुनि बसला त्रासिक चरका चित्तांत
"वेळ साधिते कशी बरोबर पहा अशी पीडा नसती
या विद्रुप अवदसा सारख्या अशा चहुंकडे वणवणती!"

* * *

चार पावलें पुढें सरकलों विसरुनि सारें झोकांत
एक अडाणी कुणबट आलें कागद घेउनि हातांत.
अडवुनि बोले, "वाचुनि दावा दादा कागद हा इतका"
त्रासुनि वदलों, "बाबा, आम्हां दुसरीं कामें नाहींत का?
गिचमिड ओळी-भिकार अक्षर लावित बसणें हें कोणीं
दुसऱ्या कोणाच्या पाठीवर लाद नेउनी ही गोणी
येईना वाचतां तुम्हांला तरि पत्रांचा व्यवहार
कां करितां मग उगाच हा अव्यापारेषु व्यापार."
दिलें चिटोरें त्याचें त्याच्या अंगावरतीं टाकून
चालू झालों गप्पा मारित कांहीं कांहीं हांसून!

* * *

जातां किंचित् पुढें आढळे नांव न घेणें कवनांत
डोकीवरतीं पाटी घेउनि अगदीं शेजारुनि जात.
त्या घाणीनें मस्तक फिरलें रागहि आला भरपूर
बोलत कांहीं आम्ही झालों त्यापासुनि आधीं दूर.
"इतका झाला दिवस तरी हे खुशाल अजुनी फिरतात
घाण घेउनी चहूंकडे ही हवे तसे वावरतात.
उर्मट तर हे इतके असती बेमुर्वत देतिल धक्का
बंदोबस्तच या लोकांचा नाहीं केला कुणीं पक्का."

* * *

जातां जातां पुढें यापरी एक दिसे पिंपळपार
दत्ताचें देवालय खालीं छोटेंसें शोभे फार.

सुंदर तरुणी हिंडत होती त्या देवाच्या भंवताली
निरखुनि बघतां–हरहर! होती विधवा ती बाला असली.
उचंबळूनी ये करुणारस–नेत्रहि अश्रूंनीं भिजले
निर्दयता दैवाची बघुनी हृदय विचारें तें थिजलें.
न्यायदेवता जागृत झाली त्या सौंदर्या बघतांच
विषय दयेचा लावित नाहीं कोणाच्या जीवा आंच?
"धिग् धर्माला–धिग् रूढीला, तेतिस कोटी देवांना–"
किती बोललों–नको सांगणें! पाठ असे तें सर्वांना.
काम कशाचें! धाम कशाचें! एक प्रश्न मग हृदयांत!
"सुधारणा होणार तरि कधीं या दुर्दैवी देशांत?"

[ अनुष्टुभ् ]

प्रश्नाच्या उत्तरासाठीं रसिकां जोडुनी करां
"गोविंदाग्रज" प्रार्थी कीं समस्या पूर्ण ही करा.

पुणें, ११।१२।१७.

---

## घुंगुरवाळा

[ जगाच्या संगीतांत शब्दमय काव्यापेक्षां निःशब्द–किंबहुना, नाद–शून्यसुद्धां काव्यांचाच भरणा विशेष आहे. अळड मातेला, सातआठ महिन्यांच्या चिमुकल्यानें उत्कट आनंदानें वाळा वाजविला म्हणजे एकाग्रतेनें ऐकत रहावेंसें वाटतें, तें याच कारणामुळें.]

वाजिवरे वाळा! वेल्हाळा! रुमझुम् घुंगुरवाळा! ॥ ध्रु० ॥
अस्फुट विश्वाचें। प्रेमाचें। गाणें आनंदाचें—
वदलों जें नादीं। संवादीं। तुझिया जन्मा आधीं–
पहिल्या प्रीतीचे। गमतीचे। कांहींसे भीतीचे,
वाळा! ते बोल। तूं बोल। आज मनीं जे खोल.
रात्रीच्या काळीं। जों बसली। ब्रह्मानंदीं टाळी,
मनिं तेंव्हां बाणें। जें गाणें। अस्फुट मंजुळवाणें,
धीर न परि हृदया। उघडाया। उघडपणें तें गाया!

वदलों मग पाहीं। दोघेंही। लाजुनि कांहीं कांहीं!
हृदयीं खळबळलें। दरवळलें। विना ऐकिल्या कळलें!
गाणें मंजुळ तें। झुळझुळतें। तुझिया वाळ्याभंवतें!
वाळा हालूं दे। बोलूं दे। आनंदें डोलूं दे.
एकच हा चाळा। वेल्हाळा। घेरे तान्ह्या बाळा!
एकच पायाचा। वाळ्याचा। नाच गोड बाळाचा—
ऐकुनि आनंदें। त्या छंदें। घर सगळें नाचूं दे;
'गोविंदाग्रज' ही। कवनांहीं। त्या छंदावर गाई!

---

## सगुणस्वरूप

[ पंढरीस पांडुरंगाची पायभेटी झाली त्या वेळीं या चार पाकळ्या अर्पण केल्या होत्या.]

[ चाल—नाहिं सुभद्रा या वार्तेतें...]

धन्य पंढरी! धन्य भीवरा! धन्य चंद्रभागा
भक्तासाठीं वैकुंठींचा नाथ जिथें जागा ॥ ध्रु० ॥
स्वानंदाचा गाभा, शोभा ब्रह्ममंडळाची
वैरागरिंचें रत्न मनोहर, आशा पुण्याची
कैवल्याचें निधान केवळ, माता संतांची
तो प्रभु झाला सगुण सांवळा गोकुळिंच्या रंगा ॥ धन्य० १
भक्तराज तो पुंडलीक या जगीं एक जाणा
हांक जयाची ऐकुनि धांवे लक्ष्मीचा राणा
करावयास्तव जगत्त्रयाच्या अखंड कल्याणा
कटिं कर, समपद, विटेवरी करि उभा पांडुरंगा ॥ धन्य० २
स्वच्छंदें सच्चिदानंदपद रमे वाळवंटीं
"जय जय विठ्ठल" नाद एक हा संतांच्या कंठीं
पहावया स्वानंद सोहळा सुर करिती दाटी ॥
'पुंडलीकवरदा हरि विठ्ठल' रंगवि दिग्भागा ॥ धन्य०

महाद्वार पंढरी, १९०८

# दैवाची निर्दयता

श्रीहरि मथुरानगरीं गेले, गोकुळ मागें तळमळतें
प्राणिमात्र नच केवळ परि तें यमुनेचें जळही जळतें !
कळे सकळ हें श्रीगोपाळा कळवळुनी मनिं अणि दया
धाडुनि दिधला व्रजांत उद्धव प्रियजन सांत्वन करावया
सत्वर हरिचा निरोप घेउनि उद्धव भेटे सकळांतें
वृत्तश्रवणा क्षणांत जमलें गोकुळ सारें त्या भंवतें.
हें नंदाला, यशोदेस हें, कोणाला कांहीं कांहीं
निरोप सांगे सांत्वनपर तो; भुनें कुणी उरलें नाहीं.
या गोपीला, त्या गोपीला, गोड शब्द दे वांटुनिया
राधेला तर बहाल केली हरिनें जीवाची दुनिया.
प्रेमकथांच्या संस्मरणानें जल सर्वांच्या ये नयनां.
व्याकुल विव्हळ झाली राधा, सांवरितां हो पुरे जनां.
सुखदु:खांच्या मिश्र सागरीं निमग्न गोकुळ सर्व असे
परि दुर्दैवी एक जीव तो त्या काळीं त्या स्थळीं नसे.
अष्टावक्रा, काळी कुबडी, कुब्जा तेथें नच दिसली
दीन बिचारी एकटीच ती कुठें तरी जाउनि बसली.
स्मरण कशाचें तिचें कुणाला जी बघवेना डोळ्यांनीं
गजबजतां जग आनंदानें दुर्दैवी पळती रानीं.
तोंड झांकुनी ओंठ दाबुनी, रडे आंतल्याआंत मनीं
पुसुनी टाकी झणि पदरानें अश्रू आले जरि नयनीं.
" प्रेमळ देवा, जिवलग देवा, माझ्या जीवाच्या देवा,
कसे विसरलां या दासीला, देवा हो, एकच देवा !
कशी विचारूं उद्धवजींना क्षेम तुझें या लोकांत
म्हणेल कोणी काय मला त्या नकळे भर आनंदांत.
सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठीं
परी कुठें मी आणि कुठें तूं लोकसुंदरा जगजेठी !

रडायासही मुक्तकंठ, हा देवारे जीवाचि लाजे
श्रीहरिसाठीं कुब्जा रडते हेंच हंसें होइल माझें "

[ अनुष्टुभ् ]

घडेना कार्य या लोकीं भाग्यावांचुनि कोणतें
हंसायातेंच न परी रडायांतेंहि लागतें!
असावें लागतें भाग्य हंसायातें न काय तें ?
रडायातेंहि जीवातें या लोकीं भाग्य लागतें!

मुंबई, २।१।१८.

---

## त्याच तारकेस याचना

थांब जरा, तारके! जरा तरि थांब, सखे सुन्दरि!
कुणिकडे नेशी मज यापरी ?
तव-किरणांच्या सुंदर कोमल आधारावरि सखे!
केलें माझें मज पारखें!
स्वर्गसुखाची आशा लावुनि ओढिसि मजला गडे!
थांबचि–सांग परी कुणिकडे ?
अति दुःखांच्या सतत अनुभवें हळवा जिव जाहला,
सुखाची संवय नाहिं त्याजला!
परि आशा लावुनि नेशी मज वरिवरी;
देशील टाकुनी स्वर्गांतुनि मज जरी,
तो अधःपातही या उन्नतिच्या परी;
उच्चतेस या योग्य न मी तरि स्वप्रेमें सांवरीं,
याचना 'गोविंदाग्रज' करी.

पुणें, २८।१२।१५.

---

# कळ्यांचीं फुलें कशीं झालीं ?

[ ला बाइला० ही चाल—थोडा फेरफार करून ]

बाळ कुणी । संध्याकाळीं रमे गुणी ॥
खेळतसे । बाळ आंगणीं हवें तसें ॥
बागेंत । मौजेनें झोंके घेत ॥
तों दिसली । सुंदरशी त्याला वेली ॥
देंठ कोंवळे । हिरवे पिवळे । नाजुक सगळे ॥
ती वेली । हिरवा शालू पांघरली ॥ १ ॥

परी तया । हवा सोबती खेळाया ।
खेळगडी । मूल फूल सुंदर जोडी ॥
पाहतसे । परि वेलीला मूल नसे ॥
तिच्या कळ्या । होत्या मिटलेल्या सगळ्या ॥
जणुं दमल्या । फार खेळुनी; मग निजल्या ॥
हवेंत डुलणें । हेंच खेळणें । खेळुनि निजणें ॥
ही त्याची । गादी हिरव्या पानांची ॥

बाळ गुणी । वाइट वाटे फार मनीं ॥
दिवसभरी । खेळुनि आला परत घरीं ॥
झोंपेंत । कितिदां गेला बागेंत ॥
धरि कुठें । पहांट होतां बाळ उठे ॥
बागेंत । धांव तसाची तो घेत ॥
मौज तों किती । कळ्या न दिसती । फुलेंच हसती ॥
बाळ डुले । चहुंकडे पाहून फुलें ॥ ३ ॥

आईला । शोधाया धांवत गेला ॥
मग बोले । “ आई बघ हीं गोड फुलें ॥
काल कळ्या । आज फुलें झाल्या सगळ्या ॥
कशा उमलल्या । कुणीं हंसविल्या । हांसत बसल्या ॥
कशा कळ्या । आई सांग मला सगळ्या ” ॥ ४ ॥

...सकी ग्रंथ संग्रहालय
नौपाडा शाखा
क्र. 22105
विभाग ...
का. क्र. ...
नों. दि. ...

मग आई। बाळाला उत्तर देई ॥
"खेळासी। जमति चांदण्या आकाशीं ॥
त्या हंसती। चहूंकडे पाहत बसती ॥
तों दिसल्या। कळ्या बिचाऱ्या हिरमुसल्या ॥
कळवळल्या। फार चांदण्या मग रडल्या ॥
आंसूं पडले। ते दंव झाले। धांवत आले ॥
भुईवरी। पडले साऱ्या कळ्यांवरी ॥ ५ ॥
तों साचा। रंग पांढरा तारांचा ॥
कळ्यांवरी। चहूंकडे जाउनि पसरी ॥
मग हंसल्या। कळ्या फुलें हंसतां झाल्या"
सर्व असें। आई बाळा सांगतसे ॥
ऐकुनि हें। बाळ तिच्या वदना पाहे ॥
कां न कळे। मिठी मारिली तिला बळें ॥
त्या काळीं। आई आनंदें हंसली ॥
हंसतां रडली। असवें पडलीं। त्याच्या गालीं ॥
तों साची ॥ कळी उमलली बाळाची ॥ ६ ॥

---

## पांच देवींचा पाळणा

[हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतें तरी एक जागृत दैवत असतें. इंग्रजी वाचकांना माहीत आहेच कीं, इंग्लंडभोंवतीं सेंट जॉर्ज, स्कॉटलंडभोंवतीं सेंट अँड्रयूज आणि आयर्लंडभोंवतीं सेंट पॅट्रिक जागत्या डोळ्यांनीं नेहमीं पहारा करीत असतात. मराठशाहीला अशा पांच देवी संरक्षक आ—होत्या ! तुळजापूरची तुळजाई, सातारची मंगळाई, प्रतापगडची भवानी आई, पुण्याची पर्वती आणि पारची वरदायी, हीं तीं पांच पवित्र नांवें होत ! या देवींनीं शिवनेरीच्या बाळाला निजविण्यासाठीं हा पाळणा श्रीजिजाऊसाहेबांच्या मुखानें म्हटलेला आहे. इतिहास कल्पनेनें आधीं पहाण्याची कल्पना रामाकाळची पुराणी आहे हें सर्वांस ठाऊक आहेच.]

[ चाल—अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला० ]

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ॥ नीज रे नीज शिवराया ॥ ध्रु० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ॥ तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला ॥ तिळ उसंत नाहिं जिवाला ॥
निजवायाचा हरला सर्व उपाय ॥ जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।
कां कष्टविशी तुझी सांवळी काया ॥ नीज रे नीज शिवराया ॥ १
ही शांत निजे बारा मावळ थेट ॥ शिवनेरी जुन्नरपेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घांटाखालीं ॥ कोंकणच्या चवदा ताली ॥
ये भिववाया बागुल तो बघ बाळा ॥ किति बाई काळा काळा ! ॥
इकडे हे सिद्दि–जमान ।
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आलेरे तुजला बाळ धराया ॥ नीजरे नीज शिवराया ! ॥ २

( अपूर्ण. )

---

## एक शंका

नाहीं राहत वास–लेश कुसुमीं कोमेजतां तें त्वरें,
होतें पात्रहि कोरडेंच घडिचा तो पूर जों ओसरे;
कां प्रेमस्मृति राहते हृदय हें दुःखें दुभंगे तरी ?
आशा वावरते उगाच मग कां ही माझिया अंतरीं ?

---

## "न" साठीं आर्या

नत जन हनन मनिं न कां मानधना जनन हानिच्या नयनां ।
वमनाहुनि अनुनय नच; अनुमानी ज्ञानखनिहि मुनिनयनां ।

# चेंडू

खेळत होता बाळ आमुचा चेंडू घेवोनी
पाहत होतों आम्ही दोघें आनंदें वरुनी.
अडगळ होती भंवतीं परि तो लक्ष्य न दे तिकडे
हांसे, धांवे, खेळे, उडवी चेंडू चोंहिंकडे.
तन्मय होउनि खेळत होता यापरि स्वच्छंदें
पाहत होतों आम्ही त्यातें तशाच आनंदें.
पाहि तिजकडे कां न कळे तों हांसूं येत मला
परि तें कळुनी तिला तिच्याही खळी पडे गाला!
इतुक्यामध्यें चेंडु उडाला अडगळींत पडला
बघे बाळ चहुंकडे जरी तरि मिळे न तो त्याला.
निराश झाला, थकुनी बसला, बाळ जरा रडला
रडत रडतची फिरुनि लाडका लागे शोधाला.
लक्ष्य देउनी फार शोधितां अवचित सांपडला
हंसत लाडका खेळामाजीं फिरुनि दंग झाला.
निश्वासातें सोडित मी हा प्रकार पाहोनी
पाहे ती मजकडे वदे मी तन्मन जाणोनी.
" खेळत आहों असेच आपण अतीव आनंदें
बागडतो हा चेंडु आपुला असाच स्वच्छंदें.
परि संसारीं बहु दुःखांची अडगळही साच
एके दिवशीं बाळहि जाइल चेंडुसारखाच!
रडत बसूं मग असेच आपण प्रिय बाळासाठीं
फिरुनि हंसूं का असेंच-परि छेः आशा ती खोटी "
तोंच वदे ती " पुरे गडे हें बोलुं नये असलें "
बघे मजकडे रागानें परि हंसतहि प्रेमबळें.
पाहत होतों असेंच आम्ही कांहीं दिन जातां
त्या दिवसाची स्मृति होउनि ती भग्न करी चित्ता.

तशीच होती अडगळ सारी-चेंडुहि तो होता
किती यमाची निष्ठुरता परि बाळ तेथ नव्हता!
बघुनि वदे ती—"चेंडु हाच तो, बाळ परी नाहीं"
परस्परातें मिठी घालुनी रडलों दोघेंही!

---

## संगीत "मित्र-प्रीति" नाटकांतील तीन पदें‡

[ १ ] शिवप्रार्थना.

श्रीशंकर शिवराया, तव पायीं नत व्हाया
सुमती दे या ॥ ध्रु० ॥
संसारभार अनिवार फार अति मार देत तूं तार
यातुनी सदया! ॥ श्री० ॥ १ ॥
आनंदकंद तव छंद धरित मतिमंद अंध स्वानंद—
मार्ग समजाया ॥ श्री० ॥ २ ॥
रतिसंग रंग निःसंग दंग पदभृंग भंग धवलांग
दुष्ट या विषया ॥ श्री० ॥ ३ ॥
पदसक्त त्यक्त अव्यक्त-भक्त अनुरक्त
मुक्त करि या ॥ श्री० ॥ ४ ॥
सुरमान्य सर्व जगदान्य जन्य प्राधान्य धन्य मज अन्य
कोण गुणवलया ॥ श्री० ॥ ५ ॥
निष्काम "राम" तव नाम गात सुखधाम ॥
तोडि हत माया ॥ श्री० ॥ ६ ॥

---

१९०२

‡ हीं पदें एका गृहस्थांनीं तोंडीं म्हणून दाखविलीं; तीं तशींच येथें उतरून घेतलीं आहेत. "मित्रप्रीति" नाटक हल्लीं उपलब्ध नाहीं.

[ २ ] दिंडी.

विनय ऐसें हें रूप अप्सरेचें ।
रुचिर कीर्ती ही, वचहि योषितेचें ॥
प्राप्त केशीं होतील हीं नराला ? ।
खचित कोणी या वेषधारि बाला ! ॥ १ ॥

१९०२

---

[ ३ ] पद.

[ चाल—महाराज आज० ]

अपवाद बहू घोर कठिण येत मजवरी ।
निजदेशत्याग घडे मजसि त्यावरी ॥ ध्रु० ॥
प्राणहनन करण्यातें नीच पातले ।
ऐन समयिं सहाय्य मिळे प्राण वांचले ।
नलिनीसह राज्य पुढें प्राप्त जाहलें ।
ही दैवगती परम गहन असत यापरी । १ ॥

१९०२

---

## भीमकबाळा

[ माझ्या " वेड्यांच्या बाजारांत " एका उपवर मुलीच्या तोंडीं हें साधें गाणें तिचीच स्थिति वर्णन करण्यासाठीं घातलें आहे. गाणें त्या मुलीनेंच केलें आहे अशी कल्पना आहे. माझी स्वतःची एवढीच कविता मला आवडते.]

[ चाल—यादवराया भाई यांहो० ]

भीमकबाळा ती वेल्हाळा टाकुनि गोपाळा
निश्चय केला बंधुवरानें द्यावी शिशुपाळा
विवाहकाळीं खळ तो आला तंव राजसबाळा
शोकभरानें विव्हळ झाली, दोष देइ भाळा
" अजुनि तरी या दासीसाठीं या हो गोपाळा
काळवेळ ही जवळी आली, संकट हें टाळा
ऐन समयिं कां निष्ठुर झालां ? काय असें केलें ?
दीनांविरिचें प्रेम सदाचें आज कुठें लपलें ?

कधिं पाहिनसें झालें मजला सांवळि ती काया
कधिं वाहिन ही काया माझी देवा तव पायां
कधीं सांठविन रूप मनोहर या नयनीं देवा
मिळेल केव्हां अभागिणीला प्रेमाचा ठेवा
नको करूं छळ याहुनि माझा अजुनी घननीळा
वाट बघूं किति घेउनि हातीं अश्रूंची माळा ?
किती आळवूं परोपरीनें ? कंठ किं हो सुकला
तरी यावया अजुनी माझा माधव कां चुकला ?
सर्वसाक्षि भगवंता ! आतां अंत नको पाहूं
कीं विषपानें प्राण तरी हा पदकमला वाहूं
मीच अभागी; म्हणुनी आपण अजुनी नच आलां
ब्रह्म सगुण जें दुर्लभ सकळां; मिळे कसें मजला ?
रडतां यापरि अश्रुजलानें पदर भिजुनि बाई
ऊर भरुनि ये–शब्द न चाले–कवन विरुनि जाई !

---

## स्मृतिगीत

[ माझ्या " प्रेमसंन्यास " नाटकांतील नायिकेच्या तोंडीं हें गाणें ठेविलें आहे. उत्तररामचरितांतील "तेहि नो दिवसा गताः" एतदन्त सुप्रसिद्ध श्लोकाची लीलेच्या–नायिकेच्या– कोमल हृदयावर पडलेली ही विततच्छाया आहे अशी कल्पना करून तिनेंच हें गाणें जोडलें आहे असें दाखविलें आहे. एरवीं भाषांतर करण्याची माझी इच्छा नव्हती ]

[ चाल—चंद्रकांत राजाची० ]

आठवतो का सांग सखे ! तो काळ विवाहाचा
बाळपणाचा, मुग्धपणाचा, निर्मळ भावाचा !
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेंच जीव
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव !
पहात होते तात तदा त्या लीला बालांच्या,
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या.

जपति परोपरि प्रसन्नहृदया पुण्यमया माता
गेले ते दिन, सीते, यापरि हा! बघतां बघतां!
बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकूं धुवुनी!
तूं सीता ती; राम तोच मी; त्याच आज माता
परि जे गेले दिन ते आतां येतिल का होता?
कशास आशा नसती आतां–झालें तें गेलें!
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनीं भिजलें!

---

## गुलाबास

[ दिंडी. ]

फुलें असतीं रमणीय जरी सारीं
तुझा गुणगण परि त्यांस दूर सारी
सकल महिमा तव वर्णुं तरि कसा बा
मूढ जरि मी, मज करिसि कवि गुलाबा १
वास घेतां तव मना सौख्य होई
तुझा रंगहि नयनांस तोष देई
तुझ्या वासानें जो न लुब्ध मोहें
असा अरसिक जगतांत कोण आहे? २
वास घेतां मच्चित्त भुलुनि जाई
रंग बघुनी नयनांस सौख्य होई
तरुण रमणी, तूं काव्य तेविं बाळ
सकल जगताला मूढतम कराल ३
सदा वाटे सहवास तव घडावा
तुझ्या स्नेहांतचि जन्म सर्व जावा
परी माझें इतुकें न थोर दैव
तुला आयुष्य न मुळीं देइ देव ४

दूर जायासाठींच काय वास
नाश व्हायासाठींच का विकास
होत दिवशीं ज्या पूर्ण तुज विकास
त्याच दिवशीं व्हावाच काय नाश ५
दुष्ट मानव जे नीच अनुपकारी
संग ज्यांचा दे त्रास मना भारी
स्नेहलेशहि नच ज्यांत गुणहि नाहीं
वर्षशत त्यां विधि वांचवीत पाहीं ६
सद्गुणांनीं तूं पूर्ण भरुनि जासी
दोष इतरांचे तूं न कधीं घेसी
वासगुण निज अन्यांस देसि देख
अशा तुजसिच आयुष्य दिवस एक ७
सज्जनातें सर्वदा दुःख होई
सदा दुष्टातें सौख्य देव देई
काय उफराटा न्याय हा जगाचा
गमे कंटाळा विधिस चांगल्याचा ८
तरुण रमणीचे ललितललित गाल
तेहि कुसुमा तुजसारखेच लाल
तुझ्या ऐसा जरि वास त्यांस नाहीं
तरी दोघे तुम्हि सारखेच पाहीं ९
एक त्यांचा गुण मात्र तुजसि नाहीं
तुला कथितों परि राग नं धरि कांहीं
कधीं त्यांच्या घेतांच चुंबनातें
करिति रोमोद्भव तनुवरी गड्या ते १०

---

## पांखरास—

पंख उभारुनि ज़रा ॥ भरारा ॥ जा जा उडुनी पांखरा
निकट तरूच्यां शाखेवरतीं नको बसूं खगवरा ॥ पंख० ॥

गानमिषानें उडवुं नको रे रम्य नादनिर्झरा
सहवासें तव नव शोभा या खास येत तरुवरा
सुरासुराची लकेर चढतां जलसा येतो भरा
एक एक हा सूर हालवी हृदयाला थरथरां
हिरवीं पानें; निळ्या नभाचा वर डोल्हारा खरा
रंगवि संध्याः तरल ढगें हीं; नानारंगीं खरा
केला देवें या घुमटाचा सोनेरी पिंजरा
विश्वाचें हें पवनहृदय ते चिंरित जाति चरचरां
खिन्न मनीं मम गाणें हें तव वर्षि हर्षनिर्भरा
वाटे हृदयीं जिरवावा हा आनंदाचा झरा
तन्मय होउनि विरुनि मिळावें चिन्मय मंगलतरा
चढ्या लकेरीसरशीं जावें देवाजीच्या घरा
सोबत घ्यावी तव पंखांची उडती पळती त्वरा
क्षण-सहवासें जीव कोंडला होत असा बावरा
परंतु सारा निर्धनमनिंचा स्वप्नभास हा खरा
विषण्ण मानस; उदास जीवन; पीत निराशागरा
हृदय तडफडे दुःखाग्नीनें मुकलें सुखसागरा
चिरंमृताला गायन हें तव उगाच हलवी जरा
चिरसहवासासाठीं परि मी पसरितांच मम करा
उडुनी जाशिल भुरदिशिं गगनीं खालीं टाकुनि धरा
विश्वगामि तूं चंचल लहरी पवनावर भोंवरा
क्षणांत गिरक्या घेतां घेतां जाशिल रे गरगरा
दूरदूर तें पळतें गाणें करिल मनाचा चुरा
मिळतां लघुसुख अधिक सुखाचा जीव सदा हावरा
तीव्र निराशा होतां होइल फार फिरे घावरा
ऐकुं न येतां सूर भासमय चिरितिल मग अंतरा
क्षणही माझ्यासाठिं न बसशिल तूं उडत्या पांखरा
इकडे तिकडे फिरशिल टाकुनि येथें या पामरा

जड निर्जिव मी शोधुं कुठें तुज धरुनि तुझा धोसरा
फुंकर एकचि सृष्टीचा तुज दूरवील खगवरा
क्षणपरिचय हा अशा स्थितीहुनि फारच बरवा खरा
अपूर्व ऐकुनि हर्ष जाहला तोच लाभ मज बरा
सहवासानें प्रेम जडायापूर्विंच पळ करि त्वरा
हेंच मागणें हात जोडुनी आनंदी पांखरा ॥ पंख०॥

---

## एकच मागणें

[ शार्दूलविक्रीडित ]

आहे जो विधिलेख भालिं लिहिला कोणास तो नाकळे
आहे जो सुखदुःखभोग नशिबीं, कोणास तो ना टळे
आहे जीवित हा हिशेब सगळा—हा बोध चित्तीं ठसे
देणें हें गतकालिंचें सकळही सव्याज देणें असे १
आशा मावळल्या; समूळ तुटले हृद्‌बंध नानापरी
इच्छा केवळ दुःखदा, अनुभवें हें बाणलें अंतरीं
आतां एकच मागणें, तव पदीं देवा असे एवढें
संसारीं मिळतां न तें, मन सदा शोकाग्नितापें कढे ! २
आतां दुःख नको, नकोच सुखही, होणार होवो सुखें
इच्छा वावरती मनांत, तरिही केलीं मुकीं तन्मुखें
" जें कांहीं घडतें सदैव तुझिया इच्छाबळें तें घडे "
ऐसें जाणुनि सोसण्यास मज तें सद्धैर्य दे तेवढें ३

---

## खरें औषध

[ सुभाषित ]

जे जे रोग मनास होति; हृदया संताप जो जाळतो
जे जे घाव जिवास लागुनि जगा तो नित्य कंटाळतो
त्या त्या विस्मृति हेंच औषध खरें आहे गमे एक तें
जें लोकीं नसतें तरी मग कुणी जीवंत ना राहतें १

पुणें, २५।११।१५.

---

# कवितेसाठीं धडपड

बा वाग्विलासा,

कांहिं लिहावें तुझ्यासाठिं हा विचार मनिं धरुनी
लेखनसाधन घेउनि रात्रीं पडलों निज शयनीं.
वाम करावर मस्तक ठेवुनि, लेखनि अन्य करीं
विषय कोणता घ्यावा याचा विचार फार करीं.
काठी, जोडा, छत्री, टोपी, ताट, तवा, पितळी–
कुत्रें, मांजर दत्त म्हणोनी येतिं पुढें सगळीं.
पसंत न पडे परी एकही, सर्वां घालविलें
श्रेष्ठ प्रतीच्या विषयास्तव मग मस्तक खाजविलें.
मूल, फूल, फळ, संध्या, रजनी, चंद्र, सूर्य, तरुणी
समोर ठाके फौज अशी ही; रुचे न परि कोणी.
"चर्वितचर्वण होइल किंवा जुनी कल्पना ही
येउनि गेली कधींच ही तर हींत मजा नाहीं.
संपादक ही टाकुनि देइल; ही न कुणास रुचे"
अशा प्रकारें त्रासुनि गेलों; मुळीं मना न सुचे.
विषय शोधितां यापरि कवना नव आले नाकीं
गुंग होउनी नादीं मग मी उभय नेत्र झांकीं.
विचार करितां फार यापरी तन्मय होवोनी
विचारब्रह्मीं लीन जाहलों नेत्रद्वय मिटुनी.
जागृत होउनि, नेत्र उघडुनी पाहीं मी नादी
तों कळलें कीं रात्र सरोनी उजाडलें अगदीं.
लेखनसाधन पाहुनि शयनीं नीट उठुनि बसलों
तोंच होउनी स्मृति रात्रीची स्वतःशींच हंसलों.
कशाबशा मग लिहिल्या सत्वर ओळी या चार
धाडित सांप्रत तुजसाठीं या; या तरि स्वीकार.

---

# प्रेमाखातर

[ प्रेमनिराशेमुळें हेतुशून्य व हताश झालेल्या मनुष्याला पुन्हा प्रेमाचा आधार सांपडला म्हणजे नवा जीव लाभतो. असा एक प्रणयी पुरुष पावसाळ्यांत आपल्या प्रेमळसंजीवनीला भेटावयास निघाला असतां त्याच्या मित्रानें त्याला न जाण्याचा उपदेश केला आहे व त्या उपदेशाला त्या प्रणयीपुरुषाचें हें उत्तर आहे, अशी या गाण्याची कल्पना आहे.]

प्रणयदर्शना जातां, मित्रा न करी उपहासा,
नको थांबवूं, मजला मानुनि फोल हृदयहासा
कसले डोंगर, नद्या कशाच्या, हीं विघ्नें कसलीं ?
प्रेमपथावर सारखींच हीं जरि असलीं नसलीं
हृदयदेवतादर्शनिं आतां ओढ जिवा लागे
चला थांबवा त्याला, पाहूं फिरतो का मागें
मार्गीं डोंगर नद्या पाहुनी घे पळता पाय–
असें निरर्थक निर्जिव माझें प्रेम असे काय ?
नव्या दमाचा, नव्या जमाचा, ज्याचा अवतार
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?
हटतिल डोंगर, तटतिल सरिता ना आपोआप
झटतिल मेघहि साह्य कराया धरुनि इंद्रचाप
गिरिशिखरांची पडेल खालीं मोडुनिया मान
प्रेमापुढतीं सांग कुणाचा टिकतो अभिमान
नव्या दमाचा, नव्या जमाचा, त्याचा अवतार
पाहुनि करितिल नद्याच त्याला स्वयें पैलपार
जो निजहृदया फाडित चपला प्रिया खेळवाया
वृष्टि कशी तो मेघ करिल वद मला थांबवाया
तोच आपुल्या पंखांवरि मज वाहुनि नेईल
–निदान मार्गीं मला विजेचा दिवा दाखवील
प्रेमें बोले, प्रेमें डोले, प्रेमें जग हाले
प्रेमाखातर जगीं आजवर काय नाहिं झालें ?

गिरितट फोडुनि नद्या कशाला धांवतात सांग
लता तरूविण सांग कुणाचे फेडितात पांग ?
संध्याहृदयीं रमवायाला सूर्य धांवतो ना ?
नातर गगनाच्या पडद्यावर भटकवेल कोणा ?
प्रेमासाठीं, रामापाठीं सीता वनवासी
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी
रघुवीरांनीं जलनिधिवरतीं पर्वत नाचविले
सांग कोणतें संकट दुसरें त्यावरि ओढवलें
गोपिजनांच्या करुण रवाच्या ऐकुनिया ताना
कसा नखावरि गोवर्धन धरि गोकुळिंचा कान्हा
पुराणांतल्या कथा कशाला, पहा आजकाल
नाचतसेना हवें तसें जग प्रेमें बेताल
कां ब्राह्मणपद बादशहाला राणी मस्तानी
कां धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं
व्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणीं हात दिला
नजर गुंतली तुझी तरी कां तिकडे त्या नयनीं;
तसाच इकडे या नयनांस्तव मी बसलों ध्यानीं
सतीदेवता पतिसह गेल्या रचुनि अग्निशय्या
प्रेमावांचुनि धीर कवण दे दुसरा लढवय्या
तलवारींच्या धारेवरती जीवांचा नाच
रणशूरांनीं कां केला, जा विचार त्यांनाच
प्रेमाचा हा प्रभाव असला अखंड वा चाले
तशांत हें तर निराशेंतुनी प्रेम जन्मलेलें
नव्या दमाचा, नव्या जमाचा ज्याचा अवतार
त्या प्रेमाचा वीर करारी काय न करणार ?

---

## अरुण (दुसरा)

[रा० ठोमरे यांची "अरुण" या नांवाची एक कोमल कविता आहे. ती ऐकून अगदीं निराळ्या दृष्टीनें प्रस्तुत कवितेंत अरुणाकडे पाहिलें आहे. त्याच गोड गीताचा या कवितेंत शेवटीं उल्लेख केलेला आहे. या पूर्वीची या विषयावरील पहिली कविता रा. ठोमरे यांच्या वळणाची आहे.]

पहा फडकला पूर्वदिशेवर रक्तरंग कसला
अरुण हाच का, उषा हीच का सांगा कुणि मजला
लालभडक दिग्भाग जाहला मोदें वा खेदें
अनुरागाचा कीं रागाचा रंग नभीं कोंदे
विरहजागरण घडलें ज्यांना फार निशाकालीं
त्या नयनांची एकवटुनि का ये सारी लाली
रजनीच्या सहवासें सृष्टिंत घडलें जें पाप
होत असे का सृष्टिस आतां हा पश्चात्ताप
किंवा कोमल बाला मेली तीव्र निराशांनीं
हृदया फोडुनि तिच्या प्रीतिची लाट चढे गगनीं
दुखावलेल्या जळणाऱ्या परि हताश हृदयांचे
जे रागाचे, जे सूडाचे, बेत निराशेचे
रात्रीं त्यांचे श्वास चालले मिटल्या डोळ्यांनीं
देवपदीं मग दाद मागण्या रिघती का गगनीं
आग लागली किंवा कोठें खालीं पाताळा
उंच दूरवर काय भडकल्या तिच्या अशा ज्वाला
निशापाप निजहृदयीं धरिलें अवकाशें म्हणुनी
पूर्वा जळते पुण्यरवीच्या का पहिल्या किरणीं
अन्यायानें रक्त करपतां वाफ काय झाली
रक्तनिधिस त्या जग बुडवाया कीं भरती आली
मुक्याच इच्छा, आशा झाल्या कोणाच्या खाक
रागानें ही लाल जाहली का त्यांची राख

दिनरजनींची धडक मस्तकीं परस्परीं बसली
ही दिवसाच्या डोक्यावर का रक्ताची लाली
कीं रजनीची टिकल्यांसाठीं फाडुनि कांचोळी
जरीपुराण्यासाठीं केली तारांची होळी
रविकिरणांचे भाले शिरले आकाशापोटीं
रक्ताचें शिंपणें करी का जखम अशी मोठी
कीं पृथ्वीच्या पापश्वासें स्वर्गचि विरघळला
निराधार रस जाउनि भिडतो आतां पाताळा
निशा संपवुनि दिन आणाया सकल देव आले
रात्र चालवूं या बाण्यानें दैत्य पुढें झाले
त्या दोघांचें समर जुंपलें पूर्वदिशाप्रांतीं
हा रक्ताचा सडा फडकवी कीं त्याची ख्याती
मृत रात्रीची चिता उषा ही अरुणमया ज्वाळा
रविरूपानें प्राणगोल का हा वरतीं आला
भ्रमण दिवसभर करुनी संध्यागर्भीं हा प्राण
शिरतां होइल मृतरजनीचा पुनर्जन्म जाण
मरण सकाळीं; सायंकाळीं जन्म पुन्हा घेई
रजनी यापरि भवचक्रावर सदा फिरत राही
फार विचारें कविकल्पकता अति भ्रांत झाली
बालकवीचें " अरुणगीत " तों मनीं उडी घाली
जसा निवळवी रंग नभाचा अरुणतेज पार
" अरुणगीत " ही भीषणतेचा जिरवी हुंकार
वसुंधरेशीं लग्न कराया सूर्य उत्तरंग
ये अरुणाचें हें सोनेरी बांधुनि बाशिंग
स्वर्भूसंगम त्या लग्नाचा शुभकर परिणाम
पुण्यमया श्रीवसुधा होइल शुद्ध-प्रेमधाम
दहा दिशांनों, जरा जराशा बाजूला सरका
दिशा नवी या कायमची या अरुण-चित्र-फलका

जगन्नायका, असा एकदां काळ येउं द्याच
निशा नको; दिन नको; असावा अरुण सारखाच
लाल नभांतुनि होइल तेव्हां प्रेमाची वृष्टि
"गोविंदाग्रज" गानिं रंगाविल तीच प्रेमसृष्टि

---

## गरिबीचें गाणें किंवा एक प्रसंग •

कुणि ऐका हो ऐका एकच वेळ । हा दुर्दैवाचा खेळ
मी शास्त्रांचा मोठा पंडित नाहीं । नच शिकलों पढलों कांहीं
मृत हृदयाचें रडकें केविलवाणें । गरिबीचें माझें गाणें
दैवाचे पाहुनि झगडे
मम हृदय जाहलें उघडें
मग गाई वेडेंबगडें १
घ्या मानुनि हें; चुकलें मुकलें कांहीं । तरि उपाय माझा नाहीं
दुर्दैवाची करणी अघटित कांहीं । दुष्काळ पसरला बाई
निज बाळाला पाजीना ती आई । गोठ्यांत उडाल्या गाई
चहुं मुलखीं हो एकच उपासमारा । चिमणीला नाहीं चारा
झाडावर नाहीं पान
वैराणच रानोरान
दुनियेचा बदले वान २
लवलेश कुठें अन्नाचा न मिळावा । पोटांत पेटला वणवा
किति आडतळीं विहिरी गेल्या खोल । नांवाला नाहीं ओल
जणुं प्रेतांच्या डोळ्यांच्या त्या खांचा । मेसूर भाव दोघांचा
नदिनाल्यांना तापुनि रेतीचूर । मृगजळेंच आले पूर
पाण्याविण होतां भडका
दगडाला देती धडका
परि पाझर कुठला खडका ३
यमरायाचे दूत फिरति चौफेर । सर्वांचा उठला शेर

(अपूर्ण)

## दुर्दर्शन

नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता, विच्छिन्न प्रेतावलि
भूकंपादि अनर्थ, दैवघटितें हीं सर्वही पाहिलीं
त्यांहीं खिन्न न चित्त होत, परि तें होतें तदा ज्यापरी
विश्रब्ध प्रणयास वंचित यदा सौंदर्य स्वार्थास्तव १

पुणें, २।१२।१५.

---

## लांडोर

[ मोर नाचतो तशी लांडोर नाचते याचा अनुभव बिचाऱ्या तेजस्वी मोराला येतच असतो; लांडोरीला त्या म्हणीचा अर्थ कळून चुकला तरी उपयोग होत नाहीं; एकूण हें गाणें फुकट आहे.]

नाचतो मोर। नाचते पहा लांडोर ॥ ध्रु०॥
कोठें त्याचा भव्य पिसारा। कोठें रंगाचाहि पसारा
कोठें थाटमाट तो सारा। कुठें ही चोर ॥ नाचते १
त्याचा आनंदाचा नाच। दिवे लाविले जाळुनि पाच
कोठें हिरा कुठें ही कांच। तरिहि समोर ॥ नाचते २
जगांत कसरत चाले थोर। तारेवरती नाचत मोर
पायीं अपुल्या कच्चा दोर। तरिहि छिचोर ॥ नाचते ३
कच्चा कुचका तो आधार। केव्हां तुटुनी जाइल पार
फुटतां आब हांसातिल चार। नसे हा घोर ॥ नाचते ४
जेथें तेथें प्रकार हाच। नाच न नुसत्या मोरांचाच
नाचे मोर कुठें तो साच। बढाईखोर ॥ नाचते ५
हलतां सजीव बळकट काया। लागे नसतें झट चिकटाया
भंवतीं भंवतीं नाचे छाया। जीव ना जोर ॥ नाचते ६
कला निसर्गामागें जाण। माया ब्रह्मामागें घाण
छाया देवाची सैतान। थोरा पोर ॥ नाचते ७

सत्यामार्गें लागे भास ॥ नक्कल अस्सलास हमखास
तुटलि मधें जरि दमादमास ॥ तरी बिनजोर ॥ नाचते ८
जमाव यांचा जमतां थोर ॥ मोरावरही यांचा जोर
चोरावरतीं होती मोर ॥ अशी शिरजोर ॥ नाचते ९
कमअस्सल या अक्करमाशा ॥ ताज्या रक्ता जळवा बाशा
करिती जगतीं स्वैर तमाशा ॥ रूप अघोर ॥ नाचते १०
खोटेंनाटें जगीं पसरतें ॥ फारपणानें खरेंहि ठरतें
खरें बिचारें दिसतें भलतें ॥ मग बिनघोर नाचते ॥ ११
बघुनी प्रकार उलटा असला ॥ येत जगाचा वीट मनाला
वाटे विनवावें देवाला ॥ नको तो मोर ॥ आणि ही नको लांडोर
॥ नाचते ॥ ११

---

## प्रेम–काळ

संगम तीन्ही काळांचा
प्रेमकाळ घडवी साचा ॥ ध्रु० ॥

हृदयदेवते, दे हाता
प्रेमकाळ निर्मूं आतां
दृढ आलिंगन दे हृदया
चुंबन देईं नंतर त्या–
एक करूं जीवा भावा
प्रेमकाळ चल करूं नवा
प्रेमकामने । प्रेमचुंबनें ॥ जोडुं या मनें
वर्तमानकाळीं करुं ती ॥ भूत-भविष्यांची भरती १

सोडुनि सारें घरदार
चिंतेचाही बाजार
चुंबनेंच घेऊं नुसतीं
सखे ! सारखीं; सोडुं न तीं

काम एवढें मनीं धरूं
जीवन चुंबनमयाचि करूं
आतां चुंबन। नंतर चुंबन। चुंबन जीवन
इच्छा तृप्ति क्रिया तशी ॥ चुंबनमय चल करूं अशी २
भूतकाळची क्रिया अशी
आणुं वर्तमानापाशीं
वर्तमानिंची हीच क्रिया
भविष्यांतही नेऊं या
झाल्याचें गोडें स्मरण
होत्याचे आशाकिरण
असत्याच्या या कार्यांत
जिरवुनि टाकूं निमिषांत
चुंबन स्मरणीं। चुंबन करणीं ॥ आशास्फुरणीं–
चुंबन एकच राहूं दे। कार्यांच्या प्रेमानंदें ३
आद्यंतीं तीन्ही काळीं
इच्छा तृप्ति स्मृति सगळी
एकरूप होतां कुठला
काळभेद सखये! उरला
भेद असे जो कार्यांचा
भेद तोच या काळांचा
इच्छा चुंबन। आशा चुंबन। स्मृतिही चुंबन
विलय तीनही काळांचा ॥ प्रेमकाळ निर्भेदाचा ४
क्रिया एकची करूं सदा
क्रिया एकची स्मरूं सदा
मनांत आणूं कितीकदां
क्रिया तीच; नच दुजी कदा
भूतभविष्यत्काळाचा
वर्तमान एकच सांचा

हा ऐक्याचा हा। प्रेमाचा। हा जीवांचा
चुंबनसंगमकाल गणा। प्रेमकाळ त्यालागिं म्हणा ५
ओंठावरती ओंठ सदा
कदा न सोडूं इष्टपदा
चुंबनास आरंभ नसे
अंतहि कुठला त्यास असे
चुंबन एक अनाद्यंत
सखये! मरणापर्यंत
ओंठ न हाले। चुंबन असलें। सदाहि चाले
नव्या जुन्याचा एक ठसा॥ प्रेमकाळ चल करूं असा ६

---

## भयाण एकांत

शांत शांत अति बाह्यसृष्टि जरि चोंहिकडे शांत
हृदयिं करी थैमान सारखा भयाण एकांत!
क्षणामागुनी क्षण जाउनिया संतत वय वाढे
देहहि वाढे त्यासह परि नच हृदय तसें निधडें.
क्रमाक्रमानें नैराश्याचे कडे तयावरतीं
कोसळले किति, तरि कोमलता होईना कमती.
एकामागुनि एक सारखे होउनि आघात
घाव तयांचे अजुनी ताजे तसेच हृदयांत.
महती आशा, तीव्र निराशा, द्वंद्व हृदयिं करिती
एकीमधुनी दुसरी निपजे खळ नाहीं कशि ती!
त्या दोघींचें हृदयभूमिवर समर सदा चाले
काळ लागला जो त्या समरा जीवन तें झालें.
कडा कडा पडतांना तुटुनी आघातासरसें
हृदयाचें या झालें जाळें राम न त्यांत असे.
तुटतां तुटतां जाळें झालें; भिन्न भिन्न तारा
तशांतुनीही जोडी त्यांना नशिबाचा तारा.

पुढें निराशा तोडित जाई हृदयाचें सूत
निर्जिव तरि त्या बांधित मागुनि आशेचें भूत !
तुटतां तुटतां असें आजवर तुटे न कां पार
अशा धागडीवर हृदयाला कसला आधार ?
नव्या दमाची कोमलताही तशीच कां राही
नैराश्याच्या दगडासम ती कठिण कां न होई ?
अजुनी पडतां नवा निराशातट हृदयावरतीं
पहिल्या इतके खोल घाव हे कां त्यावर बसती ?
जरा कुठेंसें कोमलतेहुनि हृदय होइ दूर
तोंच कशाला प्रेमाची ही लागे हुरहूर ?
दुःखामागुनि दुःख भोगुनी मन फत्तर बनतां
कधींच मेलें प्रेम, पुन्हां तें निपजे कां आतां ?
सहवासानें, अभ्यासानें तीव्र निराशेच्या
विसरत होतें हृदय भावना सौख्यकल्पनेच्या—
हृदयशारदे ! तशांत टाकिसि उडी कशाला गे !
भविष्यचिंतानें मृत आशांची मना कशा लागे.
न कळतांच मज कसें हृदयिं तूं बसविलेंस ठाणें
वशि न कुणा जें मन तें वश तुज कसें कोण जाणे !
पडक्या भिंताडावर हृदयीं कळस उंच असला
कसें करावें हृदयशारदे, बसूं नये बसला !
कळला, चळला, तुटला, फुटला, कीं पडला झडला
सहन करावा कसा पात तो ? जीव इथें अडला !
चढती पडती पुरे; सुखाचा पुरे पाठलाग
नको दिवस तो रात्र धावते ज्या मागोमाग.
तुझी उपजती आशा मनिंची मनींच चिरडावी
कीं विसरुनि अनुभवा, एकदां पुन्हां धांव घ्यावी ?
निराशेंतुनी प्रवास इतका पडला जो पार
परतावें का त्यांतुनि फिरुनी बिकट जरी फार ?

पूर्वसंचिता ! वद कायमचा का तो सरणार
किंवा नशिबीं पहिल्यापासुनि पुन्हाहि येणार !
सहज जोडिला मित्र तोडितां कष्ट होति फार
एक तोडितां सखा जिवाचा एक जीव ठार !
प्रेमाची एकदां पुरी जी झाली मनिं होळी
विसरावी ती किंवा घ्यावी कायमची झोळी ?
भवाब्धिमधुनी कशीबशी जी निघते वर मान
पुरती काढावी ती धरुनी असेंच अवसान,
किंवा तळिंच्या रत्नांसाठीं द्विगुणित उत्साहें
पुन्हां बुडी मारावी, खालीं शंका मनिं आहे.
सरता प्रवास नैराश्याचा भला बुरा झाला
म्हणविल का तो भाविकालचा परी बरा त्याला.
अशा भावना जीवाभंवतीं घालितात वेढा
कोण त्यांतुनी काढिल होतां ज्याचा तो वेडा !
आधीं आशा तुटतां सुटलें बंधन जगताचें
उदास हृदया वेड लागलें चढत्या कवितेचें.
शब्द-शारदा परि तुज लाजुनि आज दूर झाली
हृदय-शारदे ! तुझ्या निशाणा प्रेम घाव घा
अशा विचारें तुझी मूर्तिही परि होतां दू
खराखुरा एकांत करी हा हृदयाचा चूर.
कशाभोंवतीं तरि गुंगावें हा हृदयाचा ध
कविता गेली, तूंही जासी, ओढवलें क
पूर्वीं जग अंतरतां हृदयीं कांहींतरि होतें
परि या कालीं तूं त्यजितां मग काय ति
अनुभवितों हा हृदयशारदे खराच एकांत
भीत भीत आत्माहि बावरे भयाण हृदयांत.
स्थापन करि तव मूर्ति पुन्हांही हृदयमंदिरांत
तुजवांचुनि एकटा फिरावा जीव कसा त्यांत !

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नौपाडा शाखा.
अ. क्र.
विभाग
क्रमांक,
ता.

एकान्ताचें हृदयिं माजलें सखि! जें थैमान
जीव बिचारा जाइ न त्यामधिं; शून्यहृदय जाण.
आण दया मनिं हृदयशारदे, चल ये हृदयांत
शंका विवेक दूर मरूं दे; ते मजला हात.
चल धांवुनि ये; नको असा हा भयाण एकांत
"गोविंदाग्रज" वेडा तुजविण; करी तया शांत.

---

## लीला

[ अनाथबालकाश्रमांतील एक पांच वर्षांची मुलगी. ]

[ दिंडी ]

दिसे मजला हें पुढें गोड मूल
पडे कोमेजुनि रम्य तसें फूल
एक निर्णय मनिं होत नसे साच
विषय दृष्टीचा द्विविध हा तसाच १
जसें वेलीचें दलित गलित फूल
बालविधवेचें तसें पतित मूल
दिसतिं दोन्हीही सारखीं मलूल
कृपादृष्टीची कुणि न घालि झूल २
पांच वर्षांची छबकडी सुरेख
जणूं चिमणीशी हिरकणीच देख
कशी चित्रासारखी उभी राही
नांव ठेवाया सोय मुळीं नाहीं ३
कुण्या ऋषिचे यानास अडखळून
पडे निखळुनि जणुं नील पटांतून
आलि खालीं ही चांदणीच एक
तरिच इतकी ही चमकते सुरेख ४

बाल अवयव रेखींव एवढाले
कल्पनेच्या जणुं भ्रमें चित्र हाले
काव्य तरळत जणुं हृदयिं कविजनाचें
बालसौंदर्यहि असें देहिं नाचे ५
बालसौंदर्यहि असें देहिं नाचे
तरी वाटे हें स्वप्न निर्धनाचें
यास कारण तें पाहतां दिसेची
जोड सौंदर्या उदासीनतेची ६
किती लीले ! तव वदन उदासीन
सांग बाळे ! कां दिससि अशी दीन
बघावेंसें वाटतें जरी त्यास
तरी बघतां मन होतसे उदास ७
तोंच माझ्या लागलें कुणी काना
जन्मवार्ता कथिं चित्तसमाधाना
बालविधवेनें टाकिली अनाथ
मिळाली ती बालिका कंटकांत ८
जणूं कळुनी ही जन्मकथा नीच
असे तेव्हांपासून ही अशीच
किती हंसवावी तरी हंसत नाहीं
दृष्टि भूभागीं यापरी सदाही ९

---

## ये ये ये कविते !

[ एका रविवारीं कांहीं मित्रांना एक कविता देण्याचें ठरलें होतें. मुदत सरत आली; पण कविताच सुचेना ! तेव्हां कवितेस हें पाचारण केलें होतें.]

ये ये ये, आतां ये कविते । नको छळूं याहुनि मातें ॥ ध्रु०॥
रसिक मित्र हे जमले भंवतीं रविवारहि गेला
घटका घटका भरत चालली सरत वायदा आला

पाहूं कोठें कविते तुजला; मूढासम झालों
नेत्र मनाचे फाडुनि तुजला शोधाया मी झटलों
गरगर गरगर नेत्र फिरति जणुं चंचलता फिरती
तुज हुडकाया चहूंकडे कीं स्थाना सोडुनि निघती
ऊर धडधडे, हृदय मारि जणुं मुक्या मनाच्या हाका
हृत्पटिं आत्मा नाचत थैं थैं हट्ट घेउनी तव का
काव्यशून्य देहाला विटला; ध्यास तुझा मोठा
वायुरूप हा आत्मा श्वासें धावत बारा वाटा
वस्तुवस्तुमधिं शोधुनिया तुज चित्त बिचारें दमतें
काव्यहीन परि चित्र आपुलें जगदादर्शीं बघतें
कोठें वससी, कैशी असती, केव्हां येसी कविते
ये ये, देतों मोबदला तुज वस्तु कोणती हवि ते
तारांमाजी चंचलता जी चमकदार लुकलुकते
तीच असति तरि हृदयभेद करि पडुनी उल्कापातें
चंद्रमया जरि तरि क्षयकालीं कुठें तरी जी दडसी
तीच निर्दये, हपापलेल्या या हृदयिं न कां पडसी
रवींत असशिल तरि किरणांचे दोर सोडुनी खालीं
नेत्रगवाक्षांतुनि आत्म्याच्या भरभर शीर महालीं
फुलांत धरिशी सुगंधमय वा अदृश्यरूपा बरवी
तरि वाऱ्याचा घोडा करि त्या हृदयरंगणीं फिरवीं
मेघमंडलीं जरि तूं बिजली; पड कडकडुनी माथीं
नाद हवा जर नाचाया तर गडगडाट करि साथी
जरी पर्वतोदरीं दडालिस तोंड तयाचें फोडी
हो ज्वालेची लाट मानितों त्या रसिंही मी गोडी
स्त्रीहृदयीं जरि असती तरि धरि रस्ता या हृदयाचा
नेत्रकिरणिं तुज पूल देत हा प्रेमाच्या तारांचा
हाय हाय! कां येशि न अजुनी; त्रिखंड धुंडुनि झालें
तुजविरहित मैंम हृदयिं रमाया परब्रह्म बघ भ्यालें

अंध, मूढतम, शून्यवृत्ति ही मानवता पाहीं
कुठली वस्तू कुठें टाकिते भान न तिजला कांहीं
देव दडविला दगडाखालीं, भावा ज्ञानजलीं
स्त्री-हृदयाला तसें दडपिलें सोन्यामोत्यांखालीं
तीच राक्षसी मानवता तुज नकळे टाकी कोठें
विषय तुझा हुडकावा कैसा कोडें पडलें मोठें
देवामाजी वससी तरि तो देव पसरला जगतीं
तूंच न दिससी कां मग देवी, जीव न तुजविण जगती
शून्यामाजीं रमसि राक्षसी शून्यवृत्ति असती
शून्यवृत्ति या मम हृदयीं मग कां नच वद तूं वससी
चाल ॥ तों नाद विलक्षण उठले। हृदय मम भरलें। चालही बदले
खूण तों मनाला पटली
कीं कवितादेवी हंसली
जी सदाच या हृत्पटलीं
अंतर्दृष्टिसि दिसली देवी, फार मला हंसली
त्या हंसण्याचे नाद निघाले तन्मयता जमली
हृदयाचि भरलें कवनरसानें उचंबळुनि आलें
रूप अश्रुमय भरुनि काढितें नयनांचे प्याले
कवनजलाचा ओघ चालला विश्व त्यांत न्हालें
नीरसतेच्या मालिन्याचें नाम नष्ट झालें
वस्तुवस्तुमधिं कवन दिसे मग गावें कवणाला
भांबावुनि बहु जाई कवनीं गाई मीच मला
चाल ॥ हा हृदयवसंताचि भला। काय बहरला। जीव उमगला
हृदयाचा केला डोला
कवितेनें आत्मा ओला
त्यावरी बसुनि घे झोला
खोला खोला हृदयपटा; द्या कवितेचा पूर
कवन भुवन हें कवनाचि जीवन; प्याच महापूर

---

# स्मरणसृष्टि

प्रेमाचे ते जीव ॥ दयाळा ॥ आज कुठें दाखीव
काय न ये तुज कींव ॥ ध्रु०॥

प्रेमरसाचे हृदयभूवरी वाहत होते पाट
पात्र कोरडें आज; खडकची चिखलाचे घनदाट
प्रेमनदासह आज बाळपण वाहुनि गेलें दूर
जें सुखकारण तेंच दुःख दे; स्मरण लावि हुरहूर
अश्रु वाहती, दुःखस्मृतीचें मूर्तरूप हें जाण
शोधुनि बघतां त्यांत जीव ते, नलगे ठावठिकाण
नवतेचा बाहेर आड हा; स्मृतिची हृदयिं विहीर
दीन मनानें कुठें लपावें ? प्रभो, तुटे रे धीर
दुःखद जीवन आज कंठितों; पुढेंहि दिसतें तेंच
अमृतसुखाचा बालकाल तो; प्रभु, ने मज मागेंच
प्रेमनदाचीं पात्रें हृदयीं वाळुनि झालीं कोळ
नातरि त्यांताचि जाउनि मरतों करुनि जिवाचा घोळ
तारुण्याचें सौख्य निराळें; असेल बहु तें गोड
बाळसुखाच्या स्मृतिचीही तरि अधिक जिवाला ओढ
या सौख्यातें सेवित असतां सेवनींहि ये वीट
त्या सौख्याची दुःखस्मृति बरि; दगडाहुनि मउ वीट
हृदयस्मशानीं मृतलीलांना जाळुनि केल्या खाक
दीप स्मृतिचा जळक्या जागीं दावित आतां राख
प्रसंग नाना सुगंधि सुमनें; शिशुतालतिकेचीं
दाब मनाचा फत्तर त्यांवर सुख हें अत्तरची
फार सुगंधी अल्पजीवि तरि क्षणांत उडुनी जात
स्मृतिरूपानें दिगंत पसरे मिसळुनि या पवनांत
मायेची ही जादू जमवी त्या चंचल पवनास
स्मरणसृष्टि ही दिसे एकमय चित्ताच्या नयनास

अहा ! तेच हे जीव लाडके ! जमुनी त्यांचा मेळ
अवकाशाच्या रंगावरि करि बाळपणाचा खेळ

स्मरणसृष्टिचा असा पसारा अद्भुत देवा फार
जडसृष्टिचें जाळुनि गाळुनि काढियलें जणुं सार
अवकाशाचें राज्य तयांना ; इच्छेचा अवतार
जीव विदेही ; खूण पटावि तरि वायूचा आकार
भूतकाळच्या रेषा गिरविति ; एकच काळ तयांस
एकच ; तोही सान्त काळ ; स्मृति अडवी त्याचे तास
उडविति घडलें जें जें जोंवरि जीवाची हो सुटका
भविष्यकाळा वाव न ; त्याचा कडा दिसतसे तुटका

जडसृष्टीचीं चित्रें वठलीं का हीं अवकाशांत
कीं वायूवर ठसा उमटवी घडलेला वृत्तांत
अथवा प्रसंग ते नयनांनीं गिळिले जे घडतांच
निज किरणांना तेच उगाळिल बसतां हृदया आंच
भिन्न कालिंचे, भिन्न स्थलिंचे जीव दिसति हे सांग
ओळख त्यांची परस्परांना पटते का रे सांग
अनुभविती का गतलीलांतें फिरुनि तेच हे जीव
अवताराची अपुल्या त्यांना आहे का जाणीव

स्मरणसृष्टिला पटे खूण जरि तरि मजही दीनास
स्मृतिरूपानें तींत रमूं दे ; विरुनि टाकि देहास
माझी सृष्टिच जातां झालों जिवंतपणीं मी भूत
बांधितसे मज येंथ नेसत्या आशेचें हें सूत
तोडुनि त्यातें, ने मज देवा त्या माझ्या मित्रांत
नको जाळुं हा देह यावरी जगताच्या सत्रांत

---

# प्रेमाचा प्रळयकाळ

[बुद्ध, तुकाराम, ख्रिस्त, नानक यांच्या मनाचें गाणें असेंच असावें.]

चला चला रे चला चला । विसरुनि विश्वा चला चला ॥ ध्रु०॥

पूर लोटला प्रेमाचा । प्रळयकाळ हा विश्वाचा
लोट सारखा उचंबळे । आतां कसला ओघ खळे
स्वार्थाचे तट हे फुटले । चहूंकडे पाणी सुटलें
फुटकी होडी । टाका उपडी
सोडुनि साऱ्या मोहाला । चला मिळूं या ओघाला !

अलोट प्रेमाचा पूर । धरणें करि सारीं चूर
विश्व बुडालें पाण्यांत । या प्रळयाच्या लाटांत
अथांग पाण्याचा अंत । जाणि एक तो भगवंत
पाणी इकडे । पाणी तिकडे
पाणी पाणी चहूंकडे । आतां लपतां कुणिकडे ?

खडक बुडाले गर्वाचे । विरले डोंगर रागाचे
खंदक जिरले द्वेषाचे । कडे मोडले त्वेषाचे
जीव कोंडला आशेचा । श्वासचि बंद निराशेचा
प्रेमजलाचा । हृदयरसाचा
सागर करि तांडव नाच । प्रळयकाळ तो बा हाच !

दिशा दहाही खळबळल्या । सीमा त्यांच्या निरघळल्या
त्रिवेणिसंगम काळांचा । मागेंपुढें न व्हायाचा
रजनीचा पडदा धुतला । दिवसाशीं तन्मय झाला
पांचहि भूतें । पंचत्वातें—
गेलीं ; गिळिलीं प्रेमजळें । त्रिगुणांचा रंगहि निवळे !

पाण्याच्या चढत्या लाटा । उचंबळति बारा वाटा
पृथ्विसूर्य ग्रहगण तारे । बुडबुडेच त्यावर सारे

प्रकाश वरचा फेस असे। तिमिर नीलिमा आंत नसे
एकाकारें। विरलें सारें
पहा पहा रे पहा पहा!। प्रळयाची ही मौज अहा! ५
पाहणार परि कोण उरे। जेथें सर्वचि विश्व मुरे
हृदयाचें पिंपळपान। आत्मा माझा भगवान
बाळरूप निजलें शांत। उठविल त्याला कल्पांत
चला तोंवरी। आपण सारीं
प्रेमाच्या या प्रळयांत। उडी घालुं या निमिषांत! ६
जन्म इथें मरणा जाई। जन्म इथुनि मरणा नाहीं
सर्वांवर फिरतां पाणी। कोणास्तव रडणें कोणी
हृदयसागराच्या लहरी। पोहत आत्मा तयांवरी
विश्व बहिरलें। विश्व महिरलें
प्रेमजलाचा भडिमार। करि जीवा गारीगार! ७
चिरविश्वाचा अवतार। या पाण्यामधली गार
विरुनि जाउं या एकसरें। जिरुनि जाउं या प्रेमभरें
"समा" होउं या भरतीची। एक सारखी चढतीची
अखंड राही। अखंड वाही
प्रेमसागरा! तव भरती। चढवि सदा वरतीं वरतीं! ८
प्रेमसागरा, तव लहरी। उडवी अजुनी वरी वरी
अफाट लाटा नाचीव। ब्रह्मनाद तो ऐकीव
लाटांचे देउनि झोके। काळाचीं मिळवी टोंकें
या बाजूला। त्या बाजूला
कुठेंहि मग मी पडे जरी। सर्व सारखें मला तरी! ९
थांबवील असला पूर। कोण असा आहे शूर?
अनंतास देउनि वळसा। ब्रह्माच्या जाइन कळसा
विश्व बुडे मम हृदयांत। पूर्ण हरपलें अंशांत
बोलत जयजय। डोलत थयथय
अनंततेच्या पलीकडे। प्रेमप्रळया, जाच गडे! १०

गाणें माझें प्रळयाचें । कुठलें तें संपायाचें
प्रळयाच्या लाटा उडती । गाण्याचीं कडवीं चढतीं
ब्रह्मस्थितिची शून्यगति । तिच्यांतुनिहि गाणीं निघती
स्वानंदाच्या—। ब्रह्मपदाच्या—
पूर्णपणाच्या पैलथडी । गाण्याची जाईल उडी ! ११
ब्रह्महि स्वपदीं हालेल । गाणें तरि हें चालेल
शून्यकल्पनेहुनि खोल । प्रेमप्रळयाचे बोल
नका थांबवूं प्रेमाला । नका थांबवूं गाण्याला
हृदयचि हरलें । शब्दचि सरले
निःशब्दाच्या नादभरीं । गाणें ऐकत रहा तरी ! १२
टाकुनिया चिद्राजीव । प्रळयामाजीं या जीव
अचेतनाच्या गुंगींत । ऐका प्रळयाचें गीत
मृत विश्वाचें तेरावें । कडवें चाले तेरावें
कोणी निंदा । कोणी वंदा
प्रेमप्रळया प्रेमरसें । "गोविंदाग्रज" गात बसे ! १३

## निजलेल्या बालकवीस—

[ माझे परमप्रिय मित्र रा० त्र्यंबक बापूजी ठोमरे–महाराष्ट्रसरस्वतीचे रसाळ बांधव—"आनंदी आनंद" करून सोडणारे सुप्रसिद्ध बाल–कवि एकदां प्रातःकाळ अतीत झाला तरी झोपेंतच गुंग होते. गद्यांत दोनतीनदां हांका मारून फुकट गेल्यावर पुढील गीतवादानें त्यांना जागें केलें. सदर पद्य फारच थोड्या वेळांत केलें असल्यामुळें बाल–कवींचें यथार्थ गुणवर्णन त्यांत कुठून सांपडणार ? त्यांच्या "अरुण" व "चौघडा" या दोन मुरली-गीतांचा प्रस्तुत गीतांत उडता उल्लेख केला आहे.]

जगद्गायका बालकवे ! चल, ऊठ ऊठ आतां
तूंच निजसि तरि कोण सांग मग जागवील जगता ॥ ध्रु० ॥

हा तुझा अरुण बघ उगवे पूर्वेकडे
वद कोण तयाचें गाणें गाइल गडे
हा देवद्वारीं चौघडाहि धडधडे
करि कोण तुझ्याविण बोल तयाचे खडे

तव कवनाची वाट पाहती पहा उगवतीं किरणें
गाउनि गाणीं प्रेमळ त्यां उल्हास तूंच रे देणें १
बघ सृष्टीचे कवि कसे भरारति गगनीं
गातात कोणत्या स्वैर सुरांचीं गाणीं
चल एकजीव हो लौकर त्यांच्या गानीं
स्वर्गांत सांग मग तेंच आमुच्या कानीं
सौंदर्याची द्वाहि फिरविण्या वा तव अवतार
मग ऊठ निजसि कां असा गड्या रे झोंप झालि फार २
बघ फुलें उमललीं आतां सारीं नवीं
तव रसवंतीचीं फुलेंहि आम्हां हवीं
तव रसाळ रसना–रससागरिं जग झुलवी
रस उधळुनि गगनीं लपल्या मुकुलां खुलवी
नव्या सृष्टिच्या नव्या यशाचा तूंच शिलेदार
नव कवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार ३
तव गान खळाला नेइल पुण्याकडे
शिकवील यमाला सदयत्वाचे धडे
फत्तरांत वाजविल प्रेमाचे चौघडे
नेईल सज्जनां आनंदापलिकडे
सूर खडा धर लावुनि गगनापलीकडे नक्की
करिं पुढें खडा जगदीश देउनी प्रेमगांठ पक्की ४
भ्रमभरें विश्व हें सर्व जयांमधिं बुडे
चल फोडुनि टाकूं ते फसवे बुडबुडे
मग बसूं जाउनी काळाच्याही पुढें
तव सुराबरोबर कोण न यापरि उडे
" गोविंदाग्रज " कविसि* तुजसवें ने देउनि हाता
जगद्गायका बालकवे! चल ऊठ, ऊठ आतां ५

---

*स्वतःकडे हा शब्द लावून घेतला याबद्दल उदारहृदयांकडून क्षमा होईलच अशी आशा आहे.

## एका बालकवीस

[ १४ वर्षें वयाच्या एका बालकवींची श्रुतिमनोहर, बऱ्याच **प्रमाणांत अर्थशून्य**, तथापि प्रतिभापूरित अतएव गोड कविता वाचल्यानंतर **मनाला** वाटलेला आनंद पुढील शब्दांत अवतीर्ण झाला आहे.]

गारे गारे गाच जरा । माझ्या चिमण्या मुशाफरा ॥ ध्रु०॥
ठरावकाला, नियमांला । बंधाला जड जगताला
जीव पहा त्रासुनि जाई । नको नकोसें त्या होई
करीं जराशी बा घाई । रिझवाया त्याला गाईं
गोजिरवाणें । अमोल गाणें । हृदयीं बाणें
अस्पष्टाचा सोड झरा । झटपट पळत्या मुशाफरा १

आम्ही गातों जें गाणें । तें जगताचें रडगाणें
हृदयीं जो भरला त्रास । तो कवितांचरणीं प्रास
शब्दापाठीं हपापले । अर्थासाठीं जन टपले
हृदय करपलें । रसहि हरपले । कवनचि खपलें
गा तूं आतां गाच जरा । रसगंगेच्या मुशाफरा २

नियमांनीं झालों ठार । ठरावकानें बेजार
हा जगण्याचा बाजार । सजीवतेचा आजार
अमुच्या कवनाचा पूर । मरत्या जीवाचा सूर
परि तव कवनें । हलतां पवनें । भुलतिल भवनें
त्या कवनाचा सूर खरा । गा, बागडत्या मुशाफरा ३

स्वैरवृत्ति कवितादेवी । बालवृत्ति तूंही तेवीं
ती सौंदर्याची छाया । तव वदनींही ती माया
गालावरची लाल मजा । दावि प्रीतिच्या यशोध्वजा
कवनचि रदनीं । कवनचि वदनीं । कवनचि नयनीं
झुलवी खुलवी जीव जरा । सुंदरतेच्या मुशाफरा ४

हृदयाचे घुंगुर गोड । मन्मनिंचे हरितिल कोड
हृदयाच्या हृदयीं खोल । ओत कवनरस बिनमोल

फुललें विश्वाचें फूल । वर आकाशाची झूल
सुखदु:खांची । बाग जगाची । जरि कांट्यांची
फुलांचाच तूं धनी खरा । फुलांत फिरत्या मुशाफरा ५

चिखल-दाट हा जगताचा । रूढीचा, निर्बंधाचा
मम हृदयाचें कल्हार । पवनजलावर अवतार
घेत असे करुनी धीर । तूंच तयाचा शाहीर
त्यांतच राहीं । गुंगत कांहीं । दंग सदाही
गा हृत्कमलाच्या भ्रमरा । मनांतल्या तूं मुशाफरा ६

हिमवंतीच्या कणांपरी । तव शब्दांची मजा खरी
थेंब न वा ते पाण्याचे । खडेहि किंवा स्फटिकाचे
अस्फुट त्यांचा आकार । वाऱ्यावर पळते स्वार
अर्ध बोबडे । वेडेबगडे । बोल ते गडे
उडवीं त्यांना भराभरा । वाऱ्यावरच्या मुशाफरा ७

अर्थकल्पनांसाठिं गडे । कां वचसी इकडे तिकडे
अर्थशब्द सोंगें सारीं । बडेजाव हा बाजारीं
धांव, न कसली धरि हांव । धांवायासाठिंच धांव
अर्थ मरूं दे । शब्द खरूं दे । काव्य झरूं दे
परी भरूं दे नादभरा । चुकल्यासुकल्या मुशाफरा ८

अर्थ कळेना जरी कुणा । तरि तो नशिबाचाच उणा
मार्ग कुणा का दावाया । ढगांमधें चमके माया
मूठ झांकली लाखाची । उघडतांच कुचकामाची
अस्फुट गाना । भिरक्या ताना । त्या घेतांना
नाच विजलिच्या धरुनि करा । मेघावरच्या मुशाफरा ९

मुग्धापदिं घुंगुरवाळा । गायाचा त्याला चाळा
स्वैराचें बंधन त्याला । खुला ताल त्या नाचाला
रुमूझुमू शब्दां अर्थ नसे । थबथबती परि दिव्य रसें
त्या स्वच्छंदा । त्या मकरंदा । त्या रसकंदा
नाचूं दे कवनांत जरा । हृदयामधल्या मुशाफरा १०

मार भरारी नभाकडे। मेघावरतीं नाच गडे
करिं त्यांचे तुकडे तुकडे। उडवीं जल जिकडे तिकडे
कविताजल जें चहूंकडे। पडतां आत्मा थंड पडे
“पाउसपाणी। आभाळदाणी।” इकडे आणी
शांत करीं ही वसुंधरा। आकाशांतिल मुशाफरा ११

ऐकविं गगनाचें गान। जीव तुझ्यावर कुरबान
सूर सारखा लाव चढा। दिव्य नाद करि पुढें खडा
शब्दा शब्दा मुशाहिरा। जिवाचाच देईन हिरा
जीव किरकिरा। फारच अधिरा। वहिराशहिरा
करावया मंजुळ सुखरा। गा गगनांतिल मुशाफरा १२

अवकाशाच्या पाणबुड्या। तरल जळीं जा टाक उड्या
आनंदाच्या पलीकडे। काय मजा मज सांग गडे
अज्ञेयाच्या परतीरा। नाचत नाचत जाच जरा
तसा तरंगत। तसाच रंगत। नसतां संगत
हात घाल जा परात्परा। अवकाशांतिल मुशाफरा १३

विश्वाचीं अवघड कोडीं। कवनाच्या मंत्रें सोडीं
स्वानंदाच्या पैलथडी। ब्रह्माची चल उकल घडी
सर्वेच खालीं पहा बरें। जगास विसरूं नको बरें
परात्पराचा। भवरा साचा। विस्मरणाचा
नको सांपडूं त्यांत जरा। स्वानंदाच्या मुशाफरा १४

परमात्म्याच्या भवऱ्यांत। पडतां तूं गिरक्या खात
त्या विस्मरणाची माती। जमतां मोरा, तुजवरती
फुंकर तीन्ही काळांचा। मारुनि उडवूं थर वरचा
झिम् झिम् मोरा। ये सामोरा। थोरापोरां—
वर न्याया कर देच खरा। चिरंतनाच्या मुशाफरा १५

थकतां मग कोमल काया। येच विसावा श्रम जाया
विश्वकटाहावर बैस। पाय पसरुनी वा पैस
शीळ वाजवुनि पवनांत। समाधान मिळवी शांत
तरि त्या स्थानीं। मधुनी मधुनी। रंगानें कवनीं
गारे गारे गाच जरा। माझ्या चिमण्या मुशाफरा १६

---

## विश्वाची विजयादशमी

नवरात्रांची रात्र संपली सण आला दसरा
पडल्या प्रहरीं जनता सारी करी येरझारा
सृष्टिदेवता उघडुनि रविचें मावळतें दार
खुलें टाकितें हें सोनेरी संध्याभांडार
तें दसऱ्याचें सोनें लुटणें कविचा अधिकार
तयार झाला, पुढें निघाला; हौसच अनिवार
शब्दांचा चढविला क्षणोक्षणिं फुलता पोशाख
अहंपणाच्या मर्दुमकीचे अलंकार लाख
तुरा शिरावर डुलतो पवनीं तरल कल्पनांचा

———

(अपूर्ण)

## अपराध यांत कोणाचा ?

हा असे खेळ दैवाचा। अपराध यांत कोणाचा ॥ ध्रु०॥
कमलिनी मनोहर बाला। कमलमुखी शोभा वाही
गुणरूप रेखिल्या ऐसे। कोठेंही न्यून न कांहीं
मकरंदें रसपूर्णा ती। कोणाला ठाउक नाहीं
पंकांत जन्म परि तिजला
देतांना विधि कां निजला
हें पाहुनि जीवचि थिजला
परिणाम पूर्वजन्माचा। अपराध यांत कोणाचा ? १
उदयाचलिं श्रीमान् रवि ये। निजतेज त्रिजगीं पसरी
अति पवित्र त्या स्पर्शानें। कमलिनी जाहली हंसरी
कुरवाळी तिजला स्वकरीं। भाग्याला उरली न सरी
तेजाला तेज मिळालें
दोन जीव एकच झाले
"मी कुठें, कुठें तूं" सरलें
हा धर्मचि सम हृदयांचा। अपराध यांत कोणाचा ? २

———

(अपूर्ण)

## एका शब्दासाठीं विनंती *

क्षमा करीं जिवलगे !–क्षमा करि न लाविता अवधी
कोमल हृदया कठोर वचनीं छळि हा अपराधी
क्षमा करावी मीं तुज बाले, आणि तूंहि मातें
असेंच आतां जडलें आहे दोघांचें नातें
परस्परांस्तव आपण ऐसा प्रत्ययही आला
तुजवांचुनि मज सुचेरुचेना मजविणही तुजला
क्षणमात्राचा राग अनावर–स्वभाव दोघांचा
समजुनि हें मग राग धरावा कोणीं कोणाचा ?
जीवाच्या बागेंत खेळतो पक्षी प्रेमाचा
पिसामागुनी पिसें काढणें, मार्ग न सुज्ञाचा
पश्चात्तापें हृदय हलवितां अश्रूंच्या धारा
वाहुनि त्याला लाभू दे तो मोत्यांचा चारा
जें झालें तें विसरुनि, सखये ! टाकुनि इतराजी
भला बुरा मी मान्य करुनियां होशिलना माझी ?
" गोविंदाग्रज " आणुनि नयनीं जीवाचें तोय
विनवित; बाले ! लिहीं स्वहस्तें तूंच पुढें–

मुंबई, २४।३।१६.

---

## पुत्रशोक

[ दिंडी ]

पूर सरितेला फिरुनि फिरुनि येत
फुटत गिरिचें पाषाणहृदय जेथ
हृदय फुटतां हें, जरी दीनवाणी
करुणरंगें रंगते " रामवाणी "

पडुनि आकाशींच्याच कुऱ्हाडीचा
घाव देवाच्या सबळ तोंतडीचा
वंशतरुचा रोपटा कोंवळाच
तोहि एकुलता–तुटे आज साच २
हिरा जीवींच्या जिवाचाच माझा
गगननगरा जातसे बाळराजा
शोकमंगल गावया गोड गाणीं
सजे राजस रसवती "रामवाणी" ३
उचंबळुनी रस करुण येत रंगा
भरुनि दुथडी वाहते हृदयगंगा
"रामरसवंती" रमे कालिं ऐशा
साक्ष देई श्रीमहाराष्ट्रभाषा ४
हाय !—शोकाच्या भरें काय आज
बोललों हें सोडुनी भिड लाज
क्षमा करिं हा अपराधशब्दमाते
मायभाषे ! मज मूढ बाळकातें ५
कुठें देवी मंगला मायभाषा
कुठें पामर मी; काय ही दुराशा
थोरथोरांची मायमाउली ही
बोल भलते बोललों तिला कांहीं ६
ज्ञानदेवाच्या हृदयिं वसुनि कोडें
भाविकांचें जी उकलि गूढ कोडें
मराठ्यांच्या मंडळामाजि भावें
जिनें भगवद्गीतेस नाचवावें ७
जिच्या सामर्थ्यें सहज नामयातें
साध्य झालें फिरविणें राउळातें
एकनाथाचें देव आणि पाणी
जिच्या ओघांतूनि ती हीच वाणी ८



वै...१३

गोकुळींच्या चोरास धरुनि पायीं
बसवि जात्यावर जेधवां जनाई
दळण दळितां गावया गोड गाणीं
आळवी तो श्रीरंग हीच वाणी ९
फक्त नांवाची ठेवुनियां ठेव
करी देवाशीं सदा देवघेव
अभंगांनीं ही करि अभंग वाणी
खरा देहूचा जातिवंत वाणी १०
जिनें आतांही मारितां भरारी
गूढ गगनें भेदुनी पार सारीं
तत्त्वरत्ना उघडिल्या दिव्य खाणी
तीच कृष्णाची* महाराष्ट्रवाणी ११
अशी थोरांच्या रमे हृदयधामीं
बोल सलगीचे बोलिलों तिला मी
मायभाषा म्हणुनीच सर्व साही
बाळबोलाचा तिला राग नाहीं १२
अजुनि खेळत माझिया मनासंगें
रंगवावी मीं तशी तीहि रंगे
धीर येउनि यामुळें तुला माते
बोलवीं मी मजसवें रडायातें १३
हाय ! बघतां बघतांच काय झालें
कुण्या जन्माचें पाप पुढें आलें

( अपूर्ण )

---

## काळाला बजावणें

जबरदस्तिचा हुकूम माझा ऐकुनि काळा ! थांब जरा
बजावणें हें माझें तुजला, शक्तीचा हा जोर खरा

---

* कविवर्य केशवसुत.

ऐकुनि जाशिल पुढें तसाची, तुझाच होइल तरि तोटा
दटावणी ही फोल नसे; वा शब्द एक नाहीं खोटा
ब्रह्मचारि वैरागी बळकट शून्याच्या हातीं सोटा
निःसंगाची सोबत माझी ब्रह्मांडाचा करिं लोटा
गाणें माझें काळा! पाडिल चराचराला भुलावणी
जो तो होइल ठायिंच वेडा ओळखील ना कुणा कुणी
अवसानाच्या भरांत घेइन रविचंद्रांची झांज करीं
दिनरजनीची जोडी ही तव क्षणांत मूर्खा! वांझ तरी
गाणें ऐकुनि त्या सूर्याचा प्रकाश होइल गार अति
विरतिल तारा; रस पाझरतां तशी चंद्रिका अखंड ती
दिनरजनींची जोडि फोडिसी नीरस असती किती तरी
एका काळीं, एका ठायीं दोघां मी रमवीन परी
एकरूप तीं करितां यापरि झांज करीं रविचंद्रांची
दिनरजनींचा खेळ बंद; जणुं उघडझांप तव डोळ्याची
उभें ठेवितां समोर माझ्या ब्रह्मांडा करुनी वेडें
अंधा ऐसा एकटाच तूं जाशिल कोठें सांग पुढें
म्हणुनि सांगतों हुकूम माझा ऐक, नको करुं वृथा त्वरा
वजावणें हें माझें तुजला; शक्तीचा हा जोर खरा.

---

## गेले गोपाळ कृष्ण–हा! हाय!!

[आर्या]

चल, ऊठ, कल्पने, जा बघ पाहूं आज जाहलें काय
कां श्रीभारतदेवी एकाएकींच मोकली धाय?
जी एकमात्र भूषण पुरुषाप्रति तीहि वाङ्मयी देवी
ठेवी कां उतरोनि स्वभूषणें? मूक वृत्ति कां सेवी?
साऱ्या शहर पुण्याची पुण्याई काळवंडली कां ही?
आनंदाची माया हांसत खेळत कुठेंच कां नाहीं?

भारतसेवामंडलसदनाभवतीं उदास वदनांनीं
अश्रूंची पुष्करिणी केली कां ? काय जाहली हानि ?
श्रीफर्ग्यूसनमंदिरिं शोकाचा पूर लोटला कां हा ?
हे भिंतीचे दगडहि रडुनि म्हणति सारखेच कां ? हाहा !
म्हणतात झोंप आली शिक्षा ऐकिलि तरी त्वरित ज्यांस
ते धीर बाळ टिळकहि आजच रडतात कां सनिश्वास ?
हृदया ! धडधड न करीं ! ऐक इथें कोण बोललें काय !
नश्वर देहा त्यजुनी गेले गोपाळ कृष्ण–हा ! हाय !!

(अपूर्ण

---

## वीणावती सुंदरीस

घुमे नाद तो सुंदरीच्या करीं
मनीं अंतरीं ही विराल्या परी
तशा हृदयिंच्या सर्व तारा त्वरें
म्हणूं लागल्या गान एकस्वरें १
चढे दिव्य हृद्गान तें सारखें
करी बाह्य विश्वास तें पारखें
क्षणार्धांत चिद्वृत्ति ही रंगली
स्वगीतांतची बालिका गुंगली २
अशा दिव्य त्या चित्तगीतापुढें
असे कायसें विश्व हें बापुडें
घुमे आंतल्याआंत गाणें असें
कळे तें जयाचें तयाला कसें ३
म्हणोनी करीं शान्त झाली गती
विचारांतरीं लीन वीणावती
तिनें उधळितां नादरत्नाकरा
मनोवृत्ति साऱ्याहि आल्या भरा ४
मनांतील तारा निजार्थध्वनि
खडा ठेविती गूढता टाकुनी

मुक्या प्रीतिचे भावही बोलती
मनोवृत्ति त्यां ऐकुनि डोलती ५
मिटी नेत्र बाला पहाया मना
तशी गुंगली सर्वही चेतना
मुकें गान तें अंतरीं पाझरे
विरे देहिंचा देहभाव त्वरें ६
जसाच्या तसा हात राही पहा
करी यौवनश्री असा खेळ हा
खुले भाव सारा झुले जीवही
क्षणार्धांत झाली समाधिस्थ ही ७

---

## " जिवास बोध "

[ शिवोहं शिवोहं शिवः केवलोऽहम् ]

( टिपणें )

जसें पाहिलें त्वां परा जीवजातां
तसें पाहणें आपणासीहि आतां
तुला कर्मसाक्षित्व आलें निदानीं
त्रिवाचा करी बोध हा रामवाणी

( अपूर्ण )

---

## 'दिव्य प्रेमाच्या जाति'

संध्यापट गगनीं पसरी
तारांची राणी हंसरी
कधीं गालिचा अरुणाचा
करि ती तेजस्वी नाचा
शुक्रतारका अशी नभा
नवी नवी देई शोभा

तारा गगनीं,
परि भूवरुनी,
बघतां नयनीं
जी संचरते हृदयीं, ती
दिव्य प्रेमाची जाति १

न मिळे अवसर अभिलाषा
"देघे"ची नाहीं भाषा
भाव आमचा थरारला
तरि दादहि त्याची न तिला
एकाद्या किरणापुरता
प्रेमबंध होतो पुरता
जिच्या जिवाला,
तिळ मोबदला,
नकोच कसला,
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति २

प्राण चंद्र हा कुमुदांना
काय जाणतो तो त्यांना
फुलॆं हंसति पाहुनि रविला
कळे न परि त्याचें त्याला
चंद्रकांतमणि पाझरती
चंद्र फिरे वरच्यावरतीं
कवि कोठें तरि,
तत्कविता परि,
फिरे दिगंतरिं,
रसिकमनें मग कविवरतीं
करिती ती दिव्यप्रीति ३

सौंदर्याचा उत्कर्ष
कुठें असे तरि दे हर्ष
दिशाकाल होउनि सान्त
त्या वृत्तिंत विरघळतात
दर्शन—किंवा स्मरण पुरे
तन्मयता देहीं पसरे
प्रभुची शोभा
दिव्य यशोभा
हारिते लोभा
तदाकार करिते वृत्ति
दिव्य प्रेमाची जाति ४

सौंदर्याच्या ज्या श्रणि
तीं देवावरचीं लेणीं
जिवास होतां जाणीव
देहाची सांडी शींव
उदात्त वृत्तीचा प्रसर
स्वार्थाचा पाडी विसर
सौंदर्यानें
ऐश्वर्यानें
रंगुनि जाणें
दिव्य जीवनें तीं लोकीं
तच्चिंतनीं तदालोकीं ५

प्रेमविषय अपरंपार
सूक्ष्म रूप भव्याकार
निरभिलाष तन्मयता ती
दिव्य प्रेमाची जाति
कौतुक, विस्मय, आश्चर्य
शून्यवृत्ति किंवा सभय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. 26802
विभाग काव्य
क्रमांक, ९६८
नों. दि. १०/१/६७

अनेक परिचीं
त्या प्रेमाचीं
रूपें साचीं
आविष्करणीं जाणविती
दिव्य प्रेमाची जाति ६

म्हापसें, १९१४.

---

## श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा, माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा ॥ ध्रु० ॥
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा
अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासी
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकाचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा १
अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्रदेशा
सह्याद्रीच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्रदेशा
पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा

तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची
मंगल वसती जनस्थानिंची श्रीरघुनाथांची २
भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न हीं एक जीवसत्त्वें
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर ३
ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रीपोटीं
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं
तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिंचाही
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाहीं
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ४
तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणी कोंडा
वहाण पायीं अंगिं काम्बळी उशाखालिं धोंडा
बिळाकोयता धरी दिगंबर दख्खनचा हात
इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ५
रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोख ठोक
करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड
हिरडस मावळचा श्रीबाजी, ती पावनखिंड
करी रायगड रायरिचा तो जिजाइचा तान्हा
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ६
रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला
पाहिलावाहिला अष्टांगांनीं, प्रणाम हा त्याला

शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा
अनंत कोटी ग्रंथ रचुनियां जोडि तुझ्या नामा
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ७
मयूर कविच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा
कवि*कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा
देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ
जिथें रंगलीं साधींभोळीं जनाइचीं गाणीं
तिथेंच खेळे श्रीपादांची ‡ कलावती वाणी ८
विकावयाला अमोल असली अभंगमयवाणी
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी
तुला जागवी ऐन पहांटे गवळी गोपाळ
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ
मर्दांनी इष्काचा प्याला तुझा भरायासी
उभा ठाकला सगनभाउ हा शाहुनगरवासी ९
प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायला
दों हातांचा मजुरा माझा तुळशीरामाला
भीमथडीहुनि चहुंमुलखांवर फिरले धारकरी
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी
आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव
बोलघुमट घुमवीत सारखा नवलाची भाक
जेजूरीवर चढी पायरी उभी नऊ लाख १०

(अपूर्ण)

---

* केशवसुत.

‡ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर.

## कृष्णाकांठीं कुंडल*

[ कुंडल कृष्णाकाठीं नाहीं; पण घटकाभर त्याला तेथें नेलें आहे. त्या वेळच्या गांवकऱ्यांचा थारेपालट आजच्या कुंडलकरांना दगदग देणार नाहीं, अशी आशा आहे. गांवठाणाच्या या हालचालीनें भूगोलाच्या भक्तांची थोडीशी दिशाभूल झाल्यास एक आण्याच्या भूगोलपत्रकानें त्यांचें समाधान होण्यासारखें आहे.]

[ साक्या ]

— १ —

मनांत माझ्या गुणगुणतें हें रसिका कोणी कांहीं
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं "
नव्या भरानें जुन्या जिवाचें गाणें हृदयीं खवळे
फिरत्या भंवऱ्यावरी मनाच्या फेस भराभर उसळे
उचंबळुनि येतील बोल ते उधळुनि देतों वरतीं
पढिकांची चतुराई सारी येथुनि झाली परती
साधाभोळा मराठमोळा जोमदार घाटाचा
रानफुलांचा साज चढविला त्यास त्याच थाटाचा
शाहीराच्या रसवंतीला भावभेटिचें लेणें
एकसुराच्या एकसराला वालेघाटी दाणे
असेल रसिका, असलें कांहीं ऐकायाचा हेत
तर ये; मनिंच्या मळ्यांत पिकलें हें शाळूचें शेत
राखण करि त्या जीवासाठीं डोळ्यांचा हा माळा
तुझी बाहुली बसवि त्यांत, मग गोफण मारी काळा
गोफणगुंडा फाडुनि टाकी पडदा काळाचाही
तुटती धागे तीन शेंकडा उणेपुरे हे पाहीं
शिवनेरीचा हिरा चमकतो दख्खनच्या दरबारीं
रायगडाचें तटबंदीचें कोंदण साजे भारी

*या कवितेसंबंधीं थोडीशी माहिती चरित्रांत दिलेली आहे.

सह्याद्रीभर चमके त्याचा जित्या जिवाचा जोर
तेजानें बघ पाजळल्या त्या राई काळ्याभोर
त्याच लकाकीमधें तळपत्या त्या एका राईंत
कृष्णाकांठीं कुंडल शिकवी मायलेकरां प्रीत
त्या राईंतिल सगळ्या वेली एकच गाणें गाती
त्या गाण्यांतिल प्रेमकहाणी वेड लाविते म्हणती
प्रीतीचें तें गाणें होतें; सहज लागल्या नादीं
कोणी येतां जातां त्यासी तेंच सांगती आधीं
झुळझुळत्या वाऱ्यावर त्यांचीं पानें हलतांनाही
गुणगुणती तें गाणें; त्यांना छंदचि दुसरा नाहीं
वाऱ्याची धुगधुगी हलवि, तरि वेली तें कुजबुजती
सोंसाट्याचा सूर लागला तरी तेंच ओरडती
तुझ्यासारख्या रसिकासाठीं त्या तें गाणें रानीं
कळ्याफुलांच्या वेलपत्तिनें लिहिती पानोपानीं
चल, तें वाचुनि पहा एकदां बोलशील मग तूंही
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं "

— २ —

चलाच रसिका, माझ्याखातर त्या राईंत फिराया
भलत्या वेळीं, भलत्या ठायीं, भलती मौज पहाया
सह्याद्रीच्या कडेकपारी, कोठें मोठे थाट
दरीपठारी धुंडित जाणें भारी अवघड वाट
तशांत पसरुनि रात्र आपुली काळी काळी काया
दक्षिण, उत्तर झांकुनि टाकी हिरवी डोंगरमाया
थकाल वाटे रसिका; माझ्या रसवंतीच्या राया
मनासारखें मोल न मिळतां कष्टहि जातिल वांया
परंतु आतां नकाच मागें परतूं इतक्यासाठीं
मायेखातर भटकलाच ना कान्हा यमुनाकांठीं

बारामावळ देश तुम्हीही पायाखालीं घाला
—पहा पुण्याहुन कृष्णाकांठीं सहजासहजीं आला
मार्गी दिसल्या सह्यगिरीच्या चिमण्या चिमण्या बाळा
वाजवितांना फिरतां रानीं पायीं घुंगुरवाळा
भीमानामें इथें नांदते श्रीमती चंद्रभागा
पुंडलिकाची मायमावली श्रीमहाराष्ट्रगंगा
साधीसुरती बाळजिवाची डामडौलही नाहीं
बघून घ्या ही रसिका, इकडे नाचे नीराबाई
काळा दरिया काळोखाचा वरतीं भरून राही
काळ्या राईमधें खालतीं काळी कृष्णाबाई
काळोखाचें रान माजलें चंदाराणी नाहीं
तिच्याच मागें पळे तिचा तो चंदेरी दरियाही
जिकडे तिकडे काळीं रानें हमरंगानें खुलतीं
निळ्या चांदव्यालागीं नुसतीं झालरमोतीं झुलतीं
राईमधली हिरवळ आतां काळ्या रातीं कुठली
माथ्यावरची तशी कोंवळी रंगसभाही उठली
निजली दुनिया, निजला वारा, नव्हतें हालत पान
लाख जिभांची बडबड थांबुनि निजलें सारें रान
मिटुनि फुलांचे डोळे निजल्या वनदेवीच्या बाळा
उभीं झोंपतीं झाडें; त्यांचा उचलजागता चाळा
कुठें कळकबेटांतुनि निघतां सुरांत वारा वाहे
निजली राई मधुनी मधुनी वाटे घोरत आहे
क्रूर पशूंची बिनशब्दांची लपतांछपती चाल
तीं राईचीं हलतीं स्वप्नें भयाण बहु बेताल
काळे बुंधे खालीं नुसते वरतीं पान दिसेना
ठाण मांडुनी जणूं ठाकली वेताळाची सेना
त्यांतुनि चिमणे झरे चालतां झुळझुळ हळु करितात
भुताटकींतुनि जातां भिउनी रामनाम म्हणतात

भयाण रातीं भयाण राई भयाण जिकडे तिकडे
भयाण राणी भीति नांदते बांधुनि काळे वाडे
म्हणति अप्सरा आकाशांतुनि दुरून बघतांनाही
"कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं"
थरथर कांपे वरतीं जी ती निळ्या रानची राणी
त्या तर इवल्या चिमण्या परंतु, देवहि पळति विमानीं
"देवहि पळति विमानीं" म्हणसी शाहिरा! तें नीट
कोण सांग मग कृष्णाकांठीं देवाहुनि हा धीट
पहा दिसे ती काळोखांतहि हलती काळी काया
खास नसे ही नुसती तुमच्या चपळ मनाची माया

*　　*　　*

[ त्या दोन प्रेमी जीवांची गांठ पडल्यावर ती त्याला विचारते—]

कुठली दौलत या खांद्यावर मान ठेवुनी निजतें
कुण्या कुळाचें नांव उजळितें तलवारीचें पातें
कोण गडाचा उभा बुरुज हा बांका बरकंदाज
कुणीं चढविला लाजत मुरकत देहावर हा साज

*　　*　　*

[ तेव्हां तो सांगतो—]

रायगडावर धनी आमुचा, त्याला विकली काया
या देहाला, नांव साजणी, रायबागचा राया

*　　*　　*

शिवरायाच्या शब्दांसंगें नाचतसे तकदीर
दोरीपासुनि सुटलेला हा वाऱ्यावरचा तीर
मैदानावर बेलगाम कीं फिरे मोकळा वारू
भरदरियावर भरकटतां धरि फेर फिरंगी तारूं

तलवारीच्या धारेवरतीं हा जीव बारगीर
भालफळावर दिलें टांगुनी हातांनीं तक्दीर
रायगडावर खडे पसरले शिवरायाच्या पायीं
हिरेमाणकें तीं आम्हांला दुसरी दौलत नाहीं
मैदानाचा सुभा मोकळा, दुनिया मातीमोल
जिवंत मुडदा दिला गाडुनी पाताळाहुनि खोल
पळत्या पायावरचा इमला; हिरवा महाल माझा
रानगांवचे कांटे किल्ले; त्याच रानचा राजा
एकमांड घोड्यावर जाणें उत्तरहिंदुस्थानीं
भीमथडीला भाकर; तीवर गंगथडीला पाणी
जंगलशाही मिरास सारी, हिरवी दौलत न्यारी
रायबागच्या बादशहाची फिरते बेगम प्यारी
होइल असतां बाली उम्मर सूरत ऐसी न्यारी
कुंडलवाली बादशहाची बाली बेगम प्यारी
जयवंतीशीं लग्न लाविलें जेव्हां शिवरायांनीं
तोरणगडिं तें तोरण बांधिति साऱ्या कुंडलकरणी

## [ त्यानें मागें एकदां कुंडलप्रांतीं मुशाफरी केली त्या वेळीं:—]

" पायाखालीं घालुनि थकलों कुंडलचें हें सदर
दूर देशच्या मुशाफराची कुणीं न केली कदर "
" एक जिवाविण सुनेंच तेव्हां कुंडलचें हें सदर "
"आला नव्हता"–"काय साजणी "? "नव्हता आला पदर"
" गेल्या गोष्टी आज कशाला? सोडा, आतां राग
दूरदेशच्या मुशाफरा! घ्या, दिला दिलाचा बाग "
कां वेलींचीं पानें फिरलीं; फुलें लाजलीं कां हीं?
हांसलीस कां झाडावरतीं तूंही मैनाबाई?

[ तिनें बरोबर घेऊन चला असा हट्ट धरला तेव्हां तो म्हणतो व ती त्याला उत्तर देते—]

तुझ्या कपाळीं सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी
करवंदीची कांटेजाळी, परी आमुच्या भाळीं
रायगडावर उघड्या पडल्या नव्या हिऱ्यांच्या खाणी
नटेल त्यांनीं रायबागच्या रायाजीची राणी
टकमक टोंकावरी राहणें चढण उभी ती फार
पडेल खालीं बघतां असली नाजुक नवती नार
प्रीतिच्या पंखांनीं येइल टाकुनि मागें गगना
रायबागच्या राघूमागें ही मान्यांची मैना
थंडीची हुडहुडी निवाली, सरता झाला माघ
रायगडावर जागा झाला जंगलांतला वाघ
शहरगांवच्या हिरव्या फिरत्या पोरी चुकल्यावाणी
उजाड रानीं पडल्या तर त्या लागतील ना झुरणी?
चला विचारा त्या वाघाला कधीं लागली पाठी
तुझी रानची राणी कुंडलच्या बाजारासाठीं
वाघाची किंकाळी मोगल घोड्याची कीं टाप
ऐकुनि छातीवरच्या चोरी सुटेल ना थरकांप
तरीच कां ही कमरेवरची नागिण इतकी रोड?
रायबागच्या रणमर्दाची जन्माची जी जोड
शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच दिली का शीक?
रायबागचे राघू पढले पोपटपंची ठीक
नाहीं कोणी फसावयाचें बोल असे ऐकुनिया
दुसरी ग्वाही गाते आतां अलम दख्खनी दुनिया

[ तरी तिचा निश्चय फिरविण्याकरितां तो सुचवितो—]

फसाल पुरत्या; असल्या गांठी जन्माच्या ठरलेल्या
बनी बनाइ बदलायाची नाहीं कांहीं केल्या

" तेंच सांगतें—जिवा जिवाच्या आतां नजरा जमल्या
बनी बनाई बदलायाची नाहीं कांहीं केल्या "

[ तिचा निरोप घेऊन स्वारींत गेला असतां—]

फुलां फुलांतुनि रंगत होतीं मधुर सुगंधी स्वप्नें

[ झाडावरच्या मैनेला दूती करून—]

सखेसंवगडी म्हणतिल ज्याला " रानगांवचा राजा "
खूणगांठ ती मैनाबाई–तोच शिपाई माझा
तोच दिलाचा दोस्त, जिवाचा माझ्या मालक तोच
जें जें माझें त्याचें त्याची झाली त्याला पोंच
झाडावरचा राघू झाला जसा तुझा बेमान
तसाच राघू रायबागचा, कापी माझी मान
वाऱ्यावरतीं उडती फिरती असली मैनाराणी
तुझ्या गडयानें परी सोडितां झालिस बापुडवाणी
आणिक जें जें सुचेल तें तें सांग साजणी बाई
पढवणूक ही नको, तुलाही कळतें सारें कांहीं
भरकन गेली उडूनि मैना; उरे मराठी मैना
हुरहुर करुनी जीव भागला काय सांगणें दैना

[ पुढें तो घायाळ होऊन मेला तेव्हां—]

जीव सांडुनी पडला माझा जीवाचा अलबेला
तोंडीं माती पडुनि रंगला जोबनरसरंगेला
शिवबांच्या शिरपेंचासाठीं-बोली ठरली होती
तोडुनि मंगलसूत्र जिवाचा देणें माणिकमोती
शिवनेरीच्या शिवा, कसा हो केला माझा घात
हातावरचा राघू नेला उडवुनि हातोहात
घारीनें झडपिला हातिंच । बघतां बघतां हार
पुढतीं केला हात जरा तों विरून गेली गार

चुना लाविला पानाला तो अजुनि वाळला नाहीं
विडा घेतल्यावांचुनि केली कांहो इतकी घाई ?
असें जसेंच्या तसेंच वठलें जातें पाउल तुमचें
पाय काढिला इथून पुरता; पुन्हां न परतायाचें
अखंड भरला नव रंगांनीं हा इष्काचा प्याला
दुनिया झुकती है ये हरदम; नहीं झुकानेवाला

[ संदर्भ न लागणाऱ्या ओळी ]

जशी रानच्या पत्रीसाठीं रुसे मंगळागौर
रुसा साजणी, फुलते गुलशन दिलेचमनकी और
लपंडाव हा सरला राया, राज्य तुम्हांवर आलें

..........................................................

हंसेल बाई या बोला ही साधीभोळी राई
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं "

[ त्या शोकानें तिचा अंत झाल्यावर— ]

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही
" कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं

( अपूर्ण )

---

## नटमित्रास पत्र *

[ दिंडी ]

ज्येष्ट बंधो ! साष्टांग नमस्कार !
बांधवाचा घे आधिं गुणाधार
मान्य करुनी ही विनंती विशेष
वृत्त ऐकें सप्रेम मम अशेष.

---

*कै० गोविंदाग्रजांनीं हें पत्र सुप्रसिद्ध नट रा० रा० गणेश गोविंद बोडस यांस पाठविलें होतें.

पत्र पूर्वी तुज पाठविलें त्याचें
त्वरें प्रत्युत्तर खास यावयाचें
असें आधीं घेतलें मन्मनानें
परी ठरलें भलतेंच अनुभवानें.
पाहुनीयां परि गय पत्र याचें
कठिण तुमचें मन कठिण द्रवायाचें
शब्दसुमनांचा म्हणुनि करुनि झेला
पाठवीं मी; हा तरी वरिच झेला.
जरा तुमच्या मी दृष्टिआड होतां
सृष्टिआडहि झालोंच काय आतां ?
वाढलें हें जरि अंतर स्थळाचें
काय प्रेमांतहि तेंच व्हावयाचें.
आळसानें कीं हा प्रकार झाला ?
पात्र किंवा मी नसें उत्तराला ?
राग अथवा का अजुनि नाहिं गेला ?
प्रेमसिंधुच कीं मुळीं शुष्क झाला ?
निकट असतां जो स्नेह दाखवीला
भासला तों तें सत्य मन्मतीला
आजि कळला परि खरा अर्थ त्याचा
भासला कीं तो तुझ्या अभिनयाचा !
खरा नट तूं, रे नटवरा खराच
तारतम्याचें ज्ञान परि न साच
अभिनयाची तुज शक्ति तर असावी
समय पाहुनि ती परी दाखवावी.
रंगभूमी अभिनयें भूषवावी
तीच वृत्ती सर्वत्र परि नसावी
कालपट जरि दृष्टीस आड आला
तरि न विसरावें कधीं मित्रतेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठ
नोंदणी शु. नं.
ग्रं. क्र. ...२६८०७
विभाग ...काव्य
क्रमांक ...२८१

एकट्यासाचि तुज दोष देत नाहीं
वृत्ति सर्वांची हीच दिसत पाहीं
कांहिं काळें भेटतां तुम्हां कोठें
ओळखीसहि विसराल असें वाटे !
ओघ कवितेचा येथवरी चाले
पत्र तुमचें इतक्यांत हेंच आलें
खिन्न माझें मन सुप्रसन्न होत
प्रवाहाचा बदलुनी रोंख जात.
पुढिल कार्यक्रम अजुनि ठाम नाहीं
परस्वाधिन ही गोष्ट असे पाहीं
छत्रपतिच्या पत्रांत परि तयाचा
कांहिं केला उल्लेख तोच वाचा.
लेखनाचें कौशल्य फार माझें
तुझा उपहासच त्यास योग्य साजे
लिहित बसणें तुम्हांस नित्य पत्रें
लेखनाचें कौशल्य हेंच सारें.
असें वरचेवर पत्र पाठवावें
आणि प्रकृतितें नित्य जपत जावें
उण्या अधिकाचा राग नच धरावा
भूतकालासह तोहि भूत व्हावा.
बहुत लिहिणें वद काय याहुनीही
विनति नित्याची लोभ असावा ही
काव्यदेवीतें द्यावया विराम

देइ आज्ञा—

आपला—

मित्र,

“ राम ”

[ओवी]

मुक्काम—नागपूर शहर
वार—पवित्र गुरुवार
तारीख—एकोणीस नोव्हेंबर
एकोणीसशें आठची ?

---

## लोकमान्यांस भारतवर्षाचा आशीर्वाद !

[ लो० टिळक स्वराज्याच्या मागणीसाठीं इंग्लंडास गेले त्या दिवसाकरितां ]

[ चाल—चन्द्रकान्त राजाची ]

अमृतसिद्धि हा योग मंगलचि जग सगळें गाय
महाभाग जन ! सुखं गम्यतां पुनर्दर्शनाय
जें जें नश्वर गेलें निघुनी काळाच्या पाठीं
अमृत तेवढें उरलें केवळ या दिवसासाठीं
अंधाराची वाट कंठिली फिरलों संकटीं
चार युगांची रात्र भोगिली या दिवसासाठीं
रोज उगवला, रोज परतला, होउनि बहु कष्टी
आनंदें रवि आज उगवला या दिवसासाठीं
दक्षिणसागर होउनि घटिकापात्र निरभिमान
मोजित होता या दिवसाचें मंगल घटिमान
उंच उभारुनि मान हिमालय तिष्ठत केव्हांचा
पहिला वहिला किरण पहाया या शुभ दिवसाचा
गंगासिंधू धांवत होत्या आंदोलित हृदया
या दिवसाच्या या सूर्याला अर्घ्योदक द्याया
स्वस्तिवाचना सिंहगडावर चढला गगनांत
थरथरुनी श्रीतानाजीचा तो तुटका हात
मंगल दृष्टचा बघे पांचही करुनि प्राण गोळा
पंजाबी सिंहाचा दुसरा फुटकाही डोळा

व्यासवाल्मिकीकालिदास कवि आळवीत बसले
या दिवसाच्या भूपाळीस्तव वाङ्मय तें तसलें
योगिवृंद गिरिकंदरिं बसुनी लावुनि अवधान
पहात होते या दिवसाचें चिन्मंगल ध्यान
आर्यभट्टमिहिरादि काढुनी गगनाचा ठाव
हुडकित होते या दिवसाचें एकदास नांव
सोरठचा श्रीसोमनाथही या दिवसासाठीं
पडे त्रिस्थळीं फुटुनि लागतां महंमदी काठी
तिष्ठत अट्ठावीस युगांवर भीमेच्या कांठीं
खडा पहारा पांडुरंग करि या दिवसासाठीं
अठरा पद्में सेना योजुनि जलधीच्या पाठीं
श्रीरामांनीं सेतु जोडिला या दिवसासाठीं
अठरा अध्यायांची गीता एक मुक्तकंठीं
रणीं गाइली श्रीकृष्णांनीं या दिवसासाठीं
चितुरगडावर आग लागली या दिवसासाठीं
पानपतावर रक्त सांडलें या दिवसासाठीं
पोट बांधुनी वेद राखिले सरस्वतीकांठीं
पुण्याई ती सर्वहि केवळ या दिवसासाठीं
जन्मा येती बाळ टिळकही या दिवसासाठीं
जन्मति श्रीमान् पंचमजॉर्जहि या दिवसासाठीं

* * *

तहनाम्यावर सही घालितां करि खालीं मान
दुसरा बाजीराव बघे वर धरुनी अभिमान

* * *

नलगे दौलत नलगे बरकत नको कोहिनूर
स्वदेश नलगे स्वराज्य नलगे हो सर्वहि चूर
एक सांगणें एक मागणें तेंच लाखवार
मागुनि घ्यावी श्रीशिवबांची भवानि तलवार

स्वदेशभूषा, स्वराज्यजननी सकळिं दाखवावी
दावित दावित सौभाग्यश्री स्वदेशिं आणावी
चहुंमुलुखांतुनि नवखंडांतुनि मिरवित आणावी
रायगडावर समाधिची मग पूजा बांधावी
म्हणेल जो तो ऐन जिवाचा देशभक्त कट्टा
सर्वस्वाचा ताम्रपटचि तो तोच अमरपट्टा

(अपूर्ण)

---

## कारंजाचें चढतें पाणी

यंत्रबंधनीं तिर्यजलातें अवरोधुनि यापरी
चढवितां सांगा, कांहो वरी!
प्रवहण भूपृष्ठावर ज्याचा सहजधर्म हा असे
स्वर्गीं चढेल कां तें असे?
क्षणैक चढलें तरी निदानीं मातीवरती पडे
होइल चिखल मात्र चहुंकडे!
पाट बांधुनी मार्ग सुगम त्या करुनी दिधला जरी
जगतिल माळ मळे कितितरी!
कारंजाचें चढतें पाणी पडतां खालीं असें
उदास "गोविंदाग्रज" हंसे!

---

## हाय हाय!

दिक्कालांनीं, अज्ञातांनीं, बांधितांच पाय
एकलकोंडें अनंत कविमन रडे धाय धाय
वाहे वारा कसा भरारा, वातचक्र फिरतें
नव्या जुन्या पानांचें विश्वचि तयांत गिरगिरतें
कण धूळीचे उडुनी जाती त्या वाऱ्यासंगें
हाय! हाय! परि ठायिंच ठरतीं माझीं जड अंगें

या पृथ्वीचें आकर्षण हें मला तोडवेना
पायांखालीं जरी तुडवितो परी सोडवेना
जर इवल्याशा वाऱ्यावर हें जग गिरक्या खात
मला न उडवी कसा मनींचा हा झंझावात
हा वाऱ्याचा दरिया पाहुनि तसेंच बसवे ना
परि पोहाया बघतां माझें अंगच हालेना
वायुसागरावर फेनाचे थेंबचि शतधारा
तशा उसळती वरतीं वरतीं लखलखत्या तारा
किंवा वरुनी कुणि वाऱ्याची ही गंगा ओती
नभोनिधीच्या उदरीं उडवी हे पळते मोती
दिसतां मज तीं हवीं वाटतीं पुष्पें काळाचीं
परी नयन इथुनीच टाकिती किरणें आशांचीं
लाख तारका नभीं सहज या ठेविल्यात देवा
दोनच कां या नयनिं कोंडल्या; त्याहि तिथें ठेवा
मनांत माझ्या कुणी गातसे नवलाचे सूर
मलाच ऐकूं येति न; नुसती लागे हुरहूर
माझें गाणें तें ऐकुनि मी व्हाया बेभान
एकसारखा करितों माझ्या जीवाचा कान
हाय हाय तें ऐकूं येत न; झालों हैराण
मलाच लागति तीव्र सुरांचे मनांतले बाण
आग लागतां कुठें तेथुनी भडकतात ज्वाळा
वाऱ्यावरती पळतां पळतां भेटतात काळा
किती भावना, किती श्वासही त्यांसह जातात
हाय हाय ! कां मलाच त्या मग इथें टाकतात
देवा ! अंतरिं आग भडकुनी जळून जाऊं दे
त्या ज्वाळांमधिं माझी ज्वाळा मिसळुन वाहूं दे
मेघपृष्ठिवर रुद्ध चंद्रिका वर तेजा पाडी
इथेंच राहुनि जीव बिचारा मना तिथें धाडी

त्या तेजस्वी ओसाडीवर खेळे जों आशा
पायांखालीं कठिण भूमि तों बांधित निजपाशा
हाय हाय त्या मेघांमधली एखादी बिजली
जागी होइ न; त्यांची सारी सृष्टिच का निजली
कडकडुनी पडतांच तनूवर सुटेल हा जीव
हाय हाय! परि कुणालाच कशि येईना कींव
येतें कांहीं जातें कांहीं मी नुसता बघतों
कोणी येतां जातां मोठ्या आशेनें उठतों
उडत्या पंखाचा जीवाला लागतांच वारा
तिथल्या तिथेंच हालचालिचा खेळ होत सारा
शरीर माझें जग हें माझें परी जीव घेतें
जिथें तिथें हें माझें मजला कसें आड येतें
नको मला जें, दिसे न त्या जें, तसेंच नाहीं जें
तें आणाया, तेंच बघाया जीव न हा लाजे

(अपूर्ण)

---

## श्रीमत् राजाधिराज पांचवे जार्ज
## हिंदुस्थानचे बादशहा
### यांच्या राज्यारोहणानिमित्त पदें.

[ चाल—अभिवादन करित० ]

अभिनंदन करितों प्रांजलि। मंगल कालीं ॥ ध्रु०॥
प्रजाजनांच्या मंगलवचनीं। वाद्यें वाजति सकलहि भुवनीं
शुभलग्नीं सुमनोहारांनीं। श्रीवसुंधरा तुज वरुनी। पावन झाली १
पितामहीसम अमरसुखातें। सेवि भूवरी त्रिभुवननृपते
जी शोभा दे तव जनकातें। शांतवृत्तिला त्या हातें। बसवी भालीं २
क्षमादयागुणकिरणीं रमवी। सदाहि भूपा वसुधा देवी
जन सारे सदया करि तेवीं। तव कृपाचंद्रिकाजालीं। वैभवशाली ३

[ चाल—दावर दादर ]

विनति नाहीं इतर कांहीं, सदाहि स्वजनकसम तूंही पाहि नाट्य-कलानिरत जनां कृपेक्षणांहिं ॥ ध्रु०॥ कुंठितगति होति न जरि नृपकरिं । ललितकला सकला । भूपाल तरि तयाला । द्रुततरगति वितरुनि अति पसरवि यश दश दिशांहिं ॥ १ ॥ चंद्रबिंबकांति पसरि जगभरि । तिमिर जी निवारी । होई न तापकारी । शमधन जनिं उधळि सतत तदमृतकण निजकरांहिं ॥ २ ॥

पुणें, २२।६।११.

---

## प्रेमशोधन

कोणी एक कवि स्वकीय हृदया घेऊन आहिंडत
प्रेमाचा करि शोध जें जगिं जना कष्टाविना लाभत
विश्वाचें अति गूढ धुंडुनि बघे ज्ञानाप्रती वास्तव
होता प्राणहि द्यावया विनिमयें तो शुद्ध प्रेमास्तव

( अपूर्ण )

---

## गाणें चांगलें कसें असावें ?

संगीताची करी योजना विधि कां जगतींत
हेंच कळेना पामर जीवां; हृदयिं न संगति ज्यांत
भिन्नभिन्न हृदयांत भाव जे शब्दां पर असती
संगीताच्या नादावरि ते बाहेरी येती
पशूस मोही गीतध्वनि ही दंतकथा नच कांहीं
पशु-मानव यांमधील सांधा ती जमवी पाहीं

( अपूर्ण )

---

## काव्याची व्याख्या.

शब्दांमध्यें, अर्थांमध्यें, प्रासामध्यें काव्य नसे
नानारंगी वस्तूंतहि नच सौंदर्याचा लेश वसे
सिंहाचें बळ अफाट म्हणजे शौर्याचें तें स्थानच का?
गोड सुरावट वेळू करिती गाणें त्याला म्हणूं नका
उंची इमला शिल्प दाखविल, शोभा म्हणजे काव्य नव्हे
काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें

* * *

काव्याची रचना नसे कठिण ही, अर्थास लागे कवि
आलीं वक्र जरी प्रकाशकिरणें तेजास दावी रवि
अर्थावांचुनि बोल सुंदर जरी शोभा न त्यातें असे
शृंगारूनि उगाच प्रेत, परि तें; जीवंत का होतसे ? १
(अपूर्ण)

---

## समशेर दुधारी दिसतां—

[ चाल—उद्धवा शान्तवन कर ]

समशेर दुधारी दिसतां । कां भीसी ऐसा बा रे
मरणाची मिळकत लोकीं । तूं मी हें विश्वचि सारें
या कीं त्या धारेवरती । मरणाचें लागे वारें
॥ चाल ॥ जरि शेवट एकचि साचा
मग वृथा वाद दोघांचा
कोणीही कोठें नाचा
प्रेमांतचि होवो कांहीं
तो नाच जरी प्रेमाचा । मग वादचि राहत नाहीं १ *

---

* ही कविता रा० के. मा. सोनाळकर यांच्या "द्वैत कीं अद्वैत" या कवितेस अनुलक्षून लिहिली होती.

## गुलाबाच्या पाकळ्या

मैना भटके बनांत। वेडा राघू झुरतो मनांत ॥ ध्रु० ॥
विस्कळले पर, पिसें विखुरलीं, गळले दोन्ही पांख
अखंड झरणी झुळझुळ लाविति अरधे उघडे आंख १
हालचालही हरली सारी–कुठलें चारापाणी
बसल्या ठायीं खिळून बसला चित्र रेखिल्यावाणी २
घुमे पारवा इकडे, तिकडे त्या घुबडाचा घूघू
जित्या जिवाची समाध बांधुनि मधेंच बसला राघू ३
(अपूर्ण)

---

## निर्दय बालेस

अखेर झाली आतां। घे हा। प्रणाम जातां जातां ॥ ध्रु० ॥
जिंकुनि तुजला प्रेमें होइन दास तुझा जन्माचा
या आशेवर जीव टांगला होता या दीनाचा १
नजर जराशी तुझी बदलतां थोडा थोडा होई
वेडा माझा जीव बुडविला तूं शोकाच्या डोहीं २
होतें नव्हतें त्याची केली तुझ्या ठिकाणीं पोंच
जीवाच्या जाळ्यांत झेलला शब्द न पडला तोंच ३
रूप मनोहर असलें बुद्धिहि तीव्र लाभली तुजला
खऱ्या गुणाची पारख कांहीं असेल तव हृदयाला ४
वेडी आशा अशी धरुनियां धडा जिवाचा केला
भल्याबुऱ्याचा भेद न तुजला अनुभव भलता आला ५
केल्या ज्याच्या पायघड्या मीं तुझ्या पावलांसाठीं
त्या हृदयाला तुडवुनि गेलिस नटव्या थाटापाठीं ६
जग सगळें हें डोळ्यापुरतें, रूप जिवाला पुरतें
उदार हृदया परि निर्दय जग दगडाखालीं पुरतें ७

ज्या देवानें जग हें केलें ज्या प्रेमें हें चाले
त्या देवाला, त्या प्रेमाला, जाळिन आतां बाले ८
जगावांचुनी लाभतीस तरि जग मीं केलें असतें
तुझ्यावांचुनी जग हें आतां असुनें झालें नसतें ९
दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नांवा
परतायाचें नाहीं आतां त्या प्रेमाच्या गांवा १०
होइल होइल वाटत होतें तेंच अखेरिस झालें
नांव घेतल्यावांचुन आतां मनांत झुरणें आलें ११
(अपूर्ण)

---

## दिवाळी

जी दुःखी कष्टी जीवां दुसरी माता
वाढत्या वयांतहि लोभ जिचा नच सरता
त्या निद्रादेवीच्या मी मांडीवरतीं
शिर ठेवुनि पडलों घ्यावयास विश्रांति
भोगितां या परी शांती। दिव्य ती
निजतात जगाची नातीं। जागतीं
जाळत्या मनाच्या वातीं। लोपती
धडाधडां भोंवतीं तोंच फटाके उडती
मी जागा होउनि पहात बसलों पुढतीं
तों कळे उगवला आज दिवस वर्षाचा
वर्षाव जगावर करीत जो हर्षाचा १

*　　*　　*

ही जुनी दिवाळी नव्या दमानें आली
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गालीं
या नव्याजुन्याच्या मंगल संगमकालीं
जगिं आनंदीआनंद झूल जणुं घाली

चहुंकडे दिवे हे; दिवेच वरतीं खालीं
स्वर्गीय अग्नितेजानें जगती न्हाली
काढिलें फोल विश्वाचें। चाळुनी
या रसांत नव तेजाचे। जाळुनी
ढीगच्या ढीग हीणाचे। गाळुनी
सत्त्वाचें बावनकशीच सोनें सारें
ठेविलें करारे लक्ष्मीपूजन या रे २

ही त्रयोदशी धन पूजायाला असलें
काढिलें जुन्यांतुनि नवें मनीं जें ठसलें
जरि घरोघरीं नव धन हें हांसत बसलें
नच परवा लेणें जुनेंच असलें नसलें
तीं लेणीं गतकाळाचीं। सर्वही
टाकिते गिळुनियां साची। जणुं मही
उघडते नव्या खात्याची। ही वही
जी झरली खरली शोभा वर्षाजालीं
ती पुन्हां लागली ल्याया सृष्टी सगळी ३

पालवी पळाली कधींच मधुमासांची
धुंदीही नाहीं आतां वर्षावाची
तरि साधीभोळी माता देवी सरला
हें तत्त्व शिकविते चुकल्या मुकल्या बाळा
जें जुनें फार उपयोगें। जाहलें
त्यांतुनी आपुल्या जोगें। जें भलें
रंगवा नव्या नवरंगें। चांगलें
प्रतिवर्ष नव्याला जन्म जुन्यांतुनि देई
होळींत जाळितां शिशिर वसंतचि येई ४

*  *  *

अति निर्मळ जलयुत श्यामपुलिन सरिता या
घनदाटतमांतुनि चिमणासा शशिराया
जें काल पेरलें तेव्हां वाटे गेलें
ते आज पिकाला आलें शतपट झालें

(अपूर्ण)

---

## लक्ष्मीपूजन

ही सरती संध्या या साळाची जमली
तिजसवें दिवाळी आज भराला आली
जनमनें उसळलीं; आनंदानें हंसतीं
प्रतिबिंबदर्शना लाख लाविल्या वाती
नवनव्या परीचे दिवे भिन्नरंगांचे
मांडिलें प्रदर्शन तेजोमय सौंदर्याचें

(अपूर्ण)

---

## गोफ •

[• [ घटनेपेक्षां विघटना सुकर असते, हा व्यवहारी जगाचा सिद्धान्त आहे. हृदयाच्यां:ब्रह्मांडांतही ज्यांना हेंच सत्य पटलें आहे ते भाग्यशाली !]

पदर आणिले तुझे कांहिं तूं माझे आणीं मीहि तसा
हांसत खेळत गोफ गुंफिला कळलें नाहीं कधीं कसा
एकामेकाभवतीं फिरतां, गिरकी जीवांना आली
चढत चालला खेळ जसा तो नजरहि धुंद तशी झाली
कुणीं निंदिलें कुणीं वंदिलें, कुणि हंसलें रडलेंहि कुणी
नाहिं पाहिलें आम्हीं तिकडे, विश्व बुडालें प्रेमगुणीं
परि दैवाचा खेळ निराळा-खेळ नकोसा तुज झाला
ज्या खेळानें जीव रंगला, त्याचा कंटाळा आला

गोफ गुंफिला उलगडण्याचा कठिण काळ येउनि थडके
हाय, वदावें काय जिवलगे, ऊर तेवढा हा धडके
हळूहळू ओढणें हळु जरा, ओढायाची कां घाई
भलता धागा ओढितांच तूं, जीव जिवलगे; हा जाई
थांब उलगडूं गोफ कठिण हा शांत बुद्धिनें सखे असा–
कीं न तुटावा पदर एकही, धागा धागा नीट तसा
ना तरि होइल हानि आपुली आणि जगाचें हंसें तसें
एक्या ठायीं आलों कां वद दूर व्हावया सखे असें
कठिण असे, तरि उलगडणें हा गोफ असे आतां भाग
नातरि त्याचा पीळ राहुनी छळील तो जागोजाग
मनापासुनी जें केलें, जें मान्य जिवांनाही झालें
विमनस्कपणें परी आज तें निस्तरणें नशिबीं आलें
कठिण जोडणें, परी तोडणें सुकर वाटतें जनांप्रती
उलटा अनुभव आला आम्हां, गुंग जाहली इथें मति

[ अनुष्टुभ् ]

खोळितां गुंफिला गोफ, जीव त्यालागिं वाहिला
" गोविंदाग्रज " सांगेना—कीं त्याचा पीळ राहिला

---

## हृदयास

जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली कां असली ?
लाथ मार त्या चंचल जगता, प्रेमाचीं सोंगें कसलीं !
चंचल, लहरी, रंग वेगडी सुंदरतेच्या मोहानें
कां वाटेवर पडशी हृदया ! विकुनी कवडीमोलानें
तुझ्या जिवाच्या बोलापाठीं हपापले हे रसिक पहा
स्वागत करि जा त्यांचें त्यांना हर्ष किती होईल अहा

नटव्या सोंगामागें लागे जें त्या सौंदर्यासाठीं
नवलाखाचें मोल देसि कां? कशास या आटाआटी
जिथें गुणाची चाड न कांहीं कमअस्सल जें जातीचें
सौंदर्याचि तें कसलें? केवळ एक बाहुलें मातीचें
विद्यावैभव कुठें तुझें, तो ज्ञानाचा गौरव कोठें
आणि कुठें रंगीत खेळणें? नवल खरोखरि हें मोठें
उदारता तव विशाल पाहुनि देवालाही मोह सुटे
आणिक असलें खोटेंनाटें नकली नाणें सांग कुठें
गर्वाचें घर खालीं पडुनी खुशाल मिळुं दे मातींत
रसिकांच्या मृदुहृदयमंदिरीं रहा, निजयशा मिरवीत
चिताडसी कां? चित्र जिवाचें पाण्यावरच्या रेषांनीं
"गोविंदाग्रज" सांगे तुजला रहा त्याहुनी स्वस्थानीं

मुंबई, ता. ९।३।१६.

---

## शेवटचें प्रेमगीत

[ चाल—मला शांत मुनि भासतो.]

तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आतां। टाकितां तूं असें या अनाथा ॥ ध्रु० ॥
सात वर्षे सखे हर्षद स्वप्न जें। पाहिलें, भोगिलें तेंच आतां
घोरतिमिरा निशा सहज भय देतसे। जीव हा एकला आज उरतां
अश्रुधारा पहा वाहती निर्भरा। चित्त विव्हल; नसे वृत्ति शांता
नयनजलिं नाहतां, त्यासवें वाहतां। पाहिना तुजविना जीव जगता
जीवनव्याप हा व्यर्थ वाटे पहा। नयनविषयाच ही विश्वसंस्था
कांहिं नाहीं पुढें, जीव तिमिरीं बुडे। स्तिमित वा बधिर वा जात अंता
नाश तरि सर्वथा होउं दे एकदां। आपदा लोपवी रे कृतांता
कष्टला जीव हा दुःखमात्रावहा। शून्यशा जीवितांप्रति वहातां
यत्न केले सखे! रत्न तुजसारखें। कधिं तरी व्हावया प्राप्त हातां
अन्य घटना परी नाकळे कां करी। देव कीं दैव कीं तो विधाता!

जन्म हा व्यर्थसा होत, होवो तसा। सर्वथा शिवपरा ईशसत्ता
प्रेमयज्ञाप्रति प्रथम ही आहुति। अपरिहार्यांच जी जीवजाता
एक आशा उरे-( तीच परि मज पुरे )। तिजसवें जीव करि एकमयता
जन्मजन्मांतरीं एकदां क्षणभरी। प्रेम लाभो तुझें शोकघाता

[ अनुष्टुभ् ]

भावोल्लेखार्थ आलेखी कष्टदें शोकनिग्रहें
'गोविंदाग्रज' हे बोले अंतिम प्रेमगीत हें

मुंबई, १।६।१६.

---

## तीन तरी

[ जीवनाच्या काव्यांत, 'जर, पण, परंतु' हीं इच्छेला विरोध करणारीं उभयान्वयी अव्ययें दुबळ्या मनुष्याला विश्वनियंत्या ईश्वराशीं जोडीत असतात.]

चल, सख्या जिवारे पुन्हां घरीं। कां उगाच फिरसी पिशापरी ॥ ध्रु० ॥
घाय लागुनी कांच तडकली। पुन्हां जोडणें कुणी तरी,
तीं कशी तरी कीं कधीं तरी ॥ चाल० १
कळस देवळावरला ढळला। पुन्हां बसाविणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० २
वेजीं उतरे मोतीदाणा। पुन्हां सांधणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ३
हार घेउनी घार पळाली। पुन्हां आणणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ४
लवून गेली बहार बिजली। पुन्हां पाहणें कुणी तरी.
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ५
लाट झळांतरिं पळतां जिरली। पुन्हां चढविणें कुणी तरी,
ती कशी तरी कीं कधीं तरी ॥ चल० ६
सूर विरालां वाऱ्यावरतीं। पुन्हां छेडणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ७

फळे सपाटीवरतीं पारा। पुन्हां बांधणें कुणी तरी,
तो कसा तरी कीं कधीं तरी ॥ चल० ८
घडूं नये तें घडून गेलें। पुन्हां घडविणें कुणी तरी,
तें कसें तरी कीं कधीं तरी ॥ चल० ९
'गोविंदाग्रज' बघे सदाही। या संसारीं नवलपरी,
कीं तरीमागुनी तीन तरी ॥ चल ॥ १०

पुणें, ता. १९।४।१७.

---

## सेवावीं म्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही?

[ मंदाक्रांता ]

म्लेंच्छोद्योगा प्रशमुनि करी मुक्तता आर्यभूची
गोभूदेवां सुखवुनि खरी केलि वाणी गुरूची
धर्मा रक्षी; जगतिं उपमा ज्या शिवाजीस नाहीं
सेवावीं म्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही? १
शौर्यें धैर्यें स्वगुरुसम जो शत्रु ज्या काळ मानी
संभाजी तो निरुपम गमे आर्यधर्माभिमानी
देतां धर्मास्तव निज तनू भीति ज्यातें न कांहीं
सेवावीं म्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही? २
देशोद्धारास्तव झटुनिही कालमानें जयाची
हो दुर्दैवें सतत गणना 'बंडवाल्यांत' साची
नाना नामें न कधिं सुचुं दे पाश्चिमात्यांस कांहीं
सेवावीं म्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही? ३
देशोद्धारीं श्रम बहु करी गाजवी नाम 'टोपी'
घाली आत्मप्रचुरमतिनें टोपिवाल्यांस टोपी
ज्याचें नामश्रवण सुटवी कंप आंग्लांसिही ही
सेवावीं म्यां चरणकमलें कां न त्याचीं सदाही ४

२३ ऑगस्ट १९०७.

मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणे.
नौपाडा शाखा.
अ. क्र. २९८०७
विभाग पद्य २२
क्रमांक ९१८

## बिपिनचंद्रपाल यांची सुटका झाली यास्तव

[ आर्या ]

श्रीमद्भारतवर्षा ! हर्षाचें काय एवढें काज ?
विविधापदास्पदा तुज सौख्य असें काय वाटलें आज ? १
पितरांच्या अनुकरणें किंवा स्मरणेंच मुदित तव बाल ?
नवल गमे नाचति कां भोगित असतां असे कठिण हाल ? २
चंद्र सकलकलाहि परि इतुका मंदप्रकाश कां झाला ?
द्रवला तुझिया स्थितिनें किंवा कोणास पाहुनी दिपला ? ३
पावे भयासि कां भय ? धैर्या कां धैर्य एवढें येत ?
लपतो स्वार्थ असा कां ? देशद्रोहस्वघातसमवेत ? ४
यांचा कां याचितसे त्वदितर देशीं रहावया स्थान ?
चीत्कार कुणा भिउनी असत्य तें करित सोडुनी भान ? ५
सुख कां वाटे इतुकें आतांचि स्वावलंबना सांग ?
टपुनि बसे कां गगनीं स्वतंत्रता तुज वरावया सांग ? ६
का झाले मेघ मुके ? सिंहहि कां गर्जना करित नाहीं ?
झाला लज्जायुत कां ? अधिकारोन्माद यापरी पाही ७
लीना वृत्ति कशानें श्वानगुणासह पळावया लागे ?
या न्यायदेवतेसहि वाटतसे लाज कां अशी सांगे ? ८
स्तविती कां जगदीशा आनंदानें तुझे सकल तनय ?
वदनांबुजें तयांचीं प्रफुल्ल व्हायास जाहलें काय ? ९

पुणें, १३।३।१९०८.

---

## कां ?

पंख तोलुनी गरुड सारखा फिरत असे कां आकाशीं ?
विचार जाउनि जा त्याशीं !
महानदातें प्रसवि हिमालय राहुनि कां एकलेपणें ?
हेतु तयांतिल तो जाणे !
प्रकाश जगतीं पाडुनि फिरतो सूर्य असा कां गगनांत ?
उत्तर त्याच्या हृदयांत !
कष्ट सोसुनी महात्मजन कां झटती लौकिककल्याणा ?
चला विचारूं या त्यांना !
झाले साडे दहा ! पहा हा टोला पडला जोरानें—
जग मेलें त्या टोल्यानें !
'गोविन्दाग्रज' म्हणे असूं द्या असेल जें त्यांचें कांहीं !
मार्ग आपला हा नाहीं !

---

## देवाघरची दौलत हरपतांना पाहून

### पद

[चाल—आनपरी दरबार०]

नाचत ना गगनांत । नाथा । तारांची बरसात ॥ ध्रु० ॥
आणित होती । माणिक मोतीं । वरतुनि राजस रात
नाव उलटली । माव हरपली । चंदेरी दर्यांत
ती ही वरची । देवाघरची । दौलत लोक पहात

---

## वीरमरणाला शोभण्याजोगें गाणें

[चाल—अजि अक्रुर हा नेतो० ]

निज बाळारे गाणें गाते आई । करि आतां जो जो गाई ॥ ध्रु०॥
तुज जन्म दिला बाळा त्यांची स्वारी । लाखांत शिपाई भारी
बघ गरदी ही बुरुजांची तुजभंवतीं । दगडाची त्यांची छाती

कलिकाळाशीं झगडणार खंबीर । हे तुझेच हिरवे वीर
जीवांच्या जळत्या ज्योती
आकाशीं तारा होती
मोलाचीं माणिकमोतीं
त्या डोळ्यांनीं देवराय तुज पाही । करि आतां जो जो गाई १
दों दिवसांची ही दुनियेची वसती । सारखीच असती नसती
तुजऐसा हा बाळ नऊ नवसांचा । हातचा फिरे जायाचा
ऋणानुबंधाच्या तुटल्या आतां गांठी । मग कुठल्या भेटीगांठी
हें देवा-घरचें लेणें
नशिबानें देणें घेणें
कुणितरी कुणास्तव रडणें
तीं रडणारीं रडतिल धाई धाई । करि आतां जो जो गाई २

---

## निरोप द्यावा आतां

[ चाल—सबसे रामभजन० ]

निरोप द्यावा आतां । बाळा । टाकुनि जाते माता ॥ ध्रु०॥
माझें माझें म्हणुनि आजवर जें लेणें ल्यालें
बाळ गुणाचें, हाय ! कुणाचें आज परी तें झालें
हे तारांनों, उचंबळूंद्या करुणारसरंगा
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा
घटकेचा संसार संपला, लटका ठावठिकाणा
वनदेवींनों, पदरीं घ्या, हा माझा राजस राणा
अनाथ दुबळा देह पडे हा आई नाहीं त्याला
फुलत्या फुलवंतीची यावर मायापांखर घाला
भुतें जागतां उठतां दचकुनि हृदयींचा हा ठेवा
काळ्या रातीं जित्या फुलांचा खडा पहारा ठेवा
कळतें तुम्हां सारें कांहीं, अहां फुलांच्या माता
लोभ असूं या इथून पुढतीं नाहीं बोलत आतां

---

## फूल ना फुलाची पाकळी

शहाजहानाआधीं मेली ख्यालिखुशाली ती त्याची
खडा तेवढा ताजमहालच भूषा जी या जगताची
चुकल्या तरुणा! वेश्याक्रीडन आज तुझें स्मरणांत नसे
कालिदासकृत शाकुन्तल परि सरस्वतीच्या कंठिं असे
खुनी खड्यांनीं भरले रांजण वाल्याचे फुटले सारे
उरलें रामायण तें नटवी श्रीरामा निज आधारें
गोकुळांतल्या चोराचा नच गोपींना आतां त्रास
श्रीकृष्णाची गीता उरली द्याया मरत्या उल्हास
गडगडणें, काळोख, विजा हीं गेलीं वळवाच्या मार्गें
अन्नब्रह्मचि साक्ष तयाची द्याया हें राही जागें
कांटे सुकले फांदीवरतीं-धन त्यांची झाली राना
गुलाब देवा तुम्हा वाहिला, गोड करुनि तो कां घ्याना
दूषण वगळुनि भूषणमात्रें प्रभुपूजन करि काळ असें
तुम्ही आम्ही कष्टी होणें हा कुठला मग न्याय असे

[अनुष्टुभ्]

"गोविंदाग्रज" अर्पी ही स्वभावें चरणांवरी।
रसिका घ्या फूल नाहीं फुलाची पाकळी तरी

पुणें, ता. २४।११।१७.

---

## परमाणूंचें कार्यमाहात्म्य

गिरिशिखरें खरतांना त्यांतुनि कण वाळूचे पडतात,
महासागरोदरीं तेथुनी विश्रांतीस्तव दडतात;
कालमापनास्तव जन त्यांना घटिकायंत्रीं भरतात,
क्षणाक्षणासह एक एक ते खालीं भरभर झरतात;
गिरिस्वरूपा उन्नतिच्या ते करिती देहाची घटना,
विस्तारास्तव शय्यारचना मग करणें लागे त्यांना;

झटांत अनंतर अनंतांतही शोधायास्तव परिमाणा,
कालस्वरूप कालाचीही मोजिति घटका भरतांना
निजकवनाचें मसिलेखन हें पुसुनि न जावें क्षुद्र तरी,
"गोविंदाग्रज" यास्तव त्यात्ररि वाळूचे कण हे पसरी;

---

ता. ६।४।१६.

## माझा मृत्युलेख

यावज्जीवहि "काय मी" न कळलें आप्तांप्रती नीटसें
मित्रांतेंहि कळे न गूढ—न कळे माझें मलाही तसें
अज्ञाता! मरणोत्तर प्रकट तें होईल तूंतें कसें?
कोठें आणि कधींतरी जगतिं मी होऊन गेलों असें

An April Fool's Work.
ता. १।४।१८.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
२०६०४
REFBK-0020251
REFBK-0020251

म्हणे "**" जें जें मनीं मुखीं आलें। तें तें येथ झालें ब्रह्मार्पण॥

---

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना॥

श्रीगीतोपनिषत्सु—श्रीभगवान्।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20259
ता. क्र.